# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन ॲपद्वारे)

**सभा क्रं. - ३१** **दि.१२/०८/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१२/०८/२०२१ गुरूवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील सन्मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | महाजन सुनिल सुपडु |
| नेरकर सरीता अनंत | पाटील प्रतिभा सुधीर | शेख शबानाबी सादीक |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| खान रूकसाना बी गबलु | कापसे मयुर चंद्रकांत | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | शेख हसीनाबी शरिफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | कोल्हे सिंधु विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| सनकत चेतन गणेश | कोल्हे ललीत विजय | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| भंगाळे विष्णू रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| सोनवणे राखी शामकांत | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| तायडे ज्योती शरद | जोशी अनंत हरिश्चंद्र | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | तायडे सुरेखा नितीन | **स्विकृत सदस्य** |
| काळे अमित पांडुरंग | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे कैलास नारायण |
| चौधरी मंगला संजय | मराठे जितेंद्र भगवान | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | मराठे राजेंद्र नारायण |
| सोनवणे धीरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | चौधरी महेश रतन |
| काळे दिपमाला मनोज | सोनवणे सुरेखा सुदाम | |
| सोनवणे अश्विन शांताराम | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड ,मुख्यलेखापरिक्षक श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** नवनाथ भाऊ एक मिनिट रजेचे अर्ज वाचुन घेऊ द्या मला.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.सिमा सुरेश भोळे, सौ.भारती कैलास सोनवणे व सन्मा.सदस्य श्री.भगतराम रावलमल बालाणी यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, आवाज येत आहे का ?

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोला, आवाज येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.महापौर आम्ही भारतीय जनता पार्टीच्या महापालिकेच्या नवनिर्वाचीत सदस्यांची लोकशाही पध्दतीने गटनेता म्हणुन अॅड.श्री.दिलीप बबनराव पोकळे यांची व उपगटनेता म्हणुन श्री.चेतन गणेश सनकत यांची निवड केलेली आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. आणि आपण ही करावे अशी नम्रविनंती करतो.

**मा.महापौर :-** अभिनंदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**श्री.विष्णु भंगाळे :-** अभिनंदन अभिनंदन.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषय घेण्यात यावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आम्हाला बोलु द्या, या विषयाला विरोध आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आमचा या विषयाला विरोध आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरच्या विषयाला विरोध आहे.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** धन्यवाद मी सर्वांचा फार फार आभारी आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आमचा या विषयाला विरोध आहे.

**श्री.चेतन सनकत :-** पुढील सभा कामकाज सुरु करावे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** सर्व सदस्यांनी शांतता ठेवायची आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरची निवड कायदेशीर नाही.

**अॅड.सौ.शुचिता हाडा :-** सदरची निवड कायद्याला धरुन नाही. वैध नाही म्हणुन या प्रस्तावाला आमचा विरोध नोंदवावा.भारतीय जनता पार्टीच्या उपस्थित सर्व सदस्यांचा या विषयाला विरोध नोंदवावा.महापौर महोदया.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भारतीय जनता पार्टीच्या वतीने विरोध नोंदविण्यात यावा.

**मा.महापौर :-** ठिक आहे. आपल्या सुचनांची दखल घेण्यात आलेली आहे. ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध दर्शविण्यात आलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** महासभा क्र.३१ विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १ दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) विशेष महासभेचे तसेच दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील:-** महापौर महोदया, या विषय क्र.०१ वर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला राजेंद्र भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरील इतिवृत्तामध्ये अॅड.सौ.शुचिता हाडा यांचा विरोध नोंदविलेला आहे. फक्त एकाचा नव्हे तर विषय क्र.१२ ठराव क्र.४६८ या ठरावावर भारतीय जनता पार्टीच्या सर्व नगरसेवकांचा विरोध आहे. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** गटनेता म्हणुन माझी सुचना आहे. जे ठराव मागच्या इतिवृत्तात मंजुर झालेले आहे. जे मंजुर असतील ते मंजुर करावे जे नामंजुर असतील ते ना मंजुर करावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.महापौर :-** इतिवृत्तात दुरुस्ती करण्यात यावी अशी सुचना प्रशासनाला देण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. सन्मा.महापौर महोदया,

**मा.महापौर :-** इतिवृत्त मंजुर करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) सर्वसाधारण महासभा विषय क्रमांक १२ ठराव क्र.४६८ मध्ये सन्मा.सदस्या.अॅड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांचा विरोध दर्शविण्यात आलेला असून सदर ठरावात त्यांचेसह १९ भा.ज.पा.सदस्यांचा विरोध नोंदविण्यात येवुन दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त दुरुस्तीसह कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २) आस्थापना विभागाचा सन १९९१-९२ ते १९९७-९८ चा विशेष लेखापरिक्षण अहवालाची माहिति घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर महोदया, या विषयासंदर्भात थोडीशी पार्श्वभुमी मी अशी कथन करतो की, साधारणता तत्कालीन नगरपालिकेत सन १९८० नंतर लोक नियुक्त सदस्य शासनाने बरखास्त करुन प्रशासकीय राजवटलागु केलेली होती. सदर काळात अत्यावश्यक नागरीकांची कामे झालेली नव्हती. मे १९८५ मध्ये शासनाने नगरपालिका सार्वत्रिक निवडणुक लागली. त्यात शहर विकास आघाडीला बहुमत मिळाले. मा.सुरेशदादा यांची नगराध्यक्ष पदी निवड झालेली होती.लोक नियुक्त बॉडी अस्तीत्वात आल्याने नागरीक सेवांबाबत नागरीकांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या.मात्र त्याच वेळी नगरपालिकेत कर्मचाऱ्यांचे संख्या बळ कमी असल्याने प्रशासनाच्या मागणीनुसार त्यावेळेस सन १९८५-८६ मध्ये प्रशासनाने रोजंदारीवर काही कर्मचारी नेमले.दि.११/०९/१९८७ ला नगरपालिका हद्द वाढ होऊन त्यात पिंप्राळा, मेहरुण, निमखेडी, आव्हाणा एम.आय.डी.सी.संपुर्ण भाग नगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेत. १२ चौ.कि.मी.ची हद्द वाढ होऊन ६८.७८ चौ.कि.मी. इतके झालेने नागरी सेवेसाठी मोठया प्रमाणावर कर्मचारी वर्ग लागणार असल्याने शासनास कायम कर्मचाऱ्यांसाठी विहित नमुन्या प्रमाणे प्रस्ताव सादर केला होता. त्यास शासनाने सन १९८७-८८ व तद्‌नंतर मान्यता प्रदान केली. मार्च १९८८ मध्ये राज्य निवड मंडळ अस्तीत्वात आले. त्यामुळे नगरपालिकेतील वर्ग-३ ची कर्मचारी भरती राज्य निवड मंडळाद्वारे करणे क्रमप्राप्त झाले. सन १९८८ च्या शासन निर्णय क्र.प्रनिव/१२८८ दि.०२/०५/१९८८ अन्वये राज्य निवड मंडळ जो पर्यंत कर्मचारी नियुक्ती करत नाही. तो पर्यंत स्थानिक प्राधिकरणास सहा सहा महिन्यासाठी वर्ग-३ चे कर्मचारी नियुक्त करु शकतील. स्थानिक प्राधिकरणाने वेळोवेळी निवड मंडळास कर्मचारी भरती कामी पत्र व्यवहार केले पाहिजे व राज्य निवड मंडळाने स्थानिक प्राधिकरणाचे पत्र मिळालेपासुन जास्तीत जास्त दोन महिन्यात सदर स्थानिक प्राधिकरणाच्या मागणीनुसार कर्मचारी नेमणुक करणे आवश्यक होते असे नमुद होते.सदर शासन निर्णयानुसार तत्कालीन नगरपालिकेमध्ये सन १९८५-८६ पासुन रोजंदारी सोबत सेवा जेष्ठता यादी जोडलेली आहे.

योग्य ती शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवारांची सहा सहा महिन्यासाठी तात्पुर्ती नेमणुक केली. व प्रशासनाने सन १९८९-९० मध्ये तीन ते चार वेळेस राज्य निवड मंडळास कर्मचारी भरतीबाबत पत्र व्यवहार केला. जळगांव नगरपालिका आस्थापना विभाग पत्र क्र.१०९९ दि.०६/०९/१९९८ जावक क्र.१५३ दि.१०/१०/१९९०, जावक क्र.१९०२ दि.२९/११/१९९०, जावक क्र.३०१० दि.१६/१२/१९९१ मात्र राज्य निवड मंडळाने २ वर्षाचा कालावधी उलटुनही कर्मचाऱ्यांची नेमणुक केलेली नव्हती.सन १९९० मध्ये सन १९९८ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन फक्त सहा महिन्याचा कालावधी आपण नविन शासन निर्णय पारित केला.नगरपालिकेत रोजंदारीवर तसेच नेमणुक केलेले कर्मचाऱ्यांची मे.उच्च न्यायालय,मे. तात्पुरते औद्योगिक न्यायालय, मे.कामगार न्यायालयात एका वर्षात कर्मचारी भरती केलेबाबत नगरपालिकेविरुध्द ५ दावे दाखल केलेले आहे. त्यात मे.न्यायालयाने सदर कर्मचारी यांना कामातुन कमी करु नये. असे निर्णय दिले आहे. सदर निर्देशानुसार कर्मचारी कमी करता येत नव्हते व राज्य निवड मंडळ भरती करत नसल्याने, नगरपालिका ठराव क्र.४५८ दि.२३/१०/१९९८ अधिकारी यांनी राज्य निवड मंडळास मे.न्यायालयाच्या दाव्यांची माहिती देऊन त्वरीत रिक्त पदे भरणेबाबत व पत्र व्यवहार करणेबाबत ठराव पारित केला होता. मात्र नंतरही एक वर्षाचा कालावधी उलटुन गेल्यावर राज्य निवड मंडळाने जळगांव नगरपालिका मध्ये कर्मचारी नियुक्त न केल्याने न्यायालयामार्फत कार्यरत कर्मचारी यांची पदे नगरपालिका सभेने नगरपालिका अधिनियम कलम ७६ अंतर्गत मंजुर पदांवर शैक्षणिक पात्रते निहाय सदर कर्मचाऱ्यांची नेमणुक केली व तसा अहवाल राज्य निवड मंडळास प्रशासनाने दिला. तसेच मे. न्यायालयामध्ये देखील जळगांव नगरपालिकेने १९८४ ते १९९२ पर्यंतचे स्थानिक लेखा निधी शाखेने लेखा परिक्षणात सदर भरतीबाबत परिच्छेद १७५ मध्ये आक्षेप काढलेले होते. मात्र प्रशासनाने अनुपालन अहवाल सादर केल्याने, मुख्य लेखापरिक्षक व स्थानिक लेखा निधी महाराष्ट्र राज्य कोकण भवन नवी मुंबई यांच्याकडील पत्र क्र.१/ब नगरपालिका /जळगांव ४०८ दि. ०८/०३/१९९९ अन्वये सदरचा आक्षेप लेखा शाखेने वगळलेला आहे.उर्वरित रोजंदारी कर्मचारी यांनी त्यांना कायम न केल्याने न्यायालयात फौजदारी दावा दाखल केला होता.तत्कालीन प्रशासक मा.श्री.बी.जी.वाघ साहेब यांनी सदर कर्मचारी यांना प्रथम प्राधान्याने कायम सेवेत सामावुन घेण्यात येईल.असे मे.न्यायालयात लिहुन दिलेले होते. त्या अनुषंगाने सन १९९७ ला शासनाने मंजुर केलेल्या पदांवर शैक्षणिक अर्हतेनुसार रोजंदारी वरील मे.न्यायालयीन कर्मचारी भरती करण्यात आलेली होती. शासनाने मध्यंतरी रोजंदारी वरील कर्मचारी यांना शासनाच्या मंजुरीने कायम सेवेत सामावुन घेणेबाबत सर्व स्थानिक प्राधिकरणांना कळविलेले होते.सन २०१५-१६ मध्ये वरील एस.एस.ए. भारतीय लेखा ऐव लेखा परिक्षण विभाग प्रधान लेखाकार कार्यालय लेखापरिक्षण याबाबत आक्षेप घेतलेला होता. त्यांचे महानगरपालिका प्रशासनाने अनुपालन अहवाल सादर केला असता,प्रधान लेखा कार्यालय मुंबई यांनी पत्र क्र.आय.आर./फॉर्म नं.९१४५३ दि.११/०७/२०१७ अन्वये आक्षेप वगळलेला आहे. सन २०१५ मध्ये नगरपालिकेमधील केमिस्ट या पदांवरील कर्मचारी यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज केलेला असता,नगरपालिकेने सन १९९१-९२ मधील बेकायदेशीर नेमणुक असल्याने त्यांचा अर्ज निकाली काढलेला होता.सदर कर्मचाऱ्यांनी मे.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दावा क्र.५६७४/२०१५ दाद मागण्यासाठी दावा दाखल केलेला असता, सदर दाव्यात खालील प्रमाणे युक्तीवाद झाला, सदर कर्मचारी यांना १९९२ मध्ये यांना कायम सेवेत नियुक्त केले, तेवढे पदे शासनाने मंजुर केले होते का ? तर उत्तर होते होय. ज्या पदांवर नेमणुक झाली त्या पदांची शैक्षणिक पात्रता होती काय ? उत्तर होते होय. सदर कर्मचारी नगरपालिकेमध्ये नेमुन दिलेल्या पदांवर तेव्हापासुन काम करीत आहेत काय ? उत्तर होते होय. सदर कर्मचारी यांना नगरपालिकेने पाचवा सहावा वेतन आयोग वेतननिश्चिती करुन पगार अदायगी केली होती काय ? उत्तर होते होय. वरील विवेचनावरुन मे.न्यायालयाने २५ वर्षानंतर बेकायदेशीर नेमणुक हा मुद्दा उपस्थित न करणेबाबत व कर्मचाऱ्यांची मागणी केल्याप्रमाणे वरीष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत निर्देश दिलेले आहे. वरील सर्व बाबींची अवलोकन करता, राज्य

निवड मंडळाने विहित कालावधीत शासनाकडुन जळगांव नगरपालिकेसाठी मंजुर पदांवर जळगांव नगरपालिकेचे मागणीनुसार भरती न केल्याने नगरपालिकेने नेमणुका केल्या आहेत.राज्य मंडळामार्फत होणारी दिरंगाई विचारात घेऊन शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेत वर्ग-३ ची पदे भरणे कामी निर्माण केलेल्या राज्य निवड मंडळाला बरखास्त केलेले आहे. या वरुन या सर्व अनियमितता शासनाकडुन नेमण्यात आलेल्या राज्य निवड मंडळ जबाबदार आहे. प्रशासनाने मुख्याधिकारी यांनी वेळोवेळी त्यांच्याशी पत्र व्यवहार केले असता, त्यांच्यावर याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. व सदर विशेष लेखा परिक्षण अहवाल नस्तीबंद करण्यात यावा ही माझी सुचना आहे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** सदरचा जो अहवाल आहे हा प्रत्येक नगरसेवकाला द्यायला पाहिजे होता. त्या अहवालात काय आहे काय नाही ते प्रत्येक नगरसेवकाला कळायला पाहिजे. त्याची माहिती घेणे आवश्यक आहे त्यामुळे प्रत्येक नगरसेवकाला हा अहवाल देण्यात यावा आणि तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवावा. मा.महापौर महोदया, प्रत्येक नगरसेवकाला अहवाल द्यायला पाहिजे होता ना.

**मा.उपमहापौर :-** अश्विन भाऊ तुमचा आवाज येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया,

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.महापौर महोदया,

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** हॅलो.

**मा.उपमहापौर :-** बोला ना अश्विनभाऊ, आवाज येत नाही तुमचा. तुमची सुचना पुन्हा मांडा.

**श्री.महेश चौधरी :-** येत आहे आवाज अश्विनभाऊ.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** माझे म्हणणे हे आहे की, हा जो अहवाल आहे हा प्रत्येक नगरसेवकाला द्यायला पाहिजे होता. प्रत्येक नगरसेवकाला याची माहिती असणे आवश्यक आहे. पण तो प्रत्येक नगरसेवकाला देण्यात आलेला नाही. तर तो अहवाल प्रत्येक नगरसेवकाला द्या आणि तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवा.त्यांना अभ्यास करण्याची संधी द्या. काय आहे काय नाही ते कळले पाहिजे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, मला बोलण्याची संधी द्यावी. हॅलो, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला चेतन भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, आम्ही जास्तीत जास्त नवनिर्वाचित सदस्य असल्या कारणाने आमची पहिली / दुसरी टर्म असल्याकारणाने हे मागचे लेखापरिक्षणाचे अहवाल आहे. एकापेजवर ते पण अर्ध्या पेजवर सादर केले गेलेले आहे. आम्ही ते मंजुर करावे की नामंजुर करावे याच्यामध्ये आम्हाला ते सर्व समजत नाही. ५५५ पानांचा अहवाल आहे तो आम्हाला वाचन करुन डिसीजन घेणे गरजेचे असल्याकारणाने हा अहवाल जसे अश्विनभाऊंनी सांगितलेले आहे. त्याप्रमाणे तहकुब ठेवणे गरजेचे आहे. कारण की भविष्यात याच्यामध्ये आमच्याकडुन काही चुकीचे मत नोंदविले गेल्यास काही कायदेशीर प्रक्रियेत आम्ही अटकु नये किंवा आमचे सदस्य अटकु नये म्हणुन हा अहवाल सर्व ५५५ पानांचा सर्व सदस्यांना अभ्यासासाठी देणे गरजेचे आहे. तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवावा सर्वांच्या वतीने हे माझे मत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौताई, मला बोलायचे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** चेतन भाऊ सनकत यांनी सांगितलेला विषय हा एकदम बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौताई, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला, कैलास भाऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी, आपले नितीन भाऊ यांचे अभिनंदन करतो, त्यांनी खुप चांगली माहिती आम्हाला दिली. परंतु तांत्रिक अडचणीमुळे काही ऐकु आलेले नाही. परंतु आयुक्त साहेबांना मी या ठिकाणी आयुक्त साहेबांना विचारु ईच्छितो, जसे या ठिकाणी त्यांनी सविस्तर माहिती काही १९८५ सालापासुनची या ठिकाणी मांडली. आणि आपले कर्मचारी कसे रितसर या ठिकाणी भरले गेले होते. त्याच प्रमाणे मागच्या महिन्यात शासनाचे

निर्देश आलेले आहे. रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासंदर्भात. त्याचप्रमाणे अनुकंपाची भरती या ठिकाणी पेन्डींग आहे. आता अनुकंपाची भरती मध्ये शासनाची जी एक अट आलेली आहे की, हे जे कर्मचारी आहे ते रितसर लागलेले आहे की नाही. त्यांच्या जागेवर या अनुकंप धारकांना नौकरी द्यायची आहे. तर त्यांच्या नियुक्त्या रितसर आहे की नाही. आता नितीन भाऊंनी सांगितले की, कसे कोण कोण रितसर होते. कसे कसे आपल्या महापालिकेकडे हो रितसर आहे कॉलिफीकेशन आहे, हे जे सांगितले आणि नितीन भाऊंच्या बोलण्यातुन जे लक्षात आले. तर एक विषय हा झाला, दुसरा विषय जो न्यायालयीन कर्मचारी रोजंदारीचा आहे. न्यायालयीन रोजंदारी कर्मचारी या ठिकाणी जेव्हा महापालिकेत लागले ते. १९९६ कोणी १९९१ कोणही १९९२ कोणही १९९३ आणि कोणी त्यानंतरही लागलेत.

**मा.महापौर :-** कैलास भाऊ आपण जरा जोरात बोला किंवा माईक जवळ घ्या आवाज येत नाही आपला.

**श्री.कैलास सोनवणे :-** माईक तर , एका हातात माईकच आहे.

**मा.महापौर :-** आता येत आहे भाऊ, बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरं बरं, तर ते जे रोजंदारी कर्मचारी या ठिकाणी लावलेले होते. त्यांना येथुन महानगरपालिकेतुन काढुन टाकण्यात आले, ते परत लेबर कोर्टात गेले, आणि लेबर कोर्टात गेल्यावर त्यांना परत घेण्याचे आदेश झाले. आणि त्याच्यामध्ये जो एक मुख्य मुद्दा होता, तो होता २४० दिवसांचा की, यांचे २४० दिवस भरलेले आहेत. त्यांना कामावर घेण्यात यावे. जर २४० दिवस भरलेले कर्मचाऱ्यांना कामावर घेतले जाते तर कालांतराने म्हणजे २५ वर्षानंतर आज शासनाकडुन यांच्याबद्दल निर्देश येतात की, यांना कायम करण्यात यावे. तर अनुकंपाचे आपले जे कर्मचारी आहेत. त्या कर्मचाऱ्यांचे मुले, त्यांची पुर्ण हयाती या महापालिकेमध्ये गेलेली आहे. आणि त्यातुन आज काही लोकं पेन्शनही घेत आहे. म्हणुन मी आयुक्त साहेबांना नम्र विनंती करेल की, ही सर्व माहिती तुम्हाला शासनाच्या अटीचा काही अडचण येत असेली, तरी ही सर्व माहिती शासनाला पुन्हा एकदा परत कळवावी व त्यांच्याकडुन मार्गदर्शन घ्यावे. कमीतकमी सहा महिने झाले तरी ते कर्मचाऱ्यांचे मुले बिचारे या ठिकाणी वनवन फिरत असतात. आणि काही लोकं काही कर्मचाऱ्यांच्या विधवा पती या ठिकाणी एजबार होण्याच्या मार्गावर आहे. तर मी आपणास विनंती करतो की, हा विषय तर या ठिकाणी तहकुब करण्याचे सांगीतलेले आहे. परंतु आयुक्त साहेबांकडुन मला या ठिकाणी आश्वासन देण्यात यावे की, मी जी विनंती केली, तसे आपण शासनाला कळविणार आहेत का ? आयुक्त साहेबांना विनंती आहे, महापौरांनी आदेश द्यावे तसे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब यांनी याबाबत माहिती द्यावी.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** नमस्कार, आदरणीय महापौर मॅडम, आदरणीय उपमहापौर, आदरणीय आयुक्त साहेब, आदरणीय सभागृह अनुकंपाच्याबाबतीत आपली तपासणी सुरु आहे. या अनुषंगाने जसे सन्मा.सदस्यांनी सांगितले, शासनाचे पत्र जे आलेले आहे की, त्यांच्या पालकांची नियुक्ती विहित कालावधीत विहित पध्दतीने आहे का ? तर या अनुषंगाने छाननी केली असता, हा जो लेखापरिक्षण अहवाल आलेला आहे. त्यामध्ये एकुण प्राप्त अर्जापैकी ५६ अर्जदारांच्या पालकांवर लेखापरिक्षणाचे आक्षेप आहे. आणि आक्षेप या प्रकारचे आहेत की, नियुक्ती व पदोन्नती नियम डावलुन केलेली आहे. शैक्षणिक अर्हता नाही. आणि नियुक्तीच्या वेळी वय जास्त आहे. अश्या प्रकारचे आक्षेप असल्यामुळे आपल्याला हे म्हणता येणार नाही की, सदर पालकांची नियुक्ती ही विहित पध्दतीने आहे म्हणुन यापैकी जे काही कर्मचाऱ्यांचे पालक हे कोर्टाचे आदेश, मुलाखत किंवा अनुकंपाचे आधारे लागलेले आहेत. असे आपल्याला पात्र कर्मचारी घेता येतील. अश्या अनुषंगाने २८ अर्ज जी आहे ते आपल्याला पात्र म्हणता येते.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** बोला कैलास भाऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, मी प्रशासनाला विनंती करतो आणि विशेष आयुक्त साहेब आणि गायकवाड मॅडमांना विनंती करतो, जे २८ कर्मचारी आहे त्यांना अगोदर कामावर घेण्यात यावे. व जे आणखी त्यात बसत असतील परंतु ते पात्र नाहीत त्यांना परत शासनाकडे ही सगळी परिस्थिती लक्षात घेवुन त्यांच्याकडुन मार्गदर्शन घ्यावे. कारण आता तुम्ही मला सांगा, या ठिकाणी रावलाणी डॉक्टर ते आता पुर्ण जळगांवला लस देत आहे. दुसरा डोस पहिला डोस गरोदर महिलांना डोस देणे आता हा जो प्रकार चालु आहे आता ते सुध्दा या ठिकाणी पात्र नाही. म्हणुन ते अपात्र आहे का मला सांगा ? जे आपले कर्मचारी आहे जे लागलेले आहे त्याच पध्दतीने १९९७ सगळे यामध्ये लागलेले आहे. मग या सगळे अपात्र कर्मचाऱ्यांमार्फत आपण काम करत आहोत का ? आणि जे

रिटायर झाले त्यांना आपण पेन्शन देतो आहे. आणि जे रिटायर नाही झाले ते येथे कार्यरत आहे. मग सगळे बोगस कर्मचाऱ्यांमार्फत चालु आहे का आपले कारभार म्हणुन मी आपणास विनंती करणार आहे प्रशासनाला विशेष आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी ही सगळी परिस्थिती शासनाला कळवावी. आणि तसे आम्हाला सभागृहाला सांगावे की, ते कळविणार आहे की नाही.

**मा.आयुक्त :-** अनुकंपाखाली ज्या उमेदवारांच्या केसेस आपल्याकडे सद्या तपासणी मध्ये आहेत. त्याच्यामध्ये आता अतिरिक्त आयुक्तांनी सांगितल्या प्रमाणे, प्राथमिक छाननी त्यांची पुर्ण झालेली आहे. काही कर्मचाऱ्यांचे जे आई-वडील किंवा त्यांचे पालक जे कोणी महापालिका मध्ये असतांना मयत झाले यांच्या नियुक्तींच्या बद्दल लेखापरिक्षणामध्ये काही आक्षेप आहे. आता सन्मा.सदस्य श्री.नितीन भाऊ लढ्ढा यांनी याची जी काही पार्श्वभुमी सांगितली, किंवा आता सन्मा.सदस्य श्री.कैलास अप्पा यांनी जे मुद्दे मांडलेले आहे. याचा विचार करता प्रत्येक केस मध्ये जर समजा लेखापरिक्षणात आक्षेप आहे पण जर त्याचे आपल्याला अनुपालन करणे शक्य असेल. तर लेखापरिक्षणाला एखाद्या वेळेस माहिती दिली गेली नाही. किंवा काही कागदपत्रे उपलब्ध झाली नाही. म्हणुन जर अपुऱ्या माहितीच्या आधारे किंवा माहिती उपलब्ध नसल्यामुळे जर आक्षेप घेतला असेल तर त्याचे अनुपालन अहवाल आपल्याला सादर करुन तो आक्षेप वगळुन घेण्याची संधी आपल्याला लेखापरिक्षण कायद्यामध्ये उपलब्ध असते. याबाबतीमध्ये ज्यांच्या नेमणुकांवर लेखापरिक्षणामध्ये आक्षेप आहे. ते अनुकंपा खालचे असतील किंवा जे ९६ कर्मचारी कायम करणेचा जो विषय आहे. किंवा आता जो लेखापरिक्षण अहवाल आपण महासभेसमोर माहितीसाठी ठेवलेला आहे. या अनुषंगाने असेल. तर अनुपालन अहवाल तर आपण केव्हाही सादर करु शकतो. परंतु जर काही ठिकाणी आपल्याला अनुपालन अहवाल सादर करण्याची संधी नसेल. म्हणजे स्ट्रेटवे दिसत आहे की, त्यावेळेला नेमणुक करत असतांना त्यावेळेची कार्यपध्दती कदाचित त्यावेळेच्या नगरपालिकेकडुन पाडली गेलेली नसेल. तर ही बाब आपल्याला राज्य शासनाच्या निदर्शनास आणुन द्यावी लागेल. आणि जे कर्मचारी हयात असतांना त्यांच्या नियुक्ती बद्दल आक्षेप होते. आता ते कर्मचारी दुरदैवाने हयात नाही. सेवेत असतांना मयत झाले. त्यामुळे अश्या वेळेला त्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरचे असलेल्या आक्षेपाचा तोटा त्यांच्या वारसांना होतो ही वस्तुस्थिती आहे. तर या बाबतीमध्ये अटीबाबत आपल्याला शासनाकडुन मार्गदर्शन मागावे लागेल. आणि हे करत असतांना मा.सदस्यांनी जी सुचना केलेली आहे. त्याप्रमाणे वैयक्तीक त्या प्रटीक्युलर केस मध्ये जी काही नियुक्तीची प्रक्रिया राबविली गेली असेल त्याबाबी आपण शासनाच्या निदर्शनास आणुन देऊ. आणि याच्यामधुन जर आपल्याला या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी काही शासनाकडुन शिथीलता मागावी लागली. तर ती सुध्दा आपण मागु.

**श्री.कैलास सोनवणे :-** थँक्यु साहेब, मला हेच म्हणायचे होते.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर साहेबा मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट चेतन.

**श्री.चेतन सनकत :-** ठिक आहे अप्पा साहेब, आपका होनेके बाद.

**श्री.कैलास सोनवणे :-** शासनाला तुम्ही ही माहिती कळवा, मी तुम्हाला नम्र विनंती करतो.तुम्ही त्या ठिकाणी सांगितलेच आहे मी तुमचा आभारी आहे फार फार.

**श्री.चेतन सनकत :-** ताई मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** चेतन भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** मी विषय मांडला, अश्विनभाऊंनी मांडले, आम्ही काही सदस्य नविन आहे. आणि हा विषय मागच्या २० वर्ष अगोदरचा विषय आहे, १५ ते २० वर्ष अगोदरचा विषय आहे. आणि आम्हाला फक्त आर्ध्या पेजवर याची माहिती दिलेली आहे. म्हणुन सर्व ५५५ पानांची माहिती समोर आल्याविना ना हा ठराव आपण मंजुर करु शकतो. ना नामंजुर करु शकतो. माहिती घेतली असे ही आपण म्हणुन शकतो ना माहिती मिळाली असे म्हणु शकतो किंवा कारण हा जो दिलेला प्रस्ताव आहे प्रशासनाने तो मोघम स्वरुपाचा आहे. आम्हाला जर येथे रितसर काही डिसीजन घेणे गरजेचे आहे. तर ५५५ पेजची माहिती आम्हाला तरी असणे गरजेचे आहे. कारण की, सन्मा.नितीन भाऊ असो कैलास अप्पा असो. हे आपले वरिष्ठ सदस्य आहेत. वर्षानुवर्ष ते सभागृहामध्ये असल्याकारणाने त्यांना ती सर्व कल्पना आहे. पण आम्हाला कल्पना नाही, आम्ही नविन आहोत. तर आम्हाला

सर्व डॉक्युमेंटची माहिती मिळणे गरजेचे आहे. जसे अश्विनभाऊंनी सांगितले आहे याला तहकुब ठेवणे गरजेचे आहे असे माझे मत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला बोलायचे आहे महापौर महोदया,

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला बोलायचे आहे महापौरताई.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई मला बोलायचे आहे,

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, उपमहापौर आणि आयुक्त साहेब, मला गायकवाड मॅडमांना विचारायचे आहे की, किती पात्र उमेदवार आहे आता. अनुकंपासाठी किती पात्र आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला ज्योतीताई आपण.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला गायकवाड मॅडमांना विचारायचे आहे. अनुकंपासाठी किती पात्र उमेदवारांची यादी तयार आहे आपली.

**मा.महापौर :-** गायकवाड मॅडम आपण याचे उत्तर द्या.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** नमस्कार, मॅडम एकुण आपल्याकडे ११० अर्ज प्राप्त आहेत, त्यापैकी १२ अर्ज आपण ऑलरेडी आपण रिजेक्ट केलले आहे. आणि ३ नावे त्याच्यामध्ये रिपीट आहे. असे एकुण ९५ अर्जदारांची आपल्याकडे सिन्यारीटीची यादी आहे. त्या यादीत ९५ पैकी २८ जी लोकं आहे. त्यांचे ५ लोकं हे कोर्ट आदेशाने कायम झालेले आहेत. ७ लोकं जी आहे त्यांना मेडीकल अपात्रतेमुळे त्यांना अनुकंप दिलेली आहे. आणि १३ जी आहे ती अनुकंपात दिलेली आहे. आणि ३ जी आहे ते मुलाखतीने असे २८ पात्र आहेत. एकुण ९५ पैकी ५६ अर्जदारांच्या पालकांवर लेखापरिक्षण ऑब्जेक्शन आहेत.त्यामध्ये जसे मी पहिले सांगितले, काहींना पदोन्नती डावळुन दिलेली आहे असे ऑब्जेक्शन आहे. काहींची शैक्षणिक अर्हता नाही असे ऑब्जेक्शन आहे. तर काहींची नियुक्तीच्या वेळी वय जास्त आहे असे ऑब्जेक्शन आहे. ५६ पैकी देखील ११ जे आहे त्यांच्यासमोर लेखापरिक्षणात ८ लोकांसमोर काही शेरा नमुद नाही. २ लोकांचे सर्व्हीसबुक उपलब्ध करुन दिलेले नव्हते. आणि एकाचे वैद्यकीय तपासणी अहवाल नाही. असे ऑब्जेक्शन आहे. तर या पध्दतीने सध्या यादी आपली रेडी आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मग आपल्याला आता किती घेता येतील.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** २८ पण यामध्ये २०११ मध्ये आपण जी बिंदुनामावली तपासलेली होती. त्या बिंदुनामावलीचा बेस लक्षात ठेवुन आपल्याला त्यानंतर जी काही भरत्या किंवा नियुक्त्या झाल्या असतील. ते बिंदु नामावलीतुन कपात करुन उर्वरित बिंदुच्या अनुषंगाने सदरील कर्मचारी यांचे कास्ट सर्टीफिकेट तपासुन त्या बिंदु नामावलीवर बसविण्याच्या हेतुने पुढची कार्यवाही करावी लागेल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्लीज लवकर करा कारण अनुकंपवाले खुप वेठीस धरले गेलेले आहे. त्यांना नियुक्त्या देणे गरजेचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, जे पात्र असतील त्यांना कायम करण्यात यावे आणि पुढील विषय घेण्यात यावा. हा विषय मंजुर करण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे ईबा भाई, त्या ज्योतीताई बोलत आहे त्यांचे बोलणे झाल्यावर बोला, एका वेळी एक बोला.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** मध्ये मध्ये काय बोलता तुम्ही.

**मा.महापौर :-** एका वेळेला एकच सदस्यांनी बोलायचे आहे. ज्योतीताई आपण बोलत आहे. विशाल भाऊ तुम्ही थांबुन घ्या थोडे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** त्या ईबा भाऊंना सांगा हो महापौर मॅडम.

**सौ.ज्योती चव्हाण :-** गायकवाड मॅडम ज्या पध्दतीने कैलास अप्पांनी सांगितले, त्याप्रमाणे ज्यांचा आक्षेप निघाला आहे. राज्य शासनाकडे त्वरीत पाठवावे अशी विनंती मी तुम्हाला करते आणि अनुकंपातील जे काही आहे त्यांना लवकरात लवकर नौकरी द्यावी याच्यासाठी तुम्ही प्रयत्न करावे.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** हो, मा.आयुक्त साहेबांनी निवेदन केलेले आहे.

**मा.महापौर :-** बोला विशाल भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, जळगांव शहर महानगरपालिकेच्या महासभा मध्ये लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. ऐवढा मोठा हा विषय असल्यामुळे लेखापरिक्षणाची माहिती घेण्यासाठी महासभेपुढे येतो.सर्व सदस्यांनी याच्यावर अहवालाची प्रत मिळाली नाही म्हणुन नाराजी व्यक्त केलेली आहे. परंतु मला प्रशासनाला एक प्रश्न विचारायचे आहे. जेव्हा आपण महासभेमध्ये एखादा विषय पाठवितो तर त्याची सखोल माहिती सखोल अहवाल सदस्यांना का देण्यात येत नाही.काय कारण आहे याची. जर सदस्याला सभागृहात एखाद्या विषयावर निर्णय घ्यायचे आहे. तर त्या निर्णयाच्या अनुषंगाने त्याला पुर्ण माहिती का देण्यात येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर ताई.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विशाल भाऊ जे सांगत आहे ते बरोबर बोलत आहे. त्या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आम्हालाही त्याची एक प्रत पाहिजे.

**श्री.चेतन सनकत :-** सर्व सदस्यांना त्याची माहिती देणे गरजेची असल्या कारणाने सर्व सदस्यांना त्या लेखापरिक्षण अहवालाची माहिती द्यावी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर मॅडम आपण निर्णय घ्या. सर्व सदस्यांना त्याच्या प्रति अभ्यासासाठी मिळणे फार आवश्यक आहे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** विशाल भाऊ जे बोलले आता ते मला मान्य आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, जे पात्र उमेदवार असतील त्यांची छाननी करुन त्यांना कामावर घेण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया,

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्य काही असा मुद्दा उपस्थित करत आहे की, या लेखापरिक्षणाच्या प्रति आम्हाला नाही मिळाल्यामुळे आम्हाला त्याचा अभ्यास करता येत नाही. परंतु महानगरपालिकांची एकुण जर आपण आपल्या सभा कामकाज पध्दतीचा विचार केला, तर आपण सर्व सन्मा.सदस्यांना त्या विषयपत्रिकेसोबत जे डॉकेट सादर झालेले असतात. त्या डॉकेटच्या कॉपी आपण देतो. आणि प्रत्येक विषयपत्रिकेच्या शेवटी एक टिप लिहलेली असते की, या विषयांचे डॉकेट सोबत जोडलेले आहे. आणि संपुर्ण जे प्रकरण आहे ते आपल्याकडे अवलोकनार्थ उपलब्ध आहे. ज्या त्या विभागामध्ये. आणि सभेची नोटीस सन्मा.सदस्यांना ७ दिवसापुर्वी यासाठी देण्याची तरतुद आहे. एखाद्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी सन्मा.सदस्यांना त्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी, माहिती घेण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा, यासाठी ती सभेची नोटीस ७ दिवस अगोदर देण्याची तरतुद आहे. आता याच्यामध्ये प्रत्येकाने ऐवढया मोठया अहवालाची मागणी करणे हे थोडे तांत्रिक अडचणीचे असल्यामुळे असे जे मोठे अहवाल असतात. ते आपण सभा पटलावर ठेवतो. ७ दिवसा अगोदर जेव्हा सन्मा.सदस्यांना याची माहिती किंवा अभ्यास करायचे आहे. तो अहवाल ही आपल्याला उपलब्ध होऊ शकतो. आपले ऑडीटर आहे किंवा आपले विभागाशी संबंधीत खातेप्रमुख आहे. यांच्याशी चर्चा करुन आपण त्याची माहिती घेऊ शकतो. सभागृहामध्ये सुध्दा आपण या विषयावर चर्चा करतो. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाची संपुर्ण अहवालाच्या प्रती सर्व सन्मा.सदस्यांना देणे प्रशासकीय व्यवहार आहे म्हणुन आपण ही सर्व कागदपत्रे हे ज्या त्या विभागाकडे किंवा नगरसचिवांकडे अवलोकनार्थ उपलब्ध करतो. आताचा जो विषय आहे. याच्यात आपल्याला कुठल्याही प्रकारचा निर्णय घ्यायचा नाही. दुसरी गोष्ट लेखापरिक्षण अहवाल जो आलेला आहे तो मान्य किंवा अमान्य करणे हे ही गोष्ट नाही. लेखा परिक्षण जो अहवाल आहे तो मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे जो अहवाल आपल्याला प्राप्त आहे. याच्या मध्ये ज्या ज्या कर्मचाऱ्याच्या नियुक्त्या झाल्या, जसे सन्मा.सदस्य श्री.लढ्ढा साहेबांनी सांगितले आहे. याच्या बद्दलच्या काही नेमणुका हे कदाचित योग्य असतील असे आपले म्हणणे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मा.आयुक्त साहेब.

**मा.आयुक्त :-** सदस्यांना विनंती आहे, तर याच्यामध्ये आपल्याला एखाद्या नियुक्ती बद्दल अनुपालन अहवाल पाठविणे शक्य असेल की, जी नियुक्ती आक्षेपीय आहे असे लेखापरिक्षणाचे म्हणणे आहे. परंतु आपल्या दृष्टीने ती नियुक्ती योग्य आहे. तर या बद्दलचा अनुपालन अहवाल आपण सादर करुन तो अनुपालन अहवाल मान्य करुन घेऊ आणि तो आक्षेप वगळु शकतो. ही संधी आपल्याला त्यामध्ये आहे. आज आपण हा अहवाल महासभेला, लेखा परिक्षणाचा जो अधिनियम आहे १९३० सालचा त्याच्यामध्ये माहितीसाठी ठेवलेला आहे. आपण त्याची माहिती देत आहोत. हा अहवाल मान्य किंवा अमान्य करणे असा कोणताही विषय नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे. मला माझे मत मांडायचे आहे या विषयावर .
**मा.महापौर :- बोला दिलीप भाऊ.**
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई, माझे असे म्हणणे आहे की, डॉकेट मध्ये असे नमुद केलेले आहे की, सोबत आस्थापना विभागाचा सन १९९१-९२, सन १९९७-९८ चा लेखापरिक्षण अहवाल पुष्ठ क्र.१ ते १५५, मग डॉकेट मध्ये असे का लिहले की, सोबत दिला आहे, त्यांनी म्हणायला पाहिजे होते, सदर अहवाल तुम्हाला कार्यालयामध्ये उपलब्ध आहे पाहण्यासाठी, आयुक्त अशी दिशाभुल का करत आहे सभागृहाची, डॉकेट मध्ये का लिहलेले की, सोबत जोडलेले आहे. कुठे जोडलेले आहे. उत्तर द्या.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, जर सभागृहापुढे माहिती म्हणुन तो विषय प्रशासनाने ठेवलेला आहे. तर माहिती काय घेतली आम्ही. नगरसेवकांनी काय माहिती घेतली. काय माहिती मिळाली आम्हाला की, किती कर्मचारी त्याच्यात आहे. कोण कोण आहे त्यांचे नावे आहे की नाही.हे कश्यावरुन कळेल, त्याच्यावर काय आक्षेप नोंदविलेला आहे. या सगळया विषयासाठी मा.आयुक्तांना हा सर्व विषय ज्या पध्दतीने सांगितले आहे. तो बरोबर नाही त्यांनी या सभागृहापुढे माहितीसाठी ठेवलेला आहे तर सदस्यांना माहिती पाहिजे. फक्त सभागृहामध्ये माहिती द्यायची चर्चा करायची विषय बंद आम्ही त्याला अनुमोदन करुन ठराव मान्य अमान्य हा विषय होत नाही. पण माहिती म्हणुन तर पुर्ण पाहिजे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अजेंडा शनिवारी रविवारी येतो आणि काय माहिती घ्यायची यांच्याकडुन.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** बोला बोला, कैलास अप्पा बोला.
**श्री.कैलास सोनवणे :-** अगोदर माझी सर्व सदस्यांना विनंती असेल, घरातल्या मुलांचे आवाज येथे येत आहे. सगळयांचे चित्र येथे दिसत आहे. तर आपण ऑनलाईन मिटींगला बसलेलो आहे याचे भान ठेवायला पाहिजे सर्वांनी, हा एक विषय आणि दुसरा विषय आयुक्त साहेब, महापौर साहेबा, ताई साहेब,
**मा.महापौर :-** कैलास अप्पा बोला तुम्ही.
**श्री.कैलास सोनवणे :-** मा.आयुक्त साहेबांनी जसे सांगितले की, अहवाल प्रत्येक गटाला नाही तर प्रत्येक गटनेत्याला द्या. एक भाजपाचे गटनेता, आणि एक एम.आय.एम.च्या गटनेत्याला द्या. चार पाच प्रती द्या.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, या विषयावर माझे मत मा.आयुक्त साहेबांनी जे मांडले माहिती घेणेसाठी आहे. मी या ठिकाणी माझे मत नोंदवितो, मला माहिती मिळालेली नाही.
**मा.उपमहापौर :-** ठिक आहे विशाल भाऊ, महापौर बोलत आहे.
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मी ही माझे मत नोंदवितो मला माहिती मिळालेली नाही.
**मा.उपमहापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, थोडी शांतता ठेवायची.
**श्री.चेतन सनकत :-** उपगटनेता या नात्याने मी सर्वांच्यावतीने सांगु ईच्छितो की, आम्हाला माहिती मिळालेली नाही. असे आमचे मत नोंदविण्यात यावे.
**मा.उपमहापौर :-** ओके चेतन भाऊ, फक्त थोडी शांतता ठेवा.
**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांच्या सुचना लक्षात घेता, हा जो विषय आहे आपण तहकुब ठेवणार आहे. या संदर्भात आपल्याला माहिती हवी असल्यास ती आपण संबंधीत विभागाकडुन घ्यावी. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, आस्थापना विभागाचा सन १९९१-९२ ते १९९७-९८ चा विशेष लेखापरिक्षण अहवालाची प्रत सन्मा.सदस्यांना न मिळाल्याने सदर अहवालाचा अभ्यास करता आला नाही. सभागृहात बरेच सन्मा.सदस्य हे नविन असल्याने विशेष लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती सर्व मनपा सन्मा. सदस्यांना लेखा परिक्षण विभागाने वितरीत करुन उपलब्ध करुन दयाव्यात. सर्व सन्मा.सदस्यांना संपूर्ण अहवालाची माहिती घेणे आवश्यक असल्याने सदरचा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** १५ व्या केंद्रीय वित्त आयोग शिफारशीनुसार राज्यातील Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त मुलभूत अनुदानातून दर महिन्याला प्राप्त होणारी अंदाजित विज देयकांची अंदाजित रक्कम रु.१,००,००,०००/- मात्र (अक्षरी एक कोटी) अंदायगी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मंजुर करण्यात येऊन पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक. एफएफसी-२०२०/ प्र.क्रं.५६/नवि-४ मंत्रालय, मुंबई दिनांक २८ ऑक्टोंबर २०२० अन्वये १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत शासन निर्णय पारित झालेला असून सदर शासन निर्णयात १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांबाबत खालीलप्रमाणे निर्देशित केलेले असून त्याअनुषंगाने मुलभूत अनुदानाच्या प्राप्त रकमेतून मनपाच्या विविध ठिकाणांची विज देयके अदायगी करणेबाबत नमूद केलेले असून त्यानुसार विज देयके अदायगी करणे.

सदरहू शासन निर्णयातील अ.क्रं.(II) १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Non-Million Plus Cities गटासाठी प्राप्त अनुदानातून हाती घ्यावयाची कामे :-

अ) बंधनकारक अनुदान (Tied Grandts):- (एकूण अनुदानाच्या ५० टक्के)

- बंधनकारक अनुदानांपैकी ५०% अनुदान a) Drinking Water (Inluding Rainwater Harwesting and Recycling) यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे.
- उर्वरीत ५०% अनुदान b) Solid Waste Management यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे.
- उपरोक्त a) व b) यापैकी एका घटकाची गरज पुर्ण झालेली असल्यास व त्यासाठी खर्च करण्याची आवश्यकता नसल्यास त्या घटकासाठीचे अनुदान दुसऱ्या घटकासाठी खर्च करण्याची मुभा असेल.

ब) मुलभूत अनुदान/अबंधनकारक अनुदान (Basic Grants/United Grants) :-

१५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त मुलभूत अनुदान/अबंधनकारक अनुदान(Basic Grants/United Grants) महानगरपालिकांच्या बाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्यांकरिता खर्च करणे पुढील अटीच्या आधीन राहून अनुज्ञेय राहील.

- केंद्र व राज्य योजनांतर्गत मंजूर पायाभूत सुविधा प्रकल्पावरील लोकवर्गणी म.न.पा./न.पा.हिस्सा व असे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च (जर प्रकल्प मान्यतेच्या प्रक्रियेत असेल तर अशा प्रकल्पाच्या बाबतीत लोकवर्गणीच्या हिश्यांची रक्कम राखून ठेवता येईल.)
- शासन/भारतीय आयुर्विमा महामंडळ/हुडको इत्यादी वित्तीय संस्थाकडून पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी महानगरपालिका/नगर परिषदेने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी होणारा खर्च. सदर कर्जाची परतफेड संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी केली नाही तर त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १५ व्या वित्त आयोगाच्या देय निधीतून शासन अशा कर्जाच्या परतफेडीकरिता आवश्यक रक्कम परस्पर वळती करु शकेल.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडील पाणीपट्टी व वीज बिले (दंड सोडून) भरण्याचा खर्च.
- उपरोक्त १ ते ३ येथे नमूद बाबींवर खर्च करण्यास वाव नसल्यास प्राप्त अनुदानातील उर्वरीत शिल्लक रक्कम संबंधित कायदयातील आवश्यक कर्तव्यांपैकी कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर आस्थापना खर्चाशिवाय अन्य कर्तव्यांवर खर्च करणे अनुज्ञेय राहील.

अ.क्रं.(III) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोगाची कार्यपध्दती :-

- प्रशासकिय मंजूरीची कार्यपध्दती :-
- महानगरपालिका :- १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Non-Million Plus Cities गटातील अनुदानातून घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांना असतील.

उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च करण्यांवर व १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरीचे अधिकार आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांना वरील शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे देण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुलभूत अनुदानाच्या प्राप्त होणाऱ्या व शिल्लक असलेल्या रकमेतून वेळोवेळी दर महिन्यास प्राप्त होणारी अंदाजित विज देयकाची रक्कम रु.१,००,००,०००/- मात्र (अक्षरी एक कोटी) अदायगी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:**-४) महानगरपालिका हद्दितील मिळकतधारकांना दि.०१/०६/२०२१ पासुन ते दि.३०/०६/२०२१ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केल्यास चालु आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या रक्कमेवर नियमानुसार १०% सुट देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मंजुर करण्यात येऊन पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील मिळकतधारकांना दरवर्षी प्रमाणे एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा केल्यास थकबाकीची व शासकिय कराची रक्कम वगळून उर्वरित रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) व त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ व महासभा ठराव क्र.२०९ दि.२४/०३/२०१५ अन्वये एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांस १०% सुट देणेबाबत मान्यता दिलेली असुन त्यानुसार १०%इतकी सुट देण्यात येते.

परंतु चालु आर्थिक वर्ष कोविड-१९ (कोरोना) या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाव्दारे लॉकडाऊन घोषीत केलेले आहे. त्याअन्वये जमावबंदीचे नियम लागु असल्यामुळे मालमत्ता कर भरण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी महासभा ठरावा नुसार मालमत्ता कराचा भरणा रोख व धनादेश स्वरुपांत न स्विकारता दि.३०/०४/२०२१ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने १०टक्के सुटसह स्विकारण्यात आला.

महासभा ठराव क्र.४६९ दि.१२/०५/२०२१ चे ठरावांत नमुद केल्यानुसार १० टक्के सुट देणेबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर मान्यता प्रदान करतांना महासभेने कोविड-१९ चा प्रादुर्भाव पाहता कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर रोखीने मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना देखील मालमत्ताकरांत १० टक्के सुट देणे बाबत प्रशासनाने विचार करावा असे निर्देश दिलेले आहे. सदर निर्देशाचे अवलोकन करता मालमत्ता कराचा भरणा दरवर्षी रोखीने करणाऱ्या मिळकतधारकांची संख्या सुध्दा जास्त आहे. अशा मिळकतधारकांमार्फत १० टक्के सुटचा लाभ रोखीने भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना सुध्दा मिळावा याबाबत प्रभाग समिती कार्यालयात तगादा लावलेला आहे. करीता दि.०१/०६/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा, १. रोखीने, २. धनादेशाव्दारे व ३. Onlinr पध्दतीने महानगरपालिकेच्या https://www.jalgaonmc या लिंकवर करणाऱ्या मिळकतधारकांना १०% सुटचा लाभ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** जिओ. डिजीटल फायबर प्रा.लि. यांच्या मार्फत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये रिलायंन्स जीओची ऑप्टिकल फायबर टाकणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला या विषयावर बोलायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई. आपण बघत आहोत की, गेल्या अडीच वर्षापासुन दोन मुख्य योजना ज्या आपल्या सुरु आहे. एक अमृत भुयारी गटार योजना आणि अमृत पाणीपुरवठा योजना, या दोघी योजनांमुळे

बऱ्याच ठिकाणी शहरातील रस्ते खोदले गेलेले आहे. जेमतेम करुन आता रस्त्यांच्या दुरुस्त्या झालेल्या आहे. आता पुनश्च यांना परवानगी देऊन पुन्हा रस्त्यांची खोदाई झाल्यास जनतेमध्ये प्रचंड प्रमाणात रोष निर्माण होईल. या अनुषंगाने हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा. पाऊसाळयानंतर फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझे सदर प्रस्तावास अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदय, मला याच्यावर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सध्या स्थिती मध्ये जळगांव शहरातील अमृत योजनेमुळे यापुर्वीच रस्ते खोदले गेल्याने नागरीकांमध्ये असंतोष मोठया प्रमाणावर असल्याने यासर्व बाबींचा विचार करता जिओ. डिजीटल फायबर प्रा.लि. यांच्या मार्फत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये रिलायंन्स जीओची ऑप्टिकल फायबर टाकणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर (रद्द) करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ६२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) महानगरपालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणाऱ्या गाळे /हॉल/ रहिवासी गाळे वाटपाबाबत सविस्तर धोरण ठरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आवाज येत नाही.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) महानगरपालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणाऱ्या गाळे /हॉल/ रहिवासी गाळे वाटपाबाबत सविस्तर धोरण ठरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** एक मिनीट गोराणे साहेब, आवाज येत नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणे साहेब आवाज येत नाही.

**नगरसचिव :-** हॅलो, भाऊ येतो आहे का आवाज.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नितीन भाऊ जॉईंट होत आहे. दो मिनीट.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) महानगरपालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणाऱ्या गाळे /हॉल/ रहिवासी गाळे वाटपाबाबत सविस्तर धोरण ठरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** आला का आवाज.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो, प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** यावर चर्चा करायची मा.महापौर महोदया.

**मा.महापौर :-** बोला विशाल भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सद्यास्थितीला हा प्रश्न खुप मोठया प्रमाणावर प्रलंबीत आहे. आणि नगरविकास मंत्री मा.श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी आताच व्यापारी मंडळाला आश्वासन दिलेले आहे. किंवा नियमावली मध्ये बदल करुन लवकरच या संदर्भात निर्णय घेऊ. त्यानंतर ८% जी भाडेवाढ आहे. ८% ने जे भाडे घेणे रेडीरेकनरच्या विषयावर ठरविलेला आहे. ते मुळात जळगांव महापालिकेच्या जळगांव शहराच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर आहे. तर ३ ते ४ टक्के भाडे त्या ठिकाणी आकारण्यात यावे. आणि तो पर्यंत शासनाचे मार्गदर्शन घेऊन तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवावा अशी आमची भारतीय जनता पार्टीची भुमिका आहे. त्यानंतर पुर्वी जे व्यापाऱ्यांवर ५ पट दंड लावण्यात आलेला आहे. तो ५ पट दंडाचाही विषय प्रशासनाचा प्रस्ताव मंत्रालयामध्ये अजुन प्रलंबीत आहे. महापालिकेचा अहवाल गेलेला आहे. त्याचाही निर्णय अजुन व्हायचा बाकी आहे. मला असे वाटते की, या संपुर्ण गाळयांच्या प्रश्नावरती सद्या हा विषय तहकुब ठेवण्यात यावा अशी सर्व भारतीय जनता पार्टीची आमची भुमिका आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई , महापौरताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ आपण आता जी सुचना मांडली हे दोन्ही विषय वेगवेगळे आहे. आपण जर विषयाची पार्श्वभुमी बघितली, विषयाचे अवलोकन जर केले तर आपली ८ पटाच्या दंडाच्या संदर्भातली जी काही भुमिका होती किंवा जो काही ठराव होता. आणि हा जो आलेला पटलावरती विषय आहे. दोघी विषय वेगळे वेगळे आहे. आपण जर विषयाचे अवलोकन केले तर आपल्या लक्षात येईल. संदर्भीय विषयामध्ये वेळोवेळी महानगरपालिकेच्या महासभांमधुन असेल स्थायी समिती सभा मधुन असेल बऱ्यापैकी या विषयावर चर्चा झालेली आहे. याच्या मध्ये देखील आपण शासनाचे मार्गदर्शन मागविलेले होते. शासनाचे देखील वेळोवेळी मार्गदर्शन आपण घेतलेले आहे. परंतु आता हा विषय तहकुब ठेवल्याने आज रोजी आपण जळगांव शहराचे विकासापासुन वंचित आपण आज रोजी आहोत. हा विषय तहकुब ठेवल्यास मला असे वाटते की, याच्यामध्ये अजुन उशिर होईल. परंतु आपण मांडलेला विषय आणि सदरील विषय दोघी विषय वेगळे वेगळे आहे. मला असे वाटते की, हा विषय तहकुब न ठेवता आपल्या सर्वांना विनंती आहे की आपण या विषयाचे अवलोकन करावे. आपले मत मांडायचे असेल तर आपले मत मांडायला आपल्याला संधी मिळेलच. त्याच्या बद्दल वाद नाही. पंरतु विषय जर आपण थोडे समजुन घेतले तर आपल्या लक्षात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, आपण आता जी उपमहापौर साहेबांनी भुमिका मांडली, मला असे वाटते की, ही भुमिका पुढच्या गाळयांना सुध्दा लागु होणार आहे. आणि त्याच्यामुळे ही भुमिका जर आज आपण ठरविली. तर प्रशासन उद्या पासुन जप्तीची कार्यवाही सुरु करेल. लोकांचे गाळे ताब्यात घेतील आणि लिलावाच्या प्रक्रियेसाठी सज्ज होतील. या सगळया गोष्टी येथील व्यापार चालला पाहिजे, शहराचा विकास व्हायला पाहिजे. उत्पन्न वाढले पाहिजे, थोडासा उशिर होईल परंतु शासनाच्या मार्गदर्शनाने आणि कायद्याच्यानुसार मा.श्री.एकनाथ शिंदे साहेबांनी वेळोवेळी आपल्याला आश्वासन दिलेले आहे. त्याची आपण वाट बघितली पाहिजे. असे माझे मत आहे.

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ तुम्ही एकदा विषय वाचा, विषय गाळे ताब्यात घेणेबाबतचा नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.उपमहापौर साहेब, डॉकेट मध्ये म्हटले आहे, भविष्यात ताब्यात घेण्यात येणाऱ्या गाळयांसाठी सुध्दा हे लागु राहीन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई, गाळे धारकांचे कैवारी भारतीय जनता पार्टीचे अभ्यासु नगरसेवक श्री. विशाल त्रिपाठी आज म्हणत आहे की, राज्य शासनाने व्यापारी गाळेधारकांना अश्वस्त केलेले आहे. गेल्या अडीच वर्ष महानगरपालिकेत तुमची सत्ता होती.एक वर्ष महानगरपालिका अस्तीत्वात आल्यानंतर राज्यामध्ये तुमचे शासन होते. सन २०१२ पासुन गाळेधारकांची दिशाभुल करुन करुन हे दिवस गाळेधारकांना आपण पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. आज पुनश्च कुठेतरी प्रशासन हा योग्य विषय आणत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कायद्यात बदल शासनानेच केलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझे बोलणे पुर्ण होऊ द्या. माझे बोलणे झाल्यानंतर जे बोलायचे आहे ते बोलु आपण. मध्ये बोलु नका. एकीकडे व्यापाऱ्यांच्या कैवारीची भुमिका घ्यायची स्वत: कडुन काही झाले नाही. आज आमचे नगरविकास मंत्री त्याच्यावर सहानभुतीचा विचार करत आहे. आपण त्याच्यावर कुठलाही सहानभुतीपुर्वक विचार न करता, आपण आणलेल्या निर्णयाचीच अंमलबजावणी प्रशासन आज करीत आहे. परंतु प्रत्येक वेळेला कुठल्यातरी निर्णयामध्ये खोडा घालायचा हा तुमचा धर्म आहे. आणि या अनुषंगाने मी आपणास सांगतो, आणि हा निर्णय जो आहे फक्त महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या गाळयांच्या संदर्भातला आहे. म्हणजे तुम्ही असे निर्णय प्रक्रियेमध्ये खोडा घालुन हे गाळे महानगरपालिकेने आयुष्यभर सांभाळायचे का ? त्याची देखभाल दुरुस्ती कोण करणार. विचारपुर्वक निर्णय घ्यायचा, अभ्यास पुर्ण करुन यायचे. फक्त गाळेधारकांची दिशाभुल करण्याचे काम सन २०१२ पासुन आपले सुरु आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणालाही एकही गाळेधारकाना आजपर्यंत दिलासा देणारा निर्णय आपण घेतलेला नाही.

**मा.उपमहापौर :-** राजुभाऊ तुम्हाला ही संधी मिळेल त्यांचे बोलणे होऊन जाऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खोटी आश्वासने देऊन प्रत्येक वेळी दिशाभुल करण्यात आलेली आहे आपल्याकडुन आणि जो निर्णय आलेला तो तुमच्याच राज्य शासनात आलेला निर्णय आणि त्याच निर्णयाची अंमलबजावणी प्रशासन करत आहे. आणि पुनश्च उभे राहुन सांगतात. हे करु नका ते करु नका. धोरण तर निट ठरवा. कशाला त्या गाळेधारकांची आयुष्यभर दिशाभुल करायची.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया, मला बोलायचे आहे बोलु.

**मा.महापौर :-** विशाल भाऊ बोला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीन भाऊंनी जी भुमिका मांडली, भारतीय जनता पार्टी पुर्वीपासुन गाळेधारकांच्या बाजुलाच आहे. गाळेधारकांसाठीचे प्रश्न सोडविणेसाठीच मा.तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रभाऊ फडणवीस, मा.पालकमंत्री, श्री.गिरीषभाऊ महाजन, जळगांव शहराचे आमदार राजुमामा भोळे आणि भारतीय जनता पार्टीने या विषयासाठी पाठपुरावा करुन सगळयात प्रथम जळगांव महापालिकेसाठी कायद्यात बदल घडुन आणला. हा पहिला मुद्दा लक्षात घ्या नितीन भाऊ. त्यानंतर सगळे व्यापारी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब ते सुध्दा या विषयासाठी मार्गदर्शन करतच आहे. मी कोणावर आरोप केले टिका टिप्पणी केली नाही. त्यांनी परवा सुध्दा व्यापाऱ्यांना आश्वासन दिलेले आहे. मी फक्त ऐवढे बोललो की, त्याची वाट बघा, जर ते करुन देत असतील तर या शहरासाठी आनंदाची गोष्ट आहे. कोणाचे ही सरकार असो आणि तिसरा मुद्दा माझा असा आहे की, नितीन भाऊ आपण बोललात की हे ताब्यात असलेल्या गाळयांसाठी आहे. जर ताब्यात असलेल्या गाळयांसाठी राहिले असते तर आमची सुध्दा भुमिका तीच राहिली असती. परंतु डॉकेट मध्ये त्यांनी म्हटलेले आहे की, भविष्यात ताब्यात येणाऱ्या गाळयांसाठी, भविष्य म्हणजे काय ? आता यांची मोहिम सुरु आहे बी.जे. मार्केटची वसुली झाली नाही तर जप्ती करा. तुम्ही प्रशासनाला मोकळे करुन देत आहे. जेणे करुन आपल्याला शहराच्या व्यापाऱ्यांचा ही

विचार करावा लागेल. त्यांना विश्वासात घ्यावे लागेल. त्या हिशोबानी मी हा विषय मांडलेला आहे. प्रशासनाने सांगावे की, ६६ गाळयांच्या व्यतिरिक्त पुढे ताब्यात येणाऱ्या गाळयांना आम्ही हा विषय लागु करणार नाही. सांगावे असे प्रशासनाने सभागृहापुढे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर ताई, मी पुन्हा सभागृहाच्या निदर्शनात आणुन देतो की, या संदर्भातली भुमिका भविष्यातील गाळयांचा संबंध काय ? भविष्यातील गाळयांचा संबंध असा की, जो पर्यंत याच्यामध्ये नगरविकास कॅबीनेट मंत्री चर्चा करुन निर्णय घेत नाही. तो पर्यंत आम्ही प्रशासनाला याच पध्दतीची सुचना केलेल्या आहे की, व्यापाऱ्यांशी समन्वयाने व  व्यापाऱ्यांवर अन्याय होणार नाही. ही भुमिका ठेवुनच व्यापारी ज्या पध्दतीने भरणा करत आहे त्या पध्दतीनेच त्याच पध्दतीने पैसा प्रशासन स्विकारत आहे. कुठलीही प्रशासनातर्फे अतिरिक्त कार्यवाही होत नाही. हा विषय या गाळेधारकांना आपण जर कधी म्हणतात की, आम्ही कायद्यात बदल करुन आणला,विशालजी जर कधी कायद्यात व्यापाऱ्यांच्या पुर्णत: ज्या अपेक्षा होत्या त्या पध्दतीने बद्दल घडुन आणला असता, निश्चित त्या गाळेधारकांना आमचे तोंड बघण्याची गरज पडली नसती. आपण काय करतात आधी निर्णय प्रक्रिया राबवितात. आणि सातत्याने त्या गाळेधारकांना आपल्या मागे फिरण्याची एक वाट लावुन ठेवतात. अश्या पध्दतीने माझे म्हणणे आहे की, गाळे धारकांची दिशाभुल करु नका. रिक्त गाळयांच्या बाबतीतला जो निर्णय आहे. तो प्रशासनाला घेऊ द्या. या मिळणारे उत्पन्नातुन या जळगांव शहरातील प्रलंबित विषय मार्गी लागतील. एकीकडे उत्पन्नाचा स्त्रोत वाढु द्यायचे नाही. दुसरीकडे विकास कामांच्या संदर्भात गावभर ओरडायचे, हा दुटप्पीपणा जो आहे ना हा तुर्त आपल्याला कुठेतरी बाजुला ठेवावा लागेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. महापौर महोदया,

**मा.महापौर :-** या संदर्भात प्रशासनाने आपली भुमिका मांडावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. आदरणीय नितीन भाऊ यांनी सांगितले,

**मा.आयुक्त :-** मा.महापौर.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आयुक्त साहेब, मला २ मिनीट बोलु द्या. मा.नितीनभाऊ यांनी मांडले की,

**मा.महापौर :-** राजेंद्र भाऊ आपल्याला बोलण्याची संधी मिळेल प्रशासनाला याबाबत खुलासा करु द्या. प्रशासकीय प्रस्ताव आहे हा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** हो ना, प्रशासन खुलासा करेल पण सर्व सभागृह सदस्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांना खुलासा करु द्या.सदस्यांचे म्हणणे आधी ऐकु द्या.

**मा.उपमहापौर :-** राजु भाऊ, तुम्ही संबंधीत विषयाला धरुन बोलणार की, राजकारणावर बोलणार पहिले ते सांगा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** संबंधीत विषयाशी, आपली ही मिटींग कश्यासाठी आहे.

**मा.उपमहापौर :-** संबंधीत विषयाशी धरुन जर बोलणार असाल तर संबंधीत विषयाशी धरुन बोला, आपण राजकारणाच्या हिशोबाने बोलणार असाल तर वापस तिकडुन आमचे नितीन भाऊ तयारच आहे. त्याच्यामुळे आपण वेळ न घालता बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** शेवटी माझे म्हणणे कसे समजुन घ्यायचे ते तुमच्यावर अवलंबुन आहे.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे, ठिक आहे. तुम्ही बोला ना, बोलण्याबद्दल वाद नाही. पण संबंधीत विषयास अनुसरुन बोला.

**मा.महापौर :-** राजु भाऊ बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सन्मा.नितीन भाऊंनी सांगितले की, सन २०१२ पासुनचा हा विषय पेंडींग आहे. मला वाटते, सन २०१२ ते २०१८ पर्यंत आमची सत्ता नव्हती. आमची सत्ता सन २०१८ ला आली आज २०२१ आहे. अडीच

वर्ष आमची सत्ता होती. त्या आधी ६ वर्ष आपली सत्ता होती. ६ वर्षा आधी हा विषय आपण का ठेवला पेंडींग महापालिकेमध्ये, आपण तो निर्णय घेऊन टाकला असता,

**मा.उपमहापौर :-** म्हणुनच राजु भाऊ मी तुम्हाला काय बोललो. त्यावेळेस सत्ताधारी कोण होते, परंतु गाळेधारकांना आतापर्यंत न्याय मिळालेला नाही. ते जे असेल ते असेल जाऊ द्या. प्रशासन त्याच्यावर खुलासा सांगेल. आयुक्त साहेब खुलासा देतील. ते शांततेत ऐकावे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** कोणी दिशाभुल केलेली आहे हे सर्व शहराला माहित आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, जर असे असेल तर आम्ही सर्व तटस्त राहतो, हा ठराव बी.जे.पी.च्या सदस्यांना मंजुर करु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया,

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, हा जो विषय आहे. आणि आपण मागच्या १२ मे २०२१ च्या बैठकीत जो घेतलेला विषय होता. धोरणात्मक निर्णय. हे दोन विषय स्वतंत्र आहेत. १२ मे च्या बैठकीमध्ये, २०१२ पासुन ज्या गाळयांच्या मुदती संपलेल्या आहेत. परंतु गाळेधारक हे गाळे वापरत आहे. त्यांच्या बाबतीमध्ये २०१८ मध्ये झालेली नियमामधली दुरुस्ती. आणि त्याच्या आधारे कायद्यामधली दुरुस्ती आणि त्याच्या आधारे सप्टेंबर २०१९ मध्ये बनविलेले नविन नियम. नुतनीकरण किंवा नुतनीकरणाला पात्र नसतील तर गाळे ताब्यात घेऊन लिलाव करणे, याच्याबाबतीमध्ये जो प्रस्ताव प्रशासनाने मार्च मध्ये महासभेसमोर सादर केलेला होता. त्याच्यावरती सन्मा.महासभेनी १२ मे च्या बैठेकीमध्ये निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी चालु आहे. आता हा जो विषय आहे. हा मागच्या ३-४ वर्षांमध्ये महानगरपालिकेकडे याना त्या कारणाने गाळे ताब्यात आलेले आहे. काही जणांची मुदत संपली त्यांची ईच्छा नसेल त्यांनी सरेंडर केलेले आहे. काही जणांनी मुदतपुर्वी सरेंडर केलेले आहे. काही जणांचे गाळे आपण ८१ब ची कार्यवाही करुन ताब्यात घेतलेले आहे. याच पध्दतीने काही जणांची मुदत भविष्यामध्ये संपली आणि त्यांची ईच्छा नसेल किंवा मुदत संपल्यापुर्वी सुध्दा त्यांनी जर गाळे सरेंडर केले तर आपल्याला त्या गाळयांच्या बाबतीमध्ये धोरण ठरविणे आवश्यक आहे. ते यासाठी आवश्यक आहे की, दुकानांचे गाळे आपण भाडेपट्टयाने देण्यासाठीच बांधलेले आहे. त्याबद्दल दुमत नाही. परंतु महानगरपालिकेच्या कायद्यामधील कलम ७९ असे सांगते की, कोणतीही महानगरपालिकेची मालमत्ता जर आपल्याला भाडेपट्टयाने द्यायची असेल. तर ती द्यायची किंवा नाही. याच्या बाबतीमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार मा.महासभेला आहे. त्यामुळे महासभेची मान्यतेसाठी हा विषय ठेवलेला आहे. डॉकेट मध्ये सुध्दा मालमत्ता व्यवस्थापनाचे उपायुक्त यांनी जे डॉकेट सादर केलेले आहे त्याच्यामध्ये असे स्पष्ट उल्लेख आहे की, आता पर्यंत आपल्या ताब्यात असलेले गाळे हे भविष्यामध्ये आपल्याला जे लिलावाने द्यायचे आहे. कारण तेथे गाळे महानगरपालिकेच्या ताब्यात असल्यामुळे विद्यमान गाळे धारकांचा आणि त्यांचा नुतनीकरणचा हा विषय नाही. त्यामुळे लिलाव पध्दतीने आपले जे द्यायचे आहे. त्याच्यासाठी औपचारीक मान्यता महासभेची घेणे आवश्यक आहे. याच पध्दतीने पुढच्याही काळामध्ये जर काही गाळे आपल्या ताब्यामध्ये आले तर त्याच्याही बाबतीमध्ये आपल्याला ही मान्यता आहे. उद्देश ऐवढाच आहे की, गाळे आपल्या ताब्यात आल्यानंतर विनावापर पडुन राहणे आणि महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये. या दृष्टीने हा धोरणात्मक निर्णय आपण आज घेत आहोत. ज्या गाळयांची मुदत संपलेली आहे परंतु गाळे अजुन ही महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले नाही किंवा व्यपाऱ्यांनी स्वत:हुन ताब्यात दिलेले नाही. त्यांच्या बाबतीमध्ये जो काही नियम आहे. त्याच्याबाबतीमध्ये महासभेने घेतले धोरण किंवा जे काही सन्मा.सदस्य श्री.त्रिपाठी यांनी उल्लेख केला. या बाबतीमध्ये शासनाकडुन जरी काही सुचना आल्या. तरी त्या सुचनांची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. परंतु शासनाकडुन भविष्यात येणाऱ्या सुचनांसाठी आता आपल्या ताब्यात असलेले गाळयांचे वाटप थांबविण्याची आवश्यकता नाही. म्हणुन आपण हे

गाळे वाटपाच्या धोरणाला मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर केलेला आहे. म्हणुन आता मला वाटते की, आता हा निर्णय घेण्यामध्ये काही अडचण नसावी.

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौरताई मला सुचना मांडायची आहे.

**मा.महापौर :-** बोला शुचिता ताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या विषयामध्ये आयुक्त साहेबांनी आता जो निवेदन केलेले आहे. आयुक्त साहेबांनी येथे स्पष्ट केलेले की, हा विषय फक्त ६६ गाळयांपुरताच विषय आहे. आपल्याला आता सद्याची जी वादातीत मिळकती आहे. महापालिकेच्या आणि वेगवेगळया गाळयांमधला जो विषय आहे. त्याची कोणतीही जप्तीची कार्यवाही याच्यामध्ये अभिप्रेत नाही. असे आयुक्त साहेबांनी येथे स्पष्ट केलेले आहे. पण काल जेव्हा या विषयाची माहिती उपायुक्तांकडून घेण्यात आलेली होती. त्या वेळेस उपायुक्तांनी असे निदर्शनास आणुन दिलेले होते की, येथे जरी ६६ गाळे नमुद असले तरी ६६ पेक्षा जास्त गाळयांचा हा विषय आहे. आणि माझ्या प्रश्नावर प्रशासनातर्फे असे उत्तर देण्यात आलेले होते की, भविष्यात ताब्यात येणारे गाळे हे जे काही म्हटलेले आहे.याचा अर्थ जो प्रशासन आता अल्टीमेटम देत आहे व्यापाऱ्यांना त्यांनी दोन दिवसात चार दिवसात आठ दिवसात पैसे भरावे. ते जर ते भरु शकले नाही. आणि ते सुध्दा या धोरणात्मक निर्णयानुसार इनक्ल्युड केले जाईल. आता आयुक्त साहेबांनी असे नमुद केले की, त्या गाळया संदर्भातल्या निर्णय शासनाकडुन जो येईल तोच त्यांना लागु असेल. मग मला आयुक्त साहेबांना असा प्रश्न विचारायचा आहे की, साहेब येथे जर आपण गाळे विषयी धोरण ठरवत आहे. तर हे सरसकट सर्व गाळयांचे भरणस्वार नाही का ? मग या गाळयांना वेगळा न्याय राहील आणि शासनाकडुन जर काही बदल होऊन आले. शासनाकडुन ज्या प्रमाणे येतील सुचना त्या सुचना या विषयाला कश्या इमप्लीमेंट करणार ? हा येथे एक प्रश्न तयार होतो. या बद्दल आयुक्त साहेब मला आधी खुलासा करावा. यानंतरही मला काही मुद्दयांवर बोलायचे आहे. आयुक्त साहेबांकडुन आधी मला या मुद्दयाचा खुलासा अपेक्षित आहे. प्रशांत पाटील साहेबांनी स्वत: मला सांगितलेले आहे की, ६६ हा आकडा आधी होता. तो आकडा आता जवळपास ८० च्या घरात गेलेला आहे. यापैकी २७ गाळे हे सुरुवातीपासुनच रिकामे पडलेले गाळे होते. आणि वेळोवेळी वेगवेगळया पध्दतीने जप्तीची कार्यवाही होऊन किंवा सरेंडर होऊन गाळे आपल्या ताब्यात आलेले आहे. असे हे ६६ प्लस त्यात जवळपास ८० गाळे आहेत. आणि हे जे डॉकेट मधले वाक्याचा विषय आहे. महापालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणाऱ्या गाळे, हॉल, रहिवासी गाळे वाटपाबाबत सविस्तर धोरण ठरविणे, याचा अर्थ असा निघतो की, भविष्यात ताब्यात येणारे म्हणजे, आज ज्या ज्या मार्केट बद्दलचे वाद सुरु आहे. शासन दरबारी वेगवेगळया यंत्रणे समोर जे प्रलंबीत आहे वेगवेगळे मुद्दे ज्यामुळे निर्णय मिळालेला नाही, न्यायालयात सुध्दा काही मुद्दे प्रलंबीत आहे. तर त्याबद्दल सुध्दा आपण आज धोरण ठरवत आहे. असा अर्थ येथे निघत आहे. त्याबद्दल मला पुन्हा येथे स्पष्टीकरण हवे आहे. तुम्ही हे जे धोरण ठरवणार ते या वादातिक गाळयांना लागु होणार नाही का ? आयुक्त साहेब आपण कृपया स्पष्टीकरण करावे या विषयावर.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर

**श्री.चेतन सनकत :-** ताई मला पण एक सुचना मांडायची आहे. आणि आयुक्त साहेबांनी दोघी तिघी विषयाचा एकदा आयुक्त साहेबांनी खुलासा केला तर चांगले होईल. मला ही एक विषय मांडायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.चेतन भाऊ, पहिले एक एक विषयावर चर्चा होऊन जाऊ द्या. शुचिताताईच्या प्रश्नावर पहिले शासनाला खुलासा करु द्या. त्याच्यानंतर आपल्याला ही संधी मिळेल.

**श्री.चेतन सनकत :-** ओके भाऊ.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर आता सन्मा.सदस्या सौ.शुचितातार्इ हाडा यांनी जी काही मुद्दे उपस्थित केलेले आहे. अश्या प्रकारची शंका उपस्थित करणे हे ठिक आहे. सन्मा.सदस्य म्हणुन त्यांनी काही शंका उपस्थित केलेल्या आहे. परंतु वास्तविक पाहता अशी शंकेचे काही कारण नाही. कारण ज्या गाळयांची मुदती संपलेल्या आहे. परंतु जी गाळे अजुन ही व्यापाऱ्यांच्या ताब्यात आहे. यांच्या बाबतीमध्ये २०१८ मध्ये जी दुरुस्ती झालेली आहे. त्याच्या मध्ये पुर्वी नुतनीकरणाची तरतुद नव्हती. म्हणजे मुदत संपल्यानंतर ते गाळे ताब्यात घेऊन त्याचा लिलाव करणे हेच कायद्याला अपेक्षित होते. आणि त्यावेळेच्या राज्य शासनाने २०१८ च्या आपल्या कलम ७९ मध्ये दुरुस्ती केली.आणि ज्या गाळयांची मुदत संपलेली आहे. अजुन ही गाळे गाळेधारकांच्या ताब्यात आहे. त्यांना नुतनीकरणाची एक संधी उपलब्ध करुन दिली. काही अटीशर्तीना अधिन राहुन. या आधारे २०१९ मध्ये ही जी काही मुदतवाढ आपण देणार आहोत.किंवा देऊ शकतो.याच्यासाठी जी सविस्तर नियमावली शासनाने सन २०१९ मध्ये बनविली. आता या नियमावलीच्या आधारे आपण आपल्या बाबतीमधला जो धोरणात्मक निर्णय आहे. तो मी अगोदर सांगितल्या प्रमाणे दि.१२ मे २०२१ च्या महासभेच्या बैठकीमध्ये तो निर्णय बहुमताने घेतला आहे. आता हा जो निर्णय आहे. तो निर्णय अतिशय स्पष्ट आहे आपला की, जो नियम घालुन दिलेले आहे त्या नियमाला अनुसरुन महासभेने कार्यवाही करायला प्रशासनाला मान्यता दिलेली आहे. तो निर्णय असा आहे आपला दि.१२ मे २०२१ चा मी ऐवढयासाठी सांगत आहे की, तो निर्णय आणि हा निर्णय हे दोन वेगवेगळे निर्णय कसे आहे. ते आपल्याला समजुन घेणे आपल्याला अत्यंत गरजेचे आहे. दि.१२ मे २०२१ च्या बैठकीमध्ये आपण जो निर्णय घेतला तो असा घेतलेला आहे की, सन २०१८ मध्ये झालेली नियमामधील दुरुस्ती आणि त्याच्या आधारे बनविलेले सन २०१९ चे नविन नियम त्याला अधिन राहुन ज्या गाळयांची मुदती संपलेल्या आहेत परंतु अजुन ही गाळे धारक वापरत आहे. त्यांच्या बाबतीमध्ये जरी हायकोर्ट सुप्रीम कोर्टापासुन ८१ब ची कार्यवाही करुन त्यांना इव्हिक्शनची ऑर्डर फायनल झालेली असली तरी सुध्दा अद्यापपर्यंत आपण प्रशासकीय दृष्टीने त्यांचे गाळे आपण खाली करुन घेतले नाही. कारण आता सन २०१८ च्या नियमाप्रमाणे त्यांना नुतनीकरणाची संधी आहे. त्याच्यामुळे ही संधी त्यांना मिळावी.या उद्देशाने जरी हायकोर्टाने मान्यता दिलेली असली. तरी सुध्दा तो पर्यंत आपण ८१ब ची कार्यवाही करुन ईव्हीक्शन केलेले नाही. या पाठीमागची भुमिका महापालिकेची आहे. व्यापाऱ्यांचे गाळे हे शक्यतो नियम पाळुन व्यापाऱ्यांच्या ताब्यात राहिले. तर महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. आणि व्यापाऱ्यांचे ही आर्थिक हित जोपले जाईल. अशी भुमिका महानगरपालिकेची याच्यामध्ये राहिलेली आहे. याला अनुसरुन जी दुकान गाळे नुतनीकरणाला पात्र असतील. अर्थात ज्यांची ईच्छा असेल ते अर्ज करतील. त्यांना नियमांच्या आधारे पात्र असतील तर नुतनीकरण करुन देणार आहोत. परंतु जे नुतनीकरणाला पात्र नसतील. त्यांच्या बाबतीमध्ये विद्यमान कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्या गाळयांचा लिलाव करणे हे आपल्याकडे एकमेव पर्याय राहतो. पहिला ऑप्शन आपण व्यापाऱ्यांना देणार आहोत की, तुम्ही नुतनीकरणासाठी अर्ज करा. त्याच्यामध्ये प्रामुख्याने दोन अटी आहेत. सुरुवातीला गाळा हा लिलावाने दिला पाहिजे आणि तुम्ही थकबाकीदार नसावा. आता थकबाकीच्या संदर्भामध्ये जी काही आताच्या कायद्यामधील तरतुद आहे रेडीरेकनरच्या ८ टक्के आणि त्याच्यावरती विना परवाना वापर.अनाधिकृत वापर याच्यासाठी २ टक्के अधिनियमातील तरतुदी प्रमाणे शास्ती, याच्यामध्ये व्यापाऱ्यांची काही मुद्दे आहे. ही जे त्यांनी महापालिकेकडे मांडलेले आहे. आता राज्य शासनाकडे त्यांनी मांडलेले आहे. याच्या बाबतीमध्ये भाडेची आकारणी ८ टक्के असावी की, त्याच्यावरती शास्ती २ टक्के असावी किंवा नसावी. याबाबतीमध्ये राज्य शासनाने जर भविष्यामध्ये जर काही निर्णय झाला. तो निर्णय जो होईल आणि ज्या वेळेपासुन लागु होईल. त्या वेळेपासुन तो नियम लागु करणे हे महापालिकेवर बंधनकारक आहे. परंतु भविष्यामध्ये एखादी घटना घडेल किंवा न घडेल. याच्यावरती आधारीत आज आपण नियमांची अंमलबजावणी थांबविण्याची काही एक

आवश्यकता नाही. त्या नियमाला जर त्यांनी पुर्वलक्षप्रभावाने लागु केले. आपल्याला गाळेधारकांना त्याचा प्रभाव मागच्या तारखेपासुन देता येईल. शासनाने जर त्याला पोस्ट फॅक्टसवर जर मान्यता दिली. तर आपल्याला त्या तारखेपासुन लागु करावा लागेल. आता हा विषय आज जो आहे. तो आपल्याकडे पुर्वीचे आपल्या ताब्यात आलेले गाळे आहे जे आपण ६६ म्हणालात. किंवा मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ६६ मध्ये कदाचित भविष्यामध्ये वाढ ही होईल.काही गाळेधारक असे आहे की, आम्हाला नको हे आता ८ टक्के भाडे परवडत नाही. आम्ही स्वखुशीने गाळे तुमच्या ताब्यात देतो.आज ही काही गाळेधारकांचे अर्ज आपल्या मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे आहे की, आम्हाला गाळा सरेंडर करायचे आहे. अश्या वेळेला गाळा सरेंडर करुन जर तो महापालिकेत आला तर त्यांचा तो गाळा आपल्याला लिलावाने देणे शिवाय पर्याय नाही. कारण तो गाळाच जर सरेंडर झाला असेल तर नुतनीकरणाचा प्रश्नच येणार नाही. नुतनीकरण हे विद्यमान गाळे धारकाचे होणार आहे. सरेंडर केलेल्या गाळे धारकांचा नुतनीकरणाचा प्रश्नच येणार नाही. त्यामुळे अश्या वेळेला महापालिकेच्या कोणत्याही कारणाने महापालिकेच्या ताब्यात आलेले जी गाळे आहे.हे आपल्याला लिलावानेच देणे आवश्यक आहे. त्याच्यासाठी आपल्याला वेगळया नियमाची किंवा तरतुदीची आवश्यकता नाही. म्हणुन आपण महासभेची मान्यता घेऊन याच्या मध्ये आपण हे गाळे लिलावाने देणार आहोत.उद्देश ऐवढाच आहे की, गाळे पडुन राहु नये. महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये. ज्या उद्देशाने गाळे बांधलेले आहे तो उद्देश आपला सफल व्हावा. दुसरा जो मुद्दा आपण उपस्थित केला होता. भविष्यामध्ये राज्य शासनाने जर नियमामध्ये काही दुरुस्ती केली. आणि नियमामध्ये दुरुस्ती करुन जर विद्यमान गाळेधारकांना भाडे आकारणीचा दर आता जो ८ टक्के लावुन दिलेला आहे. त्याच्यामध्ये जरी सवलती दिली. तरी सुध्दा ती सवलती पुर्वलक्षप्रभावाने असेल तर ती सर्वच गाळेधारकांना लागु होणार आहे. इव्हन जळगांवात नाही संपुर्ण राज्याचे गाळे धारकांना लागु होणार आहे. त्यामुळे लिलावाने दिलेले गाळे असतील किंवा नुतनीकरणाने दिलेले गाळे असतील. जर भाडयाचा दर राज्य शासनाने बदलला, तर त्याचा फायदा हा सर्व प्रकारचे गाळे धारकांना मिळणार.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, या विषयावर मला थोडे बोलायचे आहे. या विषयावर मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयावर, हा जो धोरणात्मक निर्णय सांगितलेला आहे प्रशासनाने आणि जो प्रस्ताव येथे सादर केलेला आहे प्रशासनाने, त्या प्रस्तावामध्ये सर्व मुद्दे नमुद केलेले आहे की, कश्या पध्दतीने हा धोरणात्मक निर्णय असणार आहे. यामध्ये मी एक विषय लक्षात आणुन देऊ ईच्छिते की, प्रत्येक वर्षी थकलेल्या बिलात असे एक परवाना फी असे एक उल्लेख केलेला आहे. मुळात कायद्यामध्ये कुठेही परवाना फी असे कुठलाही उल्लेख नाही. कायद्यात कुठेही ते नमुद नाही. त्यामुळे आपण अशी परवाना फी घ्यायला नको. त्यानंतर अकृषक सारा बद्दल सुध्दा स्पष्टता करावी. परवाना फी बद्दल अकृषक सारा बद्दल स्पष्टता करावी. आणि एक महत्वाचा मुद्दा मला असा निदर्शनास आणुन द्यायचा आहे की, हस्तांतरण शुल्क बद्दलची येथे कोणतीही स्पष्टता नमुद केलेली नाही. जर असा कोणता धोरणात्मक निर्णय प्रशासन येथे करु ईच्छितो, महापालिकेच्या गाळे संदर्भातला तर त्यामध्ये हस्तांतरण शुल्क हे सुध्दा आताचा धोरणात्मक निर्णय घेतांना ही अट नमुद करणे खुप आवश्यक आहे. मला वाटते स्टेडीअमची जी गाळे आहेत आपले महापालिकेचे, त्यामध्ये यापुर्वीच हस्तांतरण शुल्क बद्दल नमुद केलेले आहे. या मध्ये एक दुरुस्ती पोट भाडेकरु ची सुध्दा करणे आवश्यक आहे. या सगळया प्रॅक्टीकल अडचणी येत आहे. या सर्व गोष्टींचा सांभाळ करणे, मनपाची प्रॉपर्टी म्हणुन जेव्हा आपण हे रन करतो, त्या वेळेला ज्या प्रॅक्टीकल अडचणी येतात. त्या संदर्भात मी या सगळया सुचना देऊ ईच्छितो आणि त्या संदर्भात विशालभाऊंनी पक्षाच्या वतीने जे मत मांडलेले आहे. त्या संपुर्ण गोष्टीला माझे पुर्ण अनुमोदन आहे. प्रशासनाने याच्यामध्ये एक गोष्ट अजुन लक्षात घ्यायची आहे की, हा जो आपण जाहिर लिलावाचा विषय म्हणत आहोत.

महासभेचा ठराव क्र.८१६ दि.२२/१२/२०१७ रोजीच हा ठराव ऑलरेडी पारीत झालेला होता. मग पुन्हा प्रशासनाला हा विषय आणायची गरज काय पडली. त्या ठरावानुसार प्रशासनाने डायरेक्टली अंमलबजावणी का केली नाही. हा सुध्दा महत्वाचा मुद्दा येथे आहे. आणि विशालभाऊंनी ज्या विषयाबद्दलचे मत मांडलेले आहे की, गाळे प्रश्नी मनपाचे नुकसान होऊ नये आणि गाळेधारकांवर देखील अन्याय होऊ नये. त्यामुळे शासन दरबारी ज्या ज्या विषयांसाठी प्रश्न प्रलंबीत आहे. त्या सगळयांचा विषय होईपावेतो हा निर्णय तहकुब ठेवावा. हेच मत मी सुध्दा पुनश्च येथे मांडत आहे. रेडीरेकनरनुसार ८ टक्के दर हा खुप जास्त दर होत आहे. प्रत्येक गाळयांच्या परिस्थितीनुसार तो दर परवडणारा नाही. त्याच्या मुळे महासभेने तो दर सुध्दा ३ ते ४ टक्के करावा. भारतीय जनता पार्टीची ही पुनश्च येथे सुचना आहे. या सर्व सुचना आपण नमुद करुन घ्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.सदस्या सौ.शुचिताताई यांनी आता म्हटले, शेवटच्या वाक्यात म्हटले की, ८ टक्के दर हा परवडणारा नाही. हा शुचिताताईंना प्रश्न उपस्थित करु ईच्छितो की, हा निर्णय आणला कोणी ? कोण गेले होते या निर्णयामध्ये कोण पाठपुरावा करत होते. संपुर्ण भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, महानगरपालिकेचे सदस्य, व्यापारी गाळेधारक, या शहराचे आमदार, या शहराचे तत्कालीन दोघी पालकमंत्री, जर ऐवढीच या व्यापाऱ्यांची कळवळ होती आपणास तर मग हे ८ टक्क्याचे दर त्या वेळेला २ टक्के करुन का नाही आणले, म्हणजे स्वत: निर्णय आणायचे, स्वत:ची निर्णय प्रक्रिया जेव्हा प्रशासन राबवत असेल. त्या वेळेला आपण कुठेतरी गाळेधारकांचे कैवारी आहोत. हा खोटा आव कश्यासाठी आणतात. २०१२ पासुन आता राजु भाऊंनी सांगितले होते की, तुमची सत्ता होती. हो निश्चितपणे आमची सत्ता होती. ठराव क्र.१२३१ सन २०१२ साली, ९९ वर्षाच्या कराराने या गाळे धारकांना त्यावेळच्या रेडीरेकनरच्या दराने गाळे भाडयाने देणेच्या संदर्भातला धोरण या महानगरपालिका आणि आम्ही राबविलेले होते. परंतु त्या वेळेला या गाळेधारकांची त्या वेळेचे तुमचे MLC श्री.गुरमुखभाई जगवाणी, त्यावेळेला आपले भारतीय जनता पार्टीचे नेते श्री.एकनाथरावजी खडसे साहेब, या सगळयांनी मिळुन त्या वेळेला या गाळेधारकांची दिशाभुल केली आणि दिशाभुल करुन त्या गाळेधारकांना आजपर्यंत न्याय मिळुन दिला नाही. आज न्याय मिळालेला आहे. किंवा भविष्यात न्याय मिळण्याच्या दृष्टीकोणातुन शिवसेनेचे पदाधिकारी मा.महापौरताई असतील, मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील असतील, मा.श्री.किशोर अप्पा पाटील असतील ते प्रयत्न करीत असतांना पुन्हा कुठेतरी त्या गाळेधारकांच्या प्रती, आमची सहानुभुती आणि खुळेपणाचा आव आणुन या संपुर्ण गाळेधारकांची पुनश्च दिशाभुल करण्याचा हा एक खटाटोप आपण चालविलेला आहे. आता मला वाटते प्रशासनाने इतकी स्पष्ट बाजु मांडल्यानंतर या सगळया गोष्टी राजु भाऊ, या संपुर्ण घटनेला भारतीय जनता पार्टीचे सन २०१२ पासुन ते आताचे संपुर्ण पदाधिकारी, मंत्री हे जबाबदार आहे. हे गाळेधारकांना सुध्दा कळुन चुकलेले आहे. आज शुचिताताई म्हणतात ८ टक्के दर जास्त आहे. यांना कमी दर द्यायला पाहिजे. मग त्यावेळेला आपण झोपला होतात का ? ज्या वेळेला पालकमंत्री श्री.गिरीषभाऊ आणि श्री.चंद्रकांतदादा आणि मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, या प्रश्नावरती निर्णय घेत होतात. त्या वेळेला सभागृहातील सदस्य झोपलेले होते का ? उगाच खोटेपणा करु नका, सभागृहाची दिशाभुल करु नका. गाळेधारकांची दिशाभुल करु नका. हा माझा स्पष्ट आरोप आहे आपल्यावर.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला राजु भाऊ बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझी नितीन भाऊंना विनंती आहे की, एकमेकांवर फक्त चिखल फेक करण्यापेक्षा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला राजु भाऊ बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महानगरपालिकेचे हित आपण कसे जोपासु शकतो याचा विचार करायला हवे. व्यक्तीगत चिखल फेक आपण खुप प्रत्येकच जण करु शकतो. ती चिखल फेक येथे अपेक्षित नाही. आणि ती ही वेळ ही नाही. मी पुनश्च सांगते नितीन भाऊ की, हे ८ टक्के परवडत नाही हे मी जे बोललेली आहे. हे मी सगळया गाळयांसाठी निश्चितच बोलली नाही. पण जे अव्यवसायीक गाळे धारक आहे. त्यांना हे ८ टक्के हे परवडणारे नाही. त्यामुळे गाळयांची सिच्युएशन बघुन गाळेधारकाच्या व्यवसायानुसार आणि परिस्थिती जन्य हा निर्णय असला पाहिजे.सरसकट ८ टक्के हे असु नये. ऐवढीच मागणी आहे. या धोरणात्मक निर्णयामध्ये आपण असे म्हटले आहे प्रशासनाने अकृषक सारा आपल्या जमीनवर भाडेकरु कडुन कसे घेणार आहोत. हे प्रशासनाने स्पष्ट करावे. हे ज्या काही सुचना आहे प्रशासनाने त्या इनक्ल्युड करावे. कोणत्याही गोष्टींनी शब्दाला शब्द पकडुन कॅम्पीट करणे खुप सोपे आहे. आम्ही सुध्दा करु शकतो याची नोंद घ्यावी.

**मा.उपमहापौर :-** ताई आवाज तुटत आहे आपला, स्पष्ट आवाज येत नाही. सन्मा.शुचितातार्इ आपला आवाज स्पष्ट येत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता मी जे मुद्दे होते, त्यामध्ये माझे मुद्दे होते की, अकृषकसारा, हा अकृषकसारा आपण आपल्याच मालकीच्या जमीनीवर भाडेकरुंकडुन कसे घेणार आहोत. हे प्रशासनाने स्पष्ट करावे. आणि नितीन भाऊंना एक विनंती आहे की, भाऊंनी ज्या पध्दतीने येथे सगळं मांडलेले आहे. तर अश्या पध्दतीची चिखल फेक करणे फार सोपे आहे. आलेल्या संधीचा एकत्रितपणे सारासार विवेक बुध्दीने निर्णय घ्या. फक्त चिखल फेक करु नका. ८ टक्के भाडयाचा जो विषय मी मांडला, हा विषय मी नितीन भाऊनी, हा सरसकट सर्व गाळेधारकांसाठी नसुन जे व्यवसायीक गाळेधारक नाही. जे छोटे गाळेधारक आहे. त्यांना ८ टक्के गाळे भाडा परवडणारे नाही. ही भारतीय जनता पार्टीची भुमिका सुरुवातीपासुन होती. हे मी येथे नमुद करु ईच्छिते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, गाळेधारकांबाबत आमची भुमिका आजच नाही सन २०१२ पासुन जी आहे ना, ती गाळेधारकांच्या हिताचीच भुमिका होती. आजही आहे आणि आजही आपल्याला सांगतो की, या संदर्भात मा.श्री.किशोर अप्पा पाटील, जे पाचोऱ्याचे आमदार आहेत. ते स्वत: या गाळेधारकांच्या शिष्ट मंडळाला घेऊन काल मा.श्री.एकनाथराव शिंदे साहेबांकडे त्यांनी बैठक लावली. बैठक लावुन त्यांना या संदर्भात मा.श्री.किशोर अप्पांचे भाऊ परवा माझ्याकडे आले होते. त्यांना या संदर्भातील सर्व माहितीचे अवलोकन करुन दिली की, नेमके शिंदे साहेबांकडे गाळेधारकांना न्याय मिळेल याबाबतीत कोणते मुद्दे मांडायचे. २% ते ८% ची तरतुद ही आपल्या महापालिका स्तरावरती भौगोलिक परिस्थितीचा व आर्थिक परिस्थितीचा विचार करुन महानगरपालिकेला जर कधी ते अधिकार सोपविण्यात आले. तर महानगरपालिका निश्चितपणे प्रत्येक मार्केटची स्थिती बघुन त्याच्यावरती निर्णय घेईल. या संपुर्ण सुचना मा.किशोर अप्पा पाटील यांना विस्तुतपणे समजुन सांगितल्यानंतर त्या संदर्भात त्याची काल बैठक झाली. आणि त्या बैठकीमध्ये साधारणता पुढील चर्चेच्या अंती काही तरी दिलासा देण्याच्या दृष्टीकोणातुन उपाययोजना मिळतील. अश्या पध्दतीचा सगळा विचार करुनच निर्णय घेतलेला आहे. आता जी चर्चा चाललेली होती की, जे रिक्त गाळे महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्याच्या संदर्भातील संपुर्ण विस्तृत माहिती मा.आयुक्तांनी सुध्दा सभागृहासमोर मांडलेली आहे. आणि या अनुषंगाने मला वाटत की, त्याच्यावरती खुप वेगळी चर्चा करणे काही स्वारस्य नाही. आपण तो प्रस्ताव मान्य करण्यात यावा. आणि पुढील विषयाकडे चलावे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, मला या विषयावर बोलायचे आहे. मला सगळयात शेवटी बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ज्या काही सुचना मी प्रशासनाला सुचविलेल्या आहे त्यांची प्रशासनाने नोंद घ्यावी अशी एक विनंती मी पुनश्च एकदा करते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच विषयाला धरुनच एक विषय आहे अजुन

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** परवाना फि, अकृषकसारा या सगळया विषयांची प्रशासनाने नोंद घ्यावी. मी मांडलेल्या मुद्दयांची धन्यवाद.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच विषयाला धरुन मला थोडे बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हॅलो, महापौर ताई. महापौर ताई आवाज येत आहे का ? महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्यांनी संबंधीत विषयावर आपले मत सांगायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर ताई. मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला अप्पा.

**श्री.प्रशांत नाईक :-** सर्वांना विनंती आहे, मोबाईलच्या बॅटरी संपत येत आहे. तरी सर्वांना विनंती आहे की, त्यांनी लवकर लवकर विषय मार्गी लावावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, आता या ठिकाणी २०-२५ मिनीटापासुन मी ही सर्व चर्चा ऐकत आहे. नितीन भाऊ यांनी या ठिकाणी विषय मांडला, विशाल त्रिपाठी यांनी या ठिकाणी विषय मांडला, आणि शुचितातार्इ हाडा या तिघांनी या ठिकाणी विषय मांडला, परंतु शुचितातार्इ आणि विशाल यांची भाषा पाहिली तर एकदम मृदु होती आणि नितीन भाऊ यांच्या तोंडातुन जे शब्द निघाले की, हा भारतीय जनता पक्षाचा धर्म आहे. डायरेक्ट भारतीय जनता पक्षाच्या धर्मापर्यंत ते पोहचले. शोभत नाही त्यांना अशी भाषा. हे योग्यही नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा धर्म की राजनीती कर रहे है आप लोग और धर्म की बात कर रहे है तो चिंता हो रही है.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट एक मिनीट, या ठिकाणी लढ्ढांजीचे जर पुर्वज पाहिले. जे महेश आणि विशालजींचे जे पुर्वज पाहिले तर हे दोघीही मोठे ॠषी आणि भगवान होऊन गेलेले आहेत. या ठिकाणी सोनवणे किंवा सपकाळेंनी हा विषय मांडला असता तर आमचे पुर्वज महर्षी वाल्मीकी आहे, तर ते चालुन पण गेले असते एखाद्या वेळेस तर ही भाषा काही योग्य नाही. तुमच्या तोंडातुन हे शोभतपण नाही आणि हे चांगले वाटत नाही. आता आमचा धर्म काय पाहता तुम्ही, अरे तुमचा धर्म आम्ही पाहिला, आम्हाला नाशिक जेल पर्यंत घेऊन गेले तुम्ही. या जळगांव शहराचे ६० जणांना. म्हणजे हे काही योग्य होत का ? आणि आमचे म्हणणे, उपमहापौरांना सुध्दा विनंती आहे. मी अगोदर ही बोललो आहे की, तेथे बसुन छिचोरे धंदे नाही करायचे. त्या विशालला आणि राजु भाऊंना तुम्ही म्हणतात.

**मा.उपमहापौर :-** अप्पा अप्पा, सन्मा.अप्पा साहेब, हे सर्व सभागृहाला माहित आहे की, छिचोरे धंदे तुम्ही करतात की मी करतो आपण विषयाचे विषयांतर करु नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी छिचोरे धंदे करत नाही. महापौरांना विचारुन बोलत आहे.

**मा.उपमहापौर :-** काही तरी बोलुन आपण सर्व सन्मा.सदस्यांच्या समोर आपण चमकोगीरी करु नका. आपल्याला विनंती आहे. आपण काय करत आहे हे सर्व सन्मा.सदस्यांच्या लक्षात येत आहे. सन्मा.सदस्यांना या विषयाबाबत मत मांडण्याची संधी सगळयांना दिलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** छिचोराच आहे तु, चमकोगीरी मी नाही करत. मी मांडत आहे मत, त्यासाठी मला तुझी परवानगीची गरज नाही.

**मा.उपमहापौर :-** आपण इतके जेष्ठ सदस्य आहात. मला आपल्याकडुन ही अपेक्षा नाही ज्या पध्दतीने आपण पदाधिकाऱ्यांबद्दल बोलत आहात.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय अपेक्षा नाही,तेथे डायसवर बसुन तु जो राजुभाऊंना धमकी देतो,

**मा.उपमहापौर :-** मला असे वाटते आपण सभागृहाच्या बाहेर एकमेकांना भेटुन आपण या विषयावरती बोलु. मला वाटते हे बोलण्याची ही वेळ ही नाही किंवा हा सभागृह हे बोलण्याचे ठिकाण नाही. आता डॉकेटवरचा जो काही विषय आहे. त्या संदर्भात जर आपल्याला काही बोलायचे असेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय ठिकाण नाही.

**मा.उपमहापौर :-** आपल्याला तो विषय समजत नाही. विषय काय आहे आपण चर्चा काय करत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला विषय समजत नाही का ? तुझ्या माहितीसाठी सांगतो हा विषय मी आणलेला आहे. सन २०११ पासुन मी आणलेला आहे हा विषय.

**मा.उपमहापौर :-** मान्य आहे ना. मी सन २०११ पासुन सभागृहात नव्हतो ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुझ्या माहितीसाठी सांगतो, तुझ्या राजकारणात जन्मपण झाला नव्हता तेव्हा.

**मा.उपमहापौर :-** मी जेव्हापासुन सभागृहात आलेलो आहे तेव्हा पासुन आपल्याला पाहत आहे की, आपण संबंधीत विषयामध्ये काय भुमिका घेत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय भुमिका घेत आहे. बरोबर घेत आहे. जी माझ्या पक्षाची भुमिका आहे तेच घेत आहे आणि तुला सांगतो डायसवर बसुन धमकी द्यायची नाही. तुम्ही राजुभाऊला.

**मा.उपमहापौर :-** आपल्याला स्वातंत्र आहे अप्पासाहेब, आपल्याला सदस्य म्हणुन आपले मत मांडण्याचा या ठिकाणी स्वातंत्र आहे. त्याच्याबद्दल वादच नाही. आपण आपले मत मांडा ना. आपल्याला बोलु पण दिले. महापौरांनी सांगितले पण आहे की, अप्पा साहेब बोला अप्पा साहेब बोला. तुम्ही जर सांगत नसाल तर कोणी काय करणार?

**श्री.नितीन बरडे :-** उपमहापौर साहेब विषय मंजुर करा.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** उपमहापौर साहेब विषय मंजुर करा, महापौरताई. विषय मंजुर करा.

**मा.महापौर :-** अप्पा साहेब, संबंधीत विषयावर आपण आपले मत मांडा आणि

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, मला पण मत मांडण्यासाठी परवानगी द्या. मी केव्हाची परवानगी मागत आहे. कृपया मला परवानगी द्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** ज्या प्रकारे उपमहापौरांनी धमकी दिली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा साहेब तुम्हाला धमकी देण्याचा प्रश्नच येत नाही. तुम्ही जेष्ठ सदस्य आहात. काही छोटयापणाने चुका होत असतील तर समजवुन टाका.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही. चुका नाही झाल्या. मी एकत आहे सगळ. महापौर साहेब मी सांगतो, उपमहापौरांना विनंती आहे की, ते जर अश्या प्रकारे धमकी देत असेल. तर हे शेवटचे आहे. पुढच्या वेळेस मग आम्ही सभागृहात येऊन जे करायचे आहे ते करु.

**मा.उपमहापौर :-** अप्पा साहेब, आपल्याला या ठिकाणी कोणीच धमकी दिलेली नाही. आपल्याला फक्त आपले मत योग्य पध्दतीने मत मांडण्याची सुचना दिलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट एकुन घ्या पहिले मी काय मांडतो ते. थोडया वेळापुर्वी तुम्ही जी धमकी दिली ती राजु घुगे पाटील यांना दिलेली. तुम्ही बोलत बसाल तर असे बोलाल तसे बोलाल. अशी धमकी दिलेली आहे.

**मा.उपमहापौर :-** ती धमकी नव्हती.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही तर उद्दधटपण्याचे उत्तरे देत आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा. अप्पा साहेब, आपण पहिले समजुन घ्या. ती धमकी नव्हती. आम्ही त्यांना सांगितले की, या संदर्भतील आपले मत मांडायचे असेल की, हे मत मांडण्याचे ठिकाण आहे राजकारण करण्याचे ठिकाण नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो म्हणजे तुम्ही राजकारण केले ते चालेल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मत मांडण्या आधी तुम्ही कसे ठरविले की, हे राजकीय भाषेत बोलणार आहे. मत मांडल्यावर ठिक आहे. मत मांडायच्या आधी तुम्ही कसे ठरविले.

**मा.उपमहापौर :-** आपल्या सर्व सदस्यांनी आपआपले मत मांडले आहे. जो ही विषय असतो तो या ठिकाणी पटलावर घेतला जातो. त्याच्या बद्दल वादच नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आणि परवानगी ही महापौरांना मागीतली होती मी.

**मा.उपमहापौर :-** बिलकुल १००% महापौरांनी आपल्याला परवानगी पण दिलेली होती आणि वापस त्यांनी तुम्हाला परवानगी दिली. पण आता तुम्ही बोलत नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मग तुम्ही हे कसे ठरविले की, मी राजकीय बोलणार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** चला आता पुढचा विषय घ्या.कुलभुषण भाऊ पुढचा विषय घ्या.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, आम्हाला दोन शब्द बोलण्याची संधी द्यावी.

**श्री.प्रशांत नाईक :-** खुप वेळ झालेला आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेबा, या ठिकाणी विनंती करत आहे.

**मा.महापौर :-** राजेंद्र भाऊ तुम्ही बोला आपला या ठरावाबाबत मत सांगा.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.राजुभाऊ तेव्हाही महापौरांनी तुम्हाला सांगितले होते मत मांडा, आताही चार वेळा सांगितले की, मत मांडा. त्यावेळेस आपणास समजले नव्हते म्हणुन मी बोललो होतो. आता पुन्हा महापौर महोदयांनी आपल्याला सांगितले मत मांडा तरी ही आपण बोलत नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** धमक्या देत आहे तुम्ही त्यांना काय बोलतील ते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता तुम्ही आले का मदतीला.

**श्री.नितीन बरडे :-** उपमहापौर साहेब पुढचा विषय घ्या.विषय बंद करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरच्या विषयावर आपण प्रशासनाकडे ५% दंड माफ करण्याची मागणी केलेली आहे आणि ८% ची आपण ३ ते ४ टक्के मुल्यांकनावर आधारीत आकारणी करायची मागणी केलेली आहे. जो पर्यंत त्यांचा निर्णय येत नाही तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवावा अशी आमची विनंती आहे.

**मा.महापौर :-** तुमचा विरोध नोंदवायचा का राजेंद्र भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** बहुमताने करा बहुमताने.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बहुमताने पारीत करा.

**श्री.सचिन पाटील :-** बहुमताने पारीत करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विषय बहुमताने पारीत करण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला संधी देण्यात यावी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मला बोलायचे आहे. मी सुरुवातीपासुन संधी मागत आहे.

**मा.महापौर :-** राजेंद्र पाटील तुमचा या विषयाला विरोध आहे का ?

**श्री.प्रशांत नाईक :-** तुम्ही धमक्या देऊन टाकल्या काय बोलतील ते.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.राजु भाऊ, मी पुन्हा आपल्याला सांगतो.हीच गडबड होते समजण्यामध्ये, आपल्या विषयाच्या बाजुने मतदान करायचे आहे किंवा विषयाच्या विरोधात आपले मत आहे. तहकुब ठेवण्यासंदर्भातला हा

विषय नाही.फक्त आपल्याला आपले मत सांगायचे आहे. आपल्याला या विषयासंदर्भात विरोध करायचे आहे का? की आपल्याला या ठरावाच्या बाजुने सांगायचे आहे.

**श्री.सचिन पाटील :-** उपमहापौर महोदय, आमचे महापौर महोदयांना म्हणणे आहे की, आमचे समर्थन आहे. भारतीय जनता पार्टीचे आमचे समर्थन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, मला बोलण्याची संधी द्यावी. महापौरताई मला या विषयावर बोलण्याची संधी द्यावी.

**श्री.सचिन पाटील :-** फक्त राजु भाऊ नाही. आम्हीपण भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक आहे. आमचे समर्थन आहे या विषयाला.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.सचिन पाटील :-** भारतीय जनता पार्टीचे समर्थन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भारतीय जनता पार्टीचे समर्थन आहे म्हणजे सर्वानुमते विषय मंजुर आहे.

**श्री.सचिन पाटील :-** सर्वानुमते मंजुर आम्ही भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक समर्थन देत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चला पोकळे साहेब तुमचे गटनेते यांनी समर्थन दिलेले आहे. श्री.सचिन भाऊंनी सुध्दा समर्थन दिलेले आहे. सर्वानुमते मान्य करण्यात यावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** काहो सर, सचिन सर भावी सभापती का ? भावी सभापती का म्हटलं .

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई, महापौर ताई.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई, लंचचा टाईम झालेला आहे. २.०० वाजता परत सभा सुरु करावी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** थोडे बोलायचे आहे. गाळेच्या विषयावर थोडे बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** गोराणे साहेब मला बोलायचे आहे या विषयावर. गोराणे साहेब मला ६ नंबरच्या विषयावर बोलायचे आहे. मला सुचना मांडायची आहे.

**मा.उपमहापौर :-** चेतन भाऊ, या विषयावर सर्वांचे मत झालेले आहे. सर्वानुमते हा विषय झालेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ मी विषय सुरु झाल्यापासुन बोलायची संधी मागत आहे. मला आता पर्यंत संधी दिली गेलेली नाही. सर्व सदस्यांना ३-३ ४-४ वेळा संधी भेटलेली आहे. तरी पण त्यांना संधी देत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**मा.उपमहापौर :-** या विषया संदर्भात बोलायचे आहे का तुम्हाला ?

**श्री.चेतन सनकत :-** गाळे संदर्भातल्या विषयावर मला चर्चा करायची आहे.

**मा.महापौर :-** बोला चेतन भाऊ या संदर्भात असेल तर बोला.

**श्री.चेतन सनकत :-** हाच विषय आहे ना ताई. मी केव्हाचा बोलत आहे. याच्यामध्ये आपण उल्लेख केलेला आहे की, ३० वर्षासाठी आपण यांना देत आहे. गाळे हस्तांतरण जर कधी करायचे विषय एक वर्षानंतर किंवा दहा वर्षानंतर जे परस्पर गाळे हस्तांतरण करतात. ती फी पण याच्यामध्ये उल्लेख असणे गरजेचे आहे. असे मला वाटते आणि ते पण त्यांच्या करारनाम्यामध्ये नमुद करुन जसे तुम्ही उल्लेख केलेले आहे की, पोटभाडेकरु ठेवता येणार नाही. असे तुम्ही या ठरावामध्ये उल्लेख करत आहे. त्या अनुषंगाने असे ही उल्लेख करावे की, गाळे हस्तांतरण करतांना परस्पर गाळे हस्तांतरण करतांना नियमानुसार जी काही फी असेल. ती फी ठरवुन महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढी संदर्भात महत्वाचा विषय आहे हा. ज्याला कोणाला विकायचे असेल दोन वर्षात पाच वर्षात दहा वर्षात त्यानी गाळे हस्तांतरण फी भरुन नियमाला धरुन तो विषय पुढे मार्गी लावावा. जेणे करुन हा

विषय पोटभाडेकरु ठेवुन तिकडच्या तिकडे परस्पर सेटलमेंट होणार नाही. महानगरपालिकेच्या तिजोरी मध्ये गाळे हस्तांतरण फीचा जो विषय आहे. त्याच्या अनुषंगाने भर पडेल. म्हणुन हा विषय गरजेचा आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे चेतन भाऊ, तुमच्या ज्या सुचना आहे. प्रशासनाला नोंद घेण्यासाठी सांगण्यात येत आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई अजुन एक सुचना आहे.

**मा.महापौर :-** बोला दिलीप भाऊ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** गाळे लिलावातुन जो मुबलक पैसा आहे. तो पैसा शहराच्या रस्त्यासाठी प्राथमिक वापरण्यात यावा. शहराचे रस्ते आणि गटारी यासाठीच तो पैसा वापरण्यात यावा.लिलावातुन येणारा संपुर्ण पैसा.आणि त्याच्यानंतर इतर विषयांना प्राधान्य देण्यात यावे.

मा.महापौर :- नक्कीच भाऊ आपल्या सुचनांची येथे नोंद घेण्यात आली. ठिक आहे भाऊ पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई फक्त या गाळयांच्या लिलावामधुन येणारा पैसाच नाही. आता ज्या पध्दतीने गाळेधारकांकडुन ज्या पध्दतीने वसुली करत आहोत. त्या वसुलीच्या संदर्भातील पैसा सुध्दा एक स्वतंत्र एस.पी.ओ अकाऊंट ओपन करून त्या एस.पी.ओ अकाऊंट ओपन करून त्यामध्ये तो पैसा जमा करण्यात यावा आणि आज आपण बघतोय की जळगावातील रस्त्यांच्या कामांची परिस्थिती , गटारींची परिस्थिती विदारक आहे. तर तो पैसा फक्त मार्केट वसुली मधुन मिळणारा पैसा हा फक्त हा पैसा निव्वळ आणि निव्वळ हा फक्त विकास कामांवरच खर्च करण्यात यावा. अश्या पध्दतीची सुचना आणि तश्या पध्दतीचा एक प्रस्ताव मी मांडतोय आणि अश्या पध्दतीने तो प्रस्ताव मान्य करून घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदरील प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदरील प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा. सदर विषय बहुमताने मंजुर करण्यात येत आहे विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा. शुचितताई यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा या विषयासाठी विरोध आहे म्हणुन विरोध नोंदविण्यात येत आहे. आणि सदरील विषय हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** फक्त शुचितताई नाही भाजपा म्हणुन सर्व सन्मा.सदस्यांचा विरोध नोंदवायचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई , ज्यांचे ज्यांचे नांव आलेले आहेत ना आणि ज्यांनी विरोध नोंदवला आहे त्यांचाच विरोध नोंदवावा फक्त भारतीय जनता पार्टीचा नाही . हे सांगतोय .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई , या

**श्री.राजेंद्र पाटील :-** या विषयाला मतदान करून घ्या. सदरचा विषयाचे मतदान करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई , या गाळेधारकांच्या उत्पन्नाच्या अनुषंगाने हा विषय आहे.

**मा.महापौर :-** सदरचा विषय हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिकेच्या मार्केट मधील ६६ गाळयांना जाहीर लिलावाने ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने देणेकामी महासभा ठराव क्रं.८१६ दि.२२/१२/२०१७ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. सदर ठरावात नमूद गाळे/हॉल/रहिवासी गाळे व त्यानंतर महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले व भविष्यात महानगरपालिकेच्या ताब्यात येणारे गाळे /हॉल/रहिवासी गाळे वाटपाबाबत सविस्तर धोरण ठरविणे आवश्यक आहे.

- सदर गाळे / हॉल / रहिवासी गाळे यांचे नगररचना विभागा यांचेकडून ठरवून येणाऱ्या मुल्याकनांच्या २५ टक्के अधिमुल्य रक्कमेस (ना-परतावा) आधारभूत मानून त्या रक्कमेचा लिलाव करण्यात यावा. लिलावात येणाऱ्या उच्चतम बोलीधारकास, उर्वरीत ७५ टक्के मुल्यांकनावर नियमानुसार ८ टक्के भाडे ठरवून ३० वर्षाच्या मुदतीकरीता महानगरपालिकेच्या विहीत अटी व शर्तीचा नोंदणीकृत करारनामा करुन भाडेतत्वाने देण्यात यावे. गाळाभाडे व त्याअनुषंगीक जीएसटी हे प्रतिमाह देय राहील, प्रत्येक महिन्याचे गाळाभाडे व त्याअनुषंगीक जीएसटी हे पुढील महिन्याच्या १० तारखेपावेतो भरणे अनिवार्य राहील तसे न केल्यास २ टक्के प्रतिमाह शास्ती आकारण्यात येईल.
- लिलावात सहभागी होणारा इच्छुक व्यक्ती महानगरपालिकेचा कोणताही प्रकारचा थकबाकीदार नसावा त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- लिलावात सहभागी होणेसाठी नगररचना विभाग यांचेकडून ठरवून येणाऱ्या मुल्याकनांनुसार येणाऱ्या रक्कमेच्या १० टक्के इतकी बयाणा रक्कम म.न.पा.च्या अर्थ विभागात भरणे अनिवार्य आहे.
- वरील लिलाव प्रक्रियेत म.न.पात जमा करण्यात येणाऱ्या रक्कमेवर कोणतेही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

  महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले गाळे / हॉल / रहिवासी गाळे हयापैकी काही सुरवातीपासून रिक्त आहे, काही गाळेधारकांनी गाळयाच्या अनुषंगाने संपुर्ण रक्कमेचा भरणा करुन गाळे म.न.पा.च्या ताब्यात दिलेला आहे तसेच काही गाळे महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले आहेत.

- गाळे / हॉल / रहिवासी गाळे यांच्या लिलावात सहभागी होणेपुर्वी इच्छुक व्यक्तीने स्थळ निरीक्षण करणे अनिवार्य आहे. लिलावात गाळे / हॉल / रहिवासी गाळे हे आज रोजी आहे त्याच स्थितीत घ्यावे लागेल वेळप्रसंगी जर काही दुरुस्ती आवश्यक असल्यास गाळेधारकास सदरची दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल, त्यास महानगरपालिका बांधील नाही.
- लिलावात गाळे / हॉल / रहिवासी गाळे मिळालेनंतर कोणत्याही सबबीवर म.न.पा.त भरलेली ना-परतावा (अधिमुल्य) रक्कम परत मिळणार नाही तसेच समायोजित केली जाणार नाही.
- प्रत्येक वर्षाचे ठरलेल्या परवाना फी, सेवा शुल्क, अकृषक सारा, मालमत्ता कर इत्यादी करांचा भरणा प्रत्येक आर्थिक वर्षात प्रथम बिलासोबत मनपाकडे करुन दयावा लागेल.
- लिलावात गाळे / हॉल / रहिवासी गाळे मिळालेनंतर गाळेधारकास गाळा कोणालाही पोटभाडयाने देता येणार नाही.
- गाळे / हॉल / रहिवासी गाळे यांच्या वार्षिक भाडे रक्कमेत दर ०३ (तीन) वर्षांनी १० टक्यांची वाढ करण्यात येईल.
- गाळे / हॉल / रहिवासी गाळे भाडेपट्टयाने देणेबाबत अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त यांचे राहतील. ज्यांचे नांवे लिलाव अंतिमरित्या मंजूर होईल, अश्या गाळे धारकांने ०७ दिवसांचे आत नापरतावा अनामत महानगरपालिकेच्या अर्थ विभागात भरणे बंधनकारक राहील तसे न केलयास सदर गाळयाचा लिलाव रद्द समजण्यात येईल व बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

- प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या ताबयातील फक्त व्यावसायिक गाळयांच्या लिलाव प्रक्रियेत दिव्यांगाकरीता ५ टक्के व अनुसूचित जाती / जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता ५ टक्के आरक्षण देणे उचित होईल.
- सदर गाळे लिलावाबाबतच्या व करारनाम्याच्या इतर अटी व शर्ती स्थायी समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात याव्यात.
- महानगरपालिकेच्या ताब्यातील गाळे त्या-त्या संवर्गाकरीता (अपंग, मागासवर्गीय इत्यादी) आरक्षित करण्याकरीता उपायुक्त (महसुल) यांनी सोडत काढून गाळे आरक्षित करण्यात यावेत. याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त यांचा राहील.
- तसेच भविष्यात जे गाळे / हॉल / रहिवासी गाळे म.न.पा. ताब्यात येतील त्या गाळयांबाबत ही प्रस्तूत धोरणानुसारच कार्यवाही करण्यात यावी. लिलावातील गाळे संख्या कमी असल्यास आरक्षणाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

उपरोक्त प्रमाणे धोरणानुसार, महानगरपालिकेच्या ताब्यातील गाळे / हॉल / रहिवासी गाळे त्या-त्या संवर्गाकरीता गाळे आरक्षित करुन त्यांचा लिलावाव्दारे विनीयोग करणे तसेच सदरचे धोरण भविष्यात म.न.पा. ताब्यात येणाऱ्या गाळे / हॉल / रहिवासी गाळे यांचेकरीता अवलंबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

गाळे लिलाव प्रक्रियेव्दारे महापालिकेत जो निधी प्राप्त होईल त्याकरिता बँकेत एस्क्रो अकौंट उघडून त्यामध्ये सदर रक्कम जमा करणेत यावी. तसेच सदर रक्कम ही शहरातील फक्त विकास कामांवरच खर्च करणेत यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ३८ प्रतिकुल मते :- १३**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६७(अ) नुसार शास्तीची आकारणी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई , मी आपल्यावतीने आयुक्तांना या संदर्भातील माहिती विचारु ईच्छितो की , आपण ज्या पध्दतीने अनधिकृत इमारतीला शास्ती लावतो. आता समजा उदाहरणार्थ की एखाद्या मिळकतीचे ३ मजल्यांची कायदेशीररित्या परवानगी घेण्यात आलेली आहे. तिन मजल्यांना कायदेशीर रित्या मिळकत कराची आकारणी सुरू आहे आणि त्या मिळकतीवर जर का समजा एखाद्या मजल्याचे अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे की ज्याला परवानगी नाहीये. तर अश्या परिस्थितीमध्ये शास्तीची आकारणी जी आहे. ती चौथ्या मजल्यालाच लागू करतो की संपुर्ण इमारतीला लागू करतो. या संदर्भातला प्रशासनाने थोडासा खुलासा करावा.

**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर याबाबत कायद्यामधील तरतुद अतिशय स्पष्ट आहे. जी अनाधिकृत बांधकाम आहे त्या अनाधिकृत बांधकामाला आपल्याला जी काही शास्तीची आकारणी दुप्पट होती. नंतर महानगरपालिकेला

अधिकार दिले. आणि महापालिकेला अधिकार दिल्यानंतर काही डायरेक्शन निर्देश शासनाने दिलेले आहेत. ज्याच्या वरती हा विषय आपण सभागृहापुढे आणलेला आहे. याच्यामध्ये जेवढा अनाधिकृत बांधकाम असेल. अनाधिकृत वापर असेल. म्हणजे एम.आर.टी.पी.च्या दृष्टीने अनऑथराईजड युज किंवा अनऑथराईजड कन्सट्रक्शन आहे. त्याच्यावरती शास्तीची आकारणी होणे गरजेचे आहे. परंतु मी माहिती घेतली महापालिकेमध्ये, एखाद्या इमारतीमध्ये जसा सन्मा.सदस्य आता म्हणत आहे. तिन मजले जर अधिकृत आहे आणि एक मजला अनाधिकृत आहे. तर संपुर्ण चारही मजल्यांना अनाधिकृत पध्दतीने आकारणी झालेली दिसुन येते.अश्या बाबतीमध्ये अश्या केसेस वेरीफाय करण्याच्या सुचना मी उपायुक्त आणि चारही प्रभाग अधिकाऱ्यांना दिलेले आहे. जेवढा पोरशन अनाधिकृत असेल तेवढयावरतीच आपल्याला शास्तीची आकारणी करणे अपेक्षित आहे. कारण कायद्यामध्ये असे म्हटलेले आहे जोपर्यंत तो भाग नागरीक स्वत:हुन पाडुन टाकत नाही. किंवा महापालिका पाडत नाही. तो पर्यंत ही शास्तीची आकारणी चालु राहणार आहे. जर तिन मजल्यांना परवानगी असेल तर ते तिन मजले ना महापालिकेने पाडण्याचा विषय येतो ना नागरीकाने स्वत:हुन पाडण्याचा विषय येतो. तर अश्या अधिकृत परवानगी घेऊन बांधलेल्या तिन मजल्यांना कुठल्याही प्रकारची शास्तीची आकारणी होणे अपेक्षित नाही. आपल्याकडे जर अश्या काही झालेल्या असतील. तर त्या प्रभाग अधिकाऱ्या मार्फत ते दुरुस्त करण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता माझे म्हणणे ऐवढेच आहे महापौरताई, मा.आयुक्त साहेब की, अश्या इमारतींच्या संपुर्ण भागाला अश्या पध्दतीने काही वर्षापासुन शास्तीची आकारणी सुरु आहे. जर कधी त्याचा एक मजला अनाधिकृत असेल आणि त्याच्यावरती शास्तीची आकारणी करायची असेल. तर त्या संबंधीत मिळकत धारकाचे पैसे महानगरपालिकेकडे निघतात. मग तश्या पध्दतीने त्यांचे समायोजन करुन देण्याच्या संदर्भातल्या सुचना सुध्दा आपण प्रशासनाला त्या पध्दतीने द्याव्या की, जेणे करुन त्याची शास्तीची रक्कम त्या शास्तीच्या बिलामध्ये समायोजित करुन मिळेल.

मा.आयुक्त :- आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि निश्चितपणे याच्यामध्ये, मी सुचनाच मांडत आहे की, एक मिनीट, परिशिष्ट ब क्रमांक अनुक्रमणिका ३ वर नमुद केलेले की, १००० चौ.फुटावरील निवासीत अनाधिकृत बांधकाम क्षेत्राला. आकारावयाची शास्ती मालमत्ता कराच्या दुप्पट न ठेवता ती एकपट ठेवण्यात यावी. त्याचे कारण सांगतो की, कुठलाही माणुस हा स्वत:चे घर बांधत असतांना अनाधिकृत बांधकाम करणे ही कुठेतरी अपर्यायीता असते.एखादा कुटुंब तो पहिले लहान असतो. कालांतराने त्या कुटुंबाची सदस्यांची संख्या वाढते, व्यक्ती वाढते, परंतु आर्थिक परिस्थितीचा निर्बंध पाहता, किंवा आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने तो वेगळा निवास स्थान बांधु शकत नाही. आहे त्याच जागे मध्ये ॲडजेस्टमेंट करणेच्या दृष्टीकोणातुन कुठेतरी दोन खोल्या चार खोल्या वाढत्या कुटुंबाच्या गरजा लक्षात घेता, त्या पध्दतीने तो निर्माण करतो, आणि त्यानंतर रितसर जी आकारणी आहे उदाहरणार्थ रु.१०,०००/- आकारणी त्याच्यावरती येत असेल, म्हणजे रु.१०,०००/- वर रु.२०,०००/- शास्ती म्हणजे रु.३०,०००/-ची मिळकत कराची नोटीस त्याला जाते, ती खुप अवास्तव असते. त्याच्यामुळे नागरीकांमध्ये रोष निर्माण होतो.आणि पर्यायाने नाकरीकांना तो कर जास्त वाटत असल्याने देण्याच्या संदर्भातली वृत्तीसुध्दा ही नकारात्मक स्वरुपात जाते. तर या अनुषंगाने दुप्पट दंडाच्या ऐवजी मिळकत कराची जेवढी आकारणी आहे. त्याच्यावर एकपट अजुन त्याच्यामध्ये वाढ करण्यात यावी. उदाहरणार्थ रु.१०,०००/- आकारणी येत असेल नियमानुसार तर ती रु.२०,०००/- करण्यात यावी. अश्या पध्दतीचे हेच धोरण व्यवसायीक अनिवासीक वाणिज्य वापराची इमारतीसाठी सुध्दा ६०० चौ.फु.पर्यंतची त्याला ०.५ रहिवास याच्यामध्ये राज्य शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे ०.५० टक्के व्यवसायीक वापराच्या इमारतीला लागु करण्यात यावी. आणि ६०० फुटाच्या वरच्या इमारतीला १ पट दंडाची आकारणी करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, सन्मा.सदस्यांनी जी काही दराची आकारणी बद्दलचा प्रस्ताव दिलेला आहे. त्याच्या बाबतीमध्ये त्याच्या पाठीमागची भुमिका जरी योग्य वाटली.तरी सुध्दा हे जर शासनाचे निर्देश आपण विचारात घेतले तर दि.११ जानेवारी २०१७ ला राज्य शासनाने आपल्याला निर्देश दिलेले आहेत. काही डायरेक्शन दिलेले आहेत.आणि यामध्ये ही त्यानी त्याची जी प्रस्तावना म्हटलेली आहे. त्याच्यात राज्य मधील सर्व महानगरपालिका मध्ये एक वाक्यता असावी. आणि सगळयात महत्वाचे म्हणजे. अनाधिकृत बांधकामाला आळा बसविणेसाठी ही शास्ती आहे. म्हणजे ही डिटरंट म्हणुन ॲक्ट होणार आहे की, जेणे करुन शास्ती जास्त असेल, तर लोक अनाधिकृत बांधकाम करण्याला दजवणार नाही. पॅनल्टी अश्या प्रकारे असावी की त्याची भिती असावी. जर पॅनल्टी नॉमिनल असेल. तर लोकांची भिती कमी होते. आणि एक प्रकारे अनाधिकृत बांधकाम करण्याकडे लोकांचा कल वाढु शकतो. त्यामुळे राज्य शासनाने जर आपल्याला डायरेक्टशन दिल्या असतील. तर ते आपल्याला बंधनकारक राहतात. त्यामुळे राज्य शासनाच्या डायरेक्शनच्या बाहेर जाणे काही योग्य होणार नाही.असे वाटते. तथापी जी व्यावसायीक आकारणी आहे. त्याच्या बाबतीत राज्य शासनाने कुठलेही डायरेक्शन दिलेले नाही.परंतु हे जर जानेवारी २०१७ चे जर आपण परिपत्रक वाचले. त्याच्यामध्ये शासनाचा हेतु लक्षात येतो की, छोटी बांधकामे, गरजेपोटी केली बांधकामे ही गोरगरीब नागरीकांनी त्यांच्या अपर्यायाच्या पोटी केलेली बांधकामे यांना काही प्रमाणामध्ये सवलत मिळावी. असा राज्य शासनाचे धोरण दिसुन येतात. त्यामुळे निवास बांधकामांच्या बाबतीमध्ये जर १००० स्के.फुटापेक्षा कमीचे बांधकाम असेल. तर राज्य शासनाने त्याला काही सवलती दिलेली आहेत. मात्र १००१ स्के.फुटच्या पुढच्या बांधकामाला कुठल्याही प्रकारची सवलत नाही. आणि व्यवसायीकाच्या बाबती मध्ये ही राज्य शासनाने कुठलेही धोरण दिलेले नाही. जरी हे अधिकार महानगरपालिकेला दिलेले असले. तरी याच्यामागची राज्य शासनाची भुमिका आणि धोरण विचारात घेऊन त्यास सुसंगतच धोरणाची आपण आखणी करणे योग्य होईल असे मला वाटते.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, आपण मला सांगा, राज्य शासनाने जरी निर्देश २०१७ ला दिलेले असतील.परंतु महानगरपालिका अधिनियमामध्ये २६७अ मध्ये जी अमेंडमेंट केलेली आहे की, अश्या इमारतीवर महानगरपालिकेकडुन ठरविण्यात येईल अश्या दराने शास्ती भरण्यास पात्र असेल.मग मला सांगा परिपत्रक हे सुपेरिअर आहे की, ॲक्ट हा सुपेरिअर आहे. २०१७ नंतरची जी अमेंडमेंट आहे ती ॲक्ट मध्ये झालेली आहे. आणि जर कधी अश्या पध्दतीने विसंगत धोरण असेल. तर या ॲक्टला गृहीत धरुन लोक न्यायालयात जातील आणि पुन्हा याच्यामध्ये वादविवाद उभे राहतील. केव्हाही ॲक्ट जो आहे हा सुप्रीमो आहे. आणि परिपत्रकला तो ओवररुल करतो. तर माझ्या मते महानगरपालिकेला जे अधिकार प्रत्यास्म करण्यात आलेले आहे. त्या अधिकारांचा वापर करुनच महानगरपालिका हा निर्णय घेते. महानगरपालिकेला अधिकार देण्याच्या मागचा प्रोव्हिजनच काय मग.तो पॉरा आलाच नसता की, अश्या इमारतींवर महानगरपालिकेवर ठरविण्यात येईल अश्या दराने शास्ती भरण्यास पात्र असेल. म्हणजे मग महानगरपालिकेला कशासाठी ठेवेलेले आहे येथे किंवा मग ती अमेंडमेंटच करायची नव्हती.

**मा.आयुक्त :-** आपली भुमिका बिल्कुल कायद्याला धरुन आहे. त्याबद्दल दुमत नाही. कायद्याने आपल्या महानगरपालिकेला दर ठरविण्याचे अधिकार दिलेले आहे. कलम २६७अ मधील तरतुद जरी योग्य असली. तरी सुध्दा महापालिकेला राज्य शासन डायरेक्शन देऊ शकतो. अशी कायद्यामध्येच तरतुद आहे. त्यामुळे हे दोन्हींचाही आपल्याला परस्पर विसंगत न समजता ते परस्पर पुरावा समजावा लागेल. कायद्याने आपल्याला अधिकार दिलेले आहे पण ते वापरण्यासाठी राज्य शासनाने आपल्याला काही डायरेक्शन दिलेले आहे. आणि राज्य शासनाचे

डायरेक्शन नाकारणे हे ही आपल्याला योग्य होणार नाही. कारण राज्य शासनाच्या अधिन राहुन आपण काम करतो. मग त्यांच्याशी संपर्क आपल्याला साधावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज जो काही आम्ही आपल्याशी वाद करत आहोत. तो कायद्याला धरुन करतो आहे. आपण ही राज्य शासनाच्या एका निर्देशाप्रमाणे संवाद करत आहात. परंतु खुप स्पष्ट लिहलेले आहे. shall we liable to pay penalty at such rate as may be decided by the corporation at such building. म्हणजे एकीकडे आपण जगात म्हणतो कायदा हा सर्वक्षेष्ठ आहे. आणि कायद्याने जर कधी सभागृहाला ते अधिकार प्रदान करण्यात आलेले असतील. तर मला वाटते की, सभागृहाचा सुध्दा मानसन्मान आपण ठेवायला पाहिजे. आणि जे कायद्याने निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्या निर्णयाच्या संदर्भातलीच भुमिका आपण या सभागृहात घेतो आहे. त्याच्या मागची कारणे आपण किमान समजुन घ्या की, आज आपण बघत आहोत की, गेल्या अनेक वर्षापासुन या शहरातील नागरीकांना आपण त्यांच्या योग्य पध्दतीच्या मुलभुत सोईसुविधा देण्याच्या संदर्भात असमर्थ आहोत. गेल्या ३ वर्षापासुन ही नविन बॉडी आल्यानंतर गेले अडीच वर्ष असो की, आताचे पाच महिने असो. कुठल्याही नागरी सुविधा देण्याच्या संदर्भात आपण समाधान व्यक्त करु शकतो असली परिस्थिती नाही. मग अश्या पध्दतीने एकीकडे आपण सुखसुविधा देण्याच्या संदर्भातही कमी पडतो. आणि दुसरीकडुन मात्र दंडाची आकारणी करावी शास्तीची आकारणी करावी आणि त्या सामान्य जनतेची पिळवणुक करावी. हे मला काही योग्य वाटत नाही. आणि निर्णय जो आपण घेत आहोत या सभागृहात तो कुठल्याही प्रकारचा बेकायदेशीर निर्णय नाही. कायद्यामध्ये जे अधुरेखीत आहे. त्या कायद्याला धरुन आपण ही निर्णय प्रक्रिया राबवत आहोत. मला वाटते की, आपण कायदेशीर निर्णय प्रक्रियामध्ये सहभागी झाललो आहोत. आणि ह्या निर्णयाच्या संदर्भातली सुचना मी मांडलेली आहे. सभागृहाने ती मान्य करावी आणि या जळगांव शहरातील नागरीकांना दिलासा द्यावा. ऐवढीच माझी आपल्या सर्वांना या प्रसंगी विनंती आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मा.महापौर महोदया,

**मा.आयुक्त :-** मा.नितीन भाऊ विनंती आहे आपल्याला सुचना आपली पुन्हा दरांच्या ज्या आपण स्टेजेस ठरवुन दिलेल्या ते जर एकदा पुन्हा वाचल्या तर बरं होईल विनंती आहे आपल्याला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे बघा, परिशिष्ट ब,क मध्ये अनुक्रमणिका क्र.३ वर नमुद १००१ चौ.फु. वरील निवासी अनाधिकृत बांधकाम क्षेत्राला म्हणजे वरच्या दोन जी आहे राज्य शासनाने दिलेले निर्देश ते आपण तसेच ठेवत आहे. १००१ चौ.फु. निवासी अनाधिकृत बांधकाम क्षेत्राला आकारावयाची शास्ती ही मालमत्ता कराच्या दुप्पट न ठेवता, एकपट ठेवण्यात यावी. बरोबर आहे. अधिनियमाच्या कलम २६७अ (१ड) नुसार सदर सुधारणा दि.४ जानेवारी २००८ पासुन अंमलात आल्यात असे मान्य करता येईल. जळगांव शहर महापालिकेत अनाधिकृत बांधकामाबाबत नगररचना विभागाकडुन प्राप्त यादीनुसार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या ज्या मिळकतीला दुप्पट शास्ती लागलेली आहे. त्याची मागणी नोंद ही नविन नियमावलीनुसार मागणी दुरुस्ती करणेस तसेच वाढीव मागणी निर्लेखित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. व ज्या मिळकत धारकांची यापुर्वी दिलेल्या दुप्पट शास्ती देयकानुसार कराच्या रकमेचा भरणा केला असल्यास त्यांची देखील मागणी दुरुस्त करणेस तसेच जादा भरणा केलेली रक्कम पुढील वर्षी मागणी देयकात समायोजित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तथापी या अधिनियमांमुळे अनाधिकृत बांधकामावर वचक कायम रहावा या करीता नगररचना विभागाने शहरातील अनाधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण करुन नेमक्या केलेल्या अनाधिकृत बांधकामाची माहिती प्रभाग निहाय प्रभाग समितीस पुरवावी. तसेच यापुढे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत नगररचना विभागाने शहरातील होत असलेल्या व झालेल्या अनाधिकृत बांधकामाची माहिती प्रभाग कार्यालयात पुरवावी. प्रभाग कार्यालयाने पुढील १० दिवसात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६७अ (१ड) नुसार शास्तीची आकारणी करावी. यापुढे

अनाधिकृत बांधकामांवर आळा बसावा. याकरीता सदर अधिनियमाबाबत प्रभाग कार्यालयाने ठिकठिकाणी फलक लावुन जनजागृती करावी. हे झाले, याच संदर्भातले धोरण आणि याच पध्दतीने अनिवासी व वाणिज्य वापराच्या इमारतीसाठी राज्य शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे की, रहिवासी योग्य इमारतींना ६०० चौ.फुटापर्यंत शास्तीत माफी दिलेली आहे. परंतु अनिवास इमारतीसाठी व वाणिज्य वापराच्या इमारतीसाठी ०.५ टक्के दराने त्याची आकारणी करावी. आणि ६०० चौ.फुटावरील इमारतीला १ पट अतिरिक्त आकारणी करण्यात यावी. म्हणजे मुळ रकमेच्या समान तेवढीच १०००० असेल तर १०००० शास्ती असावी.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांनी केलेला प्रस्ताव लक्षात आला. आता याच्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेत असतांना फक्त काही कायदेशीर बाबींची अडचण निर्माण झालेली दिसत आहे. एका बाजुला आपण जसे २६७अ मध्ये महापालिकेच्या महासभेला अश्या प्रकारचे निर्णय घ्यायचे अधिकार कायद्याने दिलेले आहे. त्यामुळे महासभेच्या या निर्णयाला कायदेशीर अधिकार पुर्ण आहे. महानगरपालिका असा निर्णय घ्यायला सक्षम आहे याच्या बद्दल दुमत नाही. परंतु त्याच अधिनियमातील कलम ४५०ड मध्ये असे म्हटलेले आहे. या अधिनियमामध्ये काही जरी तरतुद असली. तरी सुध्दा धोरणात्मक निर्णय घेत असतांना किंवा कर्तव्य पार पाडत असतांना महापालिकेला निर्देश देण्याचे अधिकार राज्य शासनाला असतील. आणि असे निर्देश अंमलात आणणे हे महापालिकेचे कर्तव्य असेल. या दोन कायद्यातील तरतुदींमध्ये थोडीशी विसंगती दिसत आहे. राज्य शासनाचे आलेले निर्देश आणि एका बाजुला महापालिकेला दिलेले अधिकार त्यामुळे हे Interest of Conflict निर्माण होण्याची शक्यता आहे. अश्या वेळेला मला वाटते महासभेने निर्णय घेणे योग्य वाटत आहे. २६७अ खाली. तो निर्णय आपण राज्य शासनाला कळवु या. आणि राज्य शासनाने जर हा निर्णय विचारात घेऊन जर पुन्हा आपल्याला बंधनकारक केले की, आम्ही केलेल्या दराचे तुम्ही इमप्लीमेंट करा. तर मला वाटते की, महासभेने राज्य शासनाचे आलेले निर्णय मान्य करावा. जर राज्य शासनाने संमती दर्शविली की, कलम २६७अ खाली तुम्हाला अधिकार आणि तुम्ही निर्णय घेतलेले आहे. त्यामुळे त्याला नियमबाह्य म्हणता येणार नाही. त्याची अंमलबजावणी करावी. तर महासभेच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आपल्याला तरच योग्य होईल. ही कायदेशीर गुंता सोडविण्यासाठी आपल्याला एक कायदेशीर मार्ग काढावा लागेल. महासभेस उचित वाटते त्या अधिकाराखाली निर्णय घ्यावा. आपण त्याच्यावरुन तो निर्णय नियमबाह्य न म्हणता राज्य शासनाकडुन त्याच्या अंमलबजावणीसाठी परवानगी द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, २६७अ खालीच हा सभागृह निर्णय घेईल. जो की संपुर्णत: कायदेशीर आहे. आणि महानगरपालिकेला सभागृहाला मिळालेल्या अधिकाराच्या अनुषंगाने घेण्यात आलेला आहे. राहिला विषय या संदर्भात वाद उदभवल्यास राज्य शासनाकडुन मार्गदर्शन आपल्या स्तरावर आपल्याला मागविणे अपेक्षित आहे.  परंतु आपण बघतो, अश्या पध्दतीने अनेक वेळा राज्य शासनाकडे विषय पाठवुन ही त्याच्या बाबतीत समाधानकारक किंवा त्वरेने खुलासा होत नाही. यामुळे अश्या पध्दतीच्या ज्या वसुलीच्या देयके प्रलंबीत असतात. ते वर्षानुवर्ष तश्याच पध्दतीने प्रलंबीत असतात. नंतर या सदंर्भात कोणीही पाठपुरावा करत नाही. आपण आपलेच उदहारण घेतो ना. आपण स्वत: ज्या पध्दतीने २५ कोटीचा निर्णय राज्य शासनाकडे पाठविलेला आहे. आज महिनाभर होऊन गेला त्या प्रश्नावर उत्तर येत नाही. त्या पर्यायाने आपल्याला वेगळा निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. याच्यातुन लाखो रुपयाच्या उत्पन्नाच्या संदर्भातल्या जमा बाजु महानगरपालिकेच्या विचारात घेवुन आपण घेतलेला निर्णय माझ्या मते कायदा हा सर्वक्षेष्ठ आहे. आणि घेतलेला निर्णय हा कुठेही बेकायदेशीर नाही. पुर्णता कायदेशीर असल्या कारणाने प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. आणि या संदर्भात जर कधी आपले काही वेगळे मत असेल. तर आपण तसे द्यावे आम्ही याला न्यायालयामध्ये अवाहन देऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** राजेंद्र भाऊ बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव हा स्वागतर आहे आणि जनहिताचा आहे. खास करुन मी सांगेल की, जळगांव शहरामध्ये गुंठेवारी प्लॉट असतील. खडे प्लॉट असतील.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजु भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** हा बोला बोला,

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने आणलेला विषय हा जनहिताचा आहे. परंतु मी मांडलेली सुचना ही त्याच्यापेक्षा व्यापक जनहिताची आहे. म्हणजे कुठेतरी आपण या शहरातील नागरीकांना कायद्याच्या चौकटीत राहुन न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे. माझी मांडलेली सुचना बेकायदेशीर असेल. तर निश्चितपणे आपण त्याच्यावरती बोललात तर मला काही वाटणार नाही. परंतु आपण योग्य निर्णय घेणे उचित राहील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपल्या सुचने विषय बोलायचे नाही भाऊ, मला बोलायचे आहे जे गुंठेवारी प्लॉट आहे. त्या विषयी बोलायचे आहे फक्त.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ६०० स्के.फुटापासुन ते १००० स्के.फुटापर्यंतच्या निवासी बांधकामाला आपण ६०० फुटासाठी जो दंड होता. तो माफ केलेला आहे. २ पट दंड आपण घेत होतो. तो माफ केलेला आहे. परत ६०० फुटा ते १००० फुटापर्यंत आपण ५० टक्के केलेला आहे. आणि १००० च्या वरती जो आहे. म्हणुन आपण प्रत्येक नागरीकासाठी हा दिलासा दायक निर्णय घेतलेला आहे. म्हणुन प्रशासनाचा हा निर्णय मान्य करण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, नितीन भाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जळगांवकर तु फक्त कर भर.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर मॅडम मला बोलायचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नितीन भाऊ. नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो राजु भाऊ.

**श्री.राजेद्र पाटील :-** नितीन भाऊ, गुंठेवारीचे जे प्लॉट आहे. त्याच्यासाठी आपण मार्च अखेर पर्यंत मुदत दिलेली आहे त्यांना नियमीत करण्यासाठी आणि जर याच्यावर हा निर्णय नाही झाला किंवा हा प्रशासनाकडे गेला तर मग त्यांना दिलासा मिळणार नाही.त्या लोकांचे सहानभुतीपुर्वक विचार केला गेला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण हा निर्णय कायद्याच्या चौकटीत राहुनच घेतो आहे. आणि कायद्याच्या चौकटीत राहुन घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने करावी ऐवढी आपली प्रशासनाला विनंती आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.नितीन भाऊंनी मांडलेल्या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोघी विषय करा ना ७ व ८

**मा.महापौर :-** सदरील विषय मंजुर करण्यात येत आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेणेत यावा. सन्मा.सदस्य श्री.नितीन भाऊ यांनी दिलेल्या सुचनेनुसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर त्यांच्या सुचनेनुसार दुरुस्ती करुन या प्रस्तावाला मंजुरी देण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** धन्यवाद ताई.

**मा.महापौर :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** राजु भाऊ, राजु भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**नगरसचिव :-** नाही नाही आता. आदरणीय नितीन भाऊ यांनी जो प्रस्ताव मांडला, मा.महापौर यांनी मंजुर केलेला आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बहुमताने मंजुर विषय

**नगरसचिव :-** मा.महापौर सो., त्यांनी तो मंजुर केलेला आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बहुमताने मंजुर,

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊंचा जर विरोध असेल तर बहुमताने मंजुर करुन घ्या नितीन भाऊंची सुचना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** त्यांचा जर विरोध असेल तर बहुमताने मंजुर हा विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे. ८ नंबर

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**नगरसचिव :-** आदरणीय राजु भाऊ येथे आदरणीय श्री.नितीन लढ्ढा यांनी मांडलेला जो प्रस्ताव आहे तो मंजुर करण्यात आलेला आहे. तर आपली भुमिका काय याच्यात.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य. भाऊ मी तुम्हाला विषय सांगितला, जे गुंठेवारीचे प्रकरण आहे ना भाऊ त्यांना मार्च एन्डींगची मुदत दिलेली आहे. मार्च अखेर पर्यंत प्रस्ताव आणावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजु भाऊ थोडी विषयाची गलत होत आहे. दोन गोष्टी आहे. आपण प्रशासनाने दिलेला प्रस्ताव कायद्याच्या तरतुदीच्या अधीन राहुन कायद्यामध्ये जे अधिकार सभागृहाला दिलेले आहे. त्या अनुषंगाने सुचना मांडुन या शहरातील अनाधिकृत मिळकत धारकांना जास्त प्रमाणावर दिलासा देण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. सुचना तुम्हाला मान्य असतील तर ठिक आहे. अन्यथा तो प्रस्ताव आम्ही बहुमताने मान्य करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** बहुमताने मान्य करा भाऊ आणि पुढील विषय घ्या.

**मा.महापौर :-** सदर विषय हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर विषयात श्री.राजु भाऊ यांचा विरोध दर्शविण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** हा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात आलेला आहे आणि आदरणीय राजुभाऊ यांनी जो मांडलेला प्रस्ताव होता. याच्या संदर्भात त्यांचा विरोध नोंदविण्यात आलेला आहे. मा.महापौरांच्या आदेशानुसार

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, उपमहापौर,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र./जशमनपा/उमका/१८४ दि.२७/०१/२०२१ चे पत्रात उपमहापौर यांनी "काही नागरीकांना कायदयाचे अल्प ज्ञान असल्यामुळे अतिरिक्त बांधकाम केलेले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने त्यांना दुप्पट शास्ती आकारणी केलेली आहे. शासनाने यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार दुप्पट शास्ती आकारणी बाबत अधिनियमांत तरतुद केलेले आहे. परंतु तद्‌नंतर शासनाने शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.३०५/नवि-२०, दि.११/०१/२०१७ मधील निर्देशाव्दारे सदर शास्तीमध्ये काही प्रमाणांत दिलासा दिलेला होता, ते खालील प्रमाणे आहे. तसेच २०१८ च्या शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील २६७ अ मधील महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाला शास्ती लावणेबाबत संबंधीत महानगरपालिकेने निर्णय घेणेबाबत दुरुस्ती केलेली आहे. त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. छोटे-छोटे भुखंडधारक यांना कायदयाचे पुरेशे ज्ञान नसल्याने त्यांच्याकडून भुखंडावर बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाने अधिनियमांत नविन केलेली दुरुस्ती प्रमाणे अंमलबजावणी केल्यास हे भुखंडधारक त्याचा लाभ घेतील. त्यांच्यावरिल शास्तीचा बोजा कमी होईल आणि महापालिकेलाही शास्तीच्या स्वरुपांत उत्पन्न प्राप्त होईल.

परिशिष्ट “अ”

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| १ | ६०० चौ.फुटापर्यंतचे बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येवु नये |
| २ | ६०१ ते १००० चौ.फुटापर्यंत निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने आकारण्यात यावी. |
| ३ | १००१ चौ.फुटावरिल निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या १ पट दराने आकारण्यात यावी. |
| | अनिवासी / संमिश्र | |
| ४ | ५०० चौ. फुटापर्यंतचे बांधकाम | मालमत्ता कराच्या ०.५० टक्के दराने आकारण्यात यावी. |
| ५ | ५०१ ते १००० चौ.फटापर्यंतचे अनिवासी बांधकाम | मालमत्ता कराच्या १ पट दराने आकारण्यात यावी. |
| ६ | १००१ ते २००० चौ.फुटावरील अनिवासी बांधकाम | मालमत्ता कराच्या १.५० टक्के दराने आकारण्यात यावी. |
| ७ | २००० चौ.फटावरिल बांधकाम | मालमत्ता कराच्या २ पट दराने आकारण्यात यावी. |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शास्ती आकारणीचा प्रस्ताव तयार करण्यात येऊन तो मंजुरीसाठी महासभेकडे पाठविण्यात यावा ही विनंती. ” अशा स्वरुपाचे पत्र दिलेले होते.

सन २०१७ पुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ मधील (१) च्या (ड) मध्ये खालील प्रमाणे तरतुद होती.

“२६७-अ अवैध इमारतीवर शास्ती बसविणे-

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्या त्या वेळी आमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायदयाचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करुन महानगरपालिका, अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्टयाने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जो पर्यंत अवैध बांधकाम म्हणुन राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही मग असा कालावधी कितीही असो.”

तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६७ अ मधील (१) च्या (ड) मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे. (Mah. 51 of 2017, dt. 1-9-2017, s.3, (w.e.f.8-1-2017), (Mah. 53 of 2018. s.3, (w.e.f.10-8-2018)

“२६७-अ अवैध इमारतीवर शास्ती बसविणे-

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्या त्या वेळी आमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायदयाचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करुन महानगरपालिका, अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्टयाने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जो पर्यंत अवैध बांधकाम म्हणुन राहील तोपर्यंत, अशा इमारतीवर महानगरपालिकेकडून ठरविण्यात येईल अशा दराने शास्ती भरण्यास पात्र असेल.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही मग असा कालावधी कितीही असो.”

परंतु आणखी असे की, या पोट कलमान्वये महानगरपालिकेने निश्चित केलेले दर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपुर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औदयोगीक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००८ (२००८ चा महा.२) याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून म्हणजेच ४ जानेवारी २००८ पासून अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.” असे नमुद आहे.

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण - २०१५/प्र.क्र.३०५, नवि-२० दि.११/०१/२०१७ अन्वये उपरोक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सदर अधिकाराचा वापर सर्व महानगरपालिकांमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न असलेल्या समाजातील घटकांना न्याय देण्याच्या उद्देशातून तसेच अनधिकृत निवासी बांधकामांवर, प्रभावी आळा बसविणेकरिता अनधिकृत बांधकामांवर आकारावयाच्या शास्तीचे दर खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे लावणे बाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत.

परिशिष्ट “ब”

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| १ | ६०० चौ.फुटापर्यंतचे बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येवु नये |
| २ | ६०१ ते १००० चौ.फुटापर्यंत निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने आकारण्यात यावी. |
| ३ | १००१ चौ.फुटावरिल निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने आकारण्यात यावी. |

सभागृहातील चर्चेनुसार खालील परिशिष्ट “क” मध्ये नमुद केल्यानुसार शास्ती आकारणेस तसेच शास्तीची आकारणी फक्त जितके बांधकाम क्षेत्र अनधिकृत आहे तेव्हढयाच क्षेत्रावर शास्तीची आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

परिशिष्ट “क”

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| १ | ६०० चौ.फुटापर्यंतचे बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येवु नये |
| २ | ६०१ ते १००० चौ.फुटापर्यंत निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने आकारण्यात यावी. |
| ३ | १००१ चौ.फुटावरिल निवासी बांधकाम | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या एकपट दराने आकारण्यात यावी. |
| ४ | अनधिकृत बांधकाम असलेल्या सर्व अनिवासी इमारतींसाठी | प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या एकपट दराने आकारण्यात यावी. |
| ५ | अनधिकृतपणे उभारलेले मोबाईल टॉवर्स | मालमत्ता कराच्या दुप्पट दराने आकारण्यात यावी. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६७ अ (१) (ड) नुसार सदर सुधारणा ४ जानेवारी २००८ पासुन अमलात आले असे मानन्यात येईल, असे नमुद आहे करिता,

अनाधिकृत बांधकामाबाबत नगररचना विभागाकडुन प्राप्त यादीनुसार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या ज्या मिळकतींना दुप्पट शास्ती लागलेली आहे. त्यांची मागणी नोंदवहीत दुरुस्ती करणेस तसेच वाढीव मागणी निर्लेखित करणेस तसेच ज्या मिळकत धारकांनी यापुर्वी दिलेल्या दुप्पट शास्तीच्या मागणी देयकानुसार कराचा भरणा केलेला आहे ती दुरुस्त करुन ज्यादा भरणा केलेली रक्कम पुढील वर्षीच्या मागणी देयकात समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या मिळकतीवर शास्तीची आकारणी करतांना मिळकतीच्या फक्त अनधिकृत असलेल्या भागाचेच मुल्यमापन करुन तेवढया भागापूरतीच शास्तीची आकारणी करण्यात यावी. संपूर्ण मिळकतीवर शास्तीची आकारणी करण्यात येवू नये.

तथापी या अधिनियमांमुळे अनाधिकृत बांधकामावर वचक कायम रहावा या करीता नगररचना विभागाने शहरातील अनाधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण करुन केलेल्या अनाधिकृत बांधकामाची माहिती प्रभाग निहाय प्रभाग समितीस पुरवावी तसेच यापुढे दर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत नगररचना विभागाने शहरातील होत असलेल्या / झालेल्या अनाधिकृत बांधकामाची प्रभाग कार्यालयास माहिती पुरवावी. प्रभाग कार्यालयाने पुढील दहा दिवसात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार शास्तीची आकारणी करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ३५ प्रतिकुल मते :- १५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ८) दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता राबवायच्या योजनांबाबत धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.
**मा.उपमहापौर :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ मला थोडे बोलायचे आहे. महापौर साहेब मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** बॅटऱ्या संपत आलेल्या आहेत.
**श्री.नवनाथ दरकुंडे :-** भाऊ मला बोलायचे होते थोडे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणाकरीता विविध योजनांचा आराखडा तयार करण्यात आला. सदर योजनांवर आयुक्त यांचे दालनात दि.२८/०४/२०२१ व दि.१७/०६/२०२१ रोजी बैठकीचे आयोजन करुन चर्चा व सादरीकरण करण्यात आले. तद्नंतर आयुक्त यांचे सूचनेप्रमाणे उपायुक्त यांचे दालनात दि.२२/०६/२०२१ रोजी विविध दिव्यांग संघटनेच्या अध्यक्षांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर बैठकीला जिल्हा दिव्यांग केंद्रप्रमुख जळगांव तसेच विविध दिव्यांग व्यक्ती सुध्दा उपस्थित होते. बैठकी दरम्यान दिव्यांग व्यक्तींना येणाऱ्या अडचणी,सुचना जाणून घेतल्या व बैठकी दरम्यान दिलेल्या सुचनेप्रमाणे योजना क्र.१० व ११ सदर आराखडयामध्ये समाविष्ठ करण्यात आल्या व योजनांमध्ये दिलेल्या सुचनांचा देखिल समावेश करण्यात आला. दिव्यांग व्यक्तीकरीता तयार करण्यात आलेल्या एकुण १ ते ११ योजना क्रमांकानुसार खालील प्रमाणे -

१) शिष्यवृत्ती योजना
२) क्रिडा स्पर्धेतील विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य
३) दिव्यांग व्यक्तींच्या मागणीनूसार त्यांना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य.
४) दिव्यांगांच्या लग्नाकरीता अर्थसहाय्य
५) ६० वर्षाचे वरील दिव्यांग व्यक्तीकरीता पेन्शन योजना
६) दिव्यांग व्यक्तींना चलन वलन साधनाकरीता अर्थसहाय्य
७) दिव्यांग व्यक्तीस उदरनिर्वाह/रेशनापोटी अर्थसहाय्य करणे.
८) शाळेत जावू न शकणाऱ्या दिव्यांग मुले/मुलींना अर्थसहाय्य
९) दिव्यांग महिला बचत गटातील दिव्यांग महिलांना अर्थसहाय्य
१०) दिव्यांग व्यक्तींना मूलभूत सोयी सुविधा निर्माण करणे.
११) सुवर्ण नगरी दिव्यांग समाजसेवा पुरस्कार.

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणाकरीता तयार करण्यात आलेल्या आराखडयात उपरोक्त विविध १ ते ११ योजनांचा समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ९) मा.महापौर यांचेकरिता महानगरपालिका फंडातुन GeM Portal वरुन नविन वाहन खरेदी करण्याकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, आमचा विरोध आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** भारतीय जनता पक्षाचा विरोध नोंदुन घ्या.
श्री.राजेंद्र पाटील :- भारतीय जनता पक्षाचा विरोध आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** १० नंबर विषय घ्या.
**मा.महापौर :-** कैलास भाऊ.
**श्री.कैलास सोनवणे :-** १० नंबर विषय घ्या.
**नगरसचिव :-** ९ नंबरच्या विषयाला आपले मत काय आहे राजु भाऊ. आदरणीय राजु भाऊ.
**श्री.नितीन लढ्ढा :-** विरोध आहे भाजपाचा विरोध आहे.
**नगरसचिव :-** राजु भाऊ विषय क्र.०९ ला आपली भुमिका काय ?
**श्री.राजेंद्र पाटील :-** विरोध आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मा.महापौर यांनी दि.१९/०५/२०२१ अन्वये महानगरपालिकेची वाढती हद्द तसेच वाढत्या लोकसंख्येचा विचार करता नागरिकांच्या समस्या जाणुन घेणे त्या सोडविणे, स्थळ पाहणी करणे, नागरिकांना महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा आढावा घेणे, शासकीय कार्यक्रमांसाठी विविध शासकीय कार्यालय ठिकाणी उपस्थित राहणे

कामी वाहनांची आवश्यकता असल्याबाबत व शासन धोरणानुसार महानगरपालिका मा.महापौर यांना राजशिष्टाचारानुसार ठरविण्यात आलेले दर निकषानुसार महापौर कार्यालयास एक नविन अदयावत असे वाहन खरेदी करुन उपलब्ध करुन देणे बाबत वाहन विभागाला सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने मा.महापौर कार्यालयास वाहन खरेदी करणे कामी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. एमयुएम-२०२०/प्र.क्र.८८/नवि-१७ दि.३० जुलै २०२० नुसार राज्यातील महानगरपालिकांचे मा.महापौर आणि नगरपालिका / नगरपंचायतीचे नगराध्यक्ष यांच्या वापरासाठी खरेदी करावयाच्या वाहनांच्या वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित वाहन खरेदी ही नविन वाहन / फायर / आरोग्य लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात येईल. त्याकामी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये नविन वाहन / फायर / आरोग्य अंतर्गत रु.२ कोटीची अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण/२०१६ प्र.क्र.२१५/उदयोग-४, मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.२४ ऑगस्ट २०१७ अन्वये शासन निर्णयानुसार रक्कम रु.३ लक्ष व त्यावरील खरेदी करिता GeM Portal वरील पुरवठाराकडून वस्तु व सेवाची गुणवत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इत्यादी बाबी तपासुन स्पर्धात्मक Online निविदेव्दारे (Online Bidding) पध्दतीने GeM Portal वरुन सन्मा.महापौर यांचेकरिता प्रशासकीय कामकाजाकरिता नविन वाहन खरेदी करणे कामी येणाऱ्या पर्यायी खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सुचविल्याप्रमाणे रु.१५ लक्ष कीमतीच्या आतील वाहन कोणत्या कंपनीचे घेण्यात यावे यासंदर्भात मा.महापौर यांचेशी चर्चा करुन वाहन घेण्यात यावे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ३५ प्रतिकुल मते :- १४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १०) जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांचे सुधारित सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.परंतू एक छोटीशी सुचना करू ईच्छितो की विद्युत विभागाकडे उप-अभियंता पदाकरीता विद्युत विभागात पदोन्नती ही १०० टक्के असुन जळगांव शहर महानगरपालिकेच्या नेमणूकी करीता अर्हता पध्दतीच्या नेमणूकी निश्चित करण्यात आलेल्या आहेत.त्याच्यामध्ये जळगांव शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सहाय्यक अभियंता या पदावर किमान ५ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता किंवा ५ वर्ष पुर्ण झालेले अभियंत्याची नियुक्ती करता येईल.परंतू या संदर्भात बांधकाम विभागाच्या संदर्भात नेमणुकीची पध्दत ज्या पध्दतीने निश्चित करण्यात आलेली आहे. ती अशी आहे की जळगांव शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक अभियंता विद्युत विभाग या पदावर किमान ५ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या किंवा सेवाज्येष्ठता किंवा अधिकाऱ्याच्या गुणवत्तेच्या आधारे अश्या पध्दतीने नियुक्ती करता येईल.जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजुर सहाय्यक अभियंता या पदाची वेतनश्रेणी व कामाचे स्वरूप हे प्रस्तावित असलेल्या अभियंता या पदाशी समकक्ष असल्याने या पदाचे रूपांतर उपअभियंता या पदावर स्थापत्य करण्यात यावे. विद्यमान अभियंता या पदावर अभियंता बाबतीत त्यांचे समकक्ष शाखा अभियंता या पदावर ५ वर्ष सेवा ग्राह्य धरली जाईल. म्हणजे ज्या बांधकाम विभागामध्ये ज्या पध्दतीने नेमणुकीची पध्दत निश्चित करण्यात आलेली आहे. तीच

पध्दत विद्युत विभागासाठी निश्चित करण्यात यावी . एवढी एक किरकोळ सुचना बदल करून तो प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्रीमती. रेखा पाटील :-** महापौर महोदया मला सुचना मांडायची आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई

**श्रीमती. रेखा पाटील :-** महापौर महोदया मला

**मा.महापौर :-** रेखा ताई बोला

**श्रीमती. रेखा पाटील :-** मनपा कार्यालयात रोजंदारी कर्मचारींसाठी डिसीई डिप्लोमा कनिष्ठ अभियंता पदासाठी घेण्यात यावी.

**मा.महापौर :-** सन्मा. सदस्या ते आपली सुचना प्रशासनाच्या लक्षात आणुन दिली . प्रशासन त्या संदर्भात कार्यवाही करतील.

**श्रीमती. रेखा पाटील :-** ठिक आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका ‘ड’ वर्ग म.न.पा.असुन दि.२१ मार्च २००३ रोजी जळगांव शहर महानगरपालिकेची स्थापना झालेली आहे.

शासनाने महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांचे मॉडेल सेवाप्रवेश नियम तयार केले असुन त्याआधारे प्रत्येक महानगरपालिकेने त्यांचे सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ४५६(१) अन्वये तयार करण्यात आलेले आहेत.

जळगांव शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार महानगर पालिकेतील सेवाभरती विनियम नियम तयार केलेले आहेत.

जळगांव म.न.पा.क्षेत्रातील पायाभुत सुविधांवर पडणारा ताण, राज्य व केंद्रशासनाने विविध प्रकल्प व प्रशासनाकडुन कामाबद्दल पदाधिकारी व नागरिकांची वाढलेली अपेक्षा यामुळे जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमात बदल करुन गतिमान व कार्यक्षम प्रशासनासाठी,महानगरपालिकेतील काही अभियंते व इतर काही विभाग प्रमुख यांच्या समवेत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, व सहाय्यक आयुक्त यांनी वेळोवेळी बैठका घेवुन म.न.पा. अधिकाऱ्यांशी वेळोवेळी प्रत्यक्ष चर्चा करुन कोणते पद कामाचे आहेत, काही कामे कंत्राटी पध्दतीने करण्यात येवु शकतात काही नविन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाज केली जावु शकतात अशी पदे अतिरीक्त असल्याने व्यपगत करण्यात येत आहे. काही पदांची पुनरावृत्ती झालेली होती. उदा.कनिष्ठ अभियंता हे पद सेवा प्रवेश नियमातील प्रत्येक विभागात जसे पा.पु./बांधकाम इ. दाखविण्यात आले होते अशा सर्व पदांचे एकत्रिकरण करुन त्यापदासाठी सदर पद कोणकोणत्या विभागात कार्यरत असेल ते दर्शविण्यात आले आहे.

तसेच म.संचालक,अग्निशमन सेवा यांचेकडे जा.क्र./अग्नि/२३५ दि.१९/०५/२०२१ अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यांची मान्यता प्राप्त झालेनंतर मान्यता दिलेल्या पदांबाबत नेमणुकीची पध्दत व शैक्षणिक अर्हतेनुसार मान्यतेच्या अनुषंगाने सेवा प्रवेशात नमुद करण्यात येईल.

यापुर्वी प्रारुप सेवा प्रवेश नियमावली जमपा/आस्था/२८२४/२०१८ दि.१५/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आली, त्यानंतर त्याच सेवाप्रवेश नियमावलीत सुधारणा करुन सुधारित सेवा प्रवेश नियम जमपा/आस्था/४२१/२०१९ दि२८/०६/२०१९ रोजी पाठविण्यात आलेला आहे.

विविध विभागातील एकाच संवर्गातील पदे वेगवेगळया ठिकाणी न दर्शविता विविध विभागातील एकाच संवर्गातील पदे एकाच ठिकाणी नमुद करुन त्यांचे सेवा प्रवेश नियम एकाच ठिकाणी नमुद केलेली आहेत. अत्याधुनिक शिक्षण पध्दती व वेगवेगळया नविन तंत्रज्ञानाच्या आधारे सरळसेवा भरती करणेवर भर दिलेला आहे. सेवा प्रवेश नियम तयार करीत असतांना क्लिष्टपणा टाळुन अत्यंत सुटसुटीत व सोप्या भाषेत नियम तयार केलेले आहेत.

सुधारीत सेवाप्रवेश नियम महासभा ठराव क्र.८१७ दि.२२/१२/२०१७, जमपा/आस्था/जा.क्र./२८२४/२०१८ दि.१५/०१/२०१८, जमपा/आस्था/४२१/२०१९ दि.२८/०६/२०१९ व महासभा ठराव क्र.३३२ दि.१६/१२/२०२० अन्वये

शासनाकडे पाठविण्यात आलेले प्रस्ताव रद्द करणेस व सभागृहातील झालेल्या चर्चेनुसार सेवाप्रवेश नियमात खालील प्रमाणे दुरुस्त्या करणेस व त्यानुसार नविन सेवाप्रवेश नियम तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) उप अभियंता स्थापत्य यापदासाठी सेवाप्रवेश नियमातील अर्हता व नेमणूकीची पध्दत ब व क मध्ये जशी नमूद केलेली आहे तशीच उप अभियंता (विदयुत) मध्ये नमूद करण्यात यावी.

२) सेवाप्रवेश नियमातील अ.नं.८६ मध्ये सफाई कामगार (मेलेली जनावरे उचलणारे कामगार) दर्शविण्यात आलेले आहेत सदर पदांवर सदया कार्यरत मानधनावरिल  सफाई कामगारांनाच नियुक्ती देण्यात यावी.

३) छायाचित्रकाराचे एक नविन पद समाविष्ठ करुन सदरचे पद नामनिर्देशनाने कार्यरत कर्मचाऱ्या मधून शैक्षणिक अर्हतेनुसार निवड करण्यात यावी.

४) वैदयकीय अधिकारी (BAMS) यांची ४ नविन पदे नामनिर्देशनाने कार्यरत असलेल्या वैदयकीय अधिकारी मधून शैक्षणिक अर्हतेनुसार निवड करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती करुन तसा सुधारीत प्रस्ताव तयार करुन शासनाकडेस मंजुरीस्तव पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५०** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सन्मा.महापौर महोदया,

**श्री. चेतन सनकत :-** सन्मा. महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयात आकृतीबंधात जी पदे

**श्री. चेतन सनकत :-** या विषयावर भाऊ मला या विषयावर बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** आकृतीबंधात ज्या ४ जागा प्रस्तावित केलेल्या आहेत. त्या ४ जागा प्रस्तावित करीत असतांना आपल्याकडे रोजंदारी किंवा मानधनावर जे कार्यरत जे दोन कर्मचारी आहेत. मला असे वाटते की ते बऱ्याच वर्षांपासुन आपल्या महानगरपालिकेच्या कामात सेवेत कार्यरत आहेत. मला अस वाटत की संबंधित आकृतीबंधाचा विचार करतांना त्या दोन कर्मचाऱ्यांचा कुठेतरी विचार केला पाहीजे तर प्रथम प्रधान्याने त्या दोन जणांचा विचार करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो जी पद जी निर्माण केलेली आहेत आपण परंतू

**श्री.कैलास सोनवणे :-** सन्मा.महापौर महोदया,

**श्री. चेतन सनकत :-** सन्मा. महापौर महोदया मला बोलायचे आहे या विषयावर

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू

**श्री. चेतन सनकत :-** महापौर ताई मला बोलायचे आहे

**मा.महापौर :-** बोला चेतनभाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मलाही बोलायचे आहे या विषयावर

**श्री.चेतन सनकत :-** ताई या डॉकेटमध्ये दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सफाई कर्मचाऱ्यांची संख्या किती दाखविलेली आहे.त्याचा खुलासा करावा. हॅलो , हॅलो

**मा.महापौर :-** बोला चेतनभाऊ

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाने डॉकेटवर दिलेली सफाई कर्मचाऱ्यांची संख्या जी आहे . त्या सफाई कर्मचारी संदर्भात व  आरोग्य विभागासंदर्भातील पदासंदर्भात दिलेल्या आकडयांचा खुलासा करावा .

**मा.महापौर :-** प्रशासनाने यासंदर्भात माहिती द्यावी.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.आयुक्त साहेब यांचेकडून मला माहिती पाहीजे.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे होते.
**श्री.चेतन सनकत :-** प्रशांतभाऊ माझा विषय होवुन जाऊ द्या मग नंतर बोला .
**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर महोदया मलाही बोलायचे आहे यानंतर
**सौ.विद्या गायकवाड ,मा.अतिरीक्त आयुक्त :-** विविध ठिकाणी आपल्याला सफाई कर्मचारी लागत असतात. त्यामुळे वेगवेगळया विभांगामध्ये सफाई कामगांराची आपण नियुक्ती करीत असतो.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.गायकवाड मॅडम थांबा
**सौ.विद्या गायकवाड ,मा.अतिरीक्त आयुक्त :-** हो
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.गायकवाड मॅडम मला आयुक्त साहेबांकडुन खुलासा पाहीजे.
**मा.आयुक्त :-** अतिरीक्त आयुक्त आयुक्तांच्या वतीनेच खुलासा करतात तरी परंतू तुमची आग्रहाची मागणी विचारात घेवुन याच्यामध्ये सन्मा चेतनभाऊ आकृतीबंध जर आपण बघितला असेल .
**श्री.चेतन सनकत :-** हो
**मा.आयुक्त :-** तर त्याच्यामध्ये सफाई कामगारांची एकूण जी पदे आहेत. त्या पदांची संख्या दिलेली आहे. ती जर संख्या आपण विचारात घेतली . तर सफाई कामगारांची संख्या आपण आपल्याकडे २३६ पद आहेत आणि ३९८ नविन आपण निर्माण करायची म्हंटले आहे. अशी एकूण ६३४ पद आपण आज महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करतो आहोत . आता याच्यामध्ये जे नविन ३९८ म्हंटलेले आहे. ती प्रत्यक्षामध्ये नविन पद नाहीयेत . तर याच्यामध्ये ९ पासुन ते १६ पर्यंत अ.क्रं. ९ ते १६ याच्यामध्ये जे वेगवेगळया सफाई कामगारांची म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची म्हणजे सफाई कामगारांचीच आणि सेवेमध्ये असणाऱ्या कामगांराची जी पदे आहेत. म्हणजे झाडु कामगार , संडास कामगार , भिस्ती, कचरा कंपोस्ट वगैरे
**श्री.चेतन सनकत :-** हो
**मा.आयुक्त :-** या सगळ्या पदांचे एकत्रित पणे आपण त्या सगळया पदांना आपण सफाई कामगार म्हणणार आहोत. जेणेकरून भविष्यामध्ये लाड - पागे शिफारशीच्या प्रमाणे त्यांना लाभ देण्याचा विषय असो किंवा अनुकंपाचा लाभ देण्याचा विषय असो शासनाच्या जीआर मध्ये हा शब्द वापरला जातो . अश्या वेळेला एखादा भाजी मार्केट कामगार हा सफाई कामगार हा पुन्हा सफाई कामगार या संज्ञेमध्ये येतो की नाही येत . अशा प्रकारचे वाद उद्या निर्माण होवू नये आणि अक्च्युली काम करणाऱ्या सफाई कामगाराला त्याचे पदनाम सफाई कामगार नाही म्हणुन त्याला सफाई कामगारांना मिळणाऱ्या फायद्यांपासुन वंचित राहू नये म्हणुन आपण या सगळ्यांचे पदनाम बदलुन आपण हे ३९८ पद सफाई कामगार या पदांची करतोय आणि यापुर्वी जे जे सभेने निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे एकूण ६३४ पदे अधिक आपण ज्या काही बाबी निदर्शनास आणुन दिल्या होत्या . त्याप्रमाणे अन्य असलेली ३ पद अशी एकूण ६३७ पदे ही अशी एकूण सफाई कामगारांची राहणार आहेत आपल्या महापालिकेमध्ये
**श्री.चेतन सनकत :-** साहेब याच्यात एक मुद्दा तुमच्या लक्षात आणुन द्यायचा आहे की तुम्ही समजा जे आता मला जे बोललात की दुसऱ्या ठिकाणी जे काम करणारे आहेत. जसे की भिस्ती कामगार असो की मैला मोटर कामगार असो किंवा सफाई कामगार असो ते काम वेगळे आहे आणि झाडू काम आणि गटार काम हे वेगळे आहे आणि हे काम याची शासनाची गाईडलाईन्स वेगळी आहे आणि या कामाची गाईडलाईल्स वेगळी आहे आणि तुम्ही जे आत्ता मला जे सगळ उत्तर दिलेले आहे. त्याच्या अनुषंगाने मी बोलतोय आता माझ्या हातामध्ये ऑफीशियली कागद आहे आमचे सन्मानिय जिल्हा अध्यक्ष आहेत अजयभाऊ घेंगट त्यांना माहितीच्या अधिकारामध्ये प्रशासनाने दिलेले कागद आहेत ते माझ्या हातात आहे. त्याच्या मध्ये एकाठिकाणी फक्त त्यांनी आराखडा मध्ये त्यांनी माहिती मागविलेली आहे. तर तत्कालिन आरोग्याधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. फक्त झाडू कामगार आणि त्याची साठी लागणारी संख्या ही वेगळी आहे आणि गटार कामगार साठी लागणारी संख्या वेगळी आहे. तुम्ही हे सगळी जी आकडेवारी दिलेली आहे. ती सर्व मोघम स्वरूपाची दिलेली आहे आणि सर्व मिक्स करून त्याच्यामध्ये सफाई कामगार असा उल्लेख केला गेलेला आहे. झाडु काम वेगळे पाहीजे. तशी गाईडलाईन्स आहे जशी शासनाची तसे झाडु काम वेगळे , गटार काम वेगळे , भिस्ती काम वेगळे ते वेगळे असेल नियमाप्रमाणे आणि दुसरी गोष्ट जर कधी गाईडलाईन्स नुसार झाडु कामगार आणि गटार कामगार भरता आले नाही तर त्याची आपल्याला भविष्यात अडचण होणार आहे.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया मला बोलायचे आहे दोन मिनिटं

**श्री.चेतन सनकत :-** विशालभाऊ माझा विषय होवुन जाऊ द्या मग आपल्याला संधी दिली जाईल मग आपण बोला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही मला फक्त याचाच एकच मुद्दा मांडायचा आहे.

**मा.आयुक्त :-** महानगरपालिकेची भविष्यामधील गरज आणि आत्ताचे असलेले आपले भौगोलिक क्षेत्र आणि साधारण २०२१ ला आता असणारी लोकसंख्या या सगळ्यांचा विचार करून आरोग्य विभागामधील जे अधिकारी आहेत. त्यांच्याशी चर्चा करून आपण ही पदसंख्या निश्चित केलेली आहे. एवढी जर पदसंख्या आपल्याला शासनाने मंजुर केली . तर मला वाटते आपल्याला नजिकच्या काळामध्ये काही अडचण यायला नको. या व्यतिरीक्त राज्य शासनाने याच्यामध्ये जी दुरूस्ती केलेली आहे . याच्यामध्ये वेगवेगळ्या सेवा ज्या आहेत. त्याचे आपण आऊटसोर्सिंग केलेले आहे. खाजगीकरण केलेले आहे. जसे आपल्याला काही सफाई कर्मचारी कमी पडतात किंवा मग आपण कॉन्ट्रक्ट पध्दतीने घेतो आहोत.अनेक वर्षापासुन आपल्याकडे ही कार्यपध्दती आहे.बहुतांश अनेक नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये आहे.सुरक्षा रक्षक असतील किंवा बांधकामचे काही कर्मचारी असतील . बागेमध्ये काम करणारे काही कर्मचारी आहेत किंवा आता आपल्याला कोविड मध्ये लागणारे कर्मचारी आहे यांचा आपण आऊट सोर्सिंग करतो. त्यामुळे आऊट सोर्सिंग मुळे उपलब्ध होणारे कामगार आपले कायम आस्थापनेवर असणारे कामगार याचा दोन्हींचा एकत्रित विचार केला तर येणाऱ्या काळामध्ये सफाईची गरज आहे. ती आपण एवढ्या संख्येमध्ये आपण निश्चितपणे पुर्ण करू शकतो. सफाई कामगारांची संख्या आपण जर विचारात घेतली . तर संपुर्ण जी काही कागदपत्र तुम्ही समोर ठेवलेली आहेत.त्याचा जर विचार केला तर गटारीची लांबी रूंदी याचा जर विचार केला तर एवढी पदसंख्या निर्माण करण आपल्याला आवश्यक नाही आणि तेवढा आपल्याला आपल्या आस्थापना खर्चाच्या दृष्टीने शक्य होणार नाही. आपल्याला जास्तीत जास्त निधी हा नागरी सेवासुविधा साठी उपलब्ध व्हावा म्हणुनच राज्य शासनाने ही ३५ टक्के आस्थापना खर्चाची मर्यादा दिलेली आहे.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब ते मला मान्य आहे.

**मा.आयुक्त :-** आणि आपली आस्थापना खर्चाची मर्यादा या दोन्हींची सांगड घालण्याचा प्रयत्न करून आपण ही संख्या निश्चित केलेली आहे. यावेळेला जर आपल्याला कमी पडत असतील तर काही सेवांच आपण आऊट सोर्सिंग करून आपल्याला हे करावच लागणार आहे.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब मला याच्यामध्ये एक असा विषय समोर आणुन द्यायचा आहे. माहितीच्या अधिकारामध्ये जे दिले गेलेले कागद आहेत.त्याच्यामध्ये दिली गेलेली म्हणजे जी वाक्य रचना आहे ती म्हंटली गेलेली आहे ती शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने किती कामगार आवश्यक आहे . २१३५ बरोबर हे माहितीच्या अधिकारामध्ये दिले गेलेले कागदपत्रे आहेत हे माझ्या हातात आहे बरोबर आहे. याच्यामध्ये तत्कालिन आरोग्याधिकारी यांचे सिग्निचर आहेत आणि सिएसआय यांचे काऊंटर वगैरे आहेत आणि दुसरी गोष्ट आता तुम्ही जे म्हंटलात ते मला मान्य आहे की आपल्याला आस्थापना खर्च लागू आहे.दुसरी गोष्ट आपल्याला शासनाची परवानगी आस्थापनाचा खर्च जास्त राहीला तर भेटणार नाही . पण याच्यामध्ये काही पद असे आहे जे आपण कमी करू शकतात . जे विनाकारण वाढले गेलेले आहे ते कमी करून शासकीय गाईडलाईन्स नुसार आपण सफाई कर्मचाऱ्यांची पदे वाढविणे गरजेचे आहे. कारण की याच्यामध्ये असे होता कामा नये की सफाई कर्मचारी म्हणजे जो वर्ग आहे. तो मागासवर्गीय वर्ग आहे. मागासवर्गीयावर अन्याय होता कामा नये. आपण हे वाढविणे गरजेचे आहे. मागे प्रशासनाकडून तत्कालिन आयुक्त साहेब असतांना एक फार मोठी चुक झालेली आहे. जसे मागे काही भरती केली गेलेली होती. सन २०१२ ते १३ च्या दरम्यान त्यावेळेला सर्व महानगरपालिकेला मोघम ठेवुन परस्पर भरती केली गेलेली होती आणि सर्व बाहेरगांवी असणारे सर्व ९२ लोकं भरती झाले होते. तस काही होता कामा नये आणि सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढवुन जो तुम्ही मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी आकृतीबंधाच्या मध्ये तुम्हाला अडथळा आणत नाहीये. मी आस्थापना खर्च वाढवा अस बोलत नाहीये. कायद्याच्या चौकटीत राहून , शासनाच्या परिपत्रकाच्या अधिन राहून सर्व सफाई कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने हे पदे वाढविणे गरजेचे आहे.मागासवर्गीय समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने हे पदे भरणे गरजेचे आहे. कारण की आज आपण वर्षानुवर्षापासुन बघत आहोत की महानगरपालिका झालेली आहे तेव्हापासुन भरती झालेली नाहीये . सन्मा. मंत्री महोदय श्री. शिंदे साहेब हे पॉझिटिव्हली असल्याकारणाने होईल ते डिसिझन जे होणार आहे ते चांगलेच होणार आहे. मुख्यमंत्री साहेब को-ऑपरेट करीतच आहेत म्हणुन आता जे डिसिझन होणार आहे ते चांगलेच होणार आहे. म्हणुन मी म्हणत आहे की माझ्या सफाई कर्मचारी वर्गावर अन्याय होता कामा नये आणि मागासवर्गीय समाजावर अन्याय होता कामा नये.

त्याप्रमाणे हे सर्व मंजुर करणे गरजेचे आहे. मागे आमचे सन्मा.अध्यक्ष युनियनचे अध्यक्ष अजयभाऊ घेंगट यांनी एक तक्रार दाखल केलेली होती ह्युमन्स राईट मध्ये त्याचे आदेश जे आलेले आहेत सन २०१३ मध्ये त्या आदेशाच्या अनुषंगाने आपल्याला आदेश असे होते की ३० दिवसाच्या आंत ५२३ जागा भरणे संदर्भात ५८५ असे काहीतरी आहे ते ती जागा आजपर्यंत भरली गेलेली नाही आणि त्याच्यानंतर ती जागा भरणे गरजेची होती . तेव्हा आपण शासनाला परवानगीसाठी पाठविलेले आहे व मार्गदर्शनासाठी पाठविलेले आहे. त्यास समजा ९ ते १० वर्ष झालेले आहेत.त्या गोष्टीला ८ वर्ष झालेले आहे. आजपर्यंत त्याचा कुणी पाठपुरावा केलेला नाहीये. आता सन्मा.महापौर ताई असो , उपमहापौर भाऊ असो आम्ही सर्व पदाधिकारी असो आम्ही या गोष्टीला पाठपुरावा करत आहेत. आम्ही मंजुरी करून घेवुन आणण्याच्या तयारीत असतांना तुम्ही मागासवर्गीय लोकांवर अन्याय होणार नाही या गोष्टीची गांर्भीयता घ्या आणि सफाई कर्मचारी वर्गाला जास्तीत जास्त कसा लाभ होईल . या गोष्टीवर लक्ष केंद्रीत करा. जेणेकरून तुम्ही शासन नियमाची पायमल्ली करून जे आकडा कमी केलेला आहे. सफाई कर्मचारी वर्गाची संख्या वाढविणे गरजेचे आहे. ती ईकडे वाढवुन मिळावी अशी माझी अपेक्षा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया मला बोलायचे आहे

**श्री.चेतन सनकत :-** माझ्याकडे जे उपलब्ध आहे. ते सगळे

**श्री.प्रशांत नाईक:-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मला माहितीच्या अधिकारामध्ये दिले गेलेले आहे.ते सर्व कागदे मी हातात धरून ते बोलत आहोत. ते सर्व पत्र मी आपल्याला दिलेले आहेत. सन्मा. आमचे अजयभाऊ यांनी आपल्याला दिलेले आहेत.हे सगळे कागदोपत्री पुरावे असतांना तुम्ही जर कधी हे पदं कमी भरले तर आता समजा एखाद्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा एखाद्या नागरीकाने हायकोर्टात अपिल केली आणि याच्यावर स्टे आणले तर ही भरती भविष्यात होणार नाही. हे तुम्ही लक्षात ठेवा. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने जळगांव शहराच्या हिताच्या दृष्टीने हे डिसिझन घेतांना आता आपल्याला चांगल डिसिझन कोणावर अन्याय होता कामा नये आणि कोणत्या समाजावर अत्याचार होता कामा नये अस डिसिझन घेणे गरजेचे आहे म्हणुन आपण याच्यावर विचार करून ते शासन नियमाच्या अनुषंगाने अजून वाढवावे अशी माझी एक सुचना आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला बोला कैलासअप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाने जो प्रस्ताव दिलेला आहे तो आम्हाला मान्य आहे.परंतू चेतनभाऊ या ठिकाणी जे बोलले की ईथे अनावश्यक भरती तर आपण काही अनावश्यक जागा वाढविलेल्या आहेत का आपण मॅडमांनी खुलासा करावा गायकवाड मॅडमांनी

**सौ.विद्या गायकवाड ,मा.अतिरीक्त आयुक्त :-** अनावश्यक अश्या जागा नाही वाढविलेल्या सर्व कर्मचारी HOD यांच्याशी चर्चा करूनच कमीत कमी कर्मचाऱ्यांमध्ये आम्ही आस्थापनाचा खर्चाच्या तरतूदी मध्ये बसवुन जागा आपण प्रस्तावित केलेल्या आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** जर मॅडमांनी सांगीतल्याप्रमाणे खर असेल तर मग चेतनभाऊ जे म्हणताहेत की बाकीच्यांचे कमी करा आणि या जागा वाढवा याला काही अर्थ नाहीये असं मला वाटत. म्हणजे कोणावर अन्याय होत नाहीये जे अनुसुचित जाती जमातीचे लोक आहेत त्यांच्यावरही काही अन्याय होता कामा नये आणि आपण या ठिकाणी अशी वर्गवारी करायला नाही पाहीजे. सर्व कर्मचारी सारखेच आहेत. सगळे आपलेच आहेत जळगांव महापालिकेत

**श्री.चेतन सनकत :-** अप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** सेवा देतात आहेत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे भाजपाच्या सर्व नगरसेवकांना.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पासाहेब आपण जे बोललेले आहात की आपल्याला

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ

**श्री .विशाल त्रिपाठी :-** महापौर साहेब

**श्री.चेतन सनकत :-** की आपण यासंदर्भात एक विषय मांडु ईच्छितो की याच्यामध्ये शासन परिपत्रक हे म्हणजे तुम्ही केराची टोपली दाखवित आहेत का ? मी जे जे विषय बोलतोय ते कागदाच्या पुराव्यानिशी बोलतोय.म्हणजे शासनाचे परिपत्रक जे मला माहितीच्या अधिकारामध्ये दिले गेलेले आहे. ती यांनी चुकीची माहिती दिली गेलेली आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** चेतनभाऊ
**श्री.चेतन सनकत :-** एक मिनिटं अप्पासाहेब ऐकून तर घ्या.
**श्री. कैलास सोनवणे :-** प्रशासनाने , बोला बोला
**श्री.चेतन सनकत :-** अप्पासाहेब आपल्याला माझ्यापेक्षा जास्त ज्ञान आहे . तर मला दोन मिनिटं समजुन घ्या.
**श्री. कैलास सोनवणे :-** बोला
**श्री.चेतन सनकत :-** जे कागदं मला दिले गेलेले आहे आमचे सन्मा.अजयभाऊ घेंगट यांना माहितीच्या अधिकारामध्ये दिले गेलेले आहेत. ते कायद्याच्या अनुषंगाने दिले गेलेले आहेत बरोबर त्या अनुषंगाने तेवढे म्हणजे शासकीय गाईडलाईन्स नुसार ते पदे भरणे गरजेचे आहे.जेवढे पदे देणे गरजेचे आहे सफाई कर्मचाऱ्यांना मग तेवढे का दिले गेलेले नाही आणि आता तुम्ही डॉकेटमध्ये म्हंटले गेलेले आहे की ही भरती हे आकृतीबंध ठेवलेला आहे हे शासन परिपत्रकाला धरून आहे म्हणजे ही शासन परिपत्रक आणि आकडे का वेगळे हे शासन परिपत्रक आकडे वेगळे हे मोघम का आहे . याचा स्पष्ट अभिप्राय पाहीजे ना त्याच्यावरती.
**श्री. कैलास सोनवणे :-** प्रशासनाने सर्व कायदेशीर गोष्टी तपासुन हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा आणि आम्हाला प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे. परंतू त्यांनी कायदेशीर बाबी या ठिकाणी तपासुन घ्याव्यात.
**श्री .विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया मला बोलायचे आहे.
**श्री.चेतन सनकत :-** याच्यामध्ये जेवढ्या जागा वाढवता येईल तेवढ्या जागा वाढवावे. एका ठिकाणी उल्लेख केला गेलेला आहे क्षेत्रफळाच्या अनुषंगाने माझ्या हातात हा कागद आहे.
**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ सन्मा.चेतनभाऊ आपल्या सुचनांची येथे दक्षता घेण्यात आलेली आहे आणि इतर सदस्यांना बोलु द्या. ज्यावेळेस आपल्या सुचनांचे पालन झाले नाही तर त्यावेळेस आपण बोलले तर ठिक आहे. परंतू आपल्या सुचनांची नोंद घेण्यात आली आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.
**मा.उपमहापौर :-** ठिक आहे ना आपण दिलेल्या सुचनांची नोंद घेण्यात आलेली आहे . आपण इतर सदस्यांना बोलू द्या.
**श्री.चेतन सनकत :-** भाऊ माझ म्हणण असं आहे की मला आता
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया
**श्री.चेतन सनकत :-** महासभेमध्ये आश्वासन भेटले
**मा.उपमहापौर :-** भाऊ प्रशासन त्या संदर्भात तुम्हाला उत्तर देणार आहे.
**श्री.चेतन सनकत :-** की आम्ही सफाई कर्मचाऱ्यांच्या जागा वाढवुन देवु. तर आमची काही हरकत नाहीये.
**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ , चेतनभाऊ त्यांना या विषयावर चर्चा करायची असल्याकारणाने आपण थोडी आपल्याला विनंती आहे. आपण थोडी शांतता घ्यावी आपल्याला यामध्ये प्रशासन उत्तर देणार आहे. इतर सदस्यांना याच्यामध्ये मत मांडायचे आहे. तर त्यांना मत मांडु द्यावे.
**श्री.चेतन सनकत :-** बिलकुल भाऊ मला मान्य आहे परंतू याच्यामध्ये प्रशासनाने दक्षता घ्यावी.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया
**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाने माझ्या विषयाची दखल घ्यावी.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर ताई
**श्री.चेतन सनकत :-** विशालभाऊ बोला.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला प्रशासनाला एक सुचना द्यायची आहे.आपल्या आकृतीबंधामध्ये छायाचित्रकार हे पद समाविष्ट करण्यात यावं. जेणेकरून आपल्या महापालिकेला छायाचित्रकार विविध प्रमुख्य अतिक्रमण , नगररचना , घरपट्टी विभाग , मार्केट वसुली , कोरोना काळातील विशेष मोहीम मध्ये आपल्याला जे छायाचित्रकाराचे पद हे आकृतीबंधामध्ये समाविष्ट करावे . वेगळं भरण्याची आवश्यकता नाही. तरी आकृतीबंधात त्याला मान्यता देण्यात यावी ही माझी प्रशासनाला सुचना आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशांत नाईकांच्या सुचनेसह प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** धन्यवाद अप्पासाहेब.
**श्री.सुनिल खडके :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर महोदया माझा परत प्रशासनावर नाराजीचा सुर आहे. ज्याप्रमाणे त्यांनी लेखापरिक्षणाचा अहवाल सदस्यांना दिला नाही. तर माझी विनंती राहणार आहे याच्यापुढे आकृतीबंधाचा त्यांनी गोषवारा दिलेला आहे. याच्यात आता जसा प्रशांतभाऊ नाईकांनी विषय मांडला की या महापालिकेत फोटोग्राफर , व्हिडीओ ग्राफर किंवा छायाचित्रकार पाहीजे. जर यांनी यासोबत डिटेल प्रस्ताव जर प्रत्येक सदस्याला दिला असता . तर त्याच्यामध्ये अजुन काही पदं वाढविण्यासाठी आपल्याला किंवा काही वेगवेगळे पदं आता नविन युगाकडे चाललो आहे आपण टेक्निशियन गोष्टी  असतील किंवा इंटरनेट सुविधा असेल. अशा बऱ्याच गोष्टी आहेत. ज्या आपण सुचवू शकतो.पण प्रशासनाला माझी विनंती राहणार आहे. थोडासा झेरॉक्सचा खर्च वाढेल . परंतू सर्व सदस्यांना पुर्ण अहवाल देत चला ही माझी नम्र विनंती आहे अशी सुचना मा.महापौर महोदय आपण प्रशासनाला द्यावी.

**श्री.विष्णू भंगाळे :-** हॅलो , हॅलो

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** हि पदे ॲड करावे . परंतू पदोन्नतीवर आपले महापालिकेमध्ये असलेले त्यांच्यावर महापालिकेने खर्च करून त्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. त्याच्यातुन पदोन्नतीवर त्यांना घेण्यात यावे ही सुध्दा सुचना त्याच्यामध्ये घ्या. कारण की आपल्या महापालिकेमध्ये बऱ्याच वर्षांपासुन बरेच कर्मचारी कार्यरत आहेत.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांच्या सुचना या लक्षात घेता आपला आस्थापना खर्च वाढणार नाही या अनुषंगाने आपले सफाई कर्मचाऱ्यांची संख्या ही कश्या पध्दतीने वाढवता येईल कारण आस्थापना खर्च जर ३५ टक्केच्यावर गेला . तर आपण राज्य शासनाला हा प्रस्ताव पाठविणार आहे तर हा रिजेक्ट होईल. म्हणजे जेवढे प्रशासन या कामासाठी मेहनत घेते आहे ती फोल ठरेल. त्यादृष्टीने आस्थापना खर्च न वाढता . सफाई कामगारांची संख्या कश्या पध्दतीने वाढवता येईल. त्या दृष्टीने प्रशासनाने विचार करून या आकृतीबंधामध्ये सुधारीत आकृतीबंध तयार करावा व शासनाकडे पाठवावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , नाही ताई कस आहे.

**मा.उपमहापौर :-** बोला नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई आता सद्यस्थितीत असलेला आपला आस्थापना खर्च त्या मर्यादेमध्ये हा आकृतीबंध प्रशासनाने तयार करून सभागृहाच्या पटलासमोर ठेवलेला आहे. मला वाटत की याला मान्यता देण्यात यावी. महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये ज्या ज्या वेळी ज्या पध्दतीने वाढ होईल. त्या पध्दतीने सफाई कर्मचाऱ्यांबाबत चेतनभाऊ सनकत यांनी मांडलेला विषय आहे. त्या पध्दतीने त्या पदांची निर्मिती करून तो प्रस्ताव तश्या पध्दतीने पुढे पाठवता येईल. आज आपण प्रशासनाने तयार केलेला. जो प्रस्ताव आहे त्याला आहे तशीच्या तशी मान्यता देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-**  प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री. चेतन सनकत :-** नाही नितीनभाऊ सन्मा.नितीनभाऊ

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्य

**श्री. चेतन सनकत :-** सन्मा.नितीनभाऊ माझा विषय असा आहे की ,

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्य चेतनभाऊ शहराच्या लोकसंख्येच्या किंवा विस्तारीत भागाच्या वाढीच्या दृष्टीने हा आपण जरी आकृतीबंध बनविलेला आहे. परंतू आपल्याला याच्यामध्ये अजून काही सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे गरजेचे असल्या कारणाने जसे आता सन्मा. सदस्य चेतनभाऊंनी सांगीतल त्यांच्या सुचनांचे पालन करून आपण याच्यामध्ये जी काही अनावश्यक पदे आहेत किंवा काही स्किलच्या जागा कमी करून हा आपला आस्थापना खर्चाचा तो रेषो तेवढा ठेवुन आस्थापना खर्च वाढणार नाही .त्या अनुषंगाने सफाई कर्मचाऱ्यांची तर आपण काही संख्या वाढवता येते का ? त्या पध्दतीचा प्रशासन आकृतीबंध तयार करून त्या नंतर मग तो आपण शासनाला पाठवु आणि मग त्यानंतर हा फक्त विषय मंजुरच करतोय .

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके , ओके

**मा.उपमहापौर :-** सर्वानुमते मंजुर करून परंतू आपल्या सुचनांचे पालन करून घेण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके , ओके

**मा.उपमहापौर :-** त्याच्यामध्ये आपल्याला काही ॲडजेस्टमेंट करता येईल का  ? त्या दृष्टीने विचार करून त्यानंतर आपण ते शासनाला पाठवणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके , ओके

**श्री. चेतन सनकत :-** धन्यवाद भाऊ

**श्री. विष्णू भंगाळे :-** चला पुढचा विषय घ्या.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** चला मंजुर करा.

**मा.महापौर :-** सदर विषय हा मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषयपटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका 'ड' वर्ग म.न.पा.असुन दि.२१ मार्च २००३ रोजी जळगांव शहर महानगरपालिकेची स्थापना झालेली आहे.

शासनाच्या आदेशा नुसार जळगांव शहर महानगरपालिकेचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आलेला आहे. तत्कालीन जळगांव नगरपालिका असतांना नगरपालिका प्रशासन संचालनालयाने सर्व संवर्गातील एकुण २६६३ पदे मंजुर केलेली आहेत शासनाने २००६ मध्ये विविध अधिकाऱ्यांचे संवर्गाकरीता ३८ पदांचा आकृतिबंध मंजुर केलेला असुन या ३८ पदांमधील जळगांव शहर महानगरपालिकेसाठी आवश्यक असणाऱ्या काही पदांचा आकृतिबंधात समावेश केलेला आहे.

यापुर्वी महासभा ठराव क्र.७७४ दि.१६/१०/२०१७, जा.क्र.जमपा/आस्था/२२८१/२०१७ दि.२०/११/२०१७ व जा.क्र.जमपा/आस्था/३०३/२०१९ दि.०६/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत आकृतीबंध शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आलेला होता.

जळगांव म.न.पा.क्षेत्रातील पायाभुत सुविधांवर पडणारा ताण, राज्य व केंद्रशासनाने विविध प्रकल्प व प्रशासनाकडुन कामाबद्दल पदाधिकारी व नागरिकांची वाढलेली अपेक्षा यामुळे जळगांव शहर महानगरपालिकेच्या आकृतीबंधात बदल करुन गतिमान व कार्यक्षम प्रशासनासाठी,महानगरपालिकेतील अभियंते व सर्व विभाग प्रमुख यांच्या समवेत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, व सहाय्यक आयुक्त यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष चर्चा करुन कोणते पद आवश्यक आहे तसेच काही कामे कंत्राटी पध्दतीने करता येवु शकतात, काही नविन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाज केली जावु शकतात अशी पदे अतिरीक्त असल्याने व्यपगत करण्यात येत आहे.

तत्कालीन नगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील मंजुर पदांची संख्या २६६३ मध्ये ३८ आकृतीबंधामधील अधिकाऱ्यांची पदे समाविष्ट केलेली असून नव्याने मंजूर करावयाच्या सुधारीत आकृतिबंधाबाबत खालीलप्रमाणे विवरण पत्र सादर करण्यात येत आहे. तसेच म.संचालक,अग्निशमन सेवा यांनी मान्यता दिलेल्या पदांबाबत पदांचा तपशिल व पदसंख्या त्यांच्या मान्यतेच्या अनुषंगाने नमुद करण्यात येईल.

प्रशासन सेवा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयुक्त कार्यालय | ८ | १ | ९ | ० |
| २ | अतिरीक्त आयुक्त कार्यालय | ३ | २ | ५ | ० |
| ३ | उपायुक्त कार्यालय | १० | २ | ८ | ४ |
| ४ | सामान्य प्रशासन विभाग | २ | १९ | २० | १ |
| ५ | आस्थापना विभाग | २५ | १ | २० | ६ |
| ६ | प्रभाग कार्यालय | ११२० | ५६५ | ११०८ | ५७७ |
| ७ | ई प्रशासन विभाग | ० | ६ | ६ | ० |
| ८ | विधी विभाग | २ | ५ | ६ | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | भांडार विभाग | ४ | ३ | ६ | १ |
| १० | महापौर कार्यालय | ५ | ३ | ८ | ० |
| ११ | उपमहापौर कार्यालय | ४ | २ | ५ | १ |
| १२ | स्थायी समिती सभापती कार्यालय | ४ | २ | ६ | ० |
| १३ | सभागृह नेता यांचे कार्यालय | २ | १ | ३ | ० |
| १४ | विरोधी पक्षनेता कार्यालय | २ | २ | ४ | ० |
| १५ | महिला व बालकल्याण समिती सभापती कार्यालय | १ | २ | ३ | ० |
| १६ | नगरसचिव विभाग | ६ | ३ | ८ | १ |
| १७ | शिक्षण विभाग (प्राथमिक) | ० | ६ | ६ | ० |
| १८ | बालवाडी विभाग | ५ | २ | ७ | ० |
| १९ | अभिलेख विभाग | १ | ६ | ६ | १ |
| २० | ग्रंथालय | १७ | ० | ७ | १० |
| | एकुण - | १२२१ | ६३३ | १२५१ | ६०३ |

महसुल सेवा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुल्य निर्धारण व कर संकलन विभाग | ७ | २ | ४ | ५ |
| २ | मालमत्ता व्यवस्थापन विभाग | १५ | ६ | १९ | २ |
| ३ | जकात विभाग | १३८ | ० | ० | १३८ |
| | एकुण - | १६० | ८ | २३ | १४५ |

वित्त व लेखा सेवा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | लेखा व वित्त विभाग | २१ | ३ | १९ | ५ |
| २ | लेखा परिक्षण विभाग | ४ | ५ | ८ | १ |
| | एकुण - | २५ | ८ | २७ | ६ |

अभियांत्रिकी सेवा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगररचना विभाग | ३० | २४ | २७ | २७ |
| २ | अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग | १ | ५६ | ५७ | ० |
| ३ | सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यालय) | ४०५ | ११ | ६७ | ३४९ |
| ४ | पाणी पुरवठा व जलनिस्सारण/मलनिस्सारण विभाग | २७६ | २४ | १०७ | १९३ |
| ५ | विदयुत विभाग | १२ | १४ | २१ | ५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | वाहन व्यवस्था विभाग | ८ | ६ | ११ | ३ |
| ७ | पर्यावरण विभाग | ० | ३ | ३ | ० |
| ८ | उदयान विभाग | ४० | १८ | ३६ | २२ |
| | एकुण - | ७७२ | १५६ | ३२९ | ५९९ |

आरोग्य सेवा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैदयकीय विभाग | २६५ | २४ | २२३ | ६६ |
| २ | स्वच्छता/आरोग्य विभाग | १५६ | २६ | ५८ | १२४ |
| ३ | समाज विकास विभाग | ० | ३ | ३ | ० |
| ४ | नागरी हिवताप योजना विभाग | २ | ३१ | ३३ | ० |
| ५ | अन्न सुरक्षा विभाग | १ | ० | ० | १ |
| ६ | पशु शल्य विभाग | ० | ३ | ३ | ० |
| | एकुण - | ४२४ | ८७ | ३२० | १९१ |

क्रीडा विभाग

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्रीडा विभाग | १ | ३ | ३ | १ |
| | एकुण - | १ | ३ | ३ | १ |

अग्निशमन विभाग

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन विभाग | ६० | ० | ० | ० |
| | एकुण - | ६० | ० | ० | ० |

गोषवारा

| अ.क्र. | पदांचा तपशील | मंजुर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकुण आवश्यक पदांची संख्या | व्यपगत पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशासन सेवा | १२२१ | ६३३ | १२५१ | ६०३ |
| २ | महसुल सेवा | १६० | ८ | २३ | १४५ |
| ३ | वित्त व लेखा सेवा | २५ | ८ | २७ | ६ |
| ४ | अभियात्रिंकी सेवा | ७७२ | १५६ | ३२९ | ५९९ |
| ५ | आरोग्य सेवा | ४२४ | ८७ | ३२० | १९१ |
| ६ | क्रीडा सेवा | १ | ३ | ३ | १ |
| ७ | अग्निशमन सेवा | ६० | - | - | - |
| | एकुण - | २६६३ | ८९५ | १९५३ | १५४५ |

आकृतीबंधात महानगरपालिकेच्या सर्व विभागांचा वर नमुद केल्याप्रमाणे समावेश करण्यात आलेला आहे. एकुणच आकृतीबंधात पदांची वाढ करण्यात आलेली नाही. उपरोक्त नमुद प्रमाणे महासभा ठराव क्र.७७४ दि.१६/१०/२०१७ नुसार जा.क्र.जमपा/आस्था/२२८१/२०१७ दि.२०/११/२०१७ व जमपा/आस्था/३०३/२०१९ दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सुधारीत आकृतिबंधाच्या अनुषंगाने शासनाने वेळो-वेळी दिलेल्या सुचने प्रमाणे नविन सुधारीत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आलेला होता त्यावर शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अनुपालन करुन नविन सुधारीत आकृतिबंध सादर करण्यात येत आहे तसेच यापुर्वी वरील संदर्भिय पत्रान्वये पाठविलेले आकृतीबंधाचे प्रस्ताव

रद्द करण्यात येवुन सदर आकृतिबंधाच्या प्रस्तावास तसेच सदर प्रस्ताव शासनाकडेस मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार भविष्याचा विचार करता प्रशासनाने तयार केलेल्या आकृतीबंधात खालील प्रमाणे दुरुस्त्या करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) छायाचित्रकाराचे एक नविन पद आकृतीबंधात समाविष्ठ करणेत यावे.

२) सदर तयार केलेल्या आकृतीबंधात आस्थापना खर्चाच्या मर्यादेत राहून शहराचा वाढीव विस्तारीत भाग पाहाता शासन निर्देशाप्रमाणे मागासवर्गीय कामगारांवर अन्याय न होवू देता सफाई कामगारांच्या पदांमध्ये वाढ होत असल्यास त्याप्रमाणे प्रशासनाने सफाई कामगारांच्या पदामध्ये वाढ करुन त्याप्रमाणे वाढीव पदे आकृतीबंधात समाविष्ठ करण्यात यावी.

३) वैदयकीय अधिकारी (BAMS) यांची ४ नविनपदे आकृतीबंधात समाविष्ठ करण्यात यावीत.

उपरोक्त प्रमाणे आकृतीबंधात दुरुस्ती करुन तसा वाढीव पदांसह सुधारीत प्रस्ताव तयार करुन शासनाकडेस मंजुरीस्तव पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५०** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १२:-** स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामी प्रकल्पाचे सुधारीत मान्यतेनुसार स्थापत्य व बायोमायनिंगचे कामी वाढीव संविदा रकमेनुसार काम करुन घेणेस व वाढीव खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सदर विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** पोकळे साहेब बोला.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाने हा जो प्रस्ताव आणलेला आहे. या प्रस्तावामध्ये त्यांनी मनपा निधि किंवा १४ व्या वित्त आयोगाचा उल्लेख केलेला आहे. १४ वा वित्त आयोग किंवा मनपा निधि वापरावा लागतोय . याची सविस्तर माहिती मला ज्यांनी प्रस्ताव दिलेला आहे . त्यांनी माहिती द्यावी व सभागृहाला अवगत करावं.

**मा.महापौर :-** प्रशासनाने यासंदर्भात माहिती द्यावी.

**श्री.योगेश पाटील , प्रकल्प अभियंता :-** हॅलो , १४ वा वित्त आयोग

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासन माहिती देत आहे.

**श्री.योगेश पाटील , प्रकल्प अभियंता :-** १४ वा वित्त आयोगातुन प्रस्तावना करण्यात आलेली आहे वाढीव खर्चासाठी

**श्री.दिलीप पोकळे :-** भोसले साहेब , भोसले साहेबांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे. हॅलो महापौर महादेया

**मा.महापौर :-** बोला दिलीपभाऊ बोला.

**श्री.दिलीप पोकळे :-** भोसले साहेबांनी हा प्रस्ताव सभागृहात ठेवलेला आहे. शाखा अभियंता म्हणुन त्यांनी दिलेला प्रस्ताव शहर अभियंता म्हणुन ठेवलेला आहे. त्यांनी फक्त इतकेच सांगावे की १४ व्या वित्त आयोगातुन किंवा मनपा निधितुन हा खर्च करण्याचा प्रसंग का उदभवला . याला पुन्हा महासभेत हा प्रस्ताव आणण्याची गरज काय आहे ? इतका अत्यंत गंभीर विषय असतांना तिन वर्षापासुन हा प्रस्ताव का पडलेला आहे. याची जबाबदारी कुणाची आहे. याची चौकशी शासनाने / प्रशासनाने केली आहे का ?

**मा.महापौर :-** या संदर्भात .

**श्री.दिलीप पोकळे :-** याचा खुलासा करावा

**मा.महापौर :-** या संदर्भातील संपुर्ण माहिती आपल्याला बोरोले साहेब देताहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** बोरोले साहेब नाही , हा प्रस्ताव भोसले साहेबांनी आणलेला आहे महासभेसमोर मग बोरोले साहेब का माहिती देताहेत.

**मा.महापौर :-** या संदर्भात प्रकल्प अधिकारी बोरोले साहेब असल्यामुळे ते ही माहिती जी आहे त्यावर आपल्याला डिटेल माहिती देताहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** पहिले हा खुलासा करावा की हा प्रस्ताव बोरोले साहेबांनी का आणला नाही, शहर अभियंत्यांनी का आणला ?

**मा.महापौर :-** ठिक आहे सदरील विषय भोसले साहेब आपण यावर खुलासा सादर करावा.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** मा.महापौर तथा सन्मा.सभागृह शासनाने सुधारीत मान्यता दिल्यानुसार शहर अभियंत्यांकडून महासभेच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सुधारीत ची गरज का पडली भोसले साहेब तिन वर्षात पुर्ण का झाले नाही.मला त्याच उत्तर द्या. शासनाने आपल्याला ३० / ३५ कोटींचा डिपीआर मंजुर करून दिलेला होता. तो डिपीआर चौकटला त्यात दुरूस्त्या झाल्या . त्या दुरूस्त्या झाल्यामुळे महानगरपालिकेचे प्रशासनाने चुकीच्या गोष्टी केल्यामुळे हा प्रसंग आलाय का ? याचा खुलासा द्या.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** त्या डिपीआर मध्ये

**श्री.दिलीप पोकळे :-** १८ कोटी , १८ कोटी आपण जे वाढीव घेतोय आणि शासन त्याला आर्थिक मदत करत नाहीये, की १४ वा वित्त आयोगातुन करा किंवा मनपा निधि वापरा मग १४ वा वित्त आयोग आपल्याला इतर विकास कामांसाठी सुध्दा वापरता आला असता. उलट आपल्याला आपला निधि वापरावा लागतोय. तर हा जो फरक पडतोय याची जबाबदारी कुणाची आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** यापुर्वी

**श्री.दिलीप पोकळे :-** मनपा निधि का वापरायचा ? बोला

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** यापुर्वी हा निधि शासनाने नियुक्त केलेल्या एजन्सी मार्फत तयार झालेला होता. इंदौरची एजन्सी होती त्यांनी तयार केल्याप्रमाणे आपण याची छाननी केली होती.त्यानुसार त्या छाननीला महासभेने त्याला मान्यता दिल्यानंतर त्याला शासनाची मान्यता घेण्यात आली होती. याच्यामध्ये पण ३५ कोटी

**श्री.दिलीप पोकळे :-** डिपीआर , डिपीआर , भोसलेसाहेब डिपीआर बोर्डवर आहे की नाही याची चौकशी करण्याची जबाबदारी मनपा प्रशासनाची होती . ती केली का ? तुम्ही डिपीआर चुकवला मग ही भरपाई समोरच्या एजन्सी कडून का घेत नाही आपण ? याचा भुर्दंड पालिकेने का सहन करायचा ? उत्तर द्या.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** प्रत्यक्ष काम सुरू करतांना तो डिपीआर थोडासा चुकीचा म्हणजे आवश्यकते नुसार फुलफिल होणारा नव्हता तो कारण डांबरी रस्ते व इतर रस्ते करीता होता.

**श्री.दिलीप पोकळे :-** मग त्याच्यावर काय कारवाई केली ? तिन वर्ष झाले तिन वर्षापुर्वीची निविदा आहे ही .

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आपण महासभेची मान्यता घेतल्यानंतरच या MJP ची छाननी करू.

**श्री.दिलीप पोकळे :-** तुम्ही परत परत हा विषय महासभेला मला एक सांगा प्रशासन म्हणुन सुध्दा आपलही काम आहे. हा जो १८ कोटीचा बोझा आलेला आहे महापालिकेवर आज महासभेसमोर हा जो प्रसंग उभा राहीलेला आहे. याची जबाबदारी कोणाची ? याची आपण चौकशी केली आहे का ? याला जबाबदार कोण साहेब मला ते सांगा आता ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** तसं हेतूपुरस्कर काही कोणी केलेल नाहीये.

**श्री.दिलीप पोकळे :-** हेतूपुरस्कर मी म्हणत नाहीये.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** सर्वंच महानगरपालिकेने प्रस्ताव सुधारीत केलेले आहेत. आवश्यकते नुसार प्रस्ताव शासनाकडे सादर झाले , व्हिसी झाली त्याची त्याप्रमाणे हे आपण माहिती दिली आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** हे जे मला हे जे मला एवढच सांगा साहेब हा पैसा का वाढला ? १८ कोटी रक्कम काही लहान रक्कम नाहीये आणि ती जर आपल्याला १४ वा वित्त आयोगातुन वापरावी लागते आहे. मनपा निधिमधुन वापरावी लागते आहे. त्याच्यामध्ये आपल्या महानगरपालिकेचं किती नुकसान होतय . याची जबाबदारी कोण घेत . आज १४ वा वित्त आयोगातुन १८ कोटी इतर ठिकाणी वापरले . मग तो पैसा तुम्ही कसा उभा करणार . माझी विनंती आहे की

या विषयावर रितसर चौकशी करण्यात यावी . चौकशीअंती या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात याव्यात आणि ज्यांच्या चुकीमुळे हे १८ कोटी लागलेले असतील. त्यांच्याकडून ते पैसे वसुल करण्यात यावे. याच्यासाठी समिती नेमण्यात यावी . तोपर्यंत सदर विषय हा तहकुब करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पोकळे साहेब जे बोलले त्याला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई मलाही या विषयावर बोलायचे आहे. महापौर महोदया मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** शुचितताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** बोला शुचितताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर ताई धन्यवाद , सभागृहात या विषया संदर्भात मला दोन गोष्टी लक्षात आणुन द्यायच्या आहेत. सगळ्यात पहिली गोष्ट मुळात याच्यात वाढीव खर्च म्हंटलेला आहे आणि वाढीव खर्चाच्या संविदेला मान्यता म्हणताहेत. तर मुळात भोसले साहेब माझा प्रश्न ईथे असा आहे की , हा वाढीव खर्च का ? कामात बदल झालेला आहे .

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** काही ॲटम मध्ये वाढीव आणि काही ॲटम चेंज झालेले आहेत. डांबरी रस्त्यांच्या ठिकाणी कॉंक्रीट रस्ते झालेले आहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** बरोबर , तर आता महापौरताई आयुक्त साहेबांना असे विचारायचे आहे की , अशा प्रकारे वाढीव खर्चाला सुध्दा यापुर्वी वेगवेळया विषयांसंदर्भात हा मुद्दा आम्ही मांडलेला आहे.तेव्हा तो वाढीव खर्च होतो तेव्हा तो वाढीव खर्चच एक लिमिटेशन आहे. जिथे मुळ खर्च १०० रूपयांचा आहे. त्याला आपण १५०० रूपयांपर्यंत वाढीव खर्च देवु शकतो. त्यापलिकडे आपण देवु शकत नाही. म्हणजे पुन्हा पुन्हा काय होत आहे की आपण सिविसी लाईन्सचे उल्लंघन करतो आहे.यामुळे आपण याची काळजी घेत चला , मान्यता देवु आता स्पष्ट भोसले साहेबांनी येथे नमुद केले की काही गोष्टींचा वाढीव खर्च आणि याच्यातला कामाचे स्वरूपात बदलले आहे आणि काही कामात बदल झालेले आहे . तर जेव्हा बदल वाटेल त्यावेळेला आपल्याला नविन निविदा काढणे आवश्यक आहे आणि वाढीव खर्चाबाबत सुध्दा सिविसी गाईडलाईन्सचं उल्लंघन होणार नाही. सभागृहात माझा आवाज येतोय का क्लियर

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हो येतोय ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौरताई माझा आवाज येतोय का ?

**मा.महापौर :-** हो हो येतोय ताई बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** बरोबर , कारण इतिवृत्तात याची नोंद घेणं आवश्यक आहे. या विषयात तिन्ही विषय क्लब करण्यात आलेले आहे. बायोमायनिंगचा , सॅग्रिगेशनचा आणि डिपीचा हे तिन विषय येथे एकाच डॉकेटमध्ये क्लब केले गेलेले आहेत. त्याच्यामुळे प्रंचड कन्फ्युसिंग येथे तयार झालेले आहे. दुसरी गोष्ट सिविसी गाईडलाईन्सच उल्लंघन आपण करू शकत नाही. आपण निविदा वाढी म्हणजे मुळ रक्कम जी आहे. त्याच्या जवळपास म्हणजे जी मुळ वाढीव रक्कम आहे. तर असा आपण याला वाढीव मान्यता देवू शकत नाही. सिविसी गाईडलाईन्सची त्याला बाधा येईल.त्यामुळे आपण या सगळ्या कामांमध्ये आपण नविन निविदा कायद्याने काढणे आवश्यक आहे व बंधनकारक आहे. याची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. भारतीय जनता पार्टीचा याला विरोध आहे.

**मा.महापौर :-** शुचितताई आपला आवाज क्लियर येत नाहीये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** शुचितताई आपला आवाज क्लियर येत नाहीये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया, आला आवाज

**मा.महापौर :-** आता येतोय बोला, माईक जवळ घ्या ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया, पुनश्च मी सांगते की हा जो विषय आहे वाढीव कामे जे आहे , वाढीव काम जे म्हंटलेले आहे. त्याला सिविसी गाईडलाईन्सची बाधा येते .त्यामुळे नव्याने निविदा काढणेच आवश्यक आहे आणि दुसरी गोष्ट जिथे कामात बदल आहे. तर कामात बदल असतांना सुध्दा आपण याला अशीच मंजुरी देवु शकत नाही. आपल्याला नविन निविदा काढणेच अत्यावश्यक आहे कायद्याने आणि ते आपल्यावर बंधनकारक आहे. सभागृहाला मी एक आठवण करून देवु ईच्छिते की या विषया संदर्भात ज्यावेळेला टेकाडे साहेब होते आयुक्त म्हणुन त्यावेळेला स्थायी समितीसमोर हा ठराव आलेला होता. या विषयाला मंजुरी साठी आणि त्यावळेला टेकाडेसाहेबांनी

सभागृहाला अस सांगीलेल होत की , हा विषय अर्जंट आहे आणि नाहीतर हरित लवादाची आपल्यावर कार्यवाही होईल आणि सगळ्यांना जेलमध्ये जावं लागेल. माझा प्रशासनाला असा प्रश्न आहे. फक्त विषयाला मंजुरी घेणं एवढ्यासाठी ती कारवाई होणार होती का ? म्हणजे दोन दोन तिन तिन वर्ष होवुन जातात विषयाला मंजुरी दिल्यानंतर ही कोणतीही कार्यवाही होत नाही. हे कितपत योग्य आहे. आता या येथे या डॉकेटमध्ये म्हंटलेले आहे की घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी राष्ट्रीय हरित लवाद प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि राज्य शासन यांच्यामार्फत वेळोवेळी दिलेले निर्देशाप्रमाणे आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे की किंबहुना जेव्हा याला मान्यता दिली , स्थायीमध्ये , महासभेमध्ये तेव्हापासुनच ही निकड होती . एखादी एजन्सी शासनाने यासाठी डिपीआर बनविण्यासाठी पाठवली. त्या एजन्सीने अक्षम्य अशा बाबी केल्या.प्रशासनाने या संबंधात काय दखल घेतली. त्या एजन्सीच्या चुकांचा भुर्दंड आज आपण महापालिका भरणार आहोत.त्या एजन्सीच्या बाबत आपण शासनाला कळवल का ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** ताई  आता आपण सुधारीत डिपीआरचेच केले आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता सभागृहात प्रशासनामार्फत अशी माहिती देण्यात आली की , सगळीकडेच चुका झालेल्या आहेत आणि प्रत्येक ठिकाणी डिपीआर चेंज केलेले आहेत. हा एवढा मोठा भुर्दंड आज आपल्याला बसणार आहेत. तेव्हा याची जबाबदारी प्रशासनाची नव्हती का ? त्या एजन्सीबद्दल तक्रारी शासनापर्यंत पोहोचविण्याची शासनाने त्या एजन्सीला काहीतरी मानधन दिलेले असेल ना ? या कामामध्ये नविन निविदाच कायद्याने काढायला हवी. नविन निविदा काढल्याशिवाय गत्यंतर नाही. वाढीव एवढे मोठे काम आपण देवु शकत नाही.सिविसी गाईडलाईन्सची बाधा येते आणि कामामध्ये बदल आहे तर तेव्हा नविन निविदाच कायदष्याने काढाव्या लागतात आणि मुदतवाढ , मुदतवाढ हा मुद्दा सुध्दा याच्यात नमुद केलेला आहे तर याला आमचा विरोध आहे. या विषयासंदर्भात नव्याने निविदा कॉल करणे ही आमची मागणी आहे. तशी प्रशासनाने या सगळ्या गोष्टींची नोंद घ्यायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, आता या विषयाला अनुषंगुन अनेक अशा वेगवेगळया गोष्टी आहेत की मुळात हा विषय सभागृहात चर्चेला का आला ? कि या संदर्भातील जो डिपीआर बनवला गेला . तो डिपीआर कुठेतरी चुकीच्या पध्दतीने बनविलेला गेला आणि त्याच्यामुळे या मुळ कामाचे स्वरूप बदलले  आणि मुळ कामाचे स्वरूप बदलले गेल्यामुळे आज हा वाढीव खर्चाचा बोझा जो आहे. म्हणजे या योजनेला केंद्र शासन पुर्वी १०० टक्के अनुदान देणार होते. आज केंद्र शासनाने वाढीव योजनेला मान्यता देण्याच्या संदर्भात आपल्या महानगरपालिकेला मिळणारा हक्काचा १४ वा वित्त आयोगाचा निधि किंवा महानगरपालिकेचा स्वनिधी यामधुन हा खर्च भागवण्यात यावा. अशा पध्दतीच्या सुचना राज्य शासनाने केलेल्या आहेत.मला एक कळतच नाही की ज्यावळेला या योजनेचा डिपीआर बनवण्यात आला. त्यावेळेला तत्कालिन जे कोणी आयुक्त असतील. म्हणजे इतकी कोणती घाई त्यावेळेला झालेली होती की डिपीआर योग्य आहे की अयोग्य आहे याची खात्री न करता . त्या पध्दतीने त्याला मान्यता देण्यात आली आणि मग नंतर उशिरा सुचलेले हे शहाणपण की मुळ डिपीआर जो आहे तो कुठेतरी चुकीच्या पध्दतीने बनविला गेलेला आहे. जळगांव शहराचे जे निकष आहे. ते त्या डिपीआर मध्ये बसत नाही. कुठल्या तरी एका गावाचा डिपीआर कुठल्यातरी महानगपालिकेचा डिपीआर तो जसाचा तसा उचलुन तो जळगांव शहर महानगरपालिकेचा डिपीआर म्हणुन सादर करण्यात आलेला आहे. आज यामुळे हा वाढीव १४ कोटी रूपयांचा भुर्दंड महानगरपालिकेला मिळणाऱ्या हक्काच्या १४ व्या वित्त आयोगाचा निधी असो किंवा महानगरपालिकेचा निधी असो. यामुळे हा भुर्दंड या महानगरपालिकेवर येवुन पडलेला आहे. आता जे शुचिताताईंनी निवेदन केलेले आहे की सिविसी गाईडलाईन प्रमाणे मुळ जी काही निविदा असेल . त्याच्या किती वाढीव खर्चाच्या मर्यादा त्याच मक्तेदाराला परवानगी देण्याच्या संदर्भातील जरी सिविसी गाईडलाईच्या प्रमाणे त्यांचे म्हणणे मला १०० टक्के मान्य आहे. त्या बद्दल वाद नाहीये . परंतू या कामाचा डिपीआर झाला आणि याची जी निविदा प्रक्रीया झाली . ती निविदा प्रक्रीया २०१६ -२०१७ च्या मंजुर दरानुसार झालेली आहे. आज २०२१ आहे जर २०२१ ला जर नव्याने निविदा काढण्याचा प्रयत्न केला , नव्याने निविदा काढण्याचा प्रयत्न केला तर २०२०-२१ च्या किंवा २०२१-२२ च्या डिएसआर प्रमाणे त्या निविदा प्रसिध्द कराव्या लागतील.त्यामुळे महानगरपालिकेवर किती भुर्दंड पडेल.या सगळया गोष्टींचा योग्य पध्दतीने विचार करून योग्य तो प्रस्ताव पुन्हा महासभेसमोर सादर करावा आणि या संदर्भात तत्कालिन जे कोणी याच्यामध्ये दोषी असतील.

ज्या आयुक्तांनी अश्या चुकीच्या पध्दतीच्या डिपीआरला मान्यता दिली असेल.त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्याच्या संदर्भातील भुमिका या सभागृहाने ठरवायला पाहीजे. अन्यथा प्रशासन सगळं काही योग्य करतय. हा जो समज आहे हाही या जनतेसमोर यायला पाहीजे. आपणही ज्यावेळेला डोळे लावुन प्रशासनावर विसंबुन राहतो की प्रशासन जे करेल ते योग्य करेल. पण अशा पध्दतीचा हा चुकीचा डिपीआर स्विकारणे ही अत्यंत अक्ष्यम अशी बाब आहे. यामुळे या संदर्भात जे कोणी तत्कालिन आयुक्त असतील . त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्याची मागणी या सभागृहामध्ये या ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सोबत अधिकारी व कर्मचाऱ्यांचीही चौकशी व्हायला पाहीजे. ज्यांच्यामुळे भुर्दंड बसलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** या संदर्भात आम्ही सहमत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** जे जे होते त्यांचीही चौकशी करण्यात यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया , यामध्ये कुठलेही काम पुर्ण झालेले नाही हरित लवादची कारवाईची भिती दाखवण्यात आली सभागृहाची याला मंजुरी घेण्यात आली. तेव्हा जेल जी होणार होती तेव्हा मंजुरी दिली नाही म्हणुन तत्वत: मंजुरी देवुन हे काम पडुन आहे आजपर्यंत मग आता कारवाई होणार नाही का हरित लवादची जर प्रशासन नगरसेवकांना कश्या पध्दतीने गृहीत धरतय .याच एक उत्तम उदाहरण आहे हे या संदर्भात जे जे दोषी आहेत त्या सगळयांवर कारवाई झाली पाहीजे. याचा जो भुर्दंड महापालिकेवर पडणार आहे. तो प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे पडणार आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मनपाचा आर्थिक फायद्याचा विचार करता आणि १४ व्या वित्त आयोगाचा निधी वापरायला लावता हा कुठला न्याय आहे याला काय अर्थ आहे. आज टेंडर काढले रक्कम वाढेल मग मनपा निधी लागणार आहे हे शासनाला का पैसे मागत नाहीये. आयुक्तांनी शासनाला सांगावे की आमच्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे. १८ कोटी रूपये तुम्ही आम्हाला द्या म्हणुन आणि दोषींवर कारवाई करण्यासाठी चौकशी समिती लावा याच्यावर यांची चौकशी व्हावी .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**मा.महापौर :-** प्रशासनाने या संदर्भात खुलासा करावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हा प्रस्ताव सुधारीत प्रस्ताव पुर्वीच्या महासभा ठराव क्रं. ३३१ दि. १६/१२/२०२० अन्वये मंजुर झालेला आहे. आता फक्त काम करून घेण्याबद्दल हा विषय सादर केला गेलेला आहे. सद्या मक्तेदार आहे. लक्ष्मी कंन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करून घेण्याबाबतीतला विषय आहे आणि दुसरा विषय असा आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** भोसले साहेब तुम्ही १८ कोटीला मान्यता मागताहेत. १८ कोटी कुठुन वापरायचे ही तुम्ही मान्यता मागताहेत. तुम्ही परत महासभेकडे आले.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हा प्रस्तावास शासनाची मान्यता आली त्याप्रमाणे पुन्हा हा प्रस्ताव महासभेकडे सादर करण्यात आलेला आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मग शासनाला तुम्ही का पत्र दिले नाही की १८ कोटी तुम्ही द्या म्हणुन १०० टक्के अनुदान शासन देणार होते . मग महानगरपालिकेचा पैसा खर्च करायचा प्रसंग का आला ?

**मा.महापौर :-** पोकळे साहेब

**श्री.दिलीप पोकळे :-** जेव्हा शासनाने मान्यता दिली , जेव्हा शासनाने या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली.

**मा.महापौर :-** पोकळे साहेब प्रशासनाला आपली बाजु मांडु द्या. त्यांना बोलु द्या.

**श्री.दिलीप पोकळे :-** बर बोलुन घेवु द्या.

**मा.महापौर :-** त्यांना बोलु द्या. बोला भोसले साहेब

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** प्रस्ताव सादर करतांना त्या अटीवरच मान्यता दिलेली आहे. १४ व्या वित्त आयोगातुन १४ वित्त आयोग हा घनकचरा व्यवस्थापनासाठी तरतूद केलेली आहे. तो निधी याच्यासाठीच वापरावा अश्या अटीवरच मान्यता दिली आहे. हा डिपीआर मंजुर केलेला आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हा विषय तहकुब ठेवावा.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपण शासनाने हा चुकीचा डिपीआर मंजुर झाला. त्याच्यामुळे हा प्रसंग उभा राहीला आहे. त्या डिपीआर आपण पुर्ण तपासला असता तर आज रोजी आपले ते काम झाले असते. तुम्ही १४ व्या वित्त

आयोगाचा विषय घनकचऱ्यासाठी म्हणताहेत. मग आरोग्यासाठी कोण वापरेल तो विषय कोविडसाठी आपल्याला तो निधी देण्यात आलेला आहे. आता पुढे जर कोविडची परिस्थिती उभी राहीली तर तुम्ही कोणता निधी वापरणार आहे. हा सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचा गलथानपणा दुर्लक्ष झाल्यामुळे झालेला विषय आहे. याची सखोल चौकशी व्हावी. तो पर्यंत सदर हा विषय तहकुब करण्यात यावा.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया , आवाज येत नाहीये.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई आवाज येत नाहीये आम्हाला

**मा.महापौर :-** तत्कालिन अधिकाऱ्यांनी जो डिपीआर सादर केलेला होता. तर तो चुकीच्या पध्दतीने सादर केलेला होता. त्या संदर्भातील प्रशासनाने चौकशी करावी आणि त्यासंदर्भात शासनाकडे कळवावे. परंतू हा विषय जो आहे हा आपल्याला मार्गी लावण्यात शहराच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** तहकुब ठेवा तहकुब .

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया हा विषय

**श्री.ईब्राहीम पटेल :-** तहकुब ठेवा

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर ताई या विषयाबाबतीत १८ कोटींची जबाबदारी कोणाची आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौरताई

**मा.महापौर :-** यासंदर्भात चौकशी करण्यात येईल , परंतू हा प्रस्ताव पुर्ण होणे गरजेचे आहे. जळगांव शहराच्या विकासासाठी आणि सुधारीत डिपीआर नुसार .

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया , माझे म्हणणे ऐवढे आहे की हा डिपीआर जर शासनाने दिलेला आहे तर शासनाकडे पैसे मागायचे ना आपण मग शासनाने दिले पाहीजे . हा पैसा आपण का खर्च करायचा , यांचा भुर्दंड आपण का घ्यायचा

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया

**श्री.दिलीप पोकळे :-** १८ करोडची जबाबदारी कोणाची

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया , सर्व सभागृहाने या प्रस्तावाला मान्यता देण योग्य ठरणार नाही.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ आपला आवाज क्लियर येत नाहीये त्यामुळे

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** भारतीय जनता पार्टीचा याला विरोध आहे.प्रशासनाला ही विनंती आहे की प्रशासनाने पुनश्च हा प्रस्ताव महासभेसमोर सादर करावा. महापौर महोदया , महापौर महोदया

**श्री.दिलीप पोकळे :-** १८ करोडची रूपयांची जबाबदारी घ्यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** प्रशासनाला सुचना देण्यात यावी. की प्रशासनाने विषय योग्य पध्दतीने सादर करावा. या विषयाला भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे तो नोंदवुन घ्यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** तुर्त हा प्रस्ताव तहकुब ठेवा.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझाही सदर विषयाला गटनेता म्हणुन विरोध आहे. या विषयासंदर्भात १८ कोटी रुपयांची जबाबदारी कोण घेतय. याचा पहिले खुलासा करावा.

**श्री.प्रशांत नाईक :-** भारतीय जनता पार्टीचे गटनेते आहेत

**श्री.ईब्राहीम पटेल :-** प्रस्ताव तहकुब ठेवा.

**मा.महापौर :-** दिलीपभाऊ शांतता राखयची आहे . प्रशासन आपली बाजु मांडत आहे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर , या विषयाच्या संदर्भामध्ये या दोन तिन वर्षात याच्यामध्ये ज्या काही घडामोडी झालेल्या आहेत. सदर विषयाच्या पार्श्वभुमिवर सन्मा.सदस्यांच्या भावना अतिशय तिव्र आहेत आणि त्या साहजिक आहे. आता याच्यामध्ये सुरूवातीचा डिपीआर हा जर पुर्ण असता तर आपल्यावर ही वेळ आली नसती. किंबहुना तो प्रोजेक्ट आजपर्यंत पुर्णही करता आला असता . परंतू त्यावेळेच्या परिस्थिती नुसार तो डिपीआर राज्य शासनाकडून नियुक्त केलेल्या संस्थेकडून बनवला गेला . अर्थात बनवणारी संस्था जरी कुठलीही असली तरी तो महापालिकेच्या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल आहे. तरी आपण त्याची खातरजमा करून घेणे महापालिकेवर व प्रशासनावर गरजेच होत त्यात दुमत नाही . परंतू त्यावेळेच्या परिस्थितीमध्ये तो डिपीआर फिल्डवरची परिस्थिती फारशी विचारात घेवुन

त्याची तपासणी न करता तो महापालिकेमार्फत स्विकारला गेला आणि राज्य शासनाला सादर केला. ही वस्तुस्थिती आहे ती आता आपल्याला नाकारता येणार नाही. आता राज्य शासनाला सादर केला आणि महापालिकेचा तो डिपीआर मंजुर झाला. निधि मंजुर झाला साधारण तो ३० कोटीचा आपला तो डिपीआर होता. त्यापैकी त्याच्यात ३० कोटींपैकी जे १२ कोटींच सिव्हिल वर्क होत आणि साधारण ३ ते सव्वातिन कोटींच जे बायामायनिंगचे ते काम होत तर जी आपण निविदा प्रक्रीया राबवली . निविदा प्रक्रीया राबवुन आपण ही एजन्सी फायनलही केली. प्रत्यक्ष काम सुरू करत असतांना ज्यावेळेला या बाबींची तपासणी आपल्या बांधकाम विभागामार्फत झाली. त्यावेळेला त्याच्यामध्ये अस लक्षात आलं की त्या डिपीआर प्रमाणे काम करणं हे प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने शक्य नाही. त्याच्यामध्ये खुपकाही तांत्रिक त्रुट्या राहून गेलेल्या आहेत आणि म्हणुन याच्यामध्ये तो डिपीआर आपण त्या एजन्सी मार्फत न करता आपण महापालिका स्तरावरून आपण हा डिपीआर दुरूस्त केला आणि तो दुरूस्त केल्यानंतर सिव्हिल वर्क , त्याच्यामध्ये घेण्यात आलेली वाहन आणि मशिनरी आणि कचरा जो जमा होणार होता त्याच बायोमायनिंग जुन्या कचऱ्यावर प्रक्रीया करणे. असा पुर्वी जो ३० कोटींचा प्रकल्प होता.तो ४९ कोटींचा प्रकल्प तयार झाला . हा प्रकल्प अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यापुर्वी आपण मान्यतेसाठी मा.महासभेपुढे ठेवला होता. मला आठवत की डिसेंबर महिन्यातील महासभेसमोर हा विषय आल्यानंतर त्याच्याविषयी चर्चाही झाली . त्यावेळेच्या वर्तमानपत्रामध्ये सुध्दा हा का ॅपीपेस्ट पध्दतीने तयार केला गेलेला आहे. अशा प्रकारचे कॉमेंटस ही गिरी नावाची जी संस्था आहे नागपुरची आहे. ईजिनियर ईन्व्हॉलटींगचे प्रोजेक्ट चे स्क्रुटीनी करते.त्यांच्या मार्फत आपल्याला जो स्क्रुटीनी रिपोर्ट आला . त्याच्यामध्ये त्यांनी हा कॉपीपेस्ट पध्दतीने तयार केला गेल्याचा दिसतो . ईथपर्यंत त्याच्यावर रिमार्कस होते. ही सगळी पार्श्वभुमि विचारात घेवुन पुर्वी राहीलेल्या त्रुटी आपण दुरूस्ती केल्या आणि महासभेच्या डिसेंबर महिन्याच्या ठरावाच्या मान्यतेच्या आधारे ते आपण राज्य शासनाला सादर केला. अर्थात महासभेची किंवा महापालिकेची त्याच्यामागची भुमिका हीच होती की स्वच्छ भारत अभियान ही जी केंद्र शासनामार्फत चालु झालेली योजना आहे. त्याच्यामधुनच आपल्याला सुरूवातीला ३० कोटी रूपयांचा निधि मिळाला होता. त्यामुळे वाढीव जो निधि आहे तो सुध्दा आपल्याला केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्फत मिळावा अशी त्याच पध्दतीचा तो आपण प्रस्ताव पाठवला होता. परंतू तांत्रिक त्रुट्या ज्या राहीलेल्या होत्या . त्या राज्य शासनाने मान्य केल्या  आणि त्याच्यामध्ये सुधारीत डिपीआरला मंजुरी दिली. जस आता आपल्या शहर अभियंत्यांनी सांगतीले त्याप्रमाणे अन्य काही महानगरपालिकांचे सुधारीत डिपीआर अगदी लांबच नको औरंगाबादचेच जर उदाहरण घेतले तर त्या औरंगाबादचाच डिपीआर हा त्यांच्या मुळ डिपीआर पेक्षा हा दुप्पट वाढला गेला . म्हणजे सुरवातीच्या एजन्सीने तयार केलेला डिपीआर हा फक्त जळगांवचा नाही अन्यही काही महानगरपालिका , नगरपालिकांच्या बाबतीमध्ये परिपुर्ण नव्हता ही वस्तुस्थिती आहे. त्याचा जसा तोटा इतरांना झाला तसा आपल्यालाही होतोय ही वस्तुस्थिती आहे तीही आपण मान्य करूया. मग आता सुधारीत डिपीआर जो पाठवला तो राज्य शासनाकडून पुर्ण ४९ कोटींच्या अनुदानाची अपेक्षा होती. परंतू जी माहिती आपल्याला याच्याबद्दलची टेक लेव्हल कंन्सल्टंट कमिटी आहे त्याच्यामध्ये देण्यात आली होती . त्याप्रमाणे ही जी योजना आहे स्वच्छ भारत याच्यामध्ये राज्य शासनाला जर केंद्राकडून निधी मिळाला तरच राज्य शासन महापालिकेला देईल.राज्य शासनाला केंद्र शासनाकडून निधी मिळाला नाही . अशा प्रकारचं सांगण्यात आलेले होते. त्यामुळे आपण राज्य शासन आपल्याला हे अनुदान देवु शकलेल नाही. मात्र आपल्याला प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने आपल्याला सुधारीत डिपीआर मंजुर करणे गरजेचे असल्यामुळे राज्य शासनाने राज्यातील ज्या अन्य महानगरपालिका , नगरपालिकांच्या बाबतीमध्ये जे धोरण अंवलंबलेले आहे. त्या धोरणाला अनुसरून आपल्याला मंजुरी देतांना ह्या वाढीव खर्चाला मंजुरी दिली . मात्र हा खर्च राज्य शासन किंवा केंद्र शासनामार्फत अनुदान स्वरूपात उपलब्ध होणार नसल्यामुळे म्हणजे स्वच्छ भारत किंवा स्वच्छ महाराष्ट्र अभियांना अंतर्गत त्यामुळे त्याच्यामध्ये अट अशी टाकण्यात आलेली आहे की एकतर तुम्ही स्वनिधी मधुन करा किंवा १४ वा वित्त आयोगाचा जो निधी आहे. त्याच्यामधला ५० टक्के निधी हा घनकचऱ्यासाठी बांधील आहे. तुम्ही जास्तही खर्च करू शकतात. जर १४ वा वित्त आयोगाचा निधी तुमच्याकडे शिल्लक असेल. तर त्या निधीमधुन तुम्ही हे काम करू शकता. अशाप्रकारे अटीला अधिन राहुन राज्य शासनाने आपल्याला मान्यता दिलेली आहे. आता जो विषय आपण त्याच्यामध्ये सादर केलेला आहे. हा प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने सुधारीत जो डिपीआर मंजुर झाला . याच्यामध्ये वाढीव खर्च १८ ते १९ कोटींचा खर्चाचा निधी उपलब्ध करून देणं अर्थातच महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीत तो स्वनिधी एवढा खर्च करण्याची नसल्यामुळे आपण हा प्रस्ताव १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन ठेवलेला आहे.आपल्याला त्याचा निर्णय घ्यायचा आहे. मात्र मुळ डिपीआर हा जर परिपुर्ण असता. तर काही सन्मा.सदस्य जसे

नितीनभाऊ लढ्ढा असतील किंवा दिलीप पोकळे साहेब असतील किंवा अन्य सदस्यांनी जो मुद्दा मांडला की जर त्यावेळेचा परिपुर्ण डिपीआर असता तर कदाचित आपल्याला त्याठिकाणी ४८ /४९ कोटींच आपल्याला अनुदान मिळालं असतं आणि आज आपल्याकडे असलेलं १४ व्या वित्त आयोगाच अनुदान हे आपल्याला अन्य कारणासाठी म्हणजे घनकचऱ्याच्या कामासाठी वापरता आलं असतं ही वस्तुस्थिती आहे. परंतू आता ज्या घटना घडुन गेलेल्या आहेत. त्याच्यावर आज आपल्याला त्याची चौकशी झाली पाहीजे. जर कोणी जबाबदार असेल त्याच्यावर शासन झाल पाहीजे. याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतू या आधारावर निर्णय घ्यायचा आत्ताच्या विषयावर जर प्रलंबित ठेवलं , उद्या चौकशी होईल दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होईल. पण म्हणुन आत्ताचा आपल्यापुढे असणारा प्रश्न सुटणार नाही . त्यामुळे आपल्याला हा प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने आपल्याला दोन भाग करणे गरजेचे आहे. प्रकल्प करायचा आहे. त्याच्यासाठी निधीची उपलब्धतता महापालिकेलाच करावी लागेल.राज्य शासन त्याच्यामध्ये केंद्र शासनामार्फत येणारा निधी देवु शकत नाहीये. हे प्रस्ताव आपण राज्य शासनाकडे पाठवायलाही हरकत नाही. परंतू मिळण्याची शक्यता फार कमी आहे. परंतू अशावेळी आपल्या प्रकल्पाला तिन वर्षाचा ऑलरेडी विलंब झाला आहे. तर अधिक विलंब करण हे निश्चितच आपल्याला सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मला वाटते योग्य होणार नाही. म्हणुन निधीची उपलब्धतता आपल्याला १४ व्या वित्त आयोगातुन करून द्यावी लागेल. राहीला विषय सुरूवातीचा डिपीआर परिपुर्ण नसणं याच्याबाबतीतची जबाबदारी निश्चित करण्याबद्दल तो सुध्दा डिपीआर हा राज्य शासनाने नियुक्त केलेल्या एजन्सी मार्फत केलाय , ठिक आहे त्याला अंतिम मान्यता ही जरी महासभेने ठराव केलेला असला. तरी अंतिम मान्यता राज्य शासनाने दिलेली आहे. त्यामुळे याच्यामध्ये आपण महासभेच्या ठरावाच्या आधारे आपण राज्य शासनाला विनंती करावी की याच्यामध्ये जो डिपीआर व्यवस्थित बनवला गेला नाही. त्यामुळे महापालिका शासकीय अनुदानाला मुकतेय याची जबाबदारी निश्चित करावी आणि त्याच्यावर कारवाई करावी आणि हा एक स्वतंत्र विषय करावा आणि महापालिकेसमोर जो आता जो विषय आहे. तो वाढीव याच्यामध्ये निधी आपल्याला १४ वा वित्त आयोगातुन उपलब्ध करून देणं आणि हे काम यासाठी जी नियुक्त केलेली एजन्सी आहे. त्यांच्यामार्फत करून घेणे याबाबती मध्ये आपण निर्णय घ्यावा असे योग्य होईल. ज्या एजन्सीची नियुक्ती आपण पुर्वीच्या टेंडर प्रमाणे केलेली आहे. त्यांना वाढीव काम देण्याच्या संदर्भामध्ये सन्मा.सदस्या . शुचितातांई हाडा यांनी काही सिवीसी गाईडलाईन्सचा उल्लेख केला. सन्मा.नितीनभाऊंनीही त्याला सहमती दर्शविली . याच्यामध्ये जर कुठे कायदेशीर काही अडचणी निर्माण होत असतील किंवा आर्थिक नुकसान होते किंवा नाही होत आहे. याची जर सभागृहाला आपण फेर तपासणी आपण करायला सुध्दा हरकत नाही. विषय मोठा आहे जवळपास आपण १७ / १८ कोटी रूपयांचा आपण जादा खर्च आपण करत आहोत. एका एजन्सीला आपण १४ कोटींचे काम दिलेले होते आता आपण त्याच्यामध्ये वाढवुन २० कोटींच काम त्यांना देण्याच्या दृष्टीने अशावेळेला आपण त्याची कायदेशीर बाजु आणि त्याच्या आर्थिक नुकसानीची बाजु या दोन्ही बाजुंची पुन्हा एकदा खातरजमा करून घेवुन याच्यावर निर्णय घ्यायला हरकत नाही. परंतू निधी हा आपल्याला १४ व्या वित्त आयोगातुनच उपलब्ध करून द्यावा लागेल. राज्य शासनाकडुन आता निधी मिळण्याची शक्यता फार कमी दिसते .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय , आपण जी पार्श्वभुमि सांगीतली ती या सभागृहातील सर्व सदस्यांना कल्पना आहे. मला एक कळत की पहिला जो डिपीआर झाला होता. त्याला साधारणत: आता किती वर्ष झाले , पहिला जो डिपीआर मंजुर झाला होता त्याला किती वर्ष झाले. आयुक्त महोदय,

**आयुक्त :-** ऑक्टोंबर २०१७ मध्ये आपण तो तयार केल्याच दिसतय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऑक्टोंबर २०१७ बरोबर आहे.

**आयुक्त :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऑक्टोंबर २०१७ मध्ये चुकीच्या पध्दतीने झालेला डिपीआर आज २०२१ आलेले आहे. म्हणजे पंचवार्षिक म्हणजे गेल्या ५ वर्षामध्ये चुकीचा झालेला डिपीआर त्या डिपीआरचा काही मेहनताना त्यावेळेला दिला गेला असेल ना डिपीआरचा ? का कोणी फुकट डिपीआर करून दिलेला होता.

**आयुक्त :-** हा जो डिपीआर आहे हा राज्य शासनामार्फत नियुक्त केलेल्या संस्थेकडूनच बनविलेला आहे. त्यामुळे महापालिकेच्या वेगळ्या निधीमधुन आपण त्याला मेहनताना दिलेला नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू ठिक आहे ना निधी कुठलाही असो, राज्य शासनाचा असो, की महानगरपालिकेचा असो शेवटी निधी हा जनतेचा आहे. राज्य शासनाने नियुक्त केलेली एजन्सी असेल आणि त्या एजन्सीने चुकीचा डिपीआर तयार केलेला असेल आणि चुकीचा डिपीआर डोळे बंद करून आपले स्थानिक प्रशासनाने तो स्विकारला असेल.

तर गेल्या ५ वर्षामध्ये त्या डिपीआर बनवणाऱ्या कंपनीवर कुठली कार्यवाही प्रस्तावित केली? काय म्हणुन आपण महानगरपालिकेने त्याच्यावर कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

**आयुक्त :-** आपण म्हणताहेत ते बरोबर आहे. महानगरपालिका स्तरावरून ती एजन्सी आपण नेमलेली नसल्यामुळे कदाचित कार्यवाही प्रस्तावित केलेली नसेल. परंतू आपण राज्य शासनाला कळविलेले आहे व त्यानुसार हा डिपीआर बनविला गेलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब याच्यामध्ये आर्थिक नुकसान कोणाचे होते आहे ? आज या संपुर्ण प्रकल्पाला चुकीच्या डिपीआरला मान्यता मिळाल्यामुळे , चुकीचा डिपीआर सादर केल्यामुळे आज जो काही कामाला विलंब झालेला आहे. आतापर्यंत इतर शहरांचे डिपीआर तयार होवुन त्यांचे प्रकल्प उभारले गेलेले आहे आणि ५ वर्षामध्ये अजूनपर्यंत आपण प्रकल्प पुर्ण करू शकलो नाही. हे झालेले आहे या शहराचे नुकसान आता या वाढीव खर्चाला मान्यता द्यायची आणि हे काम करून घ्यायचे . आता जे काही १४ / १५ कोटी रूपयांचा जो काही भुर्दंड पडेल . या आर्थिक नुकसानीला जबाबदार कोण ? म्हणजे ५ वर्षामध्ये या विषयावर प्रशासन असेल , राज्य शासन असेल किंवा अजून कोणी असेल. कार्यवाही काय झाली ?

**आयुक्त :-** नाही आपण म्हणताहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता आपण या गोष्टींवरती पांघरूण टाकत जायचे आपण आपली भुमिका समजावुन सांगीतली ती आम्हाला मान्य आहे. त्या बद्दल दुमत नाहीये. परंतू याचे निष्फळ काय निघाले . या सगळ्या गोष्टींतुन आपण साध्य काय केलं? आज ५ वर्षापासुन जळगांव शहराचा घनकचरा प्रकल्प कार्यान्वित झालेला नाहीये. आज त्या चंदुअण्णा नगर मध्ये आपण जावुन बघा की तो घनकचरा प्रकल्प कार्यान्वित नसल्याने तेथिल नागरीकांना जिव मुठीत घेवुन राहावं लागत . या सगळयांच्या आरोग्याला जबाबदार कोण ? हा एक प्रश्न नाहीये की एक डिपीआर चुकीचा झाला . त्याच्यामुळे किती आर्थिक भुर्दंडापासुन ते लोकांचे जिवन असह्य होण्यापर्यंतच्या गोष्टी होतात . त्या सगळ्या गोष्टींना कोण जबाबदार आहे?

**आयुक्त :-** नाही एक वस्तुस्थिती आहे की आपण म्हणताहेत प्रमाणे आपण जर हा त्यावेळेचा डिपीआर परिपुर्ण बनवला गेला असता किंवा मग आपणही त्यावेळेला याची खातरजमा करून घेतली असती तर आपल्याला ४८ / ४९ कोटी त्यावेळेचा जर डिपीआर झाला असता . तर त्याला पुर्ण आपल्याला स्वच्छ भारत , स्वच्छ महाराष्ट्र अभियांना अंतर्गत त्याला आपल्याला अनुदान मिळालं असतं. त्यामुळे आज ज्या १८ कोटींच्या अनुदानाला आपण मुकलोय . याला कारणीभुत परिपुर्ण डिपीआर सादर न होण हे आहे. या वस्तुस्थिती पासुन आपण काही डोळेझाक करू शकत नाही. परंतू जो प्रकल्प लांबला . गेल्या तिन चार वर्षामध्ये प्रकल्प सुरू होवू शकला नाही . याच्यामध्ये जसे डिपीआर मधील त्रुटी कारणीभुत आहेत.आपल्या डिपीआरचा जर आपण विचार केला. तर एक वस्तुस्थिती आहे की जी आपली भौगोलिक स्थिती आहे ती महानगरपालिकेची चुक मान्य केली पाहीजे की ज्या ठिकाणी आपण घनकचरा प्रकल्प करणार आहोत. ती जागा आज आपल्याकरीता त्या प्रकल्पासाठी उपलब्ध नाही . कारण त्या जागेवर आपलं जुन्या कचऱ्याचे डंपीगयार्ड आहे. आता तो जुना जो कचरा आहे. त्या पुर्ण जुन्या कचऱ्याची विल्हेवाट म्हणजे बायोमायनिंग केल्याशिवाय आपल्याला ती जागा रिप्लेस होणार नाही, म्हणजे उपलब्ध होणार नाही आणि ती जागा उपलब्ध झाल्यानंतरच आपल्याला हा नविन घनकचरा प्रकल्प करता येवू शकेल. आता त्याच्यामध्ये ईव्हन आपण बायोमायनिंगचं काम सुरू केलं. जेवढे टेंडर मध्ये होते १ लाख क्युरिक मिटर तेवढे काम पुर्णही झालं, परंतू तरी सुध्दा त्या ठिकाणी आपला जुना कचरा जो अनेक वर्षापासुन ज्यावेळेला आपला शिवाजी नगरचा कचरा डेपो बंद झाला आणि आपण आव्हान्याला सुरू केला. वर्षानुवर्षाचा कचरा जो त्या ठिकाणी पडलेला आहे.त्याची आपण ट्रायलही घेतली नाही. त्याची क्वाँटीटी कुठल्या प्रकारची याचीही प्रोसेस केली नाही आणि लमसम आपण १ लाख क्युबिक मिटर म्हंटल , १ लाखाच टेंडर काढुन १ लाखाच काम झालं , आज जो आपण त्या ठिकाणी ट्रायल पिट घेतली . त्याची आपण पुणे इंजिनियरींग कॉलेजमधुन त्याची तपासणी करून घेतली. त्यावेळेला असे लक्षात आलं की १ लाख घनमिटर नाही तर १ लाख ८० हजार घनमिटर एवढा कचरा आहे. म्हणजे अजुनही टेंडर पेक्षा जादा ८० हजार घनमिटर कचरा म्हणजे जेवढे काम झाले त्याच्या मिताच कचरा अजुनही आपल्याला त्या ठिकाणी अडवतो आहे. हा कचरा पुर्ण बायोमायनिंग प्रोसेस केल्याशिवाय आपल्याला ती जागा उपलब्ध होत नाही आणि ती जागा उपलब्ध झाल्याशिवाय एजन्सी जरी आज आपल्याकडे असली. काम जरी ती करायला तयार असली. तरी सुध्दा जागेची उपलब्धतता विचारात घेता ते काम सुरू करू शकत नाहीत. त्यामुळे आपल्याला बायोमायनिंगचे राहीलेले काम पुर्ण करून घेणं आणि मग नंतर हा सिव्हिलचा प्रोजेक्ट पुर्ण करण आणि त्याच्यानंतर प्रोसेसिंग

प्लांटचे जे काही मशिनरी प्लांट आहे ते उभं करण , एवढ आपल्याला काम करून द्यायचे आहे.ऑलरेडी आपल्याला याच्यामध्ये २ ते ३ वर्षांचा प्रचंड विलंब झालेला आहे. आता विलंबाची कारणे आणि त्याची जबाबदारी हा एक वेगळा विषय आहे परंतू ती जरी आपण कारण शोधली आणि जबाबदार असणाऱ्यावर कारवाई केली . तरी आजचा प्रश्न आपला सुटणार नाही. आजच्या प्रश्नावर आपल्याला हा निर्णय घ्यावा लागेल.

**श्री.दिलीप पोकळे :-** साहेब मला एक सांगा

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता साहेब मला सांगा

**श्री.दिलीप पोकळे :-** एक मिनिंट ना नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब एक गोष्ट लक्षात घ्या की या संदर्भात कुठेही बॉडीचं किंवा पदाधिकाऱ्यांचा कुठेही संदर्भ नसतांना सुध्दा या संपुर्ण विलंबाला शिव्या कुणाला खाव्या लागतात. या लोकप्रतिनिधीला शिव्या खाव्या लागतात. म्हणजे प्रशासनाच्या झालेल्या चुका , चुकीच्या पध्दतीने कामांच्या डिपीआर ला मान्यता देणे , चुकीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करणे आणि अशा पध्दतीने झालेल्या त्रुट्यांच्या संदर्भातल्या चुकांचा सगळ्या नागरीकांचा रोष जो असतो. तो स्थानिक लोकप्रतिनिधींवर असतो. का म्हणुन लोकप्रतिनिधींनी शिव्या खाव्या ? म्हणजे ५ वर्षामध्ये ज्यांनी चुका केल्या त्यांच्या विरूध्द कोणतीही कारवाई प्रस्तावित केलेली नाहीये. परंतू आज सुध्दा चंदुआण्णा नगरातील लोकांनी या प्रकल्पाच्या अनुषंगाने होणाऱ्या त्रासासंदर्भात मा.महापौर ताईंना तिथे पाचारण केलं . मला एक समजत नाही की प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधुन काम करत होते का तेव्हापासुन , गेल्या ५ वर्षापासुन याच्यावर कारवाई का प्रस्तावित करण्यात आली नाही ? ज्या पध्दतीने आज जी काळजी वाटतेय की आपण ऑलरेडी उशिरा जागे झालेलो आहे. परंतू उशिर कोणा झालेला मुळे आहे. याची कारणमिमांसा सभागृहासमोर येणे गरजेचे नाही का ? कारण जनता प्रशासनाला किंवा अधिकाऱ्यांना ओळखत नाही. या जळगांव शहराच्या लोकप्रतिनिंधींना ओळखते , शिव्या खाव्या लागत असतील तर महापौरांना , उपमहापौरांना आणि नगरसेवकांना शिव्या खाव्या लागतात आणि चुका या १०० टक्के प्रशासनाच्या आहेत. याच्यावर आम्ही कुठपर्यंत पांघरूण घालायचे आणि शेवटी काय होते की प्रशासन असो की राजकीय अधिकारी असो हे एक दुसऱ्यांची बाजू झाकुण घेतात आणि उघडे पाडतात ते लोकप्रतिनिधींना

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे काय लोकप्रतिनिधींनी शिव्या खायचा ठेका घेतलेला आहे का ? की लोकप्रतिनिधी निवडणुका लढवुन पाप करतात का ?

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊ मला तेच सांगायचे आहे यांना

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी म्हणतो तुम्ही इथपर्यंत येते तरी का पालन करीत नाही ?

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊ १०० टक्के बरोबर आहे निविदा काढतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज शिवाजी नगर उड्डाणपुलाचा विषय आज गेल्या अडीच वर्षापासुन तो प्रकल्प चाललेला आहे.तर कॉमन सेंस ची गोष्ट आहे की त्याच्यामध्ये अडथळा देणारे विद्युत पोल हे महानगरपालिकेने शिफ्ट करावे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने शिफ्ट करावे किंवा अजून महावितरणने शिफ्ट करावे . परंतू मला सांगा की त्या दिड कोटींच्या पोल शिफ्टींगच्या विषयाच्या संदर्भात आज हजारो लाखो लोक आपला जिव मुठीत घेवुन रेल्वे लाईन क्रॉस करून जावे लागत आहे. तर कोणाच्या चुका आहेत या ? मग त्या राज्यकर्त्यांच्या आहेत की प्रशासनाच्या आहेत की अधिकाऱ्यांच्या म्हणजे प्रशासकीय गुंतागुंत इतक्या पध्दतीने वाढवुन ठेवलेली आहे की प्रशासन प्रशासनाची बाजू लावुन धरतो.त्याच्या बाबतीतही लोकांच्या लोकप्रतिनिधींना शिव्या खाव्या लागतात. म्हणजे सगळ्या प्रशासनाचा दोष सुध्दा लोकप्रतिनिधींच्या डोक्यावर खापर मारले जातात. पण ५ वर्ष याच्यावर कुठलीही कार्यवाही प्रस्तावित होत नाही. ही शोकांतिका आहे. म्हणजे प्रशासन डोळयावर पट्टी बांधुन काम करतं का ?

**श्री.दिलीप पोकळे :-** टेंडर प्रक्रीया होतांना यांच्या लक्षात नाही आला का विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला साधे कल्व्हर्ट चे काम करायचे असेल तर दहा ठिकाणी आपण हे काम करतो आणि मग आपण ज्या पध्दतीने यांचे डिपीआर सादर होतात. हे प्रस्ताव सादर होतात. त्यावेळेला मग अधिकाऱ्यांच्या खिश्यात पैसे जात असतील . त्यावेळेला मग समजत नाही का की सभागृहाला हे मुर्ख समजताहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला एक विचारायचे आहे की ज्यावेळेला टेंडर झाले त्यावेळेला किती घनमिटर कचरा आहे हे नाही समजले का ? जागा किती लागणार आहे. जी टेंडर भरणारी कन्स्ट्रक्शन कंपनी आहे .त्यांनी काय प्रकारे टेंडर घेतलेले आहे. त्यांनी कुठले निकष पाहीले टेंडर घेतांना ? त्यांनी पाहीले नाही का ? कचरा किती आहे जागा भेटते

आहे की नाही भेटतेय , फक्त टेंडर भरून ३ वर्ष विषय अटकवुन ठेवला . आता परत विषय आला महापालिकेचा आर्थिक बाबतीचा टेंडर भरतांना समजले नाही का ? १८ कोटीची जबाबदारी कोण घेणार ते सांगा

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई हा जो विषय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** या सगळया चर्चेच्या अनुषंगाने काम या मक्तेदाराला देण्यात येईल का ? नविन मक्तेदार नेमायचा असेल तर नविन डिएसआर रेट प्रमाणे खर्चामध्ये काय वाढ होईल . झालेल्या या संपुर्ण चुकांना जबाबदार कोण आहे ? या पध्दतीने तसा सविस्तर प्रस्ताव तसा दाखल करावा . तोपर्यंत हा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा. तसेच तदनंतर परिपुर्ण विषय महासभेसमोर आणण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.नितीनभाऊ

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊ यांच्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** सदर विषय तहकुब करण्यात यावा.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई हा विषय तहकुब ठेवावा.

**मा.उपमहापौर :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदरील विषय हा तहकुब ठेवण्यात येत आहे.विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया यांचे निर्देशानुसार विषय क्रं. १२ हा सर्वानुमते तहकुब ठेवण्यात आलेला आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कामाचा सन २०१८ मध्ये तयार केलेला D.P.R. हा चूकीचा पध्दतीने तयार करण्यात आल्यामूळे सदर कामी येणाऱा वाढीव खर्च रक्कम रु.१८ कोटीचा अतिरिक्त भुर्दंड महानगरपालिकेवर येणार आहे. सदर D.P.R. हा घाई-घाई मध्ये तो चूकीचा तयार करण्यात आल्यामुळे सदर कामाची निविदा आता नविन निविदा सन २०२१ चे दरानुसार काढावी लागणार असल्याने यामूळे महानगरपालिकेवर वाढीव आर्थिक भुर्दंड पडणार आहे.

यास्तव सदर प्रकरणी महानगरपालिकेवर वाढीव आर्थिक भुर्दंड जो पडणार आहे त्याची सखोल चौकशी करणेत येवुन डीपीआर न तपासता चुकीचा डीपीआर मंजूरीसाठी पाठविणारे जे-जे अधिकारी, कर्मचारी व तत्कालीन आयुक्त जबाबदार असतील त्यांची रितसर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी तोपर्यंत सदरचा विषय तहकूब ठेवणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.१८१ दि.१७/०५/१९८९ अन्वये शिवाजी उदयान, मेहरुण येथील जागा मे.जे.के. डेव्हलपर्स यांना देण्यात आलेल्या जागेच्या कराराची मुदत संपल्याने सदरची जागा ताब्यात घेण्याबाबत पारित महासभा ठराव क्र.३७६ दि.२६/०२/२०२१ अन्वये आजच्या बाजार भावाप्रमाणे मुल्य ठरवून त्यावर वार्षिक ८% प्रमाणे वार्षिक भाडे व त्यावर ५% प्रमाणे व्याजासह दंडामध्ये सुधारणा करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सर्वानुमते सदर विषय हा मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हॅलो महापौर महोदया

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया या विषयात मला बोलायच आहे , विषय क्रं. १३ मध्ये

**मा.महापौर :-** बोला शुचितताई बोला , बोला

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौरताई मागच्या सभेमध्ये मीच मांडलेला होता . ही जेकेपार्कची जी जागा आहे ती नाममात्र १०१ रूपये भाडेपट्टयाने दिलेली होती. मुदत संपल्यानंतर सुध्दा त्याचा वापर सुरू होता. महापालिकेचे खुप

नुकसान होत आहे हे प्रशासनाने सुध्दा मान्य केलं , आपण कार्यवाही करून प्रत्यक्ष ती जागा ताब्यात घेतली आणि त्यावेळेला मी महासभेमध्ये असा मुद्दा मांडलेला होता की जशी जेके पार्कची जागा ही महापालिकेची मालमत्ता आहे. तसेच गाळे ही सुध्दा महापालिकेचीच मालमत्ता आहे. तरी त्यावर ५ पट दंड असे लावलेले आहे आणि काही गाळेधारकांकडून आपण ते वसुलही केलेले आहे. त्याच प्रमाणे या मिळकतीबाबत सुध्दा या मिळकतीला पण लावावा असं मी त्या महासभेमध्ये मांडलेले होते. मागच्या सभेचे इतिवृत्त आता माझ्या समोर आहे. इतिवृत्त मी आपल्याला काही वाचुन दाखवते. इतिवृत्तात मी असे म्हंटलेले आहे. आपण जसे गाळेधारकांना ८ टक्के वार्षिक भाडे ५ पट दंड हे सगळं लावतो . त्यांची मुदत संपल्यानंतर मग तो कायदा येथे का लागू होवू शकत नाही ? येथे सुध्दा तोच कायदा लागू झाला पाहीजे.त्यांच्याकडून आपण ५ पट दंड घेतो . तर यांच्याकडुन सुध्दा आपण ५ पट दंड घेतला पाहीजे आणि शेवटी सुध्दा या विषयाच्या चर्चेच्या शेवटचे सुध्दा वाक्य मी पुर्ण मांडते येथे त्याच विषयामध्ये जेव्हा आपण मांडतो की ज्यांची मुदत संपलेली आहे त्यांच्याकडून दंड वसुल केला जावा आणि किमान बाजारभावा प्रमाणे त्या जागेचे जे काही भाडे येणार आहे. त्या सारखा आपण भाव मनपाच्या इतर प्रॉपर्टीना लावतो. तोच न्याय येथे लागला पाहीजे याची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे आणि माझ्या माहिती प्रमाणे हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर झालेला आहे. मग अशा परिस्थितीमध्ये हा ५ पट दंड त्यांच्याकडून वसुल झाला पाहीजे आणि प्रशासनाचे जर असं म्हणण असेल की ५ पट दंड हा कायदेशीर नाही. तर मग आजच्या सभेमध्ये आपण या विषयामध्ये निर्णय घेवुयात की गाळेधारकांना जो आपण ५ पट दंड लावतो आहे . तो नियमानुसार नाही हे प्रशासन मान्य करतं आहे आणि त्यामुळे गाळेधारकांचे सुध्दा ५ पट दंड आपण या येथे रद्द करतो आहे. या विषयासंदर्भातील माझी भुमिका मी येथे मांडलेली आहे. प्रशासनाच्या या प्रस्तावाला माझा येथे विरोध आहे. भारतीय जनता पक्षाचा याला विरोध आहे. ५ पट दंड जर गाळेधारकांना लागू आहे . तर तो इतरांना सुध्दा तो लागू राहणार . यांचा रद्द करायचा असेल तर तो गाळेधारकांचा सुध्दा तो आजच्याच सभेत रद्द झाला पाहीजे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो , मा.महापौरताई

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई शुचितातार्ईनी मांडलेली जी काही भुमिका आहे. ती एका अर्थाने योग्य आहे. परंतू याच्या संदर्भातील अडचण एवढीच आहे की ५ पट दंडाची आकारणी जी केली होती. आपणास राज्य शासनाने जे नियम आपल्या महानगरपालिकेला बनवुन दिलेले आहेत. ते नियम लागण्याच्या पुर्वी गाळेधारकांना त्या ५ पट दंडाची कार्यवाही प्रस्तावित केलेली होती. तदनंतर शासनाने कायद्यामध्ये सुधारणा केली , नियम बनवुन दिले आणि नियमामध्ये ज्या अटी शर्ती टाकण्यात आलेल्या होत्या . त्या अटी शर्तीच्या अनुषंगाने ८ टक्के बाजारभाव मुल्यांची ती मिळकत कराची आकारणी आणि २ टक्के शास्ती ती राज्य शासनाने नंतर नमुद करून दिलेले होते. गाळेधारकांना ज्या ५ पट दंडाची जी जुनी शास्तीची आकारणी केलेली होती.त्या आकारणीच्या संदर्भात राज्य शासनाने जो अहवाल मागीतलेला आहे. तो अहवाल गाळेधारकांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातुन प्रशासनाने त्या पध्दतीने सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केलेला आहे.राज्य शासन त्याच्यावर ज्या दिवशी निवाडा देईल. त्या दिवशी त्या गाळेधारकांचे जे ५ पट दंडाची जी रक्कम आहे ती सुध्दा माफ करण्यात येईल. म्हणुन दोघेही विषय आपल्या जागी जरी योग्य दिसत असले , तरी परंतू दोघेही वेळेला परिस्थिती वेगवेगळी होती. यावेळेला नियमामध्ये तरतूद नसतांना ज्यावेळेला ५ पट दंडाची आकारणी केली गेली , म्हणुन आज या नियमाला धरून २ टक्के शास्तीची जी आकारणी आहे ती करण्यात येत आहे. त्याच्यामध्ये कुठेही चुकीची भुमिका प्रशासनाची आहे असे दिसुन येत नाही.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** मा.महापौरताई हा विषय तहकुब करण्यात यावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया आता नितीनभाऊंनी जे स्पष्ट केलेले आहे याच्यातुन हे दिसत आहे की प्रशासनाने येथे जशी तत्परता दाखवली ती नियमानुसार ती बसत नाही . तर हीच तत्परता प्रशासनाकडून अपेक्षित असते. इतरही विषयांमध्ये हीच तत्परता प्रशासनाने गाळेधारकांच्या दृष्टीने दाखविली पाहीजे.

**मा.महापौर :-** शुचितातार्ई आपला आवाज येत नाहीये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा:-** महापौर महोदया , प्रशासनाने जी तत्परता आजच्या या विषयामध्ये दाखवलेली आहे ती कशी या नियमामध्ये बसवली आणि तोच नियम ईथे सुध्दा लागू झाला पाहीजे आणि तसाच आपण सर्वानुमते ठराव केलेला आहे. तर तो ठराव कायम करण्यात आला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपण म्हणतात ते मान्य आहे. परंतू या संदर्भात ऑलरेडी प्रशासनाने ५ पट दंड माफ करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने जो पत्रव्यवहार महानगरपालिका प्रशासनाशी केलेला होता. त्याला अनुसरून गाळेधारकांना दिलासा मिळेल. अशा पध्दतीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे ऑलरेडी पाठवुन दिलेला आहे आणि आज जी प्रशासनाने प्रस्तावित केलेली २ टक्के शास्तीची कार्यवाही आहे. ती प्रचलित आजच्या नियमानुसार व नियमाला धरून योग्य आहे. दोघेही विषयांमध्ये आपली भुमिका जी आहे. त्या दोघेही भुमिका त्याच्यामध्ये मान्य होतात आहे. गाळेधारकांच्या बाबतीतील भुमिका ती सुध्दा प्रशासनाने राज्य शासनाला कळविलेली आहे. राज्य शासनाने नविन जे नियमानुसार निर्देश दिलेले आहेत. त्याच्या अनुषंगाने प्रशासनाने आजचा प्रस्ताव हा महासभेसमोर पाठवला आहे. मला वाटत याला मान्य करण्यास हरकत नाहीये आणि तो मान्य करावा.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा. सदस्य यांच्या सुचना लक्षात घेता. शुचितातांई याच्यासह सर्व भारतीय जनता पार्टीचा विरोध दर्शविण्यात येत आहे आणि बहुमताने हा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे , पुढील विषय घ्या.

**मा.महापौर :-** विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.राजेद्र पाटील :-** महापौर महोदया , महापौर महोदया

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की,जळगांव शहर महानगरपालिकेने मे.जे.के.डेव्हलपर यांना शिवाजी उदयानातील जागा सुमारे ११५ बाय ९५ मी जागेमध्ये बसविणे, देखरेख करणे, चालविणे करीता तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.१८१ दि.१७/०५/१९८९ अन्वये एकूण ३० वर्षासाठी नाममात्र आकार वार्षिक रु.१०१/- घेऊन अटी-शर्तीच्या अधीन राहून भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती.

त्यानुसार सदरची जागा ताबयात घेण्यासाठी जळगांव शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.३७६ दि.२६/०२/२०२१ अन्वये करारातील अटी-शर्तीचे केलेले उल्लंघन व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ मधील तरतूदी विचारात घेवून मे.जे.के.डेव्हलपर्स,जळगांव यांना देण्यात आलेली जागा जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार उपरोक्त जागा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन दि.०७/०४/२०२१ रोजी मनपाच्या ताब्यात घेण्यात आलेली आहे.

सदर ठरावात प्रशासनाने मे.जे.के.डेव्हलपर्सकडून मुदत संपल्याच्या दिनांकापासून त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेचे आजच्या बाजार भावाप्रमाणे मुल्य ठरवून त्यावर वार्षिक ८% प्रमाणे वार्षीक भाडे व त्यावर ५% प्रमाणे व्याजासह दंड वसूल करुन तात्काळ जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. असे नमूद करण्यात आलेले आहे.

मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ दिनांक १३ सप्टेंबर २०१९ अन्वये कलम ३ महानगरपालिकेच्या मालमत्तेचे/ भाडेपट्टयाचे नुतणीकरण व हस्तांतरणासाठी पात्रता अटी :- ३ मधील पोट कलम ४ मध्ये सदर नियमावली पूर्वी भाडेपट्टयाची मुदत संपलेल्या तथापि, नुतनीकरण न झालेल्या वैध भाडेपट्टयाचे नुतनीकरण/ हस्तांतरण हे या नियमातील तरतूदीनूसार करण्यात येईल. तथापि, ज्या प्रकरणात भाडेपट्टयाची रक्कम संबंधीतांनी भरलेली नसेल, अशा प्रकरणात महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार बाजार मुल्यांच्या अनुषंगाने मालमत्तेच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या ८% रक्कम अधिक अधिनियमातील तरतूदीनूसार दरमहा २% इतके व्याजासह आकारणी करण्यात यावी,असे नमूद केलेले आहे.

उक्त नियमावालीच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८१ क नुसार मे.जे.के.डेव्हलपर्सकडून मुदत संपल्याच्या दिनांकापासून त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेचे आजच्या बाजार भावाप्रमाणे मुल्य ठरवून त्यावर वार्षिक ८% प्रमाणे वार्षीक भाडे व त्यावर २% प्रमाणे व्याजासह वसूल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ३१ प्रतिकुल मते :- १३**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.राजेद्र पाटील :-** महापौर महोदया , हा जो विषय आहे फक्त याच्याशी फक्त शुचितातार्ईंचा विरोध नसुन पुर्ण भारतीय जनता पार्टीचा विरोध असेल.

**नगरसचिव विषय क्रं .१४ :-** प्रभाग क्र.१३ अंतर्गत विविध १ ते ३ कामे १०० कोटी निधीमध्ये तसेच नियोजन मंडळाच्या निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,४८,१९,२०८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.अंजनाबाई प्रभाकर सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई हे विषय क्रं. १४ ते ६७ हे सर्व विषय जे आहेत.ते विकास कामांचे आहेत. तत्पुर्वी मी एक सुचना मांडू ईच्छितो की आज आपण बघतोय की मागील महासभेमध्ये जी मंजुर करण्यात आलेली कामे होती. ती साधारणत: १०७ कोटी ७७ लक्ष ९४२२ रूपयांची कामे मागच्या महासभेमध्ये मंजुर करण्यात आलेली होती. आजच्या महासभेमध्ये विषय क्रं. १४ ते ६७ नंबरवरील जे काही प्रस्ताव आलेले आहेत. त्या प्रस्तावांची मी एक ढोबळ आकडेवारी केली , तर साधारणत: १११ कोटी २९ लक्ष १६९१८ रूपयांची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. म्हणजे साधारणत: मागची महासभा आणि आजची महासभा या दोघांचे मिळुन एक साधारणत: सव्वादोनशे कोटी रूपयांची कामं प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. आता सव्वा दोनशे कोटी रूपयांची कामे प्रस्तावित करत असतांना महानगरपालिकेचा जो २०२१-२२ चा जो अर्थसंकल्प सादर केला गेला होता. त्याच्यामध्ये साधारणत: १२५ कोटी रूपयांची तरतूद ही आपण रस्त्यांसाठी केलेली होती आणि १५ कोटी रूपयांची तरतूद आपण ही नविन गटारींसाठी केलेली होती. म्हणजे दोघेही मागचे मंजुर झालेले विकासकामांचे प्रस्ताव आणि आजचे प्रस्ताव हे जवळपास सव्वादोनशे कोटी रूपयांमध्ये १४० कोटी रूपये दोघं शिर्षकाखाली आपण अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. आता हे जे प्रस्ताव आलेले आहेत. हे प्रस्तावाबाबत सभागृहाच्या भावना या काही खोट्या नाहीयेत. ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. आज आपण बघतोय की संपुर्ण जळगांव शहर कुठलाही रस्ता निमखेडी पासुन तर मन्यारखेडापर्यंत आणि आव्हाण्यापासुन तर महाबळ पर्यंत चौफेर जर कधी जळगांव शहराचा आपण दौरा केला तर आपल्याला परिस्थिती लक्षात येईल की एकही रस्ता हा वाहन चालवण्याच्या उपयुक्त असा दिसुन येत नाही. आज आपण बघतोय की साधारणत: तिन ते चार महिन्यापुर्वी आपण १०० कोटींच्या रस्त्यांच्या कामाच पुर्ननियोजन केलेले होते. पुर्ननियोजन केल्यानंतर त्यासंदर्भात राज्य शासनाला त्याबाबत अवगत करण्याच प्रशासनाचं काम होत. परंतू ठराव होवुन साधारणत: आज दोन अडिच महिन्यांचा कालावधी झाल्यानंतर सुध्दा त्यामध्ये यापुर्वी प्रस्तावित करण्यात आलेली ४२ कोटींच्या कामांची निविदा ही रद्द करणे आणि ती रद्द करून १०० कोटींच्या कामाच्या प्रस्तावाला मान्यता देणे . याबाबत राज्य शासनाला अवगत करण तेवढच महत्वाच होत.परंतू मला वाटतय की प्रशासन या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष का करत आहे . हे मात्र कळत नाहीये. या संदर्भात मी स्वत: व्यक्तीश: आयुक्त साहेबांशी मी आणि विरोधीपक्ष नेते सुनिलभाऊ महाजन आम्ही जवळपास १५ / २० दिवसांपुर्वी भेट घेतली होती आणि त्यांना म्हंटल की प्रस्ताव पारीत होवुन , रू. १०० कोटींच पुर्ननियोजन करून साधारणत: अडीच तिन महिन्यांचा कालावधी झाला आणि अडीच तिन महिन्यांचा कालावधी झाल्यानंतर सुध्दा प्रस्तावाला गती का येत नाहीये ? परंतू यानंतर अस माहिती पडल की कुठेतरी मक्तेदार हा उच्च न्यायालयात गेलेला आहे. आता मला एक सांगा की या महानगरपालिकेचे एक धोरण पुर्वी ठरलेले होते. जळगांव शहराच्या कामांच्या संदर्भातील निकाल हे ठरवण्याचे धोरण या जळगांव शहरातील महानगरपालिका सर्व ठरवत असते.बदललेले धोरण आणि बदललेल्या धोरण्याच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णय जे निर्णय जो पर्यंत राज्य शासनाला अवगत करण्यात येणार नाहीत. तोपर्यंत राज्य शासनाला काही स्वप्न पडणार नाही की जळगांव शहर महानगरपालिकेने आपल्या धोरणामध्ये काही बदल केलेले आहे. मग अशा पध्दतीने राज्य शासनाला अवगत नसतांना एकीकडे कुणी मक्तेदार उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करतो आणि मक्तेदार याचिका दाखल करीत असतांना , राज्य शासनाला महानगरपालिकेच्या धोरणाची कल्पना नसेल आणि महानगरपालिकेच्या धोरणाची कल्पना नसतांना राज्य शासनाने जर कधी एखादी महानरपालिकेच्या धोरणाच्या विसंगत अशी भुमिका न्यायालयासमोर घेतल्यानंतर पुन्हा एक तिढा निर्माण होतो. अशा पध्दतीने या विकास कामांना विलंब होत असतो. म्हणजे १५ दिवसांपुर्वी मा.आयुक्त साहेबांसमोर शहर अभियंता होते आणि त्या गोष्टींवर चर्चा झाल्यानंतर आयुक्त साहेबांनी राज्य शासनामध्ये अव्वर सचिव यांना फोन लावला ,

जॉईंट सेक्रेटरी जाधव साहेबांना फोन लावला. परंतू त्यांनी सुध्दा हेच सांगीतले की अशा पध्दतीने महानगरपालिकेला पालिकेच्या बदललेल्या धोरणाची आम्हाला कुठलीही कल्पना नाहीये.आपण आम्हाला यासंदर्भात अवगत केल्यास त्याच्यावर निश्चितपणे काहीतरी निर्णय प्रक्रीया राबवता येईल. परंतू दहा दिवसांनंतर पुन्हा प्रशासनाकडून माहिती घेतली , शहर अभियंत्यांना फोन केला तर त्यांना त्या गोष्टीचा विसर पडलेला होता. मला सांगा की एकीकडे संपुर्ण शहरामध्ये रस्त्यांची दैना झालेली आहे. १०० कोटी रूपयांचे नियोजन केल्यानंतर प्रशासनाच्या निष्काळजी पणामुळे अशा पध्दतीने प्रस्ताव दिरंगाईने प्रवास करत असतील. तर मला सांगा या शहराचा विकास कशाप्रकारे आम्ही साध्य करणार आहोत. आता यापुढे एक गोष्ट जावुन सांगतो की जळगांव शहराच्या हद्दीतुन साधारणत: प्रमुख राज्यमार्ग आणि प्रमुख जिल्हामार्ग अशा दोन प्रकारच्या संज्ञेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते या शहराच्या हद्दीतुन जात असतात.यासंदर्भातील मी आपल्याला शासन निर्णय दाखवतो . ०४ मे २०१७ चा शासन निर्णय आहे मा.आयुक्त महोदय आपणही हा विषय थोडा गांभीर्याने ऐकावा. शासन निर्णय म्हणतय , सार्वजनिक बांधकाम विभाग , शासन निर्णय क्रं./ राज्य विकास योजना २०१७ ,प्र.क्रं. २५/ नियोजन -२ , मंत्रालय , मुंबई , दि. ०४ मे २०१७ , शासन निर्णय क्रं. १ , अधिक्षक अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ यांचे पत्र आणि आयुक्त ,जळगांव शहर महानगरपालिका यांचे पत्र दि. ०२/०५/२०१७ प्रस्तावना त्याच्या संदर्भातील वाचुन दाखवितो आपल्याला जळगांव शहर महापालिकेकडे देखभाल व दुरूस्ती साठी वर्ग , हस्तांतरीत केलेले एकूण ६ रस्ते अवर्गीकृत करणेबाबत चा प्रस्ताव मुख्य अभियंता ,सार्व. बांधकाम प्रादेशिक विभाग , नाशिक . यांनी सादर केला होता. सदर प्रस्तावातील रस्ते शासन निर्णय क्रं.TRS/२००२/ प्र.क्रं. ३५/ रस्ते १ दि. ०६ जुन २००२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जळगांव नगरपरिषदेकडे सुधारणा व दुरूस्ती व देखभालीसाठी वर्ग करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेकडे वर्ग केलेले एकुण ६ रस्ते दि. ३१/०३/२०१७ च्या शासन निर्णय क्रं./ रस्ते विकास योजना २०१७ / प्र.क्र.२५ नियोजन-२ या अन्वये अवर्गीकृत करण्यात आले. या संदर्भात संदर्भ क्रं. २ व ३ नुसार केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने सदरचे अवर्गीकृत ६ रस्ते पुनश्च वर्गीकृत करण्याचे व महानगरपालिकेच्या ताब्यात न देण्याबाबतचा हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासन निर्णय संदर्भ क्रं. १ चा शासन निर्णय क्रं. सो ॲन्ड सो ३१/०३/२०१७ रद्द करण्यात येत आहे. आता ही जी लाईन आहे ही शांततेने ऐका आता यापुढे संबंधित रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरूस्ती साठी ताब्यात राहतील . हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. म्हणजे ३१/०३/२०१७ नंतर राज्य शासनाने घेतलेला शासन निर्णय ०४ मे २०१७ तो अंमलात आल्यापासुन ०४ मे २०१७ नंतर या शहरातील प्रमुख रस्त्यांची मालकी जी आहे ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे आणि त्याच्या देखभाल , दुरूस्तीची जबाबदारी सुध्दा ही या शासन निर्णयाच्या अन्वये ही सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. आता या रस्त्यांचे स्वरूप आपल्याला सांगतो . आव्हाणे गावापासुन सुरू झालेला रस्ता संपुर्ण जुना जैन पाईप मार्गे धरून टॉवर चौकापर्यंत येईपावेतोचा हा रस्ता व कानळदा रस्ता जळगांव महानगरपालिकेची हद्द सुरू होवुन तो टॉवर पर्यंत नेण्यात आलेला रस्ता , आसोदा रेल्वे गेटपासुन ते टॉवर पर्यंत येणारा रस्ता , टॉवर चौकातुन काव्यरत्नावली चौकापर्यंत जाणारा रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग म्हणुन संबोधला जातो.हा सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे. टॉवर चौकापासुन पुष्पलता बेंडाळे चौक आणि तेथुन ईच्छादेवी पर्यंतचा रस्ता हा जुना पाचोरा मार्ग हा राज्य मार्ग म्हणुन संबोधला जातो. याची माहिती आज सुध्दा ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. टॉवर चौकापासुन ते अजिंठा चौफुली पर्यंतचा रस्ता हा जुना औरंगाबाद मार्ग हा सुध्दा राज्य शासनाच्या अखत्यारित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या साधारणत: २० पाईंट काहीतरी किलोमिटर चे काही प्रमुख रस्ते हे जळगांव शहराचे हे राज्य शासनाच्या अखत्यारित असल्याकारणाने याबाबतीतील धोरणाचा कधी प्रशासनाने विचार केला का ? किंवा प्रशासनाने या गोष्टी या महानगरपालिकेच्या सभागृहासमोर निदर्शनास आणल्या का ? की ज्या रस्त्यांवर आपली मालकी नाहीये. त्या कामांवर व त्या रस्त्यांवरचे प्रस्ताव आपण पारीत करून आपण त्याला टेक्निकल सेंक्शन लावुन आपण त्याला राज्य शासनाकडे पाठवतो. परंतू ज्या रस्त्याची मालकीच आपल्याकडे नाहीये. ज्यांच देखभाल दुरूस्तीची जबाबदारी या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने स्विकारलेली आहे , सार्वजनिक बांधकाम विभागाने स्विकारलेली आहे. मग याचा खर्च राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करण्याच्या सदंर्भातील काही उपाययोजना प्रशासनाने सुचवल्या का ? म्हणजे अशा पध्दतीने कुठेतरी महानगरपालिकेचे प्रशासन विभाग डोळ्यांवर जर कधी पट्टी बांधुन काम करीत असेल. तर मला नाही वाटत की या शहराचं भलं होईल.आज संपुर्ण जळगांव शहरातील रस्त्यांची परिस्थिती पाहाता आलेले प्रस्ताव पाहाता , अर्थ संकल्पातील तरतूदी पाहाता आणि महानगरपालिकेची आर्थिक

उत्पन्नाची बाजु पाहाता , मला वाटत की हे जे काही प्रस्ताव असतील हे मला वाटत निव्वळ ठरावापर्यंत जावुन मर्यादीत राहतील.

**श्री.प्रशांत नाईक :-** मा.महापौरताई मला बोलायचे आहे, महापौरताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** आश्वासनांवर आपण निवडून आलेलो आहोत.

**श्री.प्रशांत नाईक :-** मा.महापौरताई या विषयावर बोलायचे आहे,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि ती पुर्ण करण्याची जबाबदारी ही या महानगरपालिकेच्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांसोबत प्रशासनाची सुध्दा बरोबरीची आहे. परंतू उत्पन्न वाढीच्या संदर्भात प्रशासन काय करते हा एक मोठा प्रश्न आहे. जर कधी प्रशासन उत्पन्न वाढीच्या संदर्भात गंभीर नसेल तर मग एक छोटसं उदाहरण सांगतो की मी कमीत कमी १० वेळा स्थायीच्या मिटींगमध्ये किंवा महासभेमध्ये जळगांव महानगरपालिकेच्या मेहरूण येथील घरकुलच्या जमीनी संदर्भाचा कोट्यवधी रूपयांचा भुसंपादनाचा मोबदला दिल्यानंतर त्या जमिनीचा काही भागाचा ताबा हा जमीन मालकाकडेच आहे अजुन , कोट्यवधी रूपयांचा भुसंपादनाचा मोबदला देतांना ज्या पध्दतीने घाई दाखवली जाते , की ज्यावेळेला कोर्टाच्या निर्देशाचा बाऊ उभा केला जातो आणि त्या जागा महानगरपालिकेला म्हणजे मा.आयुक्त साहेब आपण आपल्या स्वत:च्या समोर सुध्दा मी याबाबतीत कमीत कमी चार वेळा नमुद केलेले आहे. परंतू खंत वाटते की प्रशासन अद्यापपावेतो सुध्दा महानगरपालिकेच्या कोट्यवधी रूपयांच्या मिळकतींचा ताबा सुध्दा घेवु शकत नाही ही शोकांतिका आहे. जर कधी अशा कोट्यवधी रूपयांच्या जागा अशाच पध्दतीने कोणी तिऱ्हाईत व्यक्ती त्यांच्या वापरात असेल . तिऱ्हाईत माणस त्याला गिळंकृत करत असतील आणि इकडे मात्र आपण भिकेला लागायच की कुठली पध्दत आहे. का बर मी किती वेळा बोललेलो आहे की या जागा या घरकुल योजना आपल्याला भविष्यात राबवायची नाहीये कोट्यवधी रूपयांच्या मालकीच्या या महापालिकेच्या जागा का बर आपण याचा प्रस्ताव तयार करत नाहीत. का बर निधीची उपलब्धतता करून देत नाही , म्हणजे हे फक्त अशा पध्दतीचे लोकप्रतिनिधींनी ठराव करायचे आणि सामान्य नागरीकांच्या तोंडाला पाणी पुसायचे का ? आपण तोपर्यंत ८ महिन्यांनंतर निवृत्त होवुन चालले जाल , परंतू दोन वर्ष नागरीकांच्या शिव्या खायच्या का ? या लोकप्रतिनिधींच करायचा ठेका घेतलेला आहे का ? मला वाटत की येथे येणारा अधिकारी हा निवृत्तीच्या वेधामध्ये धाडसी निर्णय घेण्याच्या मानसिकतेत नसतो. मी तर सभागृहाला विनंती करेल की याच्यानंतर कोणीतरी उमद्या मनाचा आय.ए.एस अधिकारी या महानगरपालिकेवर आणावा. जेणेकरून धाडशी निर्णय राबवुन या महानगरपालिकेच्या मनात जी एक प्रकारची शिथिलता निर्माण झालेली आहे ती कुठेतरी दुर करावी लागेल. अन्यथा तर मला असं वाटत की लोकप्रतिनिंधीनी रोजच्या शिव्या खाण्यापेक्षा राज्य शासनाला विनंती करायची की ही महानगरपालिका एकदाची बरखास्त करून टाका आणि आपणच चालवा ही महानगरपालिका ईथे आमच्याकडे अधिकारी योग्य मिळणार नाहीत, आम्ही लोकप्रतिनिंधीनी मांडलेले विषय मार्गी लागणार नाहीत.आर्थिक नियोजन या महानगरपालिकेचे त्याचे नियोजन योग्य पध्दतीने होत नसेल तर लोकप्रतिनिंधीनी काय उत्तरे द्यायची सामान्य जनतेला , म्हणजे राज्य ऐकणार नाही, प्रशासन ऐकणार नाही आणि सभागृहाच्या सदस्यांनी आपले घसे कोरडे करायचे येथे आणि सकाळी उठल्यापासुन शिव्या खायच्या नागरीकांच्या म्हणजे खड्डे पडले तर शिव्या , गटारी साफ होत नाहीतर शिव्या , कचरा उचलला जात नाही तर शिव्या , पथदिवे बंद पडले तर शिव्या , एलईडी वाला काम करत नाही तर शिव्या सगळ्या बाबींमध्ये लोकप्रतिनिधी येथे तयार आहे. मग का म्हणुन आम्ही तुमचं हे पाप वाहावं , प्रशासन म्हणुन प्रशासनाची काही जबाबदारी येत नाही का ? की जर का आपण आज बघतो की महानगरपालिकेच घरपट्टी चं उत्पन्न मागच्या वर्षाची आकडेवारी काढुन बघायची प्रशासनाने ५० / ५२ / ५४ टक्क्यांच्या वर वसुली होत नाही आणि ती ५४ टक्के वसुली कशाच्या आधारावर होते. ज्या पध्दतीने आपण १० टक्के जी सवलत देतो. त्याच्यामध्ये जे प्रमाणिक करदाते पैसे भरून जातात. त्याच्यामुळे आपण ५२ ते ५४ टक्केचा आकडा आपण गाठतो.परंतू उर्वरित निधी जमा करण्याच्या संदर्भात प्रशासनाची भुमिका काय आहे ? महानगरपालिकेच्या मालकीच्या कोट्यवधी रूपयांच्या मालमत्ता आहेत. खाँजामिया ची मालकीची जागा आहे. जुन्या नगरपालिकेची जागा आहे. सानेगुरूजी रूग्णालयाची जागा आहे. का म्हणुन प्रशासन याबाबतीत विचार करत नाही की या जागा मोक्याच्या अशा - अशा पध्दतीच्या जागा आहेत. याचं कुठेतरी योग्य पध्दतीने नियोजन करून राज्य शासनाकडून ३७ चे प्रस्ताव मान्य करून कुठेतरी या शहराचा आर्थिक हेतू साध्य करण्याच्या दृष्टीकोनातुन काही कटू निर्णय घेणे गरजेचे आहे. परंतू गेले अडीच वर्ष तसेच गेले , पुढचे अडीच वर्ष तसेच जातील. जे मागचे सत्ताधारी होते त्यांनीही शिव्या खायच्या , बसलेले सत्ताधारी आहेत त्यांनीही शिव्या खायच्या . शिव्या आम्ही एक वेळ प्रसंगी शिव्याही खाऊन घेवु , परंतू शिव्या खाऊन नागरीकांचे

समाधान नाही झाले आणि होणार नाही परंतू याचे शल्य जे आहे ना ते कायम मनामध्ये राहील. या सार्वजनिक बांधकाम विभागाचा ज्या दिवशी ०४ मे २०१७ ला निर्णय झाला त्यावेळेला २९/०४/२०१७ ला या संपुर्ण बाबींमध्ये ठराव सुध्दा महानगरपालिकेने पारीत केला होता. ठराव क्रं. ६३० दि. २९/०४/२०१७ शासन निर्णय व ठरावान्यवे हे संपुर्ण रस्ते जे होते . हे पुन्हा शासनाला त्यांच्या ताब्यात देण्यासंदर्भातला हा ठराव केला होता आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने एक सुचना सुध्दा त्यावेळेला मांडलेली होती की प्रशासनाने तात्काळ सदरचे सहा रस्ते शासनाच्या संबंधित विभागाकडे वर्गीकृत करणेबाबत शहरातील आमदार श्री.सुरेश दामु भोळे हे व विधान परिषद सदस्य श्री. चंदुलाल पटेल यांना पत्र देवुन सदरचे सहा रस्ते तातडीने वर्गीकृत करणेकामी पाठपुरावा करण्याची विनंती करावी. तसेच या सहा रस्त्यांचे नुतनीकरण करण्यासाठी पाठपुरावा करण्यासाठी ही विनंती करावी. त्याप्रमाणे प्रशासनाने तातडीने शासन स्तरावर सदरचे सहा रस्ते वर्गीकृत करण्याची प्रक्रीया करणेबाबत तसेच सदरचे सहा रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती करणे संदर्भात शासनाने आवश्यक उपाययोजना करणे संदर्भात शासनास विनंती पत्र द्यावे. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. साधारणत: मला सांगा या ठरावाच्या नंतर राज्य शासनाने हा शासन आदेश ४ मे २०१७ ला काढला . संपुर्ण रस्ते आपल्या ताब्यात घेतले , खऱ्याअर्थाने हे काम चांगल्या नियोजन पध्दतीने काम केले असते . तर मागचे जे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे त्यांना ही एक खुप चांगली गोल्डन अपॉर्च्युनिटी होती. एक अत्यंत अशी एक सुवर्णसंधी होती. ती शासन निर्णयान्वये हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग झालेले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री या शहराचे, याजिल्ह्याचे पालकमंत्री त्यावेळी चंद्रकांतदादा पाटील होते.भारतीय जनता पक्षाकडे जळगांव शहर महानगरपालिकेची सत्ता होती. या शासन निर्णया किंवा या ठरावाचा जर कधी आपण त्यावेळेला भारतीय जनता पक्षाने करून घेतला असता , हे २० किलोमिटर लांबीचे रस्ते कॉंक्रींट चे रस्ते तयार होवुन या शहरामध्ये खुप चांगल्या प्रकारची रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असती . परंतू दुर्देव की अशा पध्दतीने विचार त्यांना आला नसेल किंवा प्रशासनाचं कर्तव्य होत की प्रशासनाने अशा झालेल्या बाबी किंवा असे झालेले शासन निर्णय या संदर्भातील माहिती जी आहे ती अवगत करायला पाहीजे होती. तर माझी मा. महापौरताई एवढीच विनंती आहे की प्रशासन ज्या पध्दतीने संथ गतीने काम चालु आहे. मला सांगा आपल्या सुध्दा या टर्मचा साधारणत: ५ महिन्याचा कालावधी पुर्ण होत आला . साधारणत: आपल्या हातामध्ये २ वर्षांचा कालावधी आपल्या हातामध्ये आहे आणि त्या २ वर्षाच्या कालावधीमध्ये हे संपुर्ण प्रकल्प १०० कोटीचा विनियोग आपण पुर्ण करू शकलो नाही . २५ कोटींचा निधी आपल्याला २०१७ ला मिळालेला होता . २०१७ च्या २५ कोटीतील ४ कोटींचा निधी तोही आज आपण पुर्ण करू शकलो नाही. म्हणजे एकीकडे जिथे निधी उपलब्ध आहे. त्या निधीचं आपण नियोजन करू शकत नाही. एकीकडे निधीची उभारणी करू शकत नाही.मला वाटत की अशा पध्दतीने प्रशासनाकडून अजुन जास्त अपेक्षा काय व्यक्त करू शकणार. तर माझी या संदर्भात विनंती आहे की , प्रशासनाने या संगळया बाबींचा खुप गांभीर्याने विचार करायला पाहीजे आणि महानगरपालिकेचा जो काही दोन अडीच वर्षाचा कार्यकाळ आहे किंवा मग मा.आयुक्त साहेबांचा ८ महिन्यांचा जो काही कार्यकाळ असेल. या मध्ये जे काही आपल्या कार्यकाळात जी काही दुर्दशा झाली असेल किंवा जी काही प्रशासनामध्ये शिथिलता आली असेल. ते कुठेतरी पाप धुवुन काढण्याच्या संदर्भात प्रयत्न करावे.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती कुठेतरी पुर्ण करण्याच्या संदर्भात विचार करावा ही विनंती आहे

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ एक विनंती आहे , मा. महापौरताई , भाऊ ८ महिन्यांची वेळ न बघता अकार्यक्षम आयुक्त यांची हकालपट्टी करून एक आय.ए.एस अधिकाऱ्याची मागणी करावी. कारण हे आयुक्त निष्क्रिय ठरलेले आहेत. त्यांच्याकडून कुठल्याही विकासाची अपेक्षा नाहीये. त्यांच्याकडून जे आता तुम्ही म्हणत असाल की मिटींगमध्ये एवढे प्रस्ताव आलेले आहेत याच कारण फक्त आयुक्त साहेब आहेत. आपल्याकडे आर्थिक बजेट जेव्हा लावलेले आहे . भाऊ ३१ मार्च २०२१ पासुन तर आतापर्यंत १ रूपयाचे काम मनपा फंडातुन गटारी किंवा रस्त्यांसाठी यांच्याकडे काम कोणतेही घेवुन गेले असता . हे सांगतात की निधीच आपल्याकडे उपलब्ध नाहीये महानगरपालिकेची परिस्थिती कमकुवत असल्याकारणाने हे कोणत्याही कामाला बजेट लावुन देत नाही आणि कोणतेही काम मनपा फंडातुन करून देण्यास तयार नसतात.

**मा.आयुक्त :-** सन्मा.ज्येष्ठ सदस्य नितिनभाऊ लढ्ढा यांनी अतिशय विस्तृतपणे महापालिकेच्या एकुण स्थिती बद्दल प्रशासकीय आर्थिक असेल त्यांच्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मुद्दयाच खंडण करण्याच काहीच कारण नाही ही वस्तुस्थिती आहे. मुद्दा असा आहे की हे जे काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत. सुदैवाने

सन्मा. सदस्य अनेक वर्षापासुन या सभागृहाचे सभासद आहेत. तर मग या प्रश्नांची निर्मिती ही आजची नाहीये हे सन्मा. नितीनभाऊही मान्य करतील. प्रश्न आज आपल्याला सोडवायचे निश्चित आहे . परंतू प्रश्न निर्माण झालेले आहेत अनेक वर्षापासुन, आर्थिक स्थितीचा जर आज आपण विचार केला तर गेल्या २० वर्षामध्ये महानगरपालिकेच्या घरपट्टीचा आपण विषय काढला. घरपट्टीचे रिव्हिजन आपण गेल्या २० वर्षामध्ये करू शकलो नाही. गेल्या २ वर्षापासुन अडीच वर्षापासुन याच रिव्हिजनचं काम चालु झालय आता या वर्षामध्ये हे रिव्हिजन पुर्ण होईल अशी परिस्थिती आहे. मागच्या १ वर्षामध्ये कोविडच्या परिस्थितीमुळे आपल्यावर काय परिस्थिती उदभवली होती हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. दुकानदारांचा जो प्रश्न आहे तो गेल्या आठ वर्षापासुन तो प्रलंबित आहे. आजही तो प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने काय अडचणी येताहेत. वेळेच्या वेळी चर्चा ह्या आपण त्या त्या वेळेला करतोय आणि याची जवळपास आपण तासभर चर्चा केलेली आहे. मला नाही वाटत की याच्यामध्ये आपण जे काही मुद्दे आहेत. आता २०१७ च्या बांधकाम खात्याकडे वर्ग केलेल्या रस्त्यांचा विषय काढला . आता २०१७ मध्ये जळगांव महानगरपालिकेच्या संदर्भामध्ये राज्य शासनाने काय निर्णय घेतले . हे २०१७ ला येथे कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांनाच माहिती असेल. मला तर पुर्वीचे निर्णय माहिती असायच काही कारण नाही. परंतू ना कधी बांधकाम खात्याने या विषयी माहिती दिलेली आहे. आता त्यावेळेला आपण होतात आपण ज्येष्ठ सदस्य आहात त्यामुळे आपल्याला याची माहिती आहे. आपण सभागृहासमोर ठेवली त्याबद्दल धन्यवाद. आपण या सगळया विषयांच्या आधारे निश्चितच प्रगती करू .परंतू ज्या बांधकाम खात्याकडे हे सगळे विषय आहेत. तिथल्या अधिकाऱ्यांना याची कल्पना आहे. २०१७ ला हे अधिकारी महानगरपालिकेमध्ये कार्यरत होते. मग २०१७ पासुन २०२१ पर्यंत ही माहिती का त्यांनी सभागृहासमोर ठेवली नाही . हे रस्ते आपल्याला करण्याची आवश्यकता नाही. बांधकाम खात्याकडे वर्ग झालेले आहेत. बांधकाम खात्याकडे पाठपुरावा करून आपल्याला ते करावे लागतील. ईव्हन आत्ताच्या बैठकीपुर्वी सुध्दा जे १०० कोटींच नियोजन आपण यापुर्वी ही केलेले आहे किंवा आता सुध्दा करीत आहोत. त्याच्यामध्ये सगळे रस्ते आपण वेळोवेळी त्यामध्ये घेतलेले आहेत. महासभेसमोरही विषय आलेले आहेत. परंतू आज जी माहिती आपण पुढं आणली . ती जर माहिती यापुर्वी पुढे आली असती प्रशासनाकडून तर निश्चितच आपल्याला याबाबती मध्ये पाठपुरावा करता आला असता . दुसरा जो आपण विषय काढला ४२ कोटींच्या विषयामध्ये मा.विरोधीपक्ष नेते आणि आपण स्वत: आला होतात.यावेळेला जो ठराव झाला तो सभासदांचा प्रस्ताव होता. अशासकीय प्रस्ताव होता त्यांच्यावर आपण राज्य शासनाशी बोललो आणि राज्य शासनाशी चर्चा करून आपण सुधारीत १०० कोटींची तांत्रिक मान्यता घेवुन प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर आपण तो प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी तयार केला . तांत्रिक मान्यतेसाठी ज्यावेळेला आपण त्यांच्याकडे विचारणा केली . त्यावेळेला बांधकाम खात्याकडुन अस सांगण्यात आलं की आमच्या खात्याकडुन या कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण झालेली आहे. वर्कऑर्डर दिल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे या निविदा प्रक्रीया किंवा वर्कऑर्डर रद्द होत नाही. तोपर्यंत आम्हाला पुन्हा याच कामासाठी त्याच निधिमधुन दुबार तांत्रिक मान्यता देता येणार नाही आणि मग ही बाब आपल्या निदर्शनाला आली. त्यावेळेला आपल्या चर्चेनंतर आपण शासनाशी संपर्क साधला. शासनाच्याही अधिकाऱ्यांच तेच म्हणण होत की तुम्हाला १०० कोटींचा प्रस्ताव पाठवता येईल. परंतू बांधकाम खात्याने उपस्थित केलेली अडचण आपण त्यांच्या निदर्शनास आणुन दिली .त्यावेळेला त्यांनी सांगीतल की ठिक आहे तुम्ही प्रस्ताव पाठवा.आपण याबद्दल आम्ही तुम्हाला राज्य शासनाकडुन याच्याबाबतीत आवश्यक ते आदेश पारीत करू आणि माझ्या माहितीप्रमाणे हा प्रस्ताव हा आपण आता ४२ कोटींची जी निविदा प्रक्रीया आहे हा प्रस्ताव आपण ऑलरेडी पाठवलेला आहे. या ४२ कोटींच्या कामांचे आदेश दिले गेलेले आहेत. ते ठेकेदार कोर्टामध्ये गेले वगैरे याच्यासंदर्भामध्ये आपण त्याच्यासाठी आपली कुठलीही प्रक्रीया थांबवलेली नाहीये.जे ठेकेदार कोर्टात गेले असं आपण ऐकतोय त्याच्याबद्दल माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला याची अजुनपर्यंत अधिकृत नोटीस आलेली नाही. परंतू आपले एक सन्मा.सदस्य याच्यामध्ये न्यायालयात गेलेले आहेत. त्या अनुषंगाने जे काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्या मुद्दयांची आपण जरूर दखल घेतलेली आहे आणि त्याच्यावर आपण चर्चा केलेली आहे. त्या दृष्टीने आपण जी काही कायदेशीर प्रक्रीया करणे गरजेचे आहे ती आपण प्रक्रीया सुरू केलेली आहे. तांत्रिक मान्यतेसाठीचा प्रस्ताव आपला तयार आहे. राज्य शासनाकडे ४२ कोटी रद्द करण्याचे जे काही आहे. तो प्रस्ताव आपण पाठवलेला आहे. राज्य शासनाकडून आदेश मिळाले तर मला वाटत की तांत्रिक मान्यता आपल्याला बांधकाम खात्याकडुन म्हणजे जी बांधकाम खात्याची अडचण आहे ती दुर होईल. बांधकाम खाते त्याच्यामध्ये अडचण का सांगते की या निविदा प्रक्रीया ज्या आहेत. ती त्यांच्या विभागामार्फत राबवलेली आहे. त्यामुळे त्यांच्या विभागाची निविदा प्रक्रीया आणि वर्कऑर्डर असतांना पुन्हा तोच विभाग त्याच निधीमधुन वेगळया

कामांना मंजुरी देवु शकत नाही. दुसरा जो मुद्दा उच्च न्यायालयामध्ये उपस्थित झालेला आहे. त्याच्यामध्ये सन्मा.सदस्यांनी ठरावाच्या आपल्या याच्यासंदर्भात मुद्दा मांडलेला आहे की यापुर्वी जी काम निधीच्या ४२ कोटीमध्ये होती. तीच कामे तुम्ही आता नविन दरामध्ये करून घेण्यासाठी राज्य शासन किंवा महापालिकेवर जो अतिरीक्त भुर्दंड येणार आहे. तो भुर्दंड टाळण्याच्या दृष्टीने या ठरावाची अंमलबजावणी करू नये. याच्याबाबतीमध्ये जे काही कायदेशीर मुद्दे कोर्टामध्ये उपस्थित केलेले आहे. त्याची आपण दखल घेवु आणि कुठल्याही प्रकारच महापालिकेच आर्थिक नुकसान होणार नाही किंवा कायदेशीर अडचण निर्माण होणार नाही. या दृष्टीने आपण कार्यवाही करतोय . २०१७ मध्ये आपले जे शासन निर्णयाच्या निधीच्या मोबदल्यामध्ये जी मेहरूणची जी जागा ताब्यात घेण्याचा विषय आहे. वास्तविक पाहाता नगररचना विभागाच्या त्यावेळेच्या अधिकाऱ्यांनी ज्या जागेचा मोबदला आपण लॅन्ड ॲक्विशन ॲक्ट खाली दिलेला आहे. त्याचा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत किंवा स्पेशल लॅन्ड ॲक्विशन मार्फत पुर्णपणे ताबा घेणं हा महानगरपालिकेला गरजेचे होते. पण ताबा मात्र महापालिकेला मिळाला नाही . हे काय त्यावेळेला घडलेलं आहे याची आपल्याला हिशेब तपासणी करावी लागेल. त्या त्या वेळेच्या कार्यवाह्या ह्या त्यावेळेला झाल्या असत्या तर आता कदाचित हे मुद्दे उपस्थित झाले नसते. अस मला त्याच्यामध्ये म्हणायचं आहे. पण जे काही आता आपल्याला वारसा प्राप्त झालेला आहे. जी काही परिस्थिती आपली आहे. याच्यामध्ये आपल्याला जी काही आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही ही आपण करतोय. वेळोवेळी आपण महासभेसमोर प्रस्ताव ठेवुन , दुकान , गाळ्यांचा प्रश्न असेल, घरपट्टीच्या रिव्हिजनचा प्रश्न असेल , अनधिकृततेचा असेल , गुंठेवारी नियमित करण्याचा प्रश्न असेल किंवा अन्यही आपले जे काही उपस्थित होणारे मुद्दे आहेत. आता याच्यामध्ये ज्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचा जो विषय आहे. या संदर्भामध्ये आपल्या काही सुचना आहेत यामध्ये त्या सुचनांचे आपण काहीवेळेला यापुर्वी चर्चा केली आहे आणि म्हणुनच आपण यावेळेला यावर्षाच्या पासुन आपण महानगरपालिकेमध्ये वेगळा मालमत्ता व्यवस्थापन विभाग निर्माण केलाय . त्याच्यामध्ये उपायुक्त स्वतंत्र आपण त्याच्यासाठी दिलेले आहेत. विषय फक्त एवढाच आहे की हे जे जागांच्या संदर्भामध्ये उत्पन्न वाढीचे जे विषय आहेत. ते आपल्याला लवकरात लवकर मार्गी लावावे. आता आपण बघतोय की साधारणत: ज्यावेळेला कोविडची परिस्थिती आटोक्यात आली आणि आपलं दैनंदिन प्रशासकीय कामकाज सुरू झालं . त्याच्यानंतर दुकान गाळयांचा प्रश्न मार्गी लावण्याच्या संदर्भामध्ये पुढे गेलेलो आहोत. काही त्याच्यामध्ये अडचणी आहेत. आपण त्याच्यामध्ये राज्य शासनाच्या मदतीने सोडविण्याचा प्रयत्न त्याठिकाणी करतोय. काही जागा ताब्यात घेण्याच्या संदर्भामधील विषय होते. ते आपण मार्गी लावलेले आहेत. आजच आपण तिन वर्षापासुन जे दुकान गाळे जे पडुन होते . ते लिलावाने देण्याच्या संदर्भात आजच महासभेत याच बैठकीमध्ये आपण मान्यता घेतलेली आहे. एक एक विषय जे अनेक वर्षांपासुन प्रलंबित राहीलेले आहेत. ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न सन्मा.सभागृहाच्या माध्यमातुन असेल किंवा आपल्या निदर्शनात , मार्गदर्शनाखाली प्रशासन करतेय याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. ठिक आहे कदाचित काही बाबती मध्ये प्रशासनाची गती आपल्याला कमी वाटत असेल किंवा गती वाढविण्याच्या दृष्टीने निश्चितपणे मला खात्री आहे की आपले सगळे अधिकारी या पदाधिकाऱ्यांच्या या विधायक सुचनांच्यामध्ये निश्चित सकारात्मक आहे आणि आपण गती वाढविण्याचा प्रयत्न करतोय . परंतू एक निश्चित आहे की हे जे प्रश्न आहेत ते दिर्घ काळापासुन प्रलंबित असल्यामुळे त्याच्यामध्ये खुप गुंतागुंत निर्माण झालेली आहे हे आपणही जाणतात आमच्यापेक्षा महापालिकेची माहिती पुर्वीच्या काळामधील जास्त आहे आणि याच्या गुंतागुंती सोडविण्यामध्ये येणाऱ्या अडचणी ह्या काय आहे . हे वेळोवेळो आपल्याही पुढे मांडतो आणि आपणही त्याच्यामध्ये सहभागी असतात. आपणही त्याच्यामध्ये गाईडन्स करतात. त्यामुळे मला नाही वाटते की प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे नव्याने काही प्रश्न निर्माण होताहेत किंवा जुने प्रश्न सोडविण्यामध्ये आपण कुठे कमी पडतोय. निश्चितपणे आपल्याला गती वाढवावी लागणार आहे. त्या दृष्टीने निश्चित आपण वाढवु. या सगळयांमधुन आपल्याला महानगरपालिकेची जी काही स्थिती आहे , आर्थिक स्थिती आहे ही बदलायची आहे याबद्दल काही दुमतच नाही. परंतू अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेले विषय गेल्या दिड वर्षामध्ये जर बघितलं तर दिड वर्ष आपलं कोविडमध्ये गेलेले आहे. त्यामुळे याच्यामध्ये अनेक अडचणीला सामोरे जावुन आपण प्रशासनामार्फत अधिक चांगल्या पध्दतीने जावुन महापालिकेचे कामकाज करता येईल. याचा प्रयत्न करतोय या विषयी मी आश्वस्त आहे. आपणही आश्वस्त राहावे अशी माझी विनंती राहील.वेळेवेळी सभागृहामध्ये अभ्यासु आणि ज्येष्ठ सदस्य आहात. आपणातर्फे आपण निश्चित पणे प्रशासनाला मार्गदर्शन करा. प्रशासन आपल्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचं कामकाज हे अधिक वेगवान आणि गतीमान करता येईल . त्या दृष्टीने प्रयत्न करील . मला नाही वाटत की कुण्या एका अधिकाऱ्यांच्या मुळे अशा काही

प्रकारची परिस्थिती निर्माण होवू शकते. महापालिकेच प्रशासन असेल किंवा महापालिका असेल. हे एक संयुक्त अशा प्रकारचं कामकाज आहे. याच्यामुळे कुणा एका व्यक्तीला दोषी ठेवले. तर मला नाही वाटत की आपण त्याच्यामध्ये फार काही साध्य करू शकतो. व्यक्तीय रोषामधुन कुणी आरोप करत असेल तर त्याविषयी आपण चर्चा करणे योग्य होणार नाही. परंतू प्रशासनाचा प्रमुख म्हणुन मी आपल्याला निश्चितपणे आपल्याला आश्वासन देवु ईच्छितो की प्रशासन म्हणुन जे जे करणे आवश्यक आहे आणि जे जे काम शक्य आहे ते करण्यामध्ये प्रशासन कुठल्याही प्रकारची कसुर ठेवणार नाही. या विषयी सभागृहाने आश्वस्त राहावं.

**श्री.सुनिल महाजन :-** या सर्व बाबींची माहिती शहर अभियंता यांनी आयुक्त साहेबांना देणे आवश्यक होते.परंतू ती माहिती त्यांच्याकडून उपलब्ध झालेली नाही .

**मा.आयुक्त :-** यापुढे आपपण जो मुद्दा उपस्थित केला आहे . मा. विरोधी पक्ष नेते यांनी उपस्थित केलेला आहे . या निमित्ताने मी सर्वच अधिकाऱ्यांना सुचना देतो की ज्यावेळेला नविन अधिकारी येत असतात त्यावेळेला पुर्वीची माहिती ही त्या त्या प्रकरणाच्या निमित्ताने महासभेसमोर असो किंवा आयुक्तांसमोर असेल हे ठेवणे आपले काम आहे. विशेष करून जो नितीनभाऊंनी मुद्दा मांडला २० किलोमिटर रस्त्यांची जर जबाबदारी राज्य शासनाने बांधकाम खात्याकडे जर सोपविलेली असेल तर ही बाब ठिक आहे ते जुने सदस्य आहेत ज्येष्ठ सदस्य आहेत. अभ्यासु सदस्य आहेत. त्यांना ही बाब माहिती आहे. सदस्य बरेचशे नविन आहेत अधिकारी बदलत राहतात.अशा वेळेला जुनी झालेली जी प्रकरणे आहेत. ही जर आपण निदर्शनास नाही आणुन दिली तर कदाचित त्या माहिती अभावी आपण चुकीचे निर्णय सुध्दा घेवु शकतो.अशा वेळेला आपल्याकडे जे काही रेकॉर्ड आहे. त्याच्याआधारे असे ठराव करत असतांना आपण या जुन्याबाबीं सुध्दा बघितले पाहीजे. कदाचित असेल त्यावेळेचे शहर अभियंता रिटायर झाले . आताचे शहर अभियंता त्यावेळेला बांधकाम खात्यामध्ये नसतील.ते पाणी पुरवठा खात्यामध्ये असतील. माहित नाही ही माहिती आतापर्यंत का आली नाही. त्यांनी आयुक्तांपर्यंत महासभेसमोर का ठेवली नाही. पण याच्यापुढे अशाप्रकारच्या तांत्रिक त्रुटी प्रशासनाच्या कामामध्ये राहू नये . यादृष्टीने आपण सगळया अधिकाऱ्यांना सुचना देवु आणि प्रशासनाच्या कामाविषयी ही आपल्या विषयी जी नाराजी आहे. ती नाराजी दुर करण्याच्या दृष्टीने जे आवश्यक प्रयत्न आहेत. ते आम्ही करू याविषयी काही दुमत नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** आयुक्त साहेब , महापौरताई मला बोलायच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय,बघा शेवटी कस आहे की तुमचे आणि आमचे काही व्यक्तीगत वाद आहेत अशातला भाग नाहीये.परंतू या अनुषंगाने आम्ही नागरीकांना आश्वस्त करतो आणि ज्यापध्दतीने आम्हाला जी अपेक्षा आहे या शहराच्या विकासाप्रती आणि जर कधी त्या अपेक्षा पुर्ण होत नसतील आणि कुठेतरी विकासांच आपण सामान्य जनतेला एक विश्वास प्राप्त करून दिलेला असतो आणि त्या विश्वासाला ज्यावेळेला तडा जात असेल. तर निश्चित त्या मनाला वेदना होतात. तर या अनुषंगाने मी या २० किलोमिटर लांबीच्या रस्त्याच्या संदर्भात या जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. गुलाबरावजी पाटील साहेब यांना सुध्दा निवेदन देणार आहोत आणि त्यांना निवेदन देवुन सुध्दा हिच विनंती करणार आहोत की हे २० किलोमिटरचे रस्ते राज्य शासनाच्या माध्यमातुन त्यांनी आम्हाला मान्य करून देण्यात यावे. जेणेकरून महापालिकेला असलेला स्वत:चा उत्पन्नाचा स्त्रोत हा मर्यादित आहे. आपल्याला राज्याच्या विविध वेगवेगळया योजनांच्या माध्यमातुन काही योजना राज्य शासनाच्या, काही लोकसहभातुन आणि महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नातुन ज्यावेळेला अशापध्दतीने विकासाचा जर कधी आपण गाड रेटल तरच या शहराचा विकास साध्य आहे. एकटी महानगरपालिका स्वत:च्या निधीवर हा विकास पुर्ण करू शकणार नाही. म्हणुन या सगळया बाबींसाठी जिव तुटतो की जेणेकरून या शहरामधील नागरीकांना ज्या काही त्यांच्या माफक अपेक्षा आहेत. त्यापुर्ण करण्याच्या संदर्भातील भुमिका या सभागृहाने समजुन घ्यायला पाहीजे आणि अशा पध्दतीने प्रशासन आणि पदाधिकारी यांच्यामध्ये एक योग्य समन्वय असावे आणि त्या समन्वयातुन या शहराचा विकास साध्य व्हावा एवढीच एक आमची माफक अपेक्षा आहे. पण मला वाटत की येणाऱ्या पुढच्या कालावधीमध्ये आपण ते गांर्भीने घ्याल एवढीच एक अपेक्षा आपल्याकडुन या प्रसंगी व्यक्त करतो.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई

**मा.आयुक्त :-** आपल्या सुचना प्रशासनातील सर्वच अधिकारी गांभीर्याने घेतात. आपण किंवा आपले जे अन्यही सन्मा. सदस्य आहेत. जे महापालिकेच्या संदर्भात विधायक सुचना करतात . त्या कधीही वैयक्तीक पातळीवर न जाता. आपण त्या पोर्टीगली आपण स्विकारतो यामध्ये दुमतच नाही. परंतू केवळ प्रशासन दोषी आहे अस म्हणुन जर आपण हे केले तर शेवटी या प्रशासनामार्फत महापालिकेची झालेली आत्तापर्यंत जी काही कामे आहेत. ती याच

प्रशासनामार्फत झालेली आहेत. त्यामुळे आपल्याला प्रशासनाला बरोबर घेवुनच पुढे जायचे आहे. व्यक्ती कुणी जरी असली तरी प्रशासन ही एक सिस्टिम आहे. सिस्टिममधील काही दोष असतील . व्यक्ती बदलवुन काही दोष सुटणार नाहीत.सिस्टिममधील दोष आपल्याला बदलावे लागतील. आपण सिस्टिम बदलवुया व्यक्तीदोषामुळे जर कोणी काही जर शेरेबाजी करत असेल. तर त्याला वेगळे उत्तर देण्याची आपल्याला आवश्यकता नाही. मात्र एकमात्र याच्यामध्ये निश्चित आहे. गेल्या अनेक वर्षांपासुनचे हे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत आणि याला गती वाढविणे हे गरजेचे आहे. अस नाही की प्रशासन हातावर हात बांधुन बसलेले आहे. आपणही याच्याशी सहमत निश्चित असाल. वेळोवेळी आपण चर्चा करतात , सुचना करतात किंवा विषय मांडतात.त्यावेळेला निश्चित आहे की प्रशासनाकडून आपल्याला सकारात्मक प्रतिसादच मिळतो. काही अडीक अडचणींचा विषय बघितला . काही विषयांमध्ये आपल्याकडे टाऊन प्लॉनिंग अधिकारी नाहीयेत किंवा नगररचनाकार नाहीयेत. त्यामुळे अशा ज्या काही जागा ताब्यात घेण्याचे विषय , लॅन्ड ॲक्वेशनचे विषय आहेत. हे प्रलंबित राहीलेले असतील. दुकानदारांच्या विषयी आपण सविस्तर चर्चा करतोय. त्यामुळे आठ वर्षापासुनचे प्रश्न सोडविण्यासाठी काही कालावधी लागतोय तो आपल्याला मान्य केला पाहीजे. हा अनाश्यवक विलंब होणार नाही येणाऱ्या पुढच्या काळामध्ये याची खात्री आपण निश्चितपणे घेवु आणि प्रशासन कुठल्या याच्यामध्ये लोकप्रतिनिधींच्या मागे राहणार नाही हे मी निश्चितपणे या विषयी ग्वाही देतो.

**श्री. नितीन लढ्ढा :-** धन्यवाद साहेब.

**मा.महापौर :-** विषयपटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा :-** मा.महापौर , आता मला वाटत १४ ते ६७ जे विषय आहेत. हे संपुर्ण विकास कामांचेच विषय आहेत. मला वाटत याच्या विषयात कुणाचा काही आक्षेप नाही कारण सभागृहातील सर्वपक्षीय सदस्यांच्या प्रभागातील विकासाचे विषय आहेत.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई

**श्री. कैलास सोनवणे :-** ७३ पर्यंतचे विषय सर्वानुमतोन मंजुर करण्यात यावे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौरताई मला एका विषयावर सुचना मांडायची आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , नितीनभाऊ

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय मला सुचना मांडायची आहे.

**मा.महापौर :-** बोला बोला ईबाभाऊ

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय , २५ नंबरचा विषय आहे. हॅलो डि .पी.डी. सी चा विषय बघा . महापौर महोदय

**मा.महापौर :-** बोला बोला ईबाभाऊ तुम्ही

**श्री. ईब्राहीम पटेल :-** मला आयुक्त साहेबांशी विचारायचे आहे. २५ नंबरचा विषय आणि ६३ नंबरचा विषय बघा दोघही एकच विषय आहे आणि मला पण दिलेले विषय ते एकच आहेत.हॅलो तर आयुक्त साहेब , उपमहापौर साहेब

**मा.उपमहापौर :-** बोलोना , बोलोना ईबाभाई बोलो बोलो

**श्री. ईब्राहीम पटेल :-** कुलभुषणभाऊ यहा चर्चा कर करा हु ये गांभीर्यके विषय है.

**श्री. नितीन लढ्ढा :-** महापौरताई सन्मा सदस्य ईबाभाई पटेल

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आम्ही ईकडे सुचना करता आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** सन्मा सदस्य ईबाभाई पटेल यांच्या ज्या काही सुचना आहेत. एकाच स्वरूपाचे काम त्यांनी प्रस्तावित केलेले आहे. ते त्यांच्या प्रभागातील इतर सदस्यांनी प्रस्तावित केलेले असल्याकारणाने ईबाभाईंची जी सुचना आहे ती मान्य करण्यात यावी आणि सिमिलर त्याच पध्दतीचे जे प्रस्ताव असतील.ते वगळण्यात यावे.

**मा.महापौर :-** आपल्या सुचनांची या ठिकाणी नोंद घेण्यात येत आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई ७६ व्या विषया बद्दल बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** एक मिनिटं ७६ नंबरचा विषय अजुन पटलावर येण्याचा बाकी आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बरं

**मा.उपमहापौर :-** १४ ते ६७ विषयांना माझे अनुमोदन आहे आणि आता ५४ नंबरच्या विषयावर काहीतरी सुचना मांडलेली आहे. सुरेशभाऊ बोला.

**श्री. सुरेश सोनवणे :-** हो , हॅलो सिध्दार्थ नगरचे जे आहे ना

**श्री. ईब्राहीम पटेल :-** कुलभुषणभाऊ
**मा.उपमहापौर :-** माईक दुर धरा थोडा.
**श्री. सुरेश सोनवणे :-** महापौरताई ,
**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौरताई , सुनते भी नही
**मा.महापौर :-** सुरेशभाऊ बोला
**श्री. सुरेश सोनवणे :-** महापौरताई ,
**श्री. ईब्राहीम पटेल :-** मेरी सुचना अलग है.
**मा.महापौर :-** एका वेळेला एकाच सदस्यांनी बोलायच आहे.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौरताई
**मा.महापौर :-** बोला ईबाभाई
**श्री. ईब्राहीम पटेल :-** २५ नंबरचा तो एकच पण आहे आणि ६३ नंबरचा जो विषय आहे तो पण एकच आहे . तर यांचा हेतू काय आहे , आता या नगरसेवकांनी कोणत्या हिसाबाने दिले आहे, तरी इंजिनियर जी नगरसेवकांची दिशाभुल करीत आहे.
**मा.महापौर :-** ईबाभाई आपला आवाज येत नाहीये क्लियर
**श्री. ईब्राहीम पटेल :-** हे विषय तहकुब करण्यात यावे आणि त्यांची बदली करण्यात यावी.
**मा.महापौर :-** ईबाभाई विषय डबल येणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** डबल येणार नाही .
**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई
**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,
**श्री. ईब्राहीम पटेल :-** डबल येणार नाही , मागच्या मिटींगलाही तसेच चुकले होते.
**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** इंजिनियर नगरसेवकांची दिशाभुल करीत आहेत.
**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,
**श्री. ईब्राहीम पटेल :-** तर माझी मागणी आहे की याची चौकशी करावी. बहुतेक बोगस बिल निघत असतील. तर त्यांची चौकशी करण्यात यावी .
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** तर चौकशी करण्यात यावी आणि त्या इंजिनियरला कमीत कमी बडतर्फ करावं किंवा बदली करावी .
**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,
**श्री. ईब्राहीम पटेल :-** त्या इंजिनियरची आयुक्त साहेब चौकशी करावी.
**श्री. सुरेश सोनवणे :-** महापौरताई ५४ नंबरच्या विषयावर बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** उज्वलाताई बोला , एकावेळी एकाच सदस्याने बोलायचे आहे.
**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला एक सुचना मांडायची आहे येथे मला संधी देण्यात यावी.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** भाऊ बोलो हो उसको नही उसकी चौकशी लगनी चाहीये
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.
**श्री. अनंत जोशी :-** महापौरताई मला बोलण्याची संधी देण्यात यावी.
**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई
**श्री. अनंत जोशी :-** महापौरताई मला बोलण्याची संधी मिळावी.
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई
**श्री. ईब्राहीम पटेल :-** प्रशांत बोल
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई
**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,
**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , महापौर महोदया , सन्मा नगरसेवक जे आहेत ईबाभाई पटेल

**श्री. ईब्राहीम पटेल :-** प्रशांत बोल , बोल , बोल

**श्री. प्रशांत नाईक :-** यांच्या प्रभाग क्रं. १८ या मध्ये जे संबंधित इंजिनियर आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार ते सर्व नगरसेवकांना समसमान काम सुचवतात आणि एकाच वेळेस सगळे पटलावर येतात. त्यामुळे त्यांच ऑब्जेक्शन आहे की जे इंजिनियर आहेत. त्यांच्याकडे तिन वॉर्डांचा चार्ज असल्यामुळे त्यांचे संबंधित वॉर्डातील चार्ज काढुन घेण्यात यावे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला उज्वलाताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ताई माझ्या वॉर्ड मध्ये मी

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आयुक्त साहेब , मराठे यांची चौकशी करण्यात यावी.

**मा.महापौर :-** ईबाभाई आता झाला विषय

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ईबाभाई आता केव्हाच बोलताहेत .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** नाही ताई

**श्री. प्रशांत नाईक :-** ताई प्रशासनाकडुन येवु द्याना ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काय ?

**श्री. प्रशांत नाईक :-** ताई प्रशासनाला उत्तर देवु द्या ना , काय कारवाई करताहेत ते ? प्रशासन काय कारवाई करते त्या संबंधित इंजिनियरवर ते समजेल ना.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** तेच विचारतो आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** दोन मिनिटं थांबा तुम्ही दोन मिनिटं थांबा फक्त

**श्री. ईब्राहीम पटेल :-** गंभीर विषय आहे हा उज्वलाताई हा गंभीर विषय आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर , बरं बोलुन घ्या पण आम्हाला पण संधी द्या.

**श्री. इब्राहीम पटेल :-** हो हो

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आम्ही पण गंभीर विषय मांडतोय

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो हो आम्ही तर आता बोलतोय पुर्ण मिटींगमध्ये चारही नगरसेवकांची एकच कंडिशन आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** सहा पर्यंत मिटींग चालणार आहे चालु द्या.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.ईबाभाई आपल्याला काय अपेक्षित आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आयुक्त साहेब काय कारवाई करणार आहे तुम्ही त्याच्यावर

**मा.उपमहापौर :-** सन्मा.ईबाभाई आपण थोडा माईक जवळ पकडुन आपल्याला काय अपेक्षित आहे त्याच प्रशासनाला सांगीतले तर लक्षात येईल.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** तेच म्हणतोय की कामाचे एकच  वॉर्डातील आता हा जो आपला ठराव आहे.दोन हे आलेले आहे मला पण दिलेले आहे. म्हणजे एकच काम ठराव नंबर २५ ठराव , ६३ नंबर ठराव आलेले आहे मला पण तर त्या इंजिनियरची चौकशी करावी. बोगस बिल तर नाही काढत आहे. कारण की ते नगरसेवकांची दिशाभुल करत आहे आणि सभागृहाचा पण वेळ नष्ट करत आहे . त्याच्याकडुन जो चार्ज आहे १८ नंबरचा तो काढुन देण्यात यावा आणि त्याची चौकशी करण्यात यावी. आम्ही लेखी निवदेन देतो लागल्यास समजले का ?

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आयुक्त साहेब

**मा.आयुक्त :-** ईब्राहीमभाई मी माहिती देतो.याच्यामध्ये हे जे आलेले आहेत ते अशासकीय प्रस्ताव आहेत.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो बरोबर.

**मा.आयुक्त :-** वास्तविक पाहाता सन्मा.सदस्यांनी एकाच प्रभागामधुन एका पेक्षा जास्त सदस्य निवडुन येतात त्यावेळेला आपआपसामध्ये थोडस याबाबतीमधील संवाद असणं हे अपेक्षित आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो

**मा.आयुक्त :-** आपल्यामध्ये संवाद नसणं आपले सदस्य हे आपले त्या भागामधील जे इंजिनियर आहेत. त्यांना एक मिनिटं माझ ऐकुन तर घ्या.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** नाही नाही साहेब मी इंजिनियरला सांगीतले होते की आपला जो ठराव देतोय मला नका देवु त्यांना नका देवु आणि जर त्यांना दिला असेल. मला नाही द्यायचा.

**मा.आयुक्त :-** ईब्राहीमभाई एक मिनिटं

**श्री. प्रशांत नाईक :-** ईबाभाई साहेब काय म्हणताहेत ते ऐका ना.

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये प्रत्येक सदस्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे त्या त्या भागातील इंजिनियर या प्रमाणे इस्टिमेट तयार करून त्याची आकडेवारी ही सन्मा.सदस्यांना देतात आणि सन्मा सदस्य हे मा.महापौरांच्या नांवे हे अशासकीय प्रस्ताव हे महासभेसमोर येतात. अशा वेळेला एकाच कामाचे दोन प्रस्ताव येवु नये या दृष्टीने एकाच प्रभागामधील सदस्यांनी आपआपसामध्ये कोऑर्डीनेशन ठेवणे गरजेचे आहे आणि त्याचप्रमाणे इंजिनियरांनाही सुचना देण्यात येतील की एकाच कामाचे दोन इस्टिमेट जर होत असतील तर त्या प्रभागामधील सर्व सदस्यांना याच्याबाबत सुचना द्या आणि नगरसचिवांनी यापुढे काळजी घ्यावी. अशा प्रकारचे वेगवेगळया सदस्यांकडून आलेले प्रस्ताव बद्दल.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** नाही नाही साहेब दोन नाही ईथे तिसरेपण दिलेले आहे.

**मा.आयुक्त :-** असे दुबार प्रस्ताव महासभेसमोर येणार नाहीत.या दृष्टीने विषयपत्रिका तयार करत असतांना नगरसचिव यांनी काळजी घ्यावी.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** साहेब तिसरा मला पण दिले आहे पण मी ते दिलेच नाही.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला आयुक्त साहेबांना एक लक्षवेधी सुचना मांडायची आहे. महापौरताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला पण एक सुचना मांडायची आहे मला बोलायची संधी द्या.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांना विषयपत्रिकेवरील विषय क्रं. १४ ते ६७ हे जे विषय आहेत हे सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** माझी जी सुचना आहे ती , महापौर मॅडम माझी जी सुचना आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मला सुध्दा या विषयाच्या संबंधात बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** आपल्या सुचनेची नोंद प्रशासन घेत आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मलाही बोलायचे आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** २५ नंबर ठराव आणि ठराव क्रं. ६३

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला प्रशासनाला एक सुचना विचारायची आहे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**श्री. प्रशांत नाईक :-** या गोष्टीला अनुसरून

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी प्रभाग क्र.१३ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ३ कामे १०० कोटी निधीमध्ये तसेच नियोजन मंडळाच्या निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,४८,१९,२०८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अं.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं.४५८ रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५०,९७,९५०/- |
| २ | प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं. ४५३ झाकीर हुसेन कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण व बोळ कॉक्रीटची करणे. | रु.८०,७२,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं.४११ लायन्स क्लब परीसरातील मुख्य रोड साईड ने नवीन आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१६,४९,२५८/- |
| | एकूण - | रु.१,४८,१९,२०८/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

अनुमोदक:- पाटील कुलभुषण विरभान

**नगरसचिव विषय क्रं .१५ :-** प्रभाग क्र.२ अंतर्गत विविध १ ते १४ कामे करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.कांचन विकास सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरवणे कामी प्रभाग क्र.२ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते १४ कामे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | प्र.क्र.०२ अ हरिओम नगर असोदा रोड श्री.प्रमोद सपकाळे वाशिंग सेंटर पासुन ते हनुमान मंदिर ते श्री.पन्नालाल सोनवणे यांचे बंगला पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| २ | प्र.क्र.०२ श्री.संतोष सोनवणे (पैलवान) यांचे घरापासून ते श्री.प्रभाकर मुकूंदा पाटील यांचे किराणा पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ३ | प्र.क्र.०२ श्री.पांडुरंग सोनवणे (फोटोग्रॉफर) यांचे घरापासून ते श्री.संजय सोनवणे(पट्टया संजू) यांचे घरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ४ | श्री.सुधाकर यादव सपकाळे प्लॉट ते श्री.हिरामण सोनवणे मनपा कर्मचारी यांच्या घरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ५ | श्री.अनिल व्हॉल्वमन यांच्या घरापासुन ते श्री.सुधाकर दंगल सोनवणे यांच्या प्लॉट पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ६ | श्री.अनिल व्हॉल्वमन यांच्या घरापासुन ते बहिणाबाई कॉलनी कोपऱ्यापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ७ | प्र.क्र.०२ स्वामी नारायण मंदीर श्री.मधुभाऊ सपकाळे यांच्या घरापर्यंत श्री.राजगुर यांचे घरापर्यंत गल्लीमध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ८ | प्र.क्र.०२ श्री.देवराम बाविस्कर यांचे घरापासून ते वाणी मंगलकार्यालय रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ९ | प्र.क्र.०२ श्री.धनसिंग सोनवणे यांचे चक्की पासुन श्री.राजु कोळी यांचे घरा पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| १० | प्र.क्र.०२ श्री.प्रशांत साळुंखे यांचे घरापासून ते श्री.चैत्राम भालेराव यांच्या घरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| ११ | प्र.क्र.०२ श्री.राजु ठाकुर यांचे किराणा पासून श्री.संतोष मुकादम यांचे घरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| १२ | प्र.क्र.०२ श्री.शालिक आप्पा यांचे घरामागील गल्ली सुळेबाई यांच्या चक्की पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
| १३ | प्र.क्र.०२ वाल्मिक नगर घरकुल श्री.विकास अंडेवाले यांच्या घरापासुन ते श्री.दत्तुभाऊ कोळी यांच्या घरापासून प्रशांत चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| १४ | प्र.क्र.०२ श्री.संदीप वायरमन यांचे घरापासून ते श्री.मुरलीधर गयभु कोळी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .१६ :-** दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१० मध्ये १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८६,०१,५४२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, शेख हसीना बी शरीफ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१० मध्ये खालील नमूद १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८६,०१,५४२/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१० पिंप्राळा हुडको जुनी खांजा नगरी भागात आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.३९,९६,२५३/- |
| २ | प्रभाग क्र.१० पिंप्राळा हुडको जुनी खांजा नगरी भागात आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.४६,०५,२८९/- |
| | एकूण - | रु.८६,०१,५४२/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .१७ :-** वार्ड क्र.७ मध्ये शासनाच्या योजने अंतर्गत १ ते ८ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८७,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.सिमा सुरेश भोळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, वार्ड क्र.७ मध्ये शासनाच्या योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ८ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८७,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.७, सर्वे नं.७४८६, आंबेडकर उदयान येथे ओपन जिम व लॉन विकसित करणे. | रु.१५ लक्ष |
| २ | वार्ड क्र.७, सर्वे नं.७३८, अजय कॉलनी येथील बच्छाव सरांच्या घराजवळ ओपन जिम व बगीचा विकसित करणे. | रु.०८ लक्ष |
| ३ | वार्ड क्र.७, सर्वे नं.७१९५, यशवंत कॉलनी येथील दीप्ती चिरमाडे यांच्या घरासमोरील ओपन स्पेस मध्ये ओपन जिम व खेळणी बसविणे. | रु.०८ लक्ष |
| ४ | वार्ड क्र.७, सर्वे नं.७५२४, चैतन्य नगर येथील ज्ञानेश्वर मंदिर येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.९.९० लक्ष |
| ५ | वार्ड क्र.७, सर्वे नं. ,रामबाग कॉलनी परिसरातील गटारी बांधणे. | रु.१५ लक्ष |
| ६ | वार्ड क्र.७, सर्वे नं.७६०५, प्रोपेसर कॉलनी ओपन स्पेस विकसित करणे. | रु.२० लक्ष |
| ७ | वार्ड क्र.७, गट नं.५०, गंधर्व कॉलनी मध्ये ओपन जिम तयार करणे. | रु.०६ लक्ष |
| ८ | वार्ड क्र.७, भगीरथी कॉलनी येथील गट नं.५२ चा भाग ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. | रु.०६ लक्ष |
| | एकूण - | रु.८७,९०,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .१८ :-** प्रभाग क्र.१३ मध्ये दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,४८,९२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.सुरेखा नितीन तायडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.१३ मध्ये दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,४८,९२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं.४६२ देवेंद्र नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.८८,१०,३००/- |
| २ | प्रभाग क्र.१३ मधील त्र्यंबक नगर भागातील मुख्य रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५५,१०,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं.४५३ झाकीर हुसेन कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण व बोळ कॉक्रीटची करणे. | रु.८०,७२,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.१३ मधील दौलतनगर मेहरुण स.नं.४५०/२ ओपनस्पेस मध्ये क्लब हॉल बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| | एकूण - | रु.२,४८,९२,३००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .१९ :-** जिल्हा नियोजन मंडळाअंतर्गत वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र. ०९ मध्ये १ ते १६ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,७९,७९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जिल्हा नियोजन मंडळाअंतर्गत वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र. ०९ मध्ये खालील नमूद १ ते १३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,७९,७९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२५ निवृत्ती नगर संजय चव्हाण यांच्या घरापासुन ते | रु.३८,४५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | उगले मॅडम ते सुनिल पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करणे. | |
| २ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत शिवरोड गट नं.२४ महाजन यांच्या घरापासुन ते सुकृती रोड पर्यंत डांबरीकरण करणे. | रु.२१,३८,०००/- |
| ३ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२०/३ राजेंद्र पाटील यांचे घरापासुन ते भारंबे ते डि.आर.चव्हाण यांचे घरापासुन ते वैशाली देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१०,४०,०००/- |
| ४ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२७ जितेंद्र प्रोव्हीजन ते राजु बाविस्कर ते मंदाताई सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१४,१७,५००/- |
| ५ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.३५ डॉ.गोरख पाटील ते हिरे मॅडम यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९,३०,०००/- |
| ६ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.३२ बहीरम सर ते स.नं.३४ बेंडाळे ओपनस्पेस ते देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९,३०,०००/- |
| ७ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.३० अॅड गावंडे यांचे घरापासुन ते भागवत पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१६,५०,०००/- |
| ८ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.३४ गुरुदत्त गार्डन ते कृष्णा टेंट नविन कल्व्हेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२०,४८,०००/- |
| ९ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.७६ शिवरोड स्ट्रील फॅक्टरी ते बाळासाहेब सैंदाणे व हर्षवर्धन कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३०,२१,०००/- |
| १० | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२७ ऑक्सीजन पार्क ते मंदाताई सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१९,६०,०००/- |
| ११ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२८ मधील संजय पाटील यांचे घरापासुन ते बोरसे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३०,००,०००/- |
| १२ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.२९ मधील परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३०,००,०००/- |
| १३ | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं.३० मधील परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३०,००,०००/- |
| | अंदाजित रक्कम - | २,७९,७९,५००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२० :-** प्र.क्र.१९ अंतर्गत मुक्ताई नगर गट नं.३१/१ खुल्या जागेस संरक्षण भिंत (कंपौऊंड वॉल) बांधणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.निता मंगलसिंग सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.१९ मधिल नागरीकांसाठी मुक्ताई नगर परिसरातील गट नं.३१/१ मधील महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा स्थित असुन सदर जागा नागरीकांच्या सेवेसाठी महर्षी वाल्मिक बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना विकसित करणेसाठी दिलेली असून त्याचा लाभ परिसरातील नागरीक घेत आहे मात्र सदर खुल्या जागेस संरक्षण भिंत नसल्यामुळे अडचणी निर्माण होत असल्याने व नागरीकांची मागणी असल्याने

प्र.क्र.१९ अंतर्गत मुक्ताई नगर गट नं.३१/१ खुल्या जागेस संरक्षण भिंत (कंपौऊंड वॉल) बांधणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२१ :-** प्र.क्र.१० पिंप्राळा गट नं.२२०/१, २२०/२ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रती दिक्षाभुमी विकसित करणे कामी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ०५.०० कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.सुरेश माणिक सोनवणे व इतर ३ सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १० पिंप्राळा घरकुल परिसर हा बहुसंख्य अनुसूचित जातीचा दाटवस्तीचा राखीव आहे. तसेच या परिसरात अदयापपावेतो सुमारे २० ते २१ वर्षापासून बौध्द समाजासाठी दिक्षाभुमी, प्रार्थनास्थळ, धार्मिक स्थळ नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. तसेच या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रती दिक्षाभुमी विकसित करणे बाबत वारंवार मागणी होत आहे. या परिसरातील नागरीकांच्या मागणी नुसार प्र.क्र.१० पिंप्राळा गट नं.२२०/१, २२०/२ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रती दिक्षाभुमी विकसित करणे कामी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत रुपये ०५.०० कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२२ :-** सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेच्या निधीतुन प्रभाग क्र.१५ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,०६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,शेख शबानाबी सादीक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेच्या निधीतुन प्रभाग क्र.१५ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,०६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत महादेव मंदीर ते राष्ट्रीय महामार्ग (मनपा घरकुलाच्या | रु. ३३ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | मधील रस्ता) रस्त्याचे डांबरीकरण करणे. | |
| २ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत महादेव मंदीर ते राष्ट्रीय महामार्ग (मनपा घरकुलाच्या मधील रस्ता) रस्त्याच्या दोन्ही बाजुस आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु. १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत सदोबा वेअर हाऊसच्या कोपऱ्यापासुन ते शिरसोली रोड पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ०८ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत चंद्रकांत सॉ मिल ते मिल्लत हायस्कुल नाल्यापर्यंत आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु. २५ लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत शहीद अब्दुल हमीद चौक ते इच्छादेवी मंदीर ते सदोबा वेअर हाऊस नाल्यापर्यंत आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे तसेच कॉक्रीट पाथवे तयार करणे. | रु. ३० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.१,०६,००,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२३ :-** प्रभाग क्र.०६ अंतर्गत गणेशवाडी, तुकारामवाडी, मंजुषा हौ.सोसा. इ. परिसरामध्ये नविन आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी येणारा अपेक्षित एकूण रक्कम रु.४०/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.मंगला संजय चौधरी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.०६ अंतर्गत गणेशवाडी, तुकारामवाडी, मंजुषा हौ.सोसा. इ. परिसरामध्ये जुन्या विटकामामधील गटारी तुटलेल्या अवस्थेत असल्याने नवीन गटारी बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने प्रभाग क्र.०६ अंतर्गत गणेशवाडी, तुकारामवाडी, मंजुषा हौ.सोसा. इ. परिसरामध्ये नविन आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी येणारा अपेक्षित एकूण रक्कम रु.४०/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२४ :-** प्र.क्र.१६ अंतर्गत ईदगाह कब्रस्थान ते नेरीनाका स्मशान भुमी पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०१.०० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडु महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे..

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मेहरुण तलाव सांडवा पासुन जळगांव शहरातुन प्रभाग क्र.१६ ईदगाह कब्रस्थान ते नेरीनाका स्मशान भुमीमार्गे शहराबाहेर मार्गक्रमण करणारा प्रमुख नाला स्थित असून सदर नाल्याच्या आजुबाजूस दाट रहिवासी वस्त्यादेखिल स्थित आहेत. मात्र सदर नाल्यास संरक्षण भिंत नसल्यामुळे नाल्याकाठी स्थित असलेल्या परिसरास पावसाळयातील पुराच्या पाण्यामुळे मालमत्तेसह जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता प्र.क्र.१६ अंतर्गत ईदगाह कब्रस्थान ते नेरीनाका स्मशान भुमी पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०१.०० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२५ :-** शासकीय निधी किंवा डि.पी.डी.सी. निधी अंतर्गत प्रभाग क्र.१८ मध्ये विविध १ ते २ कामे करणे कामी अंदाजीत येणारा रक्कम रु.०२.२० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,शेख सैईदा युसुफ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासकीय निधी किंवा डि.पी.डी.सी. निधी अंतर्गत प्रभाग क्र.१८ मध्ये खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी अंदाजीत येणारा रक्कम रु.०२.२० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१८ अंतर्गत मेहरुण स.नं.१५/२ व /१+२, स.नं.१५/३ व १+२+४+५ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| २ | प्रभाग क्र.१८ मेहरुण अंतर्गत स.नं.१९/१, स.नं.१०/१+२ मध्ये रस्ते डांबरी करण करणे | रु.०१.२० कोटी |
| | एकूण रक्कम - | रु.०२.२० कोटी |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२६ :-** प्र.क्र.०८ मध्ये विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.१,०६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.प्रतिभा सुधीर पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांच्या मागणीनुसार तसेच नागरीकांना रहदारी सुखसुविधा पुरविणे कामी प्र.क्र.०८ मध्ये खालील नमूद विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.१,०६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०८ निमखेडी शिवार गट नं.१०० खुल्या जागेत क्लब हाऊस बांधणे. | रु.०६,००,०००/- |
| २ | प्र.क्र.०८ निमखेडी गावठाण भागात सिमेंट कॉक्रीटचे रस्ते करणे. | रु.५०,००,०००/- |
| ३ | प्र.क्र.०८ चंदुआण्णा नगर गट नं.२६ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२६,००,०००/- |
| ४ | प्र.क्र.०८ गिरणाई कॉलनी, कोल्हे नगर गट नं.२५/२ निमखेडी शिवार मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२४,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.१,०६,००,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२७ :-** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.१६ मध्ये विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०१ कोटी ८९ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांच्या मागणीनुसार जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.१६ मध्ये खालील नमूद विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०१ कोटी ८९ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मध्ये ईश्वर कॉलनी येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु. ७१ लक्ष |
| २ | प्रभाग क्र.१६ मध्ये रचना कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४२ लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.१६ मध्ये वर्षा कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ३६ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१६ मध्ये ढाके वाडी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु. १.८९ लक्ष |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२८ :-** प्रभाग क्र.०६ अंतर्गत परिसरातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या अंदाजीत एकूण रक्कम रु.०३ कोटी ५० लक्ष मात्रची तरतूद करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.अमित पांडूरंग काळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.०६ अंतर्गत असलेल्या प्रताप नगर, ढाके कॉलनी, शंकरवाडी, दत्त कॉलनी, खान्देश मिल कॉलनी, रोड गार्डन परिसर, जेडीसीसी कॉलनी, नूतन मराठा परिसर या भागातील विविध रस्त्यांची दुरावस्था झालेली असल्याने त्यांची तातडीने डांबरीकरण होऊन दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे झालेले असल्याने प्रभाग क्र.०६ अंतर्गत असलेल्या प्रताप नगर, ढाके कॉलनी, शंकरवाडी, दत्त कॉलनी, खान्देश मिल कॉलनी, रोड गार्डन परिसर, जेडीसीसी कॉलनी, नूतन मराठा परिसर या भागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या अंदाजीत एकूण रक्कम रु.०३ कोटी ५० लक्ष मात्रची तरतूद करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .२९ :-** प्रभाग क्र.०६ अंतर्गत गांधी उदयान परिसरातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे सुशोभिकरण व दुरुस्ती कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अमित पांडूरंग काळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.०६ अंतर्गत असलेल्या महात्मा गांधी उदयान परिसरातील पश्चिम दक्षिण कोपऱ्याला उभारण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पूर्णकृती पुतळयाचे सुशोभीकरण कठाळे दुरुस्ती, रंगरंगोटीसह आवश्यक जुजबी उपाय योजनांसह पूरक प्रकाश योजनेची व्यवस्था करणे गरजेचे असल्याने तसेच प्रासंगिक अभिवादन प्रसंगी पुतळयात मागील बाजूस शिर्डी सदृश्य चे नियोजन करणे आवश्यक असल्याने प्रभाग क्र.०६ अंतर्गत गांधी उदयान परिसरातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे सुशोभिकरण व दुरुस्ती कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३० :-** शासनाकडून उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन प्र.क्र.०७ मध्ये विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०१ कोटी ५८ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासनाकडून उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडू उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन प्र.क्र.०७ मध्ये खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.० कोटी ५८ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गट नं.६० मधील आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट करणे. | रु. ९८ लक्ष |
| २ | गट नं.५५ मधील आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट करणे. | रु. ६० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.०१ कोटी ५८ लक्ष |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तत करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३१ :-** शासकीय निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा अंदाजी एकूण रक्कम रु.३,४३,१३,९८७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,श्रीमती रेखा चुडामण पाटील यां दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना मुलभूत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या से पुरविणे कामी शासकीय निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा अंदाजी एकूण रक्कम रु.३,४३,१३,९८७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२६७, २६९ जकात सोसा. व जयदुर्गा शाळा परिसरात साईड रोडने नवीन आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.६१,३८,९१३/- |
| २ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२६५, २६६ मध्ये रोड साईडने आर.सी.सी. गटार बांधणे व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.५९,६७,८५८/- |
| ३ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२७१, २७२ मध्ये रोड साईडने आर.सी.सी. गटार बांधणे व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.८५,५४,९२३/- |
| ४ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२७४ मध्ये रोड साईडने आर.सी.सी. गटार बांधणे व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. ४७,७३,१९२/- |
| ५ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२५१ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.८८,७९,१०१/- |
| | एकूण रक्कम - | रु.३,४३,१३,९८७/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्त करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३२ :-** दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये विविध १ ते २ कामे कर कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.४,१७,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रति चंद्रकांत कापसे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये खालील नम् विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.४,१७,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गट नं.५ ते ८ अष्टभुजा नगर शिवराणा नगर ओम शांती नगर रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२,०८,००,०००/- |
| २ | गट नं.३६ ते ४२ प्रेम नगर बेंडाले नगर रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२,०९,९०,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.४,१७,९०,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्त करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३३ :-** दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये ग.नं.१० ते १८ दांडेक नगर, विदया नगर, श्रिरत्न कॉलनी पिंप्राळा शिवार रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्क रु.३,७९,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.मयुर चंद्रकांत कापसे व इतर दो सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये ग.नं.१० ते १ दांडेकर नगर, विदया नगर, श्रिरत्न कॉलनी पिंप्राळा शिवार रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्क रु.३,७९,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्त करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३४ :-** दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये विविध १ ते २ कामे कर कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.४,०८,६१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.विज पुंडलिक पाटील व इतर दोन सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.४,०८,६१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गट नं.३४३, ३४४, ३४७, ३४८ इंद्रनिल सोसायटी, पांडुरंग नगर परिसर रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,७९,६१,०००/- |
| २ | गट नं.१ ते ४ गुरुदत्त सोसायटी, पांढरी प्लॉट, साईबाबा मंदिर परिसर रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२,२९,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.४,०८,६१,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३५ :-** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गत जळगावं शहरातील रेल्वे स्टेशन जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळील परिसर सुशोभीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.सिमा सुरेश भोळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गत जळगावं शहरातील रेल्वे स्टेशन जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळील परिसर सुशोभीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .३६ :-** जिल्हा नियोजन मंडळ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गतच्या विविध निधीतुन प्रभाग क्र.९ मध्ये विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.१,४७,५८,६००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.रंजना भरत सपकाळे,सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जिल्हा नियोजन मंडळ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गतच्या विविध निधीत प्रभाग क्र.०३ मध्ये खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.१,४७,५८,६००/- मात्र खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.०३ खेडी भागात खडके शाळे पासुन ते विनायक नगर पर्यंतच्या उपनाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रु.३१,००,०००/- |
**नगरसचिव विषय क्रं .६१ :-** दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० मधील पिंप्राळा हुडको गट नं.२१२,२१३ मधील इदगाह मैदान येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व चेनलिंक फेसिंग करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.६६,६३,११८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,शेख हसीना बी शरीफ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० मधील पिंप्राळा हुडको गट नं.२१२, २१३ मधील इदगाह मैदान येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व चेनलिंक फेसिंग करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.६६,६३,११८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६२ :-** प्रभाग क्र.०३ मधील विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.१,१८,७३,१३०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.०३ मधील खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.१,१८,७३,१३०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ ज्ञानदेवनगर रस्त्यापासून श्रावण नगर, पर्यंतचा रस्ता व श्रीराम नगर परीसरात डांबरी रस्ते करणे. | रु.७८,२४,६३०/- |
| २ | प्रभाग क्र.३ जुने जळगांव डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराचे नुतनीकरण करणे. | रु. ७,८५,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.३ खेडी रस्त्यापासुन नेहते नगर व स.नं.७७ पर्यंत डांबरी रस्ते करणे. | रु.३२,६३,५००/- |
| | एकूण रक्कम - | रु.१,१८,७३,१३०/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६३ :-** शासनाकडुन वेळोवेळी येणाऱ्या निधीमधुन किंवा जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून प्रभाग क्र.१८ अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०३.२९/- कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.श्री.बागवान रियाज अहेमद अ.करीम, गटनेता,ए.आय.एम.आय.एम व इतर दोन सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी सतत मागणी होत असल्यामुळे शासनाकडुन वेळोवेळी येणाऱ्या निधीमधुन किंवा जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून प्रभाग क्र.१८ अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.०३.२९/- कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१८ अंतर्गत इकरा कॉलेज परिसर, जाकीर हुसैन कॉलनी व गणेशपुरी परिसर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.०१.१० कोटी |
| २ | प्रभाग क्र.१८ अंतर्गत अक्सा नगर स.क्र.१०/१+२, स.क्र.१९/१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ०१.२० कोटी |
| ३ | प्रभाग क्र.१८ अंतर्गत स.क्र.२०/२ मधील व दत्तनगर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रु. ९९ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.०३.२९/- कोटी |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६४ :-** प्रभाग क्र.५ व ६ अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.७५,२०,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.राखी शामकांत सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने प्रभाग क्र.५ व ६ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.७५,२०,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५ व ६ अंतर्गत शाहूनगर येथिल श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यंत आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधेणे. | रु.१५,६९,१४६/- |
| २ | प्रभाग क्र.५ व ६ अंतर्गत शाहूनगर येथिल श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,७९,३६१/- |
| ३ | प्रभाग क्र.५ व ६ अंतर्गत नवीपेठ मधील महानगरपालिका जवळील व.वा.मार्केट मागील फायर ऑफिस ते खाऊ गल्लीपर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.४९,७२,२५३/- |
| | एकूण रक्कम - | रु.७५,२०,७६०/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६५ :-** प्रभाग क्र.१७ मध्ये विविध १ ते ३ कामे शासकीय निधीतून करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.५४,९५,५१३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.सुनिल वामनराव खडके यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभाग क्र.१७ मध्ये खालील नमूद विविध १ ते ३ कामे शासकीय निधीतून करणे कामी येणारा अंदाजीत एकूण रक्कम रु.५४,९५,५१३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ जुने जळगांव भाग्यलक्ष्मी टेन्ट हाऊस पासुन चौधरी वाडयापर्यंत कॉक्रीट रस्ता तयार करणे. | रु.१९,५६,७७२/- |
| २ | प्रभाग क्र.१७ जुने जळगांव नेमाडे वाडा, खडके वाडा, काळे वाडा तसेच विठ्ठल मंदिर परीसरात कॉंक्रीट पाथवे तयार करणे. | रु.१८,८६,८९०/- |
| ३ | प्रभाग क्र.१७ जुना नशिराबाद रोडपासुन ते श्रीकृष्ण मंदिर गोपाळपुरा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१६,५१,८५१/- |
| | एकूण रक्कम - | रु.५४,९५,५१३/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६६ :-** नगरोत्थान निधी, दलितेत्तर निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकीय व मनपा निधीतुन प्रभाग क्र.१४ अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५,९०,६५,२४४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.श्री.राजेंद्र झिपरु पाटील, सभापती,स्थायी समिती यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी सतत मागणी होत असल्याने नगरोत्थान निधी, दलितेत्तर निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकीय व मनपा निधीतुन प्रभाग क्र.१४ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५,९०,६५,२४४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ मध्ये मेहरुण तलाव ओवरफ्लो पासुन ते मेहरुण स्मशानभुमी पुला पर्यंतचा नाल्याला रिटेनिंग वॉल बांधणे. | रु.४,५८,३७,९८९/- |
| २ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण तलाव ते मेहरुण स्मशानभुमी पर्यंत नाल्याचे बाजुस रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे. | रु.१,०५,१९,७३८/- |
| ३ | प्रभाग क्र.१४ मध्ये गायत्रीनगर मधील नाल्याला रिटेनिंग वॉल व रोड क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु. २७,०७,५१७ |
| | एकूण रक्कम - | रु.५,९०,६५,२४४/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६७ :-** प्र.क्र.९ अंतर्गत विविध १ ते ४ ठिकाणी हायमस्ट लॅम्प बसविणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील प्रभाग क्र.९ मधील बेंडाळे नगर परिसर पुर्णत: दाट वस्तीचा असून सदर परिसरात बहुतांश भागात पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नसल्यामुळे रात्रीच्या प्रसंगी नागरीकांना प्रकाशाअभावी रहदारीस, वाहतूकीस अनेक अडचणींच्या सामोरे जावे लागत आहे. याबाबत नागरीकांकडून किमान नेहमी वर्दळीच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणेसाठी वारंवार मागणी होत असल्याने प्र.क्र.९ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ४ ठिकाणी हायमस्ट लॅम्प बसविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | ठिकाणी | नग |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.९ अंतर्गत गट नं.२८ मधील ऑक्सिजन पार्क | ०१ |
| २ | प्र.क्र.९ अंतर्गत २२/२, २३ पंचायतन मंदीर | ०१ |
| ३ | प्र.क्र.९ अंतर्गत गट नं.३४ बेंडाळेनगर | ०१ |
| ४ | प्र.क्र.९ अंतर्गत गट नं.३० खुल्या जागेत | ०१ |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६८ :-** प्र.क्र.१२ मेहरुण सर्वे नं.४८१/२ मधिल जळगांव मनपा मालकीच्या खुल्या जागेत महाविर बिल्डकॉन यांचे तर्फे स्वखर्चाने बगीचा विकसित करणे कामी मा.श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी,गटनेता,शिवसेना यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मला या विषयाशी संबंधित बोलायचे आहे. महापौर महोदया,

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**मा.महापौर :-** राजेंद्रभाऊ बोला

**श्री. राजेंद्र पाटील :-** प्रभाग क्रं. १४ मध्ये अशा प्रकारचे झालेले आहे. मी जे रस्ते प्रस्तावित केलेले होते. ते डांबरीकरण म्हणुन मंजुर असतांना ते रस्ते कॉंक्रीटीकरणची मागणी करुन ते रस्ते मंजुर करण्यात आलेले आहेत मागच्या सभेत जसेच्या तसे मी दिलेले प्रस्ताव जसेच्या तसे परत आले दुसऱ्या सभेमध्ये आणि फक्त ते डांबरीकरणच्या ऐवजी कॉंक्रीटीकरणची मागणी करण्यात आलेली आहे.

**मा.महापौर :-** राजेंद्रभाऊ एका प्रभागमधील चार नगरसेवक आणि इंजिनियरांनी एकमेंकांमध्ये कोऑर्डीनेशन ठेवणे गरजेचे आहे. आपण कोणता रस्ता टाकतोय हे सगळयांना माहिती असणं गरजेच आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया , माझा प्रस्ताव आधीच्या सभेमध्ये मंजुर झालेले आहेत.त्या सभेमध्ये आणि आधीच्या सभेमध्ये मंजुर झालेले आहेत आणि नंतरच्या सभेमध्ये तेच कॉंक्रीटीकरण साठी मांडण्यात आलेले आहेत. प्रस्ताव पाठवण्यात आले आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई

**श्री. अनंत जोशी :-** महापौर महोदया,

**श्री. राजेंद्र पाटील :-** मंजुर झालेले असतांना परत

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने दखल घ्यावी. पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री. सचिन पाटील :-** महापौर महोदय मला एक सुचना मांडायची आहे.

**मा.महापौर :-** बंटीभाऊ बोला

**श्री. अनंत जोशी :-** धन्यवाद महापौर महोदया, धन्यवाद , ईबाभाऊंचा जो विषय होता त्याच्या सारखा विषय माझा पण आहे. ४५ नंबरचा एक प्रस्ताव आहे आणि ५७ नंबरचा आणि प्रभाग १२ मधील जी कामं आहेत ती सारखी आलेली आहेत. सन्मा. सदस्यांनी दिलेले पत्र जे आहे ते दि. २९/०६/२०२१ चे आहे आणि मी दिलेले पत्र ते ०४/०६/२०२१ चे आहे म्हणजे सहाव्या महिन्यातील ४ तारखेचे आणि भारतीय जनता पक्षाचे सन्मा.सदस्य आहेत त्यांनी २९/०६/२०२१ ला माझ्या नंतर त्यांनी पत्र दिलेले आहे. कामे सारखी आहेत. त्यामुळे माझी विनंती अशी असेल याची देखील दखल घ्यावी की सारखी कामे म्हणजे तंतोतंत सारखी कामे आलेली आहेत एकाच प्रभागातील

**मा.महापौर :-** बंटीभाऊ आपल्याही सुचनांची दखल घेण्यात येणार आहे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला प्रशासनाला प्रश्न विचारायचा आहे.

**मा.महापौर :-** उज्वलाताई आपले म्हणणे थोडक्यात मांडा. उज्वलाताई बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ताई मी पहिले संधी मागीतली होती. माझापण जो ४५ नंबराचा विषय आहे तो जसाचा तसाच आलेला आहे आणि मी स्वत:हुन येवुन तुम्हाला पत्र दिलेले होते ताई तुम्हाला माहिती असेल की पत्र कुणाचं पहिले आले आहे ते आणि कुणाचे नाही. मी पत्र दिलेले होते आपल्याकडे

**श्री. अनंत जोशी :-** महापौरताई

**मा.महापौर :-** उज्वलाताई आपल्या सुचनांची दखल घेण्यात येईल.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे. सुचना मांडायची आहे महापौरताई

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई मला सुचना आहे , महापौरताई

**श्री. प्रशांत नाईक :-** सचिन पाटील बोला तुम्ही बोला

**मा.महापौर :-** सर्व सदस्यांनी शांतता ठेवायची आहे पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला सुचना मांडु द्या महापौरताई

**श्री. सचिन पाटील :-** गोराणेसाहेब जे प्रक्षेपण चालु आहे महासभेचे ऑनलाईनचे त्या साठी महापालिकेचे आयुक्त , मा.उपमहापौर आणि सन्मा. पिठासीन अधिकारी हे महत्वाचे असतात. आयुक्त साहेबांचा प्रक्षेपणात आवाज येतोय परंतू चित्रामध्ये आयुक्त साहेब कट होताहेत. त्या आयुक्त साहेब चित्रीकरणात दिसले पाहीजे.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई

**श्री. सचिन पाटील :-** प्रक्षेपण बरोबर होत नाहीये.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , बंटीभाऊ एक मिनिट थांबा , सचिनभाऊ थांबा

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , महापौरताई

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला लक्षवेधी मांडायची आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री. सचिन पाटील :-** कॅमेराची दखल घ्यावी नगरसचिव साहेबांनी

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई

**श्री. सचिन पाटील :-** आम्हाला काहीच दिसत नाहीये. महासभेची नियमावली जी आहे. आयुक्त साहेब आम्हाला काहीच दिसत नाहीये.

**नगरसचिव :-** विषय क्रं.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , गोराणेसाहेब , महापौरताई मला प्रश्न विचारायचा आहे दोन मिनिटं प्रशासनाला

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई , महापौरताई मला प्रश्न विचारायचा आहे दोन मिनिटं प्रशासनाला

**मा.उपमहापौर :-** प्रशांत भाऊ तुम्हाला याच विषयावर बोलायचं आहे का ? प्रशांतभाऊ

**श्री. प्रशांत नाईक :-** हो बोला.

**मा.उपमहापौर :-** प्रशांत भाऊ तुम्हाला बांधकामच्या विषयात बोलायचं आहे का ?

**श्री. प्रशांत नाईक :-** हो हो  बोलायच आहे त्या विषयावरच बोलायच आहे.

**मा.उपमहापौर :-** मग तुम्हाला महापौर महोदया केव्हाचं सांगताहेत की बोला तुम्ही बोलत नाहीये.

**श्री. प्रशांत नाईक :-** आता एवढे जण बोलता आहे तर मी काय बोलु

**मा.उपमहापौर :-** बोला आता बोला

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौरताई मला प्रशासनाला सुचना करायची आहे.

**मा.उपमहापौर :-** सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी थोडी शांतता ठेवायची आहे म्हणजे सर्व सदस्यांच म्हणणं जे आहे. ते आपले अधिकारी व पदाधिकारी तसेच सभागृहाला समजेल कृपया विनंती आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** आपले जे ज्येष्ठ नगरसेवक आहेत नितीनभाऊ लढ्ढा त्यांनी जे आता थोड्या वेळापुर्वी सांगतीले की हे जे काम आहेत हे  निधीमधुन सुचविले जातात . याला कारण हे प्रशासन जबाबदार आहे या गोष्टीला , प्रशासन प्रत्येक वेळेस याच्यामध्ये सन २०२१-२२ चा जो बजेट लावलेला आहे आपण गटारसाठी आणि रस्त्यांच्या कामासाठी तर मला प्रशासनाला विचारायचे आहे की तो बजेट लावला होता तो फेक बजेट आहे का ? मला आयुक्त साहेबांनी उत्तर द्यायचे आहे . गटारींसाठी २०२१-२२ ला किती बजेट लावलेला आहे आणि रस्त्यांसाठी किती बजेट लावलेला आहे. १ एप्रिल २०२१ पासुन ते ऑगस्ट पर्यंत आता १२ ऑगस्ट आहे. तर आतापर्यंत याच्यावर किती

रूपये खर्च झालेले आहेत.त्या बजेटमधील मला आयुक्त साहेबांनी उत्तर द्यायचे आहे या गोष्टीचे , कारण की मी आयुक्त साहेबांकडे छोटे छोटे काम जेव्हा घेवुन गेलेलो आहे. ५ लाखाचा रस्ता शौचालयात जाण्यासाठी आयुक्त साहेबांनी सांगीतले की महापालिकेची परिस्थिती अत्यंत खराब असल्याकारणाने हे काम करता येणार नाही . दुसरी गोष्ट मी साहेबांकडे माझ्याप्रभागातील जे आता काम तुम्ही सुचविलेले आहे. ते काम पण मी आयुक्त साहेबांकडे घेवुन गेलो होतो की साहेब मनपा फंडातुन ही आर.सी.सी गटार करणेबाबत तरी आयुक्त साहेबांनी सांगीतले की महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्याकारणाने हे करता येणार नाही. त्यामुळे मला आयुक्त साहेबांना प्रश्न विचारायचा आहे की हा जो बजेट लावलेला आहे तो फेक बजेट आहे का? त्या बजेटला काही महत्व आहे का? आयुक्त साहेबांनी उत्तर द्यायच आहे या गोष्टीला

**मा.आयुक्त :-** महापालिकेचे जे बजेट आहे ते आपण खुप सविस्तर चर्चा करून स्थायी समिती आणि महासभेमध्ये मंजुर केलेले आहे.सन्मा सदस्य प्रशांतभाऊ नाईक आपण स्थायी समितीमध्ये सदस्य आहात. त्यामुळे आपल्याला माहिती असेल की या सगळयांची चर्चा त्यावेळेला झालेली आहे आणि स्थायी समिती मार्फत सन्मा.सभापती स्थायी समिती यांनी ते बजेट महासभेसमोर मांडलेले आहे. त्यामुळे त्याला फेक आहे असं म्हणण्याच निदान सभासदांनी त्याला फेक म्हणणे योग्य वाटत नाही.

**श्री. प्रशांत नाईक :-** साहेब , साहेब तुम्ही

**मा.आयुक्त :-** दुसरा विषय आहे महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा , महापालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे याच्या विषयी वेगळे भाष्य करणे आयुक्तांनी करणे याची आवश्यकता नाहीये.

**श्री. प्रशांत नाईक :-** साहेब याला तुम्ही जबाबदार आहात .

**मा.आयुक्त :-** एक मिनिटं

**श्री. प्रशांत नाईक :-** याला तुम्ही जबाबदार आहात . १५ महिने झाले तुम्ही महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काहीही काम केले नाहीये. आपण अकार्यक्षम आयुक्त ठरलेले आहात.

**मा.आयुक्त :-** प्रशांतभाऊ

**मा.उपमहापौर:-** प्रशांतभाऊ प्रशासनाला त्यांच म्हणण मांडु द्याना , प्रशासन उत्तर देत आहे प्रशांतभाऊ

**मा.आयुक्त :-** आपण समोरच्याचे म्हणणे ऐकुन घेण्याची मानसिक तयारी आपण ठेवली पाहीजे.

**श्री. प्रशांत नाईक :-** हो , हो बोला बोला माझी मानसिकता आहे साहेब बोला बोला.

**मा.आयुक्त :-** आपल्या महापालिकेच्या आजच्या आर्थिक परिस्थितीला कोण जबाबदार आहे. याच्या बद्दलची आपल्याला एक श्वेतपत्रिका काढावी लागेल की महापालिकेची आजची जी आर्थिक परिस्थिती जी झालेली आहे. कशामुळे झालेली आहे आणि त्याला कुणी व्यक्ती किंवा कुणी पदाधिकारी किंवा कोण आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे. नगरसेवक आहे.

**श्री. प्रशांत नाईक :-** कैलासआप्पा ज्येष्ठ नगरसेवक आहात आपण बोलू नका आप्पा शांती ठेवा थोडी.

**मा.आयुक्त :-** आपल्या

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आप्पा बरोबर बोलले तुम्ही

**मा.आयुक्त :-** आपल्या या बजेट मध्ये

**श्री.प्रशांत नाईक :-** एकदम ओके आहे ताई , चांगले काम करता आहे तुम्ही मध्ये बोलुन चांगले काम करताहेत.एकदम शिस्त आहे आपल्याला बोला बोला

**मा.आयुक्त :-** प्रशांतभाऊ ऐकुन घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** हो बोला बोला. चला बोलत जा तुम्ही मध्ये , बोला साहेब तुम्ही बोला .

**मा.आयुक्त :-** प्रशांतभाऊ ऐकुन घ्या कृपया ऐकुन घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** हो हो मी ऐकतोच आहे साहेब

**मा.आयुक्त :-** आपण कुठल्याही नविन कामाला मंजुरी देत असतांना बजेट मध्ये नुसती तरतूद आहे की नाही हे बघत नाही . आपण त्यासाठी निधी उपलब्ध होतो का , कारण बजेट तयार करत असतांना आपण जे काही अपेक्षित उत्पन्न धरतो उदाहणार्थ आपण जर या वर्षीच बघितले तर सन्मा.स्थायी समिती सभापतींनी जे बजेट सादर केलं आणि जे महासभेने मंजुर केले. त्याच्यामध्ये दुकान गाळयांपासुन आपण सव्वा दोनशे कोटी रूपयांच उत्पन्न अपेक्षित धरतोय आता हे सव्वा दोनशे कोटी रुपयांच उत्पन्न अपेक्षित जे धरलं ते काही गृहीत तत्वावर आपण धरलेलं

आहे.आज आपण या गाळ्यांच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये ज्यावेळेला आपण चर्चा करतो. त्यावेळेला लक्षात येते की हे सव्वा दोनशे कोटी रूपये वसुल होण्यामध्ये काय काय अडचणी आहेत. त्यामुळे केवळ बजेट मध्ये

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब त्याच अडचणी आहेत का त्यांनाच सांगा ते

**मा.आयुक्त :-** एक मिनिटं त्यामुळे आपण ऐकुन घ्या कृपा करून

**श्री.प्रशांत नाईक :-** हो हो बोला बोला

**मा.आयुक्त :-** प्रशांतभाऊ ऐकुन घ्या.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला बोलायचे आहे. लक्षवेधी मांडायची आहे.

**मा.आयुक्त :-** केवळ बजेट मध्ये तरतूद असुन उपयोग नाही. जर बजेट च्या तरतूदी नुसार आपली प्रत्यक्ष वसुली झाली . तरच आपल्याला काम करता येईल. अन्यथा जे आपण आत्ताच्या बजेट मध्ये आपण बघितलेले आहे. जवळपास आपली ८० ते ८५ कोटींची देणी आपली झालेली आहेत आणि याचा परिणाम असा होतो की आपण काम करत राहतो . ठेकेदार काम करतात आपलं बिल मिळेल म्हणुन आणि मग वेळेवर बिल न दिल्यामुळे महापालिकेची देणी वाढत राहतात. शिवाजी नगरचा आपण एक विषय बघितला तर आपण एक टेंडर काढले महापालिकेच्या निधीमधुन त्या टेंडरला प्रतिसाद मिळाला नाही. प्रतिसाद न मिळण्याचं कारण काय की महापालिकेच्या निधीमधुन जर काम काढल तर निधी मिळेल याची खात्री नसल्यामुळे अशाला प्रतिसाद मिळत नाही. म्हणुन आपल्याला हि आर्थिक शिस्त पाळणं गरजेच आहे.याच्यामध्ये कुठल्याही सदस्यांच काम नाकारण किंवा स्विकारणं हा काही चेहरा बघुन निर्णय घेतला जात नाही.महापालिकेकडे उपलब्ध असलेला निधी बघुन घेतला जातो आणि आपल्या कामांच्या संदर्भामध्ये आपल्यालाही वेळोवेळी सांगीतलेले आहे की महापालिकेच्या निधीतुन अति आवश्यक काम असेल त्याचा आपल्याला विचार करता येईल. परंतू रस्त्यांच्या कामामधील आपली जी काही १०४ कोटींची तरतूद आहे.याच नियोजन हे सन्मा.महापौर , मा.उपमहापौर यांच्या स्तरावरूनच केले जात आहे. जी काही महापालिकेच्या निधीमधुन काम करायची असतील किंवा शासनाच्या निधीमध्ये मग त्याचा दोष आपण प्रशासनावर देणं योग्य वाटत नाही.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला लक्षवेधी सुचना मांडायची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब , अप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** अप्पा

**मा.महापौर :-** कैलासअप्पा बोला तुम्ही

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई ७६ क्रमांकाच्या विषयापर्यंत आमची काही हरकत नाहीये.ज्यांना चर्चा करायची आहे ते करू शकतात.आता ७७ नंबरचा विषय घेतला तरी चालतो.

**सौ.ज्योती चव्हाण:-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** अप्पा , महापौरताई विषय क्रं. ७७ घ्या.

**सौ.ज्योती चव्हाण:-** ७६ नंबरवर मला बोलायचे आहे महापौरताई , नितीनभाऊ.

**मा.उपमहापौर :-** १४ ते ६७ नंबरच्या विषयांना व ७५ नंबरच्या विषयाला माझ अनुमोदन आहे.

**सौ.ज्योती चव्हाण:-** ७६ नंबर बद्दल बोलायचे आहे कुलभुषणभाऊ , महापौरताई ७६ नंबर

**मा.महापौर :-** बोला ज्योतीताई बोला ७४ बद्दल बोलायचे आहे आपल्याला ?

**सौ.ज्योती चव्हाण:-** नाही नाही ७६ नंबर बद्दलच बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला ज्योतीताई बोला

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय ,

**सौ.ज्योती चव्हाण:-** महापौर महोदया ७६ नंबरचा विषय

**मा.महापौर :-** विषय पत्रिकेवरील ७५ नंबरच्या विषयाबद्दल कुणाला बोलायचे आहे का ?

**सौ.ज्योती चव्हाण:-** नाही ७६ बद्दल बोलायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्र.क्र.१२ मेहरुण सर्वे नं.४८१/२ मधिल जळगांव मनपा मालकीच्या खुल्या जागेत महाविर बिल्डकॉन यांचे तर्फे स्वखर्चाने बगीचा विकसित करणे कामी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापुर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी व सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .६९ :-** महानगरपालिका आरोग्याच्या विशेष निधीतुन जळगांव शहरासाठी ०४ नग नविन नाले एस्केव्हेटर खरेदी करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरासाठी पुर्वीचे नाले एस्केव्हेटरची अत्यंत दुरावस्था झालेली असल्याने वेळोवेळी त्यांचेवर दुरुस्तीसाठी पुष्कळ खर्च येत असल्याने जळगांव शहराच्या हितासाठी महानगरपालिका आरोग्याच्या विशेष निधीतुन ०४ नग नविन नाले एस्केव्हेटर खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७० :-** आकाशवाणी चौक येथे सार्वजनिक महिला शौचालय बांधणे कामी परवानगी मिळणेबाबत रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, आकाशवाणी चौक येथे सार्वजनिक महिला शौचालय नाही. सदर ठिकाणी महिला शौचालयाची आवश्यकता आहे. महिला शौचालयाचा रहदारीस कोणताही अडथळा येणार नाही. आकाशवाणी चौकात महानगरपालिका निश्चीत करेल त्याठिकाणी महिला शौचालय बांधणेस व तशी परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७१ :-** मेहरुण तलाव परीसर सुशोभीकरण करणेस परवानगी मिळणेबाबत रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मेहरुण तलाव परीसरात सुशोभीकरण अंतर्गत I Love Jalgaon, Selfi Point, Benches, Dustbin स्वच्छता फलक वगैरे उपक्रम रोटरी क्लब जळगांव ईस्ट करण्यास तयार असल्याने मेहरुण तलाव परीसर सुशोभीकरण करणे कामी रोटरी क्लब जळगांव ईस्ट यांना परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७२ :-** फुले मार्केट समोरील जुन्या न.पा.च्या मोकळया जोगत तसेच मनपा अग्निशामक कार्यालयाच्या प्रवेशव्दार शेजारील मोकळया जागेत व भास्कर मार्केट परिसर या तीन ठिकाणी वॉटर ए.टी.एम. बसविणेस परवानगी मिळणेबाबत रोटरी क्लब ऑफ जळगांव गोल्ड सिटी,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील वर्दळीच्या ठिकाणी रोटरी क्लब ऑफ जळगांव गोल्ड सिटी तसेच बुलढाणा अर्बन को.ऑप बँकेच्या सहयोगाने वॉटर ए.टी.एम. उभारण्याचा मानस असून याकरीता फुले मार्केट समोरील जुन्या न.पा.च्या मोकळया जागेत तसेच मनपा अग्निशामक कार्यालयाच्या प्रवेशव्दार शेजारील मोकळया जागेत व भास्कर मार्केट परिसर अशा तीन ठिकाणची रोटरी क्लब ऑफ जळगांव गोल्ड सिटी यांनी निवड केलेली असून या उपक्रमाचा फायदा दररोज शहरातील ३ ते ५ हजार नागरीकांना होणार असून अतिशय अल्प दरात शुध्द पिण्याचे पाणी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. या उपक्रमाव्दारे दररोज ५० हजार लिटर पेक्षा जास्त शुध्द पाणी जळगांव शहरातील नागरिकांना उपलब्ध होणार आहे. यातून जमा होणाऱ्या निधीतून बुलढाणा को.ऑप बँक या ए.टी.एम. चा संपूर्ण मेन्टेन्स करणार आहे. या उपक्रमाचा कुठलाही आर्थिक बोजा आम्ही मनपावर येऊ देणार नाही असे त्यांनी आपल्या अर्जात नमूद केलेले आहे.

त्यास्तव फुले मार्केट समोरील जुन्या न.पा.च्या मोकळया जागेत वा परिसरात तसेच मनपा अग्निशामक कार्यालयाच्या प्रवेशव्दार शेजारील मोकळया जागेत व भास्कर मार्केट परिसर या तीन ठिकाणी वॉटर ए.टी.एम. स्वखर्चाने बसविणे कामी रोटरी क्लब ऑफ जळगांव गोल्ड सिटी,जळगांव यांना परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त जागा निश्चित करतांना वॉटर ए.टी.एम.मुळे कोणासही त्रास होणार नाही अथवा रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७३ :-** प्रभात कॉलनी चौकातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलास " हिंदु क्रांतीसुर्य विर शिरोमणी सम्राट महाराणा प्रतापसिंह " यांचे नाव देणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा व श्री.संग्रामसिंह सुर्यवंशी, युवा अध्यक्ष, प्रदेश महाराष्ट्र, अखिल भारतीय क्षत्रिय महासभा यांनी दिलेल्या पत्रांवर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रभात कॉलनी चौकातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलास " हिंदु क्रांतीसुर्य विर शिरोमणी सम्राट महाराणा प्रतापसिंह " यांचे नाव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७४ :-** आसोदा रेल्वेगेट वरिल पुलास " कवियत्री बहिणाबाई चौधरी उड्डाण पुल " असे नाव देणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रस्ताव हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातुन आसोदा गावाला जाणाऱ्या रस्त्यावर रेल्वेकडुन उड्डान पुल उभारण्यात येणार आहे. कवियत्री बहिणाबाई यांचे माहेर आसोदा गांव असून जळगांव हे त्यांचे सासर आहे. सदर रेल्वे उड्डाण पुल दोन्ही गावास जोडणारा असल्यामुळे या पुलाचे नामकरण " कवियत्री बहिणाबाई चौधरी उड्डाण पुल " असे नाव देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .७५ :-** महाराणा प्रताप स्मारक चौक ते राष्ट्रीय महामार्ग क्र.६ पर्यंतच्या रस्त्यावरील रस्ता दुभाजकास सुशोभीकरण, देखभाल दुरुस्तीसह करणे कामी अखिल भारतीय क्षत्रिय महासभा यांना परवानगी देणेबाबत श्री.संग्रामसिंह सुर्यवंशी, युवा अध्यक्ष, प्रदेश महाराष्ट्र, अखिल भारतीय क्षत्रिय महासभा यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे विषय पत्रिकेवरील ७५ विषय हे सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत. विषय पटलावरील विषय क्रं. ७६ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर सुंदर शहर या सकंल्पनेला हातभार म्हणून महाराणा प्रताप स्मारक चौक ते राष्ट्रीय महामार्ग क्र.६ पर्यंतच्या रस्त्यावरील रस्ता दुभाजकास सुशोभीकरण, देखभाल दुरुस्तीसह करणे कामी अखिल भारतीय क्षत्रिय महासभा यांना परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय मला एक सुचना मांडायची होती.

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ बोला .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय आणि आयुक्त साहेब एक आपल्या निदर्शनास आणुन द्यायचं होत की ६९ च्या अनुषंगाने आपण वाहन तर घेत होतो

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ आपला आवाज येत नाहीये क्लियर , विष्णू भाऊ आपला आवाज येत नाहीये

**श्री.विष्णू भंगाळे :-** एक मिनिट मी वाहनांच्या बाबतीत बोलतोय , हॅलो आवाज येतोय ताई आता महापौर महोदय.

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ येतोय बोला .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय मी फक्त आपल्या निदर्शनास आणुन देतोय की आपल्या ज्या दृष्टीने काही वाहने आपण घेत असतो . परंतू मी एक आपल्या माध्यमातुन सभागृहाच्या आणि प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देवु ईच्छितो की २५ नंबर शाळेमध्ये आपलं एक ट्रॅक्टर तिन वर्षापुर्वी घेतलेले नविन ट्रॅक्टर जवळजवळ एक वर्षापासुन बंद पडलेले आहे आणि त्याच बंद पडण्याच कारण काय आहे. तर फक्त एक मोठं टायर पंक्चर होत. डोक्याबरोबर गवत त्या वर त्याच्यासोबत झालेले आहे. म्हणजे मी त्या ट्रॅक्टरचा नंबरपण आपणांस देवु ईच्छितो MH-१९- ०८५० महापौर महोदय आपल्या मनपाला वाहन विभागाला इंजिनियर व्यवस्थित नसल्याकारणाने नक्कीच आपले वाहनं कुठे आहेत. त्याची देखभाल कशी आहे. या सगळया गोष्टींकडे

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई मला ७२ नंबरच्या विषयावर बोलायचे आहे. हॅलो महापौर ताई मला ७२ नंबरच्या विषयावर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला चेतनभाऊ बोला

**श्री.चेतन सनकत :-** मॅडम फुले मार्केट जुने नगरपालिकेच्या जागेजवळ अग्निशमन कार्यालय जवळील जागेत वॉटर एटीएम टाकणे संदर्भात हा ठराव आलेला आहे आणि अजून ३ ठिकाणी फुले मार्केटच्या समोरच्या जागेवर ऑलरेडी वॉटर एटीएम टाकले गेलेले आहे. त्या ठिकाणी वॉटर एटीएम आणि पाणपोई असतांना आणखी ती जागा देणे गरजेचे आहे का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** हॅलो महापौर महोदय , चेतनभाई हे जे आहे हे मोठ्या प्रमाणावर आहे आपल्या मनपाच्या अनुषंगानेच आहे मनपाची मंजुरी असेल तरच रोटरी क्लब करेल.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** त्या ठिकाणी जे टाकलेले आहे ते आजच्या तारखेत बंद अवस्थेत पडलेले आहे आणि ज्या ज्या भागांमध्ये या एटीएम च्या माध्यमातुन सुचविलेले आहे रोटरी क्लब गोल्ड सिटी म्हणुन आहे हे ते करत आहे आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या काळामध्ये

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ मान्य

**श्री.विष्णू भंगाळे :-** याचा फायदा होईल

**श्री.चेतन सनकत :-** विष्णूभाऊ त्या विषयाला माझा विरोध नाहीये . मी असं प्रस्तावित करतोय की त्या ठिकाणी ऑलरेडी पाणपोई आहे शहर पोलिस स्टेशनच्या प्रवेश द्वाराजवळ आणि एक वॉटर एटीएम त्यालाच लागुन एक ५०

मिटरच्या अंतरावर आहे. अजुन तिकडेच देणं गरजेचे आहे का ? असे विचारतो आहे जे एटीएम बंद पडलेले आहे ना.

**श्री.विष्णू भंगाळे :-** चेतनभाई , महापौर महोदया

**श्री.चेतन सनकत :-** विष्णूभाऊ भाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** चेतनभाई ते वॉटर एटीएम बंद पडलेले आहे.

**श्री.चेतन सनकत :-** विष्णूभाऊ भाऊ एक मिनिटं भाऊ माझं बोलण होवु द्या अगोदर म्हणजे तुम्हाला गैरसमज होणार नाही.

**श्री.विष्णू भंगाळे :-** बोलुन घ्या , बोलुन घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ माझ एकदा ऐकुन घ्या . वॉटर एटीएम जे बंद पडलेले आहे . तुम्ही जे सांगता आहे . त्याच्या जागी यांना मंजुरी देण्यास हरकत नसावी. जेणकरून अतिक्रमणाला अडथळा नको . वाहनांना अडथळा नको . रस्त्यामध्ये अजुन आपण परवानगी देवुन टाकण्याच्या ऐवजी जे बंद पडलेले आहे त्याला काढुन याला परवानगी द्यावी. अस मला म्हणायचे आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो अध्यक्ष महोदय आणि आयुक्त साहेब आता हे जे चेतनभाईंनी जो विषय केला ते आपले भोसले साहेब त्यानी आपले मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करून भोसले साहेबांच्या सोबत रोटरी परिवारासोबत साईटवर गेलो होतो की ते अतिक्रमणामध्ये कुठे येणार नाहीत अशा जागेवर ते टाकणार आहेत. जे स्पॉट दिलेले आहे ते त्यात दिलेले आहेत.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ मला मान्य आहे रोटरी क्लब जे काम करत आहे आणि आपण जे करत आहोत ते चांगले करीत आहोत.फक्त जे बंद पडलेले आहे. जी जागा आपली रिकामी गेलेली आहे त्या ठिकाणी केले तर अति चांगले काम होईल अस माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** कुणाला त्रास होणार नाही अशा जागेवर टाकणार आहेत.

**श्री.चेतन सनकत :-** ऑलरेडी

**श्री.विष्णू भंगाळे :-** ती जागा आपली मनपाचीच आहे आणि आपले इंजिनियर आहेत.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ जुन्याच्या जागी नविन करण्याच्या संदर्भात बोलतोय मी जुने जे बंद पडलेले आहे त्याच्या जागी यांना मंजुरी द्यावी मी असे बोलतोय. मी हे म्हणतोय जे जुने बंद पडलेले आहे ना त्याच्या जागी यांना मंजुरी द्यावी.

**मा.महापौर :-** बर चेतनभाऊ आणि विष्णूभाऊ आपण आपल्या दोघांच्या चर्चेवरून असे दिसुन येतेय की ज्या ठिकाणी आवश्यक असेल त्या ठिकाणी आपण एटीएम मशीन हे बसविण्यासाठी आपण त्यांना सुचना करण्यात यावी.

**श्री.विष्णू भंगाळे :-** बिलकुल , बिलकुल हो आयुक्त साहेबांच्या परमिशन जे योग्य असेल आपण तिथे देवु .

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई मला आयुक्त साहेबांना एक सुचना विचारायची आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पुढचे विषय घ्या.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** बोला तुम्ही मिनाक्षीताई बोला.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई आपल्या येथील महापालिकेतील कामगारांविषयी एक सुचना विचारायची आहे आयुक्त साहेबांना की महाराष्ट्रातील नगरपालिका , महानगरपालिकांच्या कामगांराना सातवा वेतन आयोग लागू झालेले आहे. आपल्या महापालिकेतील कर्मचाऱ्यांना कधी लागणार सातवा वेतन आयोग.

**मा.महापौर :-** बोला मिनाक्षीताई बोला आवाज येत नाहीये आपला मिनाक्षीताई , चला विषयपटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** विषय क्रं. ६८ ते ७५ मंजुर आहेत ?

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई मला अजुन उत्तर मिळालेले नाहीये मी समाधानी नाहीये ताई

**मा.महापौर :-** मिनाक्षीताई आपला आवाज आलेला नाहीये . त्यामुळे आपण काय मांडलेले आहे ते कळालेले नाहीये सभागृहाला आपले मत मांडावे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** ठिक आहे मी परत विषय मांडते, आयुक्त साहेबांना सुचना आहे मला एक लक्षवेधी मांडायची आहे . आपल्या महाराष्ट्रामधील नगरपालिका , महापालिका मधील कामगारांना सातवे वेतन लागू आहे आणि

आपल्या महापालिकेमधील कामगारांना हे वेतन लागू नाहीये. तर मला याबाबतीत मला आयुक्त साहेबांकडून खुलासा हवाय .

**मा.आयुक्त :-** आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात मान्यता दिलेली आहे. परंतू ही मान्यता देत असतांना काही अटी टाकलेल्या आहेत.उत्पन्न वाढीच्या संदर्भामधील त्या अटींची पुर्तता करण्याचे काम चालु आहे. अटींची पुर्तता झाल्यानंतरच आपल्याला सातवा वेतन लागू करण्याबद्दल निर्णय घेण्यात येईल.जे राज्य शासनाने आदेश दिलेले आहेत .त्याच्याप्रमाणे कार्यवाही होईल.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** ठिक आहे . लवकरात लवकर करावे . धन्यवाद.

**नगरसचिव विषय क्रं .७६ :-** जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील रायसोनी नगर येथील सर्वे नंबर ४६१/२/१ मेहरुण शिवारातील ओपन स्पेस मध्ये कृत्रिम जंगल तयार करण्या कामी झाडांसाठी पाण्याची व्यवस्था व जागा निर फौंडेशन,जळगांव यांना उपलब्ध करुन देणेबाबत श्री.सागर महाजन,निर फौंडेशन यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई

**मा.महापौर :-** ज्योतीताई बोला .

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई या विषयाला संबंधित म्हणजे रायसोनी नगरकरांचा विरोध आहे.तर हा विषय रद्द करावा.

**श्री.चेतन सनकत :-** ज्योतीताईंनी दिलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** धन्यवाद महापौरताई

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हॅलो , पुढचा विषय घ्या , पुढचा विषय घ्या. हॅलो

**मा.महापौर :-** विषय पटलावरील विषय क्रं. ७६ हा विषय रद्द करण्यात येत आहे.याबाबत आपणांस काही विचारणा करायची असेल तर ती आपण ज्योतीताई चव्हाण यांना करू शकतात. सर्वानुमते विषय क्रं. ७६ हा नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ७७ घ्या.

**मा.महापौर :-** विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदर भागातील नागरीकांचा विरोध असल्यामुळे जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील रायसोनी नगर येथील सर्वे नंबर ४६१/२/१ मेहरुण शिवारातील ओपन स्पेस मध्ये कृत्रिम जंगल तयार करण्या कामी झाडांसाठी पाण्याची व्यवस्था व जागा निर फौंडेशन,जळगांव यांना उपलब्ध करुन देणेबाबत श्री.सागर महाजन,निर फौंडेशन यांनी दिलेला अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव विषय क्रं. ७७ :-** निविदा समितीमध्ये मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.स्थायी समिती सभापती यांचा समावेश करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडु महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला राजेंद्र भाऊ बोला

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, सभापती म्हणुन माझा समावेश करण्यात येवू नये आणि या विषयाला माझा विरोध आहे आणि या विषयाला संपुर्ण भारतीय जनता पार्टी म्हणुन विरोध आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** बहुमताने मान्य करण्यात यावा.

**श्री. कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** कैलासअप्पा बोला
**श्री. कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेबांना माझा प्रश्न आहे.
**श्री. दिलीप पोकळे :-** सदर विषय बहुमताने मान्य आहे.
**श्री. कैलास सोनवणे :-** की काय झाले
**मा.महापौर :-** बोला बोला कैलासअप्पा तुम्ही बोला.
**श्री. कैलास सोनवणे :-** मला आयुक्त साहेबांना प्रश्न विचारायचा आहे. त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे. की हे कायदेशीर आहे का ? फक्त ऐवढे उत्तर द्यावे बस. याची याचे इम्प्लीमेंट होईल का ? चर्चा करून घ्या साहेब , चर्चा करून घ्या मग उत्तर द्या.
**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर हा जो आहे अशासकीय प्रस्ताव आहे तर नेमकी या समितीत कोणत्या नियमाखाली आपण करणार आहोत आणि त्या समितीचा उद्देश आणि त्यांची कार्यकक्षा काय आहे . या गोष्टी क्लियर झाल्याशिवाय आपल्याला त्याच्या विषयी भाष्य करणे योग्य नाही. तथापी जी निविदा समिती जी आहे. ती अॅक्चुली निविदा समितीने निविदा मंजुर करणारे आलेले निविदा कागदपत्रांची छानणी करणारी निविदा छानणी समिती आहे. त्यामुळे ज्या निविदा आपण मागवतो .त्या दोन लिफाफा पध्दतीने मागवतो. पहिल्या लिफाफ्या मध्ये तो तांत्रिक दृष्टया तो पात्र असल्याबाबत त्याची कागदपत्र दिली जातात आणि दुसरा लिफाफा जो आहे तो आर्थिक लिफाफा असतो. त्यामुळे पहिला लिफाफा उघडल्यानंतर जे कॉन्ट्रक्टर किंवा ज्या एजन्सीने टेंडर भरलेले आहे. ते सर्व अटी शर्तीला पात्र ठरतात की नाही . याची प्रशासकीय तपासणी करण्यासाठी आपण ही समिती नेमलेली आहे. निविदांची पात्रता ठरवणे हे प्रशासकीय काम असल्यामुळे त्या समिती मध्ये फक्त प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असतो आणि त्याप्रमाणे या समितीच कामकाज चालतं . त्यामुळे मला वाटत प्रशासकीय कामामध्ये पदाधिकाऱ्यांच्या समितीचा समावेश करणं याची आवश्यकता नाही. कारण हे प्रशासकीय समिती आहे. ज्या निविदांची आपण लिफाफे आपण उघडतो आणि निविदा मंजुरीला हा विषय पुन्हा स्थायी समिती समोर येतोच आहे. अशावेळेला उघडलेल्या निविदा ह्या योग्य आहेत की अयोग्य आहेत . याच्याबद्दलचा आम्ही हा निर्णय स्थायी समिती मध्ये जे काही आपले सन्मा. सभासद आहेत. त्यांच्या मार्फत घेतला जातो .समितीने तो निर्णय घेतला आहे.
**श्री. कैलास सोनवणे :-** आल लक्षात साहेब
**मा.आयुक्त :-** तर तो निर्णय स्थायी समितीने घेतल्यानंतर तो पुर्ण होतो . त्याच्यानंतर स्वतंत्र समितीची आवश्यकता नसावी असं मला वाटत .
**श्री. कैलास सोनवणे :-** साहेब माझ्या लक्षात आले सगळं फक्त काय आहे माहिती आहे का मला खात्री करायची होती की तुम्ही इंम्प्लीमेंट करणार आहे की नाही करणार आहे आणि ठराव तर झाला असता तो पण तुम्ही इंम्प्लीमेंट करणार आहे की नाही तेवढेच पाहायचे होते आम्हाला आणि तुम्ही जे गोल गोल फिरवता आहेत की हा अशासकीय प्रस्ताव आहे . असा प्रस्ताव आहे तसा प्रस्ताव आहे. तुम्हाला पण जवळ जवळ ३० ते ३५ वर्ष झाले आहे . आता तुम्ही रिटायर्ड होणार आहेत. मला पण आता ३० वर्ष झाले आहेत. मी रिटायर्ड होणार नाही पण मला माहिती होत आहे.
**श्री.प्रशांत नाईक:-** तुम्ही रिटायर्ड नाही होणार हो आप्पा रिटायर्ड नाही होणार तुम्ही
**श्री. कैलास सोनवणे :-** साहेब पण तुम्ही आम्हाला
**श्री. सचिन पाटील :-** आप्पा तुम्ही रिटायर्ड नाही होणार तुमचं प्रमोशन होईल आता तुम्ही आमदार होणार आहे आता
**श्री. कैलास सोनवणे :-** साहेब मला फक्त हेच विचारायचे होते.
**मा.आयुक्त :-** सन्मा. कैलासआप्पा जेवढा माझा अनुभव आहे . तेवढाच आपला अनुभव आहे. तरी तुम्ही मला विचारता आहेत.
**श्री. कैलास सोनवणे :-** नाही ऑथोराईज तुम्ही साहेब , शेवटी ऑथोराईज पर्सन तुम्ही आहेत उत्तर तुमच्याकडुनच घ्यावे लागेल ना आम्हाला ठिक आहे साहेब
**श्री. नितीन लढ्ढा :-** ठिक आहे बहुमताने मंजुर करण्यात यावा.
**श्री. दिलीप पोकळे :-** पुढचा विषय घ्या.
**अॅड. सौ. शुचिता हाडा :-** महापौर महोदया या विषयामध्ये भारतीय जनता पार्टीचा विरोध नोंदवावा.
**श्री. सचिन पाटील :-** सदर विषय बहुमताने मंजुर करावा.
**नगरसचिव :-** अनुमोदक ?

**श्री. सचिन पाटील :-** भारतीय जनता पार्टीकडून सदर विषय बहुमताने मंजुर करावा.
**मा.महापौर :-** सदर विषय हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** आमचे अनुमोदन आहे.
**श्री. सचिन पाटील :-** अनुमोदन आहे.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** आमचे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे प्रलंबित आहेत व विकासचा अनुशेष भरुन काढण्याकरिता केंद्र शासनाकडून, महाराष्ट्र शासनाकडून व जिल्हा नियोजन कार्यालयाकडून तसेच इतर निरनिराळया योजनां मधून निधी उपलब्ध होत आहे व महानगरपालिका नगररचना विभागाकडून तसेच मनपा फंडातून विकास कामे पार पाडण्यात येतात. याकरिता प्राकलन तयार करणे, तयास तांत्रिक मंजुरी घेणे, शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव विशेष सभेत मंजूरी घेऊन प्रस्तावास पाठपुरावा करुन निधी मंजूर करुन घेणे तसेच निविदा प्रक्रिया राबविणे, निविदा उघडून तपासणे, वाटाघाटी करणे, रद्द करणे अथवा त्यास मंजूरीची कार्यवाही होणे कामी शिफारस करुन स्थायी समिती सभेत विषय घेणे, कार्यादेश देणे व कंत्राटदार चांगल्या दर्जाचे काम करीत असल्याची खातरजमा करुन बिलांची अदायगी कामी शिफारस करणे इत्यादी संपूर्ण कामांना प्रशासनाकडून मोठया प्रमाणावर विलंब होऊन प्रसंगी निधी व्यपगत होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

विकास कामे वेळेवर राबविली जात नसल्याने जनतेमधून व प्रत्येक विशेष सभेमध्ये व स्थायी समिती सभेमध्ये लोकप्रतिनिधी मार्फत तक्रारीव्दारे नाराजी व्यक्त केली जाते, ही वस्तुस्थिती आहे. सबब सदर सर्व कामांना गती यावी याकरीता वरील संपूर्ण विकास कामे मनपामध्ये स्थापित करण्यात आलेल्या निविदा समितीचे माध्यमातून करणेत यावीत तसेच लोकप्रतिनिधी व प्रशासन अधिकारी यांचे मध्ये समन्वय घडवून कामांना गती देणे करीता निविदा समितीमध्ये महापौर व उपमहापौर यांचा समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सबब यापूढे ऑगष्ट २०२३ पर्यंत विकास कामांच्या सर्व प्रक्रियेमध्ये प्रशासनाने निविदा समिती ज्यामध्ये महापौर व उपमहापौर यांचा समावेश असेल व समितीच्या मान्यतेशिवाय वरील नमूद कोणतीही प्रक्रिया करणेत येऊ नये.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- १९ प्रतिकुल मते :- ११**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव विषय क्रं. ७८:-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रति दिक्षाभुमीसाठी प्र.क्र.१० पिंप्राळा गट नं.२२०/१, २२०/२ ही जागा मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.सुरेश माणिक सोनवणे व इतर तीन सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री. नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.
**श्री. सुरेश सोनवणे :-** मला बोलायचे आहे या विषयावर हॅलो , महापौरताई
**मा.महापौर :-** सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.
**श्री. प्रशांत नाईक :-** सुरेशभाऊ मंजुर केला आहे विषय
**श्री. राजेंद्र पाटील :-** विषय क्रं. ७८ मंजुर करण्यात यावा.
**श्री. सुरेश सोनवणे :-** मला दोन मिनिटं बोलायचे आहे. दोन मिनिंट बोलू द्या फक्त बस
**मा.महापौर :-** बोला सुरेशभाऊ बोला
**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई हा जो विषय आपण मान्य केला आहे. मी सर्वपक्षीय सदस्य , मा.महापौर , उपमहापौर आणि गिरीशभाऊ आणि या सगळयांमध्ये नितीनभाऊ माझे मार्गदर्शक माझे गुरू यांचे सगळयांचे मी आभार मानतो आणि यांच्या सगळयांच्या मताने नगरसेवक झाला असे सिध्द करतो. मी नगरसेवक झाला खुप

बहुमान झाला आज खरच आमच्या समाजासाठी कामात आले तुम्ही पण आणि मी पण , महापौरताई , उपमहापौर सगळयांच आभार व्यक्त करतो.

**मा.महापौर :-** विषय पटलावरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १० पिंप्राळा घरकुल परिसर हा बहुसंख्य अनुसूचित जातीचा दाटवस्तीचा राखीव आहे. तसेच या परिसरात अदयाप पावेतो सुमारे २० ते २१ वर्षापासून बौध्द समाजासाठी, दिक्षाभुमी, प्रार्थनास्थळ, धार्मिक स्थळ नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. तसेच या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रती दिक्षाभुमी विकसित करणे बाबत वारंवार मागणी होत असल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रति दिक्षाभुमीसाठी प्र.क्र.१० पिंप्राळा गट नं.२२०/१, २२०/२ ही जागा देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ७९:-** महासभा ठराव क्र.३४२ दि.१६/१२/२०२० अन्वये ग.नं.१२/१+२/२ ची जागा श्री समस्त बारी पंच मंडळ,जळगांव यांना देण्यात आलेली आहे. सदर ठरावात खेडी शिवार याचा उल्लेख करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करुन मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मंजुर आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** मंजुर , मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका खेडी शिवार हद्दीतील ग.नं.१२/१+२/२ या गटातील ओपन स्पेसची जागा श्री समस्त बारी पंच मंडळ,जळगांव यांना विकसित करणे करिता महासभा ठराव क्र.३४२ दि.१६/१२/२०२० अन्वये देण्यात आलेली असून सदरच्या ठरावात खेडी शिवार असा उल्लेख झालेला नसल्याने सदरच्या ठरावात खेडी शिवार ग.नं.१२/१+२/२ याप्रमाणे उल्लेख करुन दुरुस्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ८० :-** रेडक्रॉस इमारतीला लागून असलेली फायनल प्लॉट क्र.१६७ ब मधील १४१२.२ स्क्वेअर मीटर रिकामी जागा इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा,जळगांवला समाजसेवी लोकाभिमुख विविध उपक्रम राबविणेसाठी मिळणेबाबत श्री.विनोद बियाणी,मानद सचिव, इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. दिलीप पोकळे :-** सदरची महानगरपालिकेची जागा हि अत्यंत मोक्याची व महत्वाची असुन सदर जागेचा महानगरपालिकेला पुढील काळामध्ये उपयोग होण्यासारखा आहे. तरी सदरचा त्यांचा आलेला प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री. अश्विन सोनवणे :-** आमचे पण अनुमोदन आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** सर्वानुमते नामंजुर करावा.

**श्री. नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. ८१ घ्या.

**श्री. चेतन सनकत :-** पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ८० हा सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे. विषय पत्रिकेतील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, रेडक्रॉस इमारतीला लागून असलेली फायनल प्लॉट क्र.१६७ ब मधील १४१२.२ स्क्वेअर मीटर रिकामी जागा इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा,जळगांवला समाजसेवी लोकाभिमुख विविध उपक्रम राबविणेसाठी मिळणेबाबत श्री.विनोद बियाणी,मानद सचिव, इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा,जळगांव यांनी दिलेला अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ३३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव विषय क्रं. ८१:-** प्रभाग क्र.१८ जळगांव-मुंबई हायवे ममता हॉस्पिटल जवळ प्रवेशव्दार उभारुन त्यावर मेहरुणनिसा असे नामकरण करणेबाबत मा.श्री.बागवान रियाज अहेमद अ.करीम, गटनेता,ए.आय.एम.आय.एम व इतर दोन सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदय मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला राजुभाऊ

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय मला बोलायचे आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया मागच्या महासभेमध्ये हा विषय रद्द करण्यात आलेला आहे. तरीही परत हा विषय आलेला आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** तुमचे बहुमत होते म्हणुन तुम्ही नामंजुर केले होते.

**श्री. राजेंद्र पाटील :-** ऐका ना , माझे ऐकुन घ्या आधी

**श्री. ईब्राहीम पटेल :-** बोला भाऊ बोला

**श्री. राजेंद्र पाटील :-** तुम्ही नंतर काय बोलायचे ते बोला नंतर , शहरातील रस्ते असतील, चौक असतील , सार्वजनिक इमारती , बगीचे , विमानतळ असेल , प्रेक्षणीय स्थळे असतील . त्यांना आपण थोर पुरूष , विचारवंत , राष्ट्रसंत , समाजसुधारकांची नांवे देतो . याच कारण असं आहे की या महापुरुषांचे कार्य व त्यांचे विचार जिवंत राहावे व ते पुढील पिढ्यांना माहित व्हावे व त्यांचा पुढील पिढीने आदर्श घ्यावा. हा त्या मागचा उद्देश असतो. मी या सभागृहाला विचारू ईच्छितो सदरचा मेहरून्नीसा नावाचा प्रस्ताव सभागृहासमोर आणलेला आहे. त्यांचा ईतिहास त्यांचे समाजाप्रती असलेले महान कार्य सभागृहातील सन्मा. सदस्यांना माहित आहे का ? आणि सभागृहाला जर माहित नसेल तर ज्यांनी हा प्रस्ताव आणलेला आहे. त्यांनी त्यांचा ईतिहास व त्यांचा समाजाप्रती असलेले कार्य सभागृहाला अवगत करावं.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** करतो , करतो

**मा.महापौर :-** बोला ईबाभाई

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो , महापौर महोदया , सदरील प्रस्ताव हा पास करण्यात यावा. परंतू मागे मी एक सुचना केली होती की हा डीपी रस्ताचा आहे. तर हा येथुन ते ममता हॉस्पीटल ते शेरा चौक पर्यंत अतिक्रमणही काढायचे

आहे आणि जेथे आपण ते गेट उभारणे होते. तिथे साडेतिन मिटर वर जी मार्केटची भिंत आहे अलीकडे म्हणजे तो डिपी रस्ता बघुन

**श्री. राजेंद्र पाटील :-** ईबाभाऊ विषयाशी संबंधित बोला आपण

**श्री. ईब्राहीम पटेल :-** २ मिनिंट राजुभाऊ तोच विषयाशी संबंधित आहे.

**श्री. अश्विन सोनवणे :-** ईतिहास सांगा , त्यांचा काय ईतिहास आहे तो सांगा.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ ईतिहास पण सांगतो. रियाज दो मिनिट रुक जा.

**श्री.चेतन सनकत :-** हॅलो, हॅलो.

**श्री. रियाज बागवान :-** हा , हा भाई

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ भारतातील जे मुगल साम्राज्य होते, औरंगजेब ज्यांच संपुर्ण भारतावरती राज्य होत , त्यांची कन्या मेहरून्नीसा हे मेहरूणला नांव दिले गेले होतं. हा विषय आत्ता आपण ठेवतोय हा असा विषय नाहीये. मेहरून्नीसा या मेहरूण मध्ये मेहरून्नीसा ह्या मेहरूण मध्ये राहीलेल्या आहेत. आपल्याला असे नाही की कोणाचं नांवावर करायच आहे की प्रस्थापीत करायचं आहे. अस काहीही नाही फक्त एका गेटला त्यांच नांव द्यायचं आहे. असेही आपण मेहरूणची बोरं खातोच आहे. आता आमच्या मेहरूणची बोरं प्रसिध्द आहेत जळगांव काय तर भारतात तर असा एक ईतिहास आहे तर अस नाहीये

**श्री. राजेंद्र पाटील :-** ईबाभाऊ तुम्ही , महापौर महोदया

**मा.महापौर :-** बोला राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया , सन्मा. ईबा पटेल यांनी जे सांगीतलं , त्या विषयाची संबंधित विभाग प्रमुखांनी खात्री केली का ?

**श्री. ईब्राहीम पटेल :-** मग मग केला ना

**श्री. अश्विन सोनवणे :-** ईतिहास काय आहे त्यांचा काही राष्ट्रीय कार्य आहे का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांचा ईतिहास काय आहे ?

**श्री. अश्विन सोनवणे :-** ईतिहास काय आहे त्यांचा मागे पण हा विषय झालेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांचा ईतिहास काय आहे ?

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांचे समाजाप्रती काय कार्य आहे ?

**श्री. अश्विन सोनवणे :-** ईतिहास काय आहे भाई

**श्री.राजेंद्र पाटील :-** समाजाप्रती त्यांचे कार्य काय आहे ? ते सांगा.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** समाजहिताचे काय कार्य केले ते सांगा , त्यांच तुम्हाला नांव द्यायच आहे ना

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांच कोणतं महान कार्य आहे की त्याच्यामुळे तुम्ही त्यांच नांव देण्याचं म्हणताहेत ते सांगा.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ बिलकुल , बिलकुल राजुभाऊ शिवाजी महाराजांचा जसा ईतिहास आहे की अफजल खानाचा वध केल्यानंतरही त्यांची जी कबर आहे ती रायगडाच्या खाली त्यांनी ठेवलेली आहे. आम्ही शिवसैनिक आहेत सद्या

**श्री. कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ शिवाजी महाराजांनी कधीही भेदभाव केलेला नाहीये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तो ईतिहास सर्वांना माहिती आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आणि त्यानुसार हा विषय मंजुर करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तो ईतिहास आपण याद ठेवलेला आहे तर मग हा ईतिहास सांगा ना. ज्यांच्याविषयी तुम्ही प्रस्ताव आणला आहे . त्यांच्याविषयी बोला बाकी ईतिहास सभागृहाला माहिती आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** बहुमताने विषय मंजुर झाला जावु द्या.

**श्री. रियाज बागवान :-** महापौर मॅडम ये जो विषय है ये विषय बहुमतसे मंजुर करो.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** बस बस बस

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया आपण खात्री केल्याशिवाय कुठलाही प्रस्ताव असा सभागृहासमोर आणू नये आणि मंजुरही करू नये.
**श्री. रियाज बागवान :-** महापौर मॅडम आपसे ये रिक्वेस्ट है , महापौर महोदया मै आपको ईसकी भुमिका बता रहा हू
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया
**श्री.अश्विन सोनवणे:-** महापौर महोदया
**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी कृपया शांतता ठेवायची आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया
**मा.महापौर :-** हा जो प्रस्ताव मांडलेला आहे . त्यांनी याबद्दल बोलावं.
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया
**मा.महापौर :-** आणि आपण या बद्दलची पार्श्वभुमि सांगावी.
**श्री. कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** रियाजभाई आपण बोला
**श्री. कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम मला या विषयाबद्दल बोलायचे आहे.
**मा.उपमहापौर :-** सन्मा. सदस्य रियाजभाई
**श्री. रियाज बागवान :-** हा हॅलो
**मा.उपमहापौर :-** आपल्याला आवाज येतोय का ?
**श्री. रियाज बागवान :-** हा , हा पहिले की मिटींगमे भी बंटीभाई जोशी ने ईतिहास बताये थे अभी भी उन्होने बताया और अपन ऑलरेडी जो मेहरूण का नाम लेते है वो ईसी वजहसे लेते है की यह नाम दिया हुवा है. ये अपन कुछ नया दे रहे या नया कुछ कर रहे है. राजेंद्र भाऊ ये कुछ नया नाम नही है. या फीर अपन कुछ नया बोल रहे है ऐसा नही है कुछ भी
**श्री.राजेंद्र पाटील :-** मला फक्त हेच म्हणायचे आहे की आपण ईतिहासाचे दाखले देण्यात यावे. तुमच्या कडे आहे का दाखला काही पुरावा देण्यात यावा. उद्याच्या दिवशी तुम्ही आणाल की हे अमुक अमुक आहे आणि या रस्त्याला राजेंद्र घुगे पाटील यांचे नांव देण्यात यावे.
**श्री. रियाज बागवान :-** नही मेहरून्नीसा जो थे वो मेहरूण रखा थो. राजुभाऊ मेहरूण का नाम कहासे आया ?
**श्री.राजेंद्र पाटील :-** वो आप बताईये कहासे आया. हम नही बतायेंगे हमे पता है कहासे आया है. आप बताईये , क्या बाहरके लोग हमको बतायेंगे मेहरूण का ईतिहास
**श्री. रियाज बागवान :-** नही बाहर के लोग कोण
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही आप बताईये हमे
**श्री. रियाज बागवान :-** नही बाहर के लोग कोणसे हो गये अब
**श्री. ईब्राहीम पटेल :-** आम्ही भारतीय आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही आप बताईये हमे हे बघा तुम्ही
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ चुकीच बोलताहेत तुम्ही
**श्री. रियाज बागवान :-** नही राजुभाऊ ऐकुन घ्या. मुझे एक बात बताईये राजुभाऊ
**श्री.राजेंद्र पाटील :-** आम्ही सर्वधर्म समभाव ऐकुन घ्या तुम्ही
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ चुकीच बोलू नका.
**श्री.राजेंद्र पाटील :-** सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की चुकीचे प्रस्ताव सभागृहामध्ये आणू नका
**श्री. रियाज बागवान :-** नही राजुभाऊ
**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना तुमच्या माहितीसाठी मेहरूणमध्ये सर्वे नं.२१ , सर्वे नं. १२१ येथे राम नगर आहे तिथे सर्व हिंदु लोक राहात होते . त्याला राम नगर नांव दिलेल होत.
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ
**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका तुम्ही थांबा , तिथे काही मुस्लिम बांधव राहायला आले त्यांनी राम नगरच त्यांनी राम रहिम नगर केलं. थोड्या दिवसांनी मला अस वाटत .
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ मेरी बात तो सुन लो
**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना राम रहिम नगरच उद्याच्या दिवशी राम रहिम नगरच फक्त रहिम नगर केल जाईल.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ नाही नाही तस नाही .राम रहिम नगर आहे ना उलट चांगले आहे ना
**श्री.राजेंद्र पाटील :-** हे बघा तुम्ही त्या मेहरूण गावामध्ये सुखी , सर्व एकोप्याने नांदताहेत. त्याला आपण गालबोट लावायचं कुठलही काम करू नका आणि विवादीत विषय सभागृहासमोर आणू नका.
**श्री. रियाज बागवान :-** ये विवादित विषय नही है राजुभाऊ ,
**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही नाही मी तुम्हाला सांगेल
**श्री. रियाज बागवान :-** विवादित विषय
**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना तुम्हाला नांवच द्यायचे आहे तर भारतरत्न मिसाईल मॅन आपले मा. अब्दुलजी कलाम यांच नांव द्या. मा. एपीजे अब्दुल कलाम साहेब यांच नांव देण्यात याव . आमचा सर्वांचा पाठींबा आहे याला.
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ ये जो अपने गांव का नाम है ना मेहरूण
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ ऐकून घ्याना तुम्ही
**श्री.राजेंद्र पाटील :-** तुम्ही
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ आपण पहिले पासुन पाहाता आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** तुम्ही मुळातच ऐका ना ऐका.
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ डॉ.एपीजे अब्दुल कलाम जी नाम देणेका और ईनका नाम देणेका अपन खाली नाम के लिये ईतना कर ही नही रहे है
**श्री.राजेंद्र पाटील :-** तुम्ही मुळातच
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ जो अपनी आयडेंटीटी है जो अपने गांव का पहचान है ऑलरेडी मेहरूण की जो पहचान है. वही अपन देने का चाह रहे है.
**श्री.राजेंद्र पाटील :-** वो पहचान , वो
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ ऑलरेडी जो अपना मेहरूण गांव का नाम है वही तो है.
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही वो पहचान है ही नही आप पहचान करवा रहे है उसकी
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ नही नही
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही वो पहचान
**श्री. रियाज बागवान :-** मेहरूण गांव के नाम के उपरसे अपन
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही आपके पास कुछ पुरावा है तो पुरावा दिजीये उसके बाद करे
**श्री. ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ तुमच्या घराचा उतारा पुरावा पुरवुन देईल.
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरांना माझी विनंती आहे.
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ
**श्री.राजेंद्र पाटील :-** याचा पुरावा दिल्याशिवाय याला मान्यता देण्यात येवू नये.
**श्री. रियाज बागवान :-** राजुभाऊ एक मिनिटं मेरी बात तो सुनो
**श्री.राजेंद्र पाटील :-** नही नही मागच्या सभेतच विषय मांडलेला आहे मी
**श्री. रियाज बागवान :-** एक मिनिटं मेरी बात तो सुनो राजुभाऊ
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम
**श्री. रियाज बागवान :-** एक मिनिटं मेरी बात तो सुनो राजुभाऊ मागच्या सभेमध्ये पण आप बोल रहे है की राम नगर को रहिम नगर कर लिये , ईसके अंदर गणेश पुरी भी है.
**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब
**श्री. रियाज बागवान :-** गणेश पुरी को आज भी गणेश पुरी के नाम से ही पहचाना जाता है.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय
**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या.
**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदया बहुमताने करण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया मला या विषयावर बोलायचे आहे.

**श्री. रियाज बागवान :-** महापौर मॅडम हमारी इतनी रिक्वेस्ट है. बहुमतसे ये पारीत करो

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** कैलासआप्पा आपण बोलायच आहे . बाकीच्या सन्मा.सदस्यांनी शांतता राखयची आहे. कैलासआप्पा आपण बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो बोलतो बोलतो, महापौर महोदया आज ईबाभाईंनी जो विषय मांडलेला आहे .माझ्या माहितीप्रमाणे हे मेहरूण गांव हे नांव मिनाकुमारीच होत, आणि ती पण वारली. राहिला दुसरा विषय, आज ईबाभाईं इतिहास सांगितला, मला फार काही समजले आहे त्याच्या मध्ये की ती औरंगजेबाची मुलगी होती आणि ज्यांना औरंगजेबाचं भारतावरती राज्य होत आणि तो ईथला सम्राट होता. याचा अभिमान अभिमान वाटत असेल.

**मा.महापौर :-** कैलासआप्पा आपण माईक ऑन करा आपला

**श्री.राजेंद्र पाटील :-** आप्पा माईक ऑन करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि ज्यांना वाटत असेल की औरंगजेब , महापौर साहेब मला याच्या माहिती प्रमाणे एक ईतिहास माहीती पडला .

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा मला दु:ख जाणवतय आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** हो

**श्री.अनंत जोशी :-** आप्पासाहेब मला दु:ख जाणवतय आप्पासाहेब तुम्ही सिनेमा प्रेमी आहेत आणि तुम्ही स्वत: सिनेमाप्रेमी आहात तर तुमचं असं बोलण मला नाही आवडले.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो , हो

**श्री.अनंत जोशी :-** मला दु:ख

**श्री.कैलास सोनवणे :-** माझा विषय असा आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मिनाकुमारी फार मोठ्या अभिनेत्री होत्या त्यांच्याबद्दल असं बोलणं योग्य नाही

**श्री.कैलास सोनवणे :-** हो त्या अभिनेत्री होत्या मान्य आहे. मी माझे शब्द मागे घेतो बंटीभाऊ, येथे ईबाभाईंनी औरगजेबाचा ईतिहास सांगीतला की हा पुर्वी सम्राट होता आणि ज्याला अस वाटत असेल आणि ज्याला याच्यामध्ये एकदम खुशी होत असेल की तो भारताचा सम्राट होता. त्याने त्याच्या कबरीवर जावुन दिवसरात्र झोपला तरी आमची काही हरकत नाहीये. जाव त्याने खुशाल जावं.

**श्री. ईब्राहीम पटेल:-** आप्पा मला दबाव टाकुन सांगण्यात आलेला आहे हा सगळा ईतिहास

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही म्हणजे दबावामध्ये बोलताहेत म्हणजे तुम्ही

**श्री. ईब्राहीम पटेल:-** आप्पा बरोबर आहे की नाही आणि ज्या

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही हा ठिक आहे

**श्री. ईब्राहीम पटेल:-** जे मला माहिती आहे सांगीतले स्वत:हुन आप्पा मला काही कोणी सांगीतले नाही.

**श्री. नितीन बरडे:-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ऐकुन घ्या आमच्या संभाजी महाराजांच्या

**श्री.अश्विन सोनवणे :-** शिवाजी महाराजांचे ठेवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईथले जे असतील संभाजी महाराजांचे नांव टाकतील आणि ज्यांना लागत असेल जो हा विषय मंजुर करत असेल त्यांनी हा विषय मंजुर करावा. आमचा या विषयाला विरोध आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** विरोध आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि राहीला विषय तर मग संभाजी महाराजांचा वध कसा केला ते पण सांगतो. त्यांचे जे मित्र होते . कविकलश म्हणजे समोर बनाव केला की याची चामडी काढायची म्हणजे संभाजी महाराजांना त्याची जाणीव करून द्यायची की पहा किती त्रास होईल तुला त्याचे डोळे काढायचे आणि नंतर संभाजी महाराजांचे डोळे काढायचे. अशा प्रकारे अनैतिक छळ करून असा प्रयोग करून त्याने आमच्या महाराजांचा जिव घेतला आणि याच भुषण या सदस्यांना वाटत असेल तर याच्या सारखी लाजीरवाणी बाब कोणतीच नाही. आमचा या गोष्टीला विरोध आहे. ज्यांना द्यायचे आहे याचे समर्थन त्यांनी बिनधास्त द्यायचं आणि आमच काही म्हणणं नाहीये. आमच म्हणणं ऐवढे आहे की डॉ. ऐपीजे अब्दुल कलाम यांच नांव द्यावं त्याला मिसाईल मॅन यांच आम्हाला अभिमान आहे. एका देशभक्ताच नांव दिले जाईल. करा आता काय करायचं आहे ते.

**श्री.दिलीप पोकळे :-** सदरच्या प्रस्तावाचे छाननी करून पुढील निर्णय घेण्यात यावा.

**श्री. नितीन बरडे:-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या.
**श्री.दिलीप पोकळे :-** सदरच्या प्रस्तावाची छाननी करा त्याच्यानंतर निर्णय घ्यावा याच्यावर
**श्री.कैलास सोनवणे :-** तेच सांगतोय मी याच्या विषयी
**मा.महापौर :-** सदरचा विषय हा तहकुब ठेवण्यात येत आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.नितीन बरडे:-** तुम्ही पण कुठल्या कुठे मांडताहेत विषय ईबाभाई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदर विषयाबाबत सभागृहात बऱ्याच सदस्यांनी चर्चा केली व त्या चर्चेच्या अनुषंगाने प्रशासनाने सदर प्रस्तावाची छाननी करुन प्रस्ताव सादर करावा तोपावेतो सदरचा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- २९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव विषय क्रं. ८२ :-** महासभा ठराव क्र.४२९ दि.२६/०२/२०२१ च्या हद्दीवाढ प्रस्तावाबाबतचा ठराव झालेला असुन त्याअनुषंगाने आव्हाणे शिवार मधिल २० एकर जागा मुस्लिम कब्रस्थानास आरक्षित करुन तसा ठराव करुन शासनास पाठविणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.चेतन सनकत :-** माईक बंद करावे , कृपया सर्वांनी माईक बंद करावे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मंजुर करण्यात यावा.
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे. माझे अनुमोदन आहे.
**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.
**श्री.सुनिल खडके :-** गट नंबर कुठले आहेत मला बोलायचे आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मलाही बोलायच आहे.
**श्री.सुनिल खडके :-** महापौरताई मला बोलायच आहे.
**मा.महापौर :-** सुनिलभाऊ बोला
**श्री.सुनिल खडके :-** महापौरताई आता हा जो विषय सांगीतला हा आव्हाणे शिवारातील तर याचे गट नंबर कुठले आहेत. विषयातील गट नंबर कुठले कुठले आहेत. ते पहिले दाखवावे.
**श्री.नितीन लढ्ढा:-** माझ काय म्हणण आहे सुनिलभाऊ
**श्री.सुनिल खडके :-** हो भाऊ
**श्री.नितीन लढ्ढा:-** हा जो प्रस्ताव आहे ना हा परिपुर्ण प्रस्ताव नाहीये , याच्यामुळे प्रशासनाने परिपुर्ण प्रस्ताव तयार करावा आणि परिपुर्ण आल्यानंतर त्याची वस्तुस्थिती काय आहे . असे मोघम स्वरूपाचे प्रस्ताव आणुन संभ्रम निर्माण होईल.
**श्री.अश्विन सोनवणे :-** तहकुब करण्यात यावा. तहकुब करा.
**श्री.सुनिल खडके :-** तहकुब करा.
**श्री.नितीन लढ्ढा:-** आणि शेतकऱ्याचं ही नुकसान होईल
**श्री.सुनिल खडके :-** तहकुब करा हा विषय
**श्री.कैलास सोनवणे :-** तहकुब करा हा विषय.
**श्री.सुनिल खडके :-** तहकुब करा हा विषय महापौरताई हा विषय तहकुब करा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई हा विषय तहकुब करा आणि पुढचा विषय घ्या महापौरताई
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब
**श्री.नितीन लढ्ढा:-** हा विषय तहकुब करावा आणि प्रशासनाने परिपुर्ण प्रस्ताव सादर करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** विकास आराखड्याशी सुसंगत असा प्रस्ताव सादर करावा.

**श्री.नितीन लढ्ढा:-** योग्य आहे , योग्य आहे. आप्पा योग्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो हो ठिक आहे.

**मा.महापौर :-** सदरील विषय हा तहकुब करण्यात येत आहे. विषय पत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रशासनाने आव्हाणे शिवारात मुस्लिम कब्रस्थानाकरिता जागा आरक्षित करणे संदर्भात परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन महासभेपूढे सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- २७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव विषय क्रं. ८३ :-** जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत होणाऱ्या विकास कामांसंदर्भात करावयाच्या ठराव व जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत नेहमी होत असलेल्या विकास कामांच्या निविदा काढणे व त्या स्विकारण्याबाबतचे धोरण ठरविण्याबाबत मा.श्री.सुनिल सुपडू महाजन, विरोधी पक्षनेता यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** या संदर्भात अश्या टिप्पण्या मांडण्यात येत आहे की , उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम विभागात वेळोवेळी प्रकाशित होणारे शासन निर्णय , शासन परिपत्रके या अन्वये कार्यपध्दतीने निविदा प्रक्रीया राबविण्यात येतो आहे. मात्र जळगांव शहर महानगरपालिकेत सार्वजनिक बांधकाम विभागातील मॅन्युअल अद्यावत शासन निर्णय , परिपत्रके या प्रमाणे निविदा प्रक्रीया राबविण्यात येत नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच काही शासन निर्णय व परिपत्रके यांचा सोईप्रमाणे अंर्तभाव करण्यात येतो. तर काहींचा अंर्तभाव करण्यात येत नाही. तरी आपणांस सुचित करण्यात येते की, उपरोक्त कामात सुसुत्रता येणेकामी शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले शासन निर्णय , परिपत्रके तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मॅन्युअल कार्यपध्दतीत सुधारणा करून निविदा प्रक्रीया , निविदा संख्या यामध्ये या कार्यपध्दतीचा अवलंब होईपावेतो पुढील निविदा प्रक्रीया राबविणे तसेच उपरोक्त निविदा प्रक्रीयेचा कार्यपध्दतीत अवलंब केलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर अहवाल ईकडेस सादर करण्यात यावा. तसेच आपण बघतोय की मागील काही दिवसांपासुन कालावधी मध्ये राबविण्यात आलेल्या विकास कामांच्या निविदा प्रक्रीयेमध्ये असंख्य तक्रारी मा.महापौर यांचेकडे प्राप्त झालेल्या असुन त्या तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती दखल घेवुन ज्या काही निविदा प्रक्रीया चुकीच्या पध्दतीने मंजुर करण्यात आलेली असेल त्या चुकीच्या पध्दतीने मंजुर करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीया तातडीने रद्द करून नव्याने निविदा प्रक्रीया राबविण्याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.

**श्री.नितीन बरडे :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला एक सुचना मांडायची आहे महापौरताई

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला प्रशासनाला एक सांगायचे आहे की धुळे मनपाने शासनाच्या अटी शर्तीप्रमाणे कर्मचाऱ्यांना सातवा वेत आयोग लागू करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे जळगांव मनपा कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करणेस हरकत नाहीये. तरी याची प्रशासनाने दखल घ्यावी. १२ नंबरच्या विषयामध्ये प्रशासनाने सांगीतले की स्वच्छ भारत अभियानासाठी पुर्ण महापालिकेंनी डिपीआर दुरूस्ती साठी पाठविलेला आहे. त्याच आपल्या आयुक्त साहेबांना त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांचा जसा धुळे मनपाने अवलंब केलेला आहे. त्या अटी शर्तीना अधिन राहून कर्मचाऱ्यांना सातवे वेतन लागू करण्यात यावं. दुसरा विषय कर्मचाऱ्यांचे मागील महागाई भत्ते बाकी आहेत. ते अदायगी करण्यात यावे. महापौरताई आपण आदेश करावा प्रशासनाला.

**नगरसचिव :-** ८३ नंबरचा ठराव सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** भारतीय जनता पार्टी म्हणुन विरोध आहे. ८३ नंबरला

**मा.महापौर :-** सदरील विषय हा बहुमताने

**श्री.नितीन बरडे :-** बहुमताने मंजुर करा.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई
**मा.महापौर :-** सदरील विषय हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.
**श्री.नितीन बरडे :-** महापौरसाहेब मला बोलायच आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई , महापौरताई
**श्री.दिलीप पोकळे :-** विषयपत्रिकेवरील पुढचा विषय घ्या जादा विषय
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई ,
**श्री.नितीन बरडे :-** महापौरसाहेब मला बोलायच आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** एक मिनिंट शिवाजी नगर उड्डाणपुलाचा विषय आहे ना
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई ,
**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ आपल्या सर्व सुचनांची प्रशासनाने नोंद घेतली आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई , धुळे महापालिकेने लावला आहे त्यासाठीच बोलतोय.
**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई हा जो विषय आहे शिवाजी नगर उड्डाणपुला संदर्भातील ईलेक्ट्रीक पोल स्थलांतरीत करण्यासंदर्भातला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका विविध विभागाव्दारे निविदा प्रक्रिया राबविण्यात येते. ती सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या निविदा प्रक्रियेनुसारच राबविण्यात येते. मात्र त्या निविदा अटी शर्तीमध्ये जे नियम सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत त्यातील काही अटी शर्तीची पायमल्ली होत आहे असे दिसून येते. त्याकरीता महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्रकाशित होणारे शासन निर्णय, शासनपरिपत्रके यान्वये कार्यपध्दतीप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी त्यात प्रामुख्याने निविदाधारकाने त्याच्या आर्थिक स्थैर्यता (बीड कॅपिसिटी) म्हणजे त्यांचे कडून झेपवतील एवढयाच रक्कमेचे काम करुन घेणे व ते पुर्ण करावे. आपल्या जळगांव शहर महानगरपालिकेत सदयस्थितीत एकच मक्तेदार या असंख्य कामे अंदाजित रक्कमेपेक्षा खुप कमी दराने घेवुन ठेवतात व ती पुर्ण करण्यास दिलेल्यामुदती पेक्षा जास्त वेळ लागते. परिणामी निधीतील कामे होण्यास विलंब होतो तसेच कामांना विलंब झाल्यामुळे वेळोवेळी जिल्हाधिकारी यांचेकडेस मुदत वाढ घ्यावी लागते. मागील काही कालावधीत अश्या बऱ्याच कामांसाठी खर्चास मुदतवाढ घेणे करीता वेळोवेळी शासनाकडेस सुध्दा पाठपुरावा करावा लागतो व अनेक अडचणींना स्थानिक प्रशासनास समोरे जावे लागते. त्याकरीता निविदा प्रक्रियेतील निविदा संचामध्ये आवश्यक तो बदल अदयावत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रक्रियानुसार करुनच नविन निविदा प्रक्रिया राबविली पाहीजे व उपरोक्त नमुद कामी सुसूत्रता येणेसाठी शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यपध्दतीप्रमाणे सुधारणा करुन निविदा प्रक्रिया, निविदा संच या कार्यपध्दतीचा अवलंब होईपावेतो पुढील निविदा प्रक्रिया राबविण्यात येवु नये.

तसेच यापुर्वी निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होवुन कार्यादेश प्राप्त करुन सुध्दा मुदतीत कामे पुर्ण केली नाही. अश्या निविदाधारकांना पुढील निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही तसेच निविदाधारक/मक्तेदार झालेले काम पुर्ण दाखला / काम सुरु असलेल्या कामांचा दाखला तसेच ते स्वत: किती रक्कमेचे कामे करु शकतात याची शाश्र्वती व इतर आवश्यक कागदपत्रे निविदा समितीकडून छाननी करुन आयुक्त,मनपा,जळगांव यांच्या स्वाक्षरीचा दाखला संबंधीतांनी प्राप्त केल्याखेरीज कोणतीही निविदा भरता येणार नाही व भरल्यास निविदाधारकांना त्या प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल.

तसेच मागील काही कालावधीत राबविण्यात आलेल्या विकास कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये असंख्य तक्रारी मा.महापौर यांचेकडेस प्राप्त झालेल्या असून त्या तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती दखल घेवुन झालेल्या निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेची दक्षता घ्यावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- १६** **प्रतिकुल मते :- १०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव आयत्या वेळेचा विषय क्रं. ८४:-** हो याच्यात मा. आयुक्त महोदय यांच्या मार्फत तातडीने विषय घेण्याबाबत एक प्रस्ताव प्राप्त झालेला आहे आणि सदरचा आयत्या वेळेचा विषय घेण्याबाबत मा.महापौर महोदया यांचे निर्देश झाल्यानुसार प्रशासकीय प्रस्ताव पुढील प्रमाणे :- शास्त्री टॉवर चौकाकडुन शिवाजी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील रेल्वे ओव्हर ब्रिजच्या दोन्ही बाजुच्या म्हणजेच शास्त्री टॉवर तथा जिल्हा परिषद कार्यालयाकडील जोड रस्त्यावरील व शिवाजी नगर भागातील जोड रस्त्यावरील महावितरण कंपनी मर्याच्या उच्च दाबाची/लघु दाबाची वीज वाहीनी स्थलांतरीत करणे, खर्च रक्कम रु.१५० लक्ष मात्रचे काम महानगरपालिका स्व निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई हा सदरील प्रस्ताव हा तातडीने मान्य करण्यात यावा आणि याप्रस्तावाचे वाचन करून ईतिवृत्त सुध्दा कायम करण्यात यावे आणि तातडीने या प्रस्तावाची दखल घेवुन हा १.५० कोटींचा निधी हा महावितरण कडे वर्ग करण्यात यावा. जेणेकरून सदरचा पुल व रस्त्याचे काम मार्गी लागेल. त्यामुळे या पध्दतीने महावितरण कडे निधी वर्ग केल्यानंतर त्यांना तातडीने कार्यादेश देवुन त्याबाबत दक्षता घेण्यात यावी. अशी विनंती आहे.

**श्री.नितीन बरडे :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेचे तंतोतंत पालन करून लवकरात लवकर करण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई मला बोलायचे आहे या विषयावर

**मा.महापौर :-** प्रशासनाकडून आलेल्या आयत्या वेळेच्या विषय हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे ना हा विषय ?

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई

**श्री.दिलीप पोकळे :-** हो सर्वानुमते मंजुर आहे.

**नगरसचिव :-** हो

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब एक मिनिंट मला बोलायचे आहे

**नगरसचिव :-** राजुभाऊ , आदरणिय राजुभाऊ

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे ना हा विषय ?

**श्री.दिलीप पोकळे :-** मंजुर आहे  सर्वानुमते मंजुर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब एक मिनिंट मला बोलायचे आहे , महापौर साहेब , महापौर साहेब शेवटचा एकच मिनिंट

**नगरसचिव :-** राजुभाऊ सर्वानुमते आहे ना हा

**श्री.नितीन बरडे :-** हो हो सर्वानुमते

**श्री.राजेंद्र पाटील:-** त्यातील ऐकायला आले नाही गोराणेसाहेब काय आहे विषय

**नगरसचिव :-** मी सकाळी दिले ना भाऊ तुम्हाला दिले ना

**श्री.राजेंद्र पाटील:-** नाही नाही

**श्री.नितीन बरडे :-** शिवाजी नगरच्या उड्डाणपुलासाठी विद्युत पोलांसाठी महापालिकेचे दिड कोटी रूपये द्यायचे आहे. त्याचा विषय आहे.

**श्री.राजेंद्र पाटील:-** हो

**नगरसचिव :-** स्टँडीग कमिटी मिटींगमध्ये पण विषय झाला ना

**श्री.नितीन बरडे :-** ते दिले ना तर काम लवकर होईल.

**श्री.राजेंद्र पाटील:-** हो हरकत नाही , द्यायला हरकत नाही.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे ना हा

**श्री.राजेंद्र पाटील:-** मंजुर आहे, मंजुर

**श्री.नितीन बरडे :-** गोराणेसाहेब एक मिनिंट बोलायचे आहे फक्त हा , महापौरसाहेब आयुक्तांचाच विषय आहे माझा

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक मिनिंट हा महापौरताई याच्याबाबत प्रशासनाने हा जो प्रस्ताव दिलेला आहे आणि पुलाविषयी जो प्रस्ताव ठेवलेला आहे . आणि यापुर्वी जी आपण सभागृहात चर्चा केलेली आहे. त्या अनुषंगाने मी एक प्रस्ताव मांडतो की दिनांक ०४ मे २०१७ रोजीचा महाराष्ट्र शासन , सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रं. रस्ते विकास योजना २०१७ / प्रकरण क्रं. २५/ नियोजन-२ या पध्दतीने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने जो निर्णय घेतलेला होता. तो राज्य शासना निर्णय अत्यंत स्वंयस्पष्ट आह दे. तो संदर्भ क्रं. १ किंवा मग शासन निर्णय क्रं. रस्ते विकास योजना २०१७/ प्रकरण क्रं. २५/ नियोजन-२ दि.३१/०३/२०२७ म्हणजे या दि.३१/०३/२०२७ पर्यंत हे रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात होते आणि महानगरपालिकेकडे हस्तांतरण केलेले होते. परंतू ४ मे २०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने हे रस्ते ३१/०३/२०१७ चे शासन निर्णयाने रद्द करण्यात आलेले आहे. आता यापुढे संबंधित रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरूस्ती साठी ताब्यात राहतील असा नव्याने शासन निर्णय ०४ मे २०१७ रोजी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतलेला असल्या कारणाने सदरहू रस्त्याची मालकी ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने आता सदरहू या पुलाचे काम जे सुरू आहे. ते सुध्दा राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन त्याची निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली आहे. रस्ते व उड्डाणपुलाचे काम जे आहे. ते सुध्दा राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्यांच्या अखत्यारीत सुरू आहे आणि त्यामुळे याच्या संदर्भात अडथळा निर्माण होणारे पोल, जे ईलेक्ट्रिक पोल आहेत. ते सुध्दा काढण्याची जबाबदारी पर्यायाने राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडेच येत असल्याकारणाने या संदर्भातील या सभागृह असे धोरण ठरवते की या संदर्भात राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागालाच विनंती करण्यात यावी ठरावात नोंद करावी की या रस्त्यांची मालकी आपल्याकडे असल्याकारणाने या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती ही सुध्दा आपल्या अखत्यारित असल्याकारणाने व नविन उड्डाण पुलाचे कामसुध्दा त्यांच्याच विभागाच्या माध्यमातुन सुरू असल्या कारणाने पोल स्थलांतरीत करण्याची जबाबदारी पर्यायाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडेच येत असल्याने ही संपुर्ण प्रक्रीया जी आहे. ही संपुर्ण सार्वजनिक बांधकाम विभागाने राबवावी. अशा पध्दतीचा ठराव करून आणि त्या ठरावाला त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. हा ठराव करून त्यांना या संपुर्ण शासन निर्णयाच्या बाबतीतील माहिती या ठरावान्वये ही सार्वजनिक बांधकाम विभागाला अवगत करण्यात यावी मा. जिल्हाधिकारी महोदयांना या संदर्भात विनंती करण्यात येत आहे की, या संदर्भातील जो शासन निर्णय आहे . सार्वजनिक बांधकाम विभागाचा आणि त्यांची या शासन निर्णयान्वये असलेली जबाबदारी मा. पालकमंत्री महोदयांनाही विनंती करण्यात येत आहे. आणि मा. जिल्हाधिकारी महोदयांनाही विनंती करण्यात येत आहे आणि त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाला सुध्दा विनंती करण्यात येत आहे की त्यांनी तातडीने जळगांव शहरातील हा शिवाजी नगर वासीयांचा आणि त्याला पर्यायाने संपुर्ण लागुन असलेले खेडे कानळदा असेल , नांद्रा असेल, भोकर असेल , भादली असेल जे काही तमाम खेडी याला लागुन असलेल्या नागरीकांची याच्यामुळे जी गैरसोय होतेय ती गैरसोय दुर होण्याच्या दृष्टीकोनातुन आपल्या परिने तातडीने या निर्णयाची अंमलबजावणी करून महावितरणकडे व सार्वजनिक बांधकाम विभागाने तो निधी हस्तांतरीत करण्यात यावा. आणि या विषयाला मान्यता देण्यात यावी. ही मागणी या ठरावाच्या अनुषंगाने करण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ मला एक गोष्ट लक्षात नाही आली की , मला दोन मिनिंट बोलायचे आहे , मला एक गोष्ट लक्षात नाही आली की , दिड कोटी रूपयांचा निधी आपण आता वर्ग करायचा म्हणतोय हा जो प्रस्ताव आहे आलेला जादा विषय आहे त्याच काय ? म्हणजे आपणं असं म्हणतोय का ? की हा जो निधी आपल्याला लागणार आहे तो आपल्याला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घ्यायचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा निधी संपुर्णत: कायदेशीररित्या वर्ग करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याकारणाने मनपा निधीतुन दिड कोटी रूपये खर्च करणे हा जड लागू होईल.

**श्री.दिलीप पोकळे :-** अच्छा हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे ही जबाबदारी शासनाची

**श्री.दिलीप पोकळे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-**शासन निर्णयाचा अभ्यास केला असता की सार्वजनिक बांधकाम विभागानेच हा निधी खर्च करावा. अशी एक अपेक्षा आपण या निवदेनाद्वारे करतोय.

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ मला फक्त ती गोष्ट आयुक्त साहेबांना विचारायची आहे.हा जळगांव महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असलेला पुल हा आमच्या प्रभाग क्रं. १ , २ , ३ च्या साठी त्या प्रभागातील लोकांसाठी अत्यंत निकडीचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मग आयुक्त साहेबांनी याच्यापुर्वी का विलंब केला या विषयाचा पाठपुरावा का नाही केला  मग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रशासन म्हणुन त्यांनी पाठपुरावा का नाही केला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** वकील साहेब आजच्या शासन निर्णयाच्या मी म्हणलेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रशासनाला ती बाब आत्ता निदर्शनाला आलेली आहे आणि त्याच्यामध्ये पुनश्च कायदेशीर अडचणी निर्माण होवू नये. म्हणुन आपल्याला वाटते की हा निर्णय आपण या सभागृहाने मान्य करून तो सार्वजनिक बांधकाम विभागाला अवगत करण्यात यावा. तसेच आपण या अनुषंगाने मा.नामदार. पालकमंत्री गुलाबरावजी पाटील महोदय , जळगांव यांना सुध्दा विनंती करूया की त्या पुलावर पोल शिफ्टिंगवर होणारा खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभागाने खर्च करण्यात यावा. त्याच पध्दतीने हे जे २० किलोमिटरचे रस्ते जे आपण प्रस्तावित केलेले आहे. याच्या बाबतीत सुध्दा मा.नामदार गुलाबभाऊ पाटील यांना विनंती करूया कि या रस्त्यांचे विषय सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाच्याच माध्यमातुन ती कामे मार्गी लावण्यात यावे. जेणेकरून महानगरपालिकेच्या निधीची बचत होईल आणि कायदेशीर ती जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाचीच असल्याकारणाने ही मागणी त्यांच्याकडे लावुन धरणे आणि त्याचा पाठपुरावा करण्याच्या संदर्भात पालकमंत्री महोदय यांना विनंती करणे एवढ्याच दोन गोष्टी मला वाटतं . आजच्या गोष्टीला कायद्याच्या दृष्टीकोनातुन सुसंगत राहातील

**श्री.दिलीप पोकळे :-** ठिक आहे भाऊ या गोष्टीला धरून आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की जळगांव महानगरपालिकेला वेगवेगळ्या डिपार्टमेंटला जे वेळोवेळी शासन निर्णय प्राप्त होतात किंवा आदेश प्राप्त होतात. त्याची इंतभुत माहिती वेळोवेळी सदस्यांना त्यांनी द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई या सुचनेच्या अनुषंगाने आपण मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आपण आपला घेतलेला निर्णय त्यांना अवगत करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदरील विषय हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई मला बोलायचे आहे. महापौर साहेब , महापौर साहेब दोनच मिनिंट

**मा.महापौर :-** नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून प्रशासनाने या संदर्भात कार्यवाही करून हा सुधारीत असा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर मॅडम एकच मिनिंट घेतो , महापौरसाहेब

**मा.महापौर :-** बोला नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई नितीनभाऊंचा काय विषय आहे तो एकदा ऐकुन घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आपण गेल्या पाच सहा महिन्यांपुर्वी भारतीताई सोनवणे या महापौर असतांना एक ठराव केलेला होता , दुध केंद्रांचा त्या दुध केंद्रांच्या ठराव झालेल्या किती जणांना परवानगी मिळालेली आहे ?  किती केंद्रांना परवानगी मिळाली आहे.

**मा.आयुक्त :-** रस्त्यावरच्या जागा दुध केंद्रांना देण्याबाबत यापुर्वी काही ठराव झालेले होते. ते आता राज्य शासनाने रद्द केलेत की हे नियमाला धरून नाहीत. रस्त्यापैकी जागा व्यवसायासाठी देता येत नाही. असे राज्य शासनाने कलम ४५१ खाली पुर्वीचे ठराव रद्द केल्यामुळे नविन ठरावाची अंमलबजावणी आपल्याला करता येणार नाही. त्यामुळे जरी महासभेने ठराव केलेले असले. तरी दुधसंघाच्या जागेसाठी आपण शासनाच्या आदेशा प्रमाणे जागा आपण देवू शकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** नाही साहेब पण जळगांवमध्ये काही ठिकाणी दुध केंद्र पडलेले आहेत शहरात

**मा.आयुक्त :-** नाही जर कुणी अतिक्रमण केले असेल तर अतिक्रमण विभागामार्फत याची दखल घेवू आणि आता आपण त्याच्यावर कारवाई करू.

**श्री.नितीन बरडे :-** ते चेक करायला लावा साहेब शहरात पुर्ण

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शास्त्री टॉवर चौकाकडुन शिवाजी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील रेल्वे ओव्हर ब्रिजच्या दोन्ही बाजुच्या म्हणजेच शास्त्री टॉवर तथा जिल्हा परिषद कार्यालयाकडील जोड रस्त्यावरील व शिवाजी नगर भागातील जोड रस्त्यावरील महावितरण कंपनी मर्याच्या उच्च दाबाची/लघु दाबाची वीज वाहीनी स्थलांतरीत करणे, खर्च रक्कम रु.१५० लक्ष मात्रचे काम महानगरपालिका स्व निधीतून करणेबाबतचा प्रस्ताव महासभेत आयत्यावेळी प्रशासनाने सादर केला असून यावर सभागृहात सविस्तर चर्चा होवून शासन निर्णय क्र.रवियो-२०१७/प्र.क्र.२५/नियोजन-२ मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक ०४ मे २०१७ अन्वये सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग जळगांव यांचेकडेस सुधारणा, दुरुस्ती व देखभालीसाठी वर्ग करण्यात आलेला असल्यामुळे म.न.पा.चा स्वनिधी वर्ग करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त कारणास्तव विज वाहीनी स्थलांतरीत करणे व त्यासाठी रु.१५० लक्ष मात्रचे काम महानगरपालिका स्वनिधीतून करणे बाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- २५ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**
**(जयश्री सुनिल महाजन)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**